
# परिसस्पर्श



म.ग्रं सं. ठाणे
विषय : भू-प्रवास
सं क्र : ७५०

REFBK-0026953

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
श्रू-प्रवास
दा. क्र. ८५०
२६९५६
२२१५१३
शाखा (प्रधान क्र.)

संदर्भ
श्रू-प्रवास
८५०
२६९५६
२२१५१३

## मराठी ग्रथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 28 JUL 1993 | 18 SEP 1993 |
| 11 AUG 1993 | 18 SEP 1993 |
| 17 AUG 1993 | 22 SEP 1993 |
| 18 AUG 1993 | 29 SEP 1993 |
| 11 SEP 1993 | 18 MAY 1994 |
| 6 JUN 1998 | 30 AUG 1995 |
| | (क्र. मा. पहा) |
| | ९३०१६१० |

# परिसस्पर्श

रमेश मत्री

REFBK-0026953

अनुभव प्रकाशन

प्रकाशक
राजेंद्र मत्री
अनुभव प्रकाशन,
श्रीधर, हनुमान रस्ता
विलेपार्ले (पूर्व)
मुबई ५७

© रमेश मत्री

१ मार्च १९९३

टाईपसेटिंग
टायपो आर्टस
१४८१ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

मुद्रक
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि बापट
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११०३०

मूल्य ६० रु

# अनुक्रम


१ जीवनाचा परिसस्पर्श ५

२ पॅरिसची नाट्यगृहे १४

३ हे विमान फिरते नभातरी ३२

४ अन्नासाठी दाहिदिशा फिरण्यातील मौज ५१

५ जग हे आगगाड्यांचे ६१

६ हॉटेल विश्वातील फेरफटका ७८

७ राणीचा बाग ९३

८ पाच शहराच्या पाच तऱ्हा ११२

विद्वत्ता आणि रसिकता
यांचा मधुर संगम
श्री. राम शेवाळकर
याना...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# ९ / जीवनाचा परीसस्पर्श

पॅरीस हे पृथ्वीच्या पाठीवरील असे एकमेव शहर आहे की जेथे चोवीस तासांत दोन दिवस उगवतात  पहिला दिवस सकाळी सहाला सुरू होतो, दुसरा संध्याकाळी सहाला  रसिकता, जीवनातील आनद, काव्यात्मकता, सौंदर्य, बौद्धिक विलास अशा सर्व बाबतीत या दोन दिवसाची विलक्षण चैतन्यशील अशी स्पर्धा असते  हे शहर खानदानी आहे आणि थिल्लरही आहे  धीरगभीर आहे आणि चावटही आहे  श्रम करणारे आहे आणि विलास भोगणारेही आहे  नवे विचार माडून जगाला दीपवणारे आहे आणि हजारो वर्षांच्या जुन्या श्रद्धा व समजुती उराशी बाळगणारे आहे  नोत्रदेम चर्चसारखे अतिभव्यही आहे आणि आजूबाजूच्या छोटचा चौकातल्या लहानशा कारज्यासारखे लहानही आहे

बहुतेकाना पॅरीस म्हणजे नाईट क्लब्जच्या रगेल अड्ड्याचे शहर एवढीच अधुक कल्पना असते  पण असे म्हणणे म्हणजे गीता सागणारा कृष्ण विसरून केवळ त्याचे रासक्रीडेचेच रूप लक्षात ठेवण्यासारखे आहे  पॅरीसच्या रात्रीच्या उन्मादक नृत्यागनाच आठवणाऱ्यानी हेही स्मरावे की याच शहरातील बडखोरानी बॅस्टीलचा तुरुग फोडून जागतिक क्रातीचा शुभारभ केला होता  थोर विचारवत, श्रेष्ठ चित्रकार, अभिजात सगीतकार, महान साहित्यिक, नर्तक, अभिनेते, चित्रपट दिग्दर्शक, नाट्यनिर्माते, वास्तुशिल्पकार याना याच पॅरीस शहराचा परीसस्पर्श झाला आहे

अखंड जागणारे असे हे शहर आहे  दिवसाच्या कोणत्याही वेळी या शहरात कुठे ना कुठे उत्सव चाललेला असतो  दिवसा सिते युनिव्हर्सितेमध्ये जागतिक विचारवताचा परिसवाद असेल, दुपारी युनेस्कोच्या भव्य इमारतीत आगामी जागतिक युवा वर्षाची आखणी चाललेली असेल, सध्याकाळी लुव्हरमध्ये चित्रकलेवर जागतिक कीर्तीच्या चित्रकाराचे व्याख्यान असेल आणि

रात्री प्लास ब्लाँश, फ्लास पिगाल, प्लास क्लिशी या जगाच्या मदनपुऱ्यात शेकडो मदमस्त अप्सराचा खुलेआम नाच चालू असेल या अखड आनदात सहभागी होतात पॅरीसचे आणि जगातील इतर देशाचे हौशी सर्वसामान्य लोक– तसेच चार्ली चॅप्लीन्, जीन कॉक्लो, अर्नेस्ट हेमिंग्वे, मेरिलिन मन्रो, रिचर्ड बर्टन, एलिझाबेथ टेलर अशी त्या त्या क्षेत्रातली मातब्बर मडळी जगातील सर्वोत्कृष्ट नृत्यागना, सर्वोत्कृष्ट मद्य, उत्तमातील उत्तम सगीत, नयनमनोहर देखावे, बुद्धी स्तिमित करणारी भव्य दृश्ये, जादूचे खेळ, प्राण्याचे खेळ, खुणावून बोलावणाऱ्या मदभऱ्या तरुणी, याचा नुसता खच पडलेला असतो हे सारे याच पृथ्वीवर एकाच ठिकाणी पाहायला, ऐकायला, अनुभवायला मिळते याची खात्री या स्मरभूमीवर आल्याशिवाय होणारच नाही जे पोहोचले नाहीत ते फक्त अविश्वासाच्या, आश्चर्याच्या आणि दूर अतराच्या वातावरणातच घुटमळत राहतील सौंदर्य, सगीत, चैतन्य, काव्य, मुक्त मदन यानी प्रत्यक्ष रूप घेतले आहे ते पॅरीसमध्ये ! म्हणूनच या शहराचा स्पर्श म्हणजे जीवनाला मिळालेला परीसस्पर्शच !

पहाटे पाच गार नॉर्द पॅरीस हे पॅरीसचे उत्तर स्टेशन बाहेरगावाहून येणाऱ्या जाणाऱ्या व लोकल अशा दोन्ही आगगाड्याचे एक मोठे स्टेशन या स्टेशनसमोरच्या चौकात पहाटे थडीत जाण्यापूर्वी आपल्याला स्टेशनवरच्या सेल्फ सर्व्हिस स्टॉलवर किंवा धाब्यावर गरम कॉफी घेतली पाहिजे त्या कॉफीची ऊब एकदा अगात भिनली की आपण पॅरीसच्या पहाटेचे निरीक्षण करण्यासाठी ताजेतवाने होतो तमाशाच्या बोर्डावर एक बारी सपून दुसरी सुरू होण्यापूर्वी जसे वातावरण असते, तसे यावेळी पॅरीसभर असते जुन्या बारीतल्या मदनिका अगाभोवती ओव्हरकोट गुडाळून, हातात सौंदर्यप्रसाधनाच्या छोट्या पेटिका घेऊन तुरुतुरु स्टेशनकडे जात असतात रात्रभर नाईट क्लबमध्ये मौजमजा करून सुस्तावलेले रसिक कॉफी घेऊन दिवसाची रात्र करण्यासाठी घरी किंवा हॉटेलवर परतत असतात

नाईट क्लबमध्ये नृत्याला सगीताची साथ करणारे काळ्या सुटातील साथीदार पहाटे पाच वाजताही कॉफीऐवजी वाईन घेताना बारच्या काचेमधून दिसतात बहुधा हे साथीदार चार-सहा जणाच्या गटांनी बारच्या स्टुलावर बसून कालच्या रात्रीचे सिहावलोकन करीत असतात ते एकमेकाना जणू सागत असतील –

*घे आवरून आता*
*स्वप्नातला पसारा*
*बेचैन गोकुळाने*
*केला तुझा पुकारा*

एखाद्या श्रीमत, उतारवयाच्या अमेरिकनान नाईटक्लबमधून उचललेली तरुण नर्तिका त्याला बिलगून चाललेली दिसते. वास्तविक ती यावेळी रात्रीच्या नृत्यान अतिशय दमलेली असते पण 'गिऱ्हाईकाचा संतोष हेच आमचे समाधान' हे वचन नजरेसमोर ठेवून ती त्याच्याबरोबर हसत-खिदळत चाललेली असते बहुधा त्याने एखादा चावट अमेरिकन चुटका सांगतलेला असावा त्याच्या अमेरिकन अस्पष्ट उच्चारामुळे तो चुटका तिला समजलाही नसेल, पण त्यालाही दिलखुलास हसून ती दाद देते कारण काही काळाने तो डॉलर्सची चळथ तिच्या हातात देणार असतो मदनपुऱ्यात मध्यस्थी करून चार पैसे कमावणारे व्यावसायिक लोक जांभया देत घराकडे परतत असताना आपल्या मित्राबरोबर सुखदु:खाच्या गोष्टी बोलत असतात

पहिल्या बारीच्या लोकात असे सुस्तीचे, आवराआवरीचे वातावरण असते याच्या उलट येणाऱ्या बारीचे लोक अतिशय झकपक पोषाख केलेले, नीटनेटके, लगबग ये-जा करणारे असतात हे लोक कामावर जात आहेत त्यात टेलिफोन ऑपरेटर मुली, बँकाचे नोकर, रेल्वे कामगार, मोठ्या कपन्यातले अधिकारी, कारकून, शिपाई, नगरपालिकाचे सेवक अशा विविध क्षेत्रातील स्त्री-पुरुष आहेत बडे अधिकारी मोटारीतून वेगाने झेप घेत आहेत सफाई कामगार रात्रीचे रस्ते धुण्याचे काम आटोपून पाण्याच्या रिकाम्या टँकर्सवरून परत जात आहेत रस्त्यावरचे काही दिवे मालवले जात आहेत, काही अजून थोडा उजेड होण्याची वाट पाहत आहेत एखादा प्रेमवीर दिव्याखाली आपल्या प्रेयसीला मिठी मारून निरोपाचे चुंबन घेत आहे सीन नदीच्या काठच्या छोट्या होड्या पाण्यात सरकवल्या जात आहेत. त्या होड्यावर तास न् तास बसून नदीतले मासे गळाला लागतात का ते पाहत भरपूर वेळ असलेले सुखवस्तू पॅरीसकर सिगरेटचे झुरके ओढीत आहेत

पहिल्या बारीच्या बायका आता आळसावलेल्या, ओशट वाटतात तर दुसऱ्या बारीतल्या बायका तरतरीत, घरगुती, लिपस्टिक-पावडर-रूजच्या साजशृंगारासह आपापल्या कचेरीच्या वेळा साभाळण्यासाठी जलद जाणाऱ्या कुणाला अजून एखादी बस पकडायची असेल, एखाद्या सहेलीची बसस्टॉपवर

वाट पाहायची असेल, कुणाला एखादा मित्र मोटारीतून लिफ्ट देणार असेल या दुसऱ्या बारीतल्या लोकांच्याकडे पाहिले की पॅरीस हे जगातील सर्वात रंगेल शहर आहे हे अजिबात खरे वाटत नाही कारण हे लोक 'अँड नाऊ टु बिझनेस' असे करड्या शिस्तीने म्हणून कामावर रुजू व्हायला जात आहेत त्यांच्या लेखी नाईट क्लब्ज, संगीत, नृत्य, मद्य ही आता अस्तित्वातच नाहीत साडेसहा, सात किंवा साडेसात-जी कचेरीची वेळ असेल त्यापूर्वी हजेरीबुकावर सही करून कामाला सुरुवात करण्यासाठी हे लोक उत्सुक असतात, तत्पर असतात आणखी एका क्षेत्रात यावेळी विलक्षण द्रुतवेगाने कामे चाललेली असतात ते क्षेत्र म्हणजे वृत्तपत्राचे. पॅरीसमधील दैनिकांची प्रचंड पार्सले घेऊन धावणाऱ्या गडद निळ्या रंगाच्या व्हॅन्स तुफान वेगाने कोपऱ्यावर येतात तेथे त्यांची वाट पाहणाऱ्या आठ-दहा लोकांच्या कोंडाळ्याजवळ थाबतात व्हॅन्समधील वृत्तपत्रांचे गठ्ठे धडाधड खाली रस्त्यावर टाकतात आणि पूर्वीच्याच तुफान वेगाने पुढील नाक्यावर जातात ती पार्सले झपाट्याने उघडली जातात आणि त्यातील ताज्या, गरम अंकाचे वाटप ताबडतोब सुरू होते पॅरीसमधील बेघर, निराश्रित, बहुधा वृद्ध लोक रात्रीच्या वेळी थंडीत कुडकुडत एखाद्या पुठ्ठ्याच्या मोठ्या खोक्यात बसून असतात किंवा तो पुठ्ठा पसरून झोपलेले असतात पहाटे रस्त्यावर गडबड सुरू झाली की हे लोक उठतात कारण थोड्याच वेळाने येणारा जडार्म ऊर्फ पोलीस त्यांना तेथून हाकलून देणार असतो या विलासनगरीतील हे एक करुण दृश्य पॅरीसमध्ये भीक मागण्याला बंदी आहे अशा परिस्थितीत हे लोक आपल्या खाण्यापिण्याची तरतूद कशी करतात आणि दिवसभर काय करतात, कोठे जातात, हा एक प्रश्नच आहे.

रात्रपाळीला बदोबस्तावर असलेले [illegible]

परतत असतात. क्वचित त्यांचा जथा एखाद्या जाळीच्या व्हॅनमधून जाताना दिसतो दिवसपाळीचे पोलीस अजून यायचे असतात त्यामुळे पहाटे पाच ते आठपर्यंतचा काळ पॅरीसमध्ये काहीसा निर्णायकीच असतो पण रस्त्यावर भरपूर रहदारी असल्याने या काळात गुन्हेगारीला फारसा वाव मिळत नाही सकाळी आठ वाजल्यापासून पॅरीसच्या आणखी एका जगात विजेच्या वेगाने हालचाली सुरू होतात हे जग प्रवासी सफरीचे किंवा साईट सीईंग टूर्सचे असते या शहरात रोज हजारो प्रवासी ओतले जातात त्यांना थोड्या वेळात जास्तीत जास्त प्रेक्षणीय स्थळे पाहायची असतात त्यांची ही गरज भागविण्यासाठी शेकडो प्रवासी कंपन्यांच्या आरामगाड्यांचे ताफेच्या ताफे

चौकाचौकातून तयार असतात 'सिटी रामा', 'मॉतपार्नेस टूर्स' 'पॅरीस साईट्स'. 'अमेरिकन एक्सेस' 'पॅनोरामा' अशा अनेक प्रवासी कपन्याच्या कचेऱ्या सकाळी साडेसातपासूनच आगामी बिऱ्हाईकासाठी सज्ज असतात काही प्रवासी आधी जागा राखून ठेवतात कोणी ऐनवेळी येतात ऑगस्ट-सप्टेंबर हा प्रवाशाच्या गर्दीचा मोसम सोडला तर या बसेसमध्ये केव्हाही जागा मिळते साडेआठ ते नऊपर्यंत या बसेस निघतात सदा हसतमुख राहण्याचे प्रशिक्षण घेतलेल्या चुणचुणीत गाईड तरुणी कपनीचा गणवेश घालून प्रवाशाचे स्वागत करतात त्याची तिकीटे पाहतात आणि बरोबर ठरलेल्या वेळी बसेस चालू करण्याची घटा देतात ग्रामोफोनच्या तबकडीसारखी किंवा आताच्या भाषेत सागायचे तर टेपरेकॉर्डरच्या कॅसेटसारखी त्याची पॅरीसवर्णनाची टकळी चालू होते ती म्हणजे, "आमच्या रसिक पाहुण्याच मी स्वागत करते जगातील सर्वांत सुदर, कलात्मक आणि वैभवशाली शहराला आज आपण भेट देत आहात ही नगरी म्हणजे रसिक जगाची सम्राज्ञी आहे चित्रकलेची तर ही जागतिक राजधानी ऑपेराचा जन्म पॅरीसमध्ये झाला जगातील अनेक सर्वश्रेष्ठ साहित्यिक, कलावत, सगीतकार या शहरान दिले आहेत सर्वांत प्रसिद्ध अस लुव्हर कलासग्रहालय इथ आहे. जागतिक क्रातीच पहिल रणशिग फुकल ते या पॅरीसनगरीन! अशा या लोकविलक्षण नगरीच दर्शन आपण आता घेणार आहोत माझ नाव सुझन सकाळी एक वाजेपर्यंतच्या या सफरीत मला आपल्या सहवासाचा आनद मिळणार आहे"

मग साडेचार तास ती मुलगी सहजपणे, सोप्या शब्दात पॅरीसच्या नवनवोन्मेषशालिनी सौंदर्याची उकल करते या नगरीत प्रेक्षणीय स्थळाच्या नुसत्या रागाच्या रागा लागल्या आहेत एक लुव्हर म्युझियम घेतले तर त्याचा पूर्ण आस्वाद घ्यायला चार-पाच दिवस अपुरे पडतील पण या धाईगर्दीच्या सफरीत त्यासाठी चाळीस मिनिटे देण्यात आली आहेत अर्थात् अशा 'सिटी टूर्स' चा मुख्य उद्देश असा असतो की जे प्रवासी एखाद-दुसरा दिवसच राहणार असतील, त्याचे शहराचे कोणतेही महत्त्वाचे प्रेक्षणीय स्थळ चुकू नये तसेच जे प्रवासी अधिक दिवस राहणार असतील त्याना प्रथम शहराचे विहगम दर्शन घडावे आणि नतर त्यानी आपल्या सवडीने हव्या त्या ठिकाणाना फुरसदीने पुनर्भेटी द्याव्यात

पॅरीसची सहजता इतर कोणत्याही मोठ्या शहराला लाभलेली नाही वॉशिग्टन, लडन या शहरातील लोक उपचारानी गच्च बाधल्यासारखे वावरतात

पॅरीसमध्ये मात्र जातिवंत कलावंताची सहजता, बेफिकिरी, काहीसा बेछूटपणा या शहराच्या हवेत आहे हे शहर नित्य नूतन आहे ताज्या फुलाचा ताजेपणा या शहराच्या रोमारोमात भिनलेला आहे तुम्ही पूर्वी कितीही वेळा पॅरीसला गेलेले असा, पण पुन्हा गेलात तर हे शहर नवेच वाटेल पुन्हा पुन्हा शोध घ्यावा आणि पूर्वी न पाहिलेले असे काही नवे दरवेळी आढळते हा अनुभव केवळ पॅरीसमध्येच येतो सीन नदीच्या काठावरून शभराव्या वेळी तुम्ही फिरलात, तरी ही नदी अगदी नुकतीच वाहायला सुरुवात करते आहे असे वाटते रस्त्यारस्त्यावरचे चित्रकार, त्यांच्या शिकाऊ, दिखाऊ आणि मौलिकही अशा कलाकृती, समोर दहा हजार डॉलर्सचे चित्र विक्रीसाठी ठेवूनही आत्ताच्या जेवणासाठी पैसा नसल्याने स्वस्तातल्या केळ्यावर जेवण भागवणारा कलावंत तेच चित्र विकले गेल्यावर जॉर्ज फिफ्थसारख्या बादशाही हॉटेलात उचीतल्या उंची मद्याचा आणि संपन्न दहा कोर्सेसच्या भोजनाचा मैत्रिणीसह आस्वाद घेताना आढळेल रात्री पिगाल चौकात दिव्याखाली उभी राहून गिऱ्हाईके शोधणारी तरुणी सकाळी चांगल्या उपहारगृहात आपल्या मुलाला भरपूर व उंची पदार्थ घालताना दिसेल आता ती काही धंदेवाईक बाई नाही, ती आपल्या मुलाची प्रेमस्वरूप आई आहे तिचा हा मुलगा अनौरस आहे ऐन विशीच्या प्रियकराबरोबर मौज करताना सुखी वैवाहिक जीवनाची स्वप्ने रंगवणारी ही सुंदरी पण ती आई होणार हे कळल्याबरोबर प्रियकर निर्दयपणे बेपत्ता होतो, परागंदा होतो ती मुलाला वाढवते त्यासाठी सर्वांत जुना व्यवसाय पत्करते पण मनातून ती गृहिणीच असते सकाळी मुलाला पोटभर जेवू घालताना किती गुंतागुंतीचे विचार तिच्या मनात येत असतील ? आपली आई काय करते हे त्याला समजल्यावर त्याला काय वाटेल ? किती दिवस हा लपंडाव चालेल ? योग्य काय ? अयोग्य काय ? पण ' गंगा बहती है ' या धर्तीवर पॅरीसची सीन नदी अखंड वहात आहे त्या नदीत अनेक प्रवाह मिसळून चाललेच आहेत अनेक राजवटी आल्या नि गेल्या सम्राट आले, राजे झाले, हुकूमशहा आले, लोकनेते आले नि गेले, पण सीन वाहते आहे त्या सर्वांच्या कडू-गोड आठवणी पोटात बाळगून मेरी ॲन्टोनिएटच्या दरबारी विलासाबरोबरच हिटलरच्या काळातील जुलूमही ही नदी विसरलेली नाही जगज्जेत्या नेपोलियनचा पराक्रम आणि जोसेफिनचे अलोट प्रेम या नदीने पाहिले आहे एखाद्या अवाढव्य आगबोटीसारखे मध्येच नांगरून उभे असलेले भव्य नॉत्रदेमचे चर्च आणि लेफ्ट बॅंक या नदीकिनारी इतिहासातील सर्वोत्कृष्ट साहित्यिकाच्या ग्रंथांचा पडलेला

खच बॅस्टीलच्या भिती फोडणारे खवळलेले क्रातिकारक आणि नाजुक पदन्यासाने रोमहर्षक, नाजुक नाजुक भावना उचबळविणाऱ्या ऑपेरामधील नर्तकी जगातील सर्वात मौलिक, कोट्यावधी रुपये किंमतीचे डी व्हिन्सीचे 'मोनालिसा' हे चित्र कडक बदोबस्तात ठेवणारे 'लुव्हर' म्युझियम आणि तुमच्यासमोर वीतभर कागदावर तुमचे रेखाचित्र फक्त पाच फ्रँकना ताबडतोब काढून देणारा रस्त्यावरचा चित्रकार शेकडो मदनिकाचा जल्लोष करणारे, हारीने उभे असलेले झगमगीत नाईट क्लब्ज आणि कडक थडीपासून सरक्षण मिळावे म्हणून पुठ्ठ्याच्या पेटीत रात्र काढणाऱ्या पॅरीसच्या म्हाताऱ्या सकाळी साडेआठ-नऊ वाजता मॅडलीन मेट्रो स्टेशनजवळची अफाट गर्दी आणि बॉय द बलोन (सलोनचे जगल) या राईतील नीरव निवातपणा ही सर्व पॅरीसचीच रूपे आहेत चौदाव्या लुईचे एक वचन होते– 'आय शाईन ऑन मोअर दॅन वन् वर्ल्ड' (मी अनेक जगावर चमकतो) तसे हे पॅरीस शहर अनेक जगे सामावून चैतन्यशील राहिले आहे म्हणून पॅरीसचा स्पर्श म्हणजे जीवनाचा परीसस्पर्शच!

या जादूच्या नगरीची धावती किंवा निवात सफर घडवून आणणाऱ्या अनेक प्रवासी कपन्या आहेत ऑपेरा चौक हे त्याचे मुख्य केंद्र सकाळी नऊ ते एक, दुपारी दोन ते सहा सबध दिवस, सबध रात्र अशा अनेक प्रकारच्या सफरी करता येतात पॅरीसची माहिती इग्रजीत सागणारी देखणी, चुणचुणीत गाईड बरोबर असते

प्रथम ती पॅरीसचा त्रोटक इतिहास सागते इसवीसनपूर्व ५३ मध्ये सम्राट ज्यूलियस सीझर याने आपल्या सेनानींची भेट घेण्यासाठी प्रथम या ठिकाणाची निवड केली त्यानतर अनेक राजे, सम्राट, आक्रमणे, जोन ऑफ आर्क, सम्राट नेपोलियन, फ्रेंच राज्यक्राती, पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध, चार्ल्स द गॉल अशा सर्व महत्त्वाच्या घटना आणि व्यक्ती याचा दहा मिनिटात झटपट आढावा घेऊन ती तुम्हाला पॅरीसच्या महत्त्वाच्या प्रेक्षणीय स्थळाच्याकडे घेऊन जाईल द झोला, बॉडलोट, रेन्वा, मॅडमिलम क्यूरी, पहिला चित्रपट तयार करणारा ल्युमिटा, व्हिक्टर ह्यूगो अशा पाच-पन्नास श्रेष्ठ व्यक्तीना नमन करून ती गाईड पोरगी आता तुम्हाला इफेल टॉवर या पॅरीसमधील सर्वात उच आणि सर्वात प्रसिद्ध अशा मनोऱ्यासमोर उभी करते पिंजऱ्याचे दार उघडल्यावर उदीर जसे घाईघाईने बाहेर पडतात, तसे या टॉवरच्या पायथ्याशी उभ्या असलेल्या दहा-बारा प्रवासी बसेसमधून चित्रविचित्र प्रवासी पुदुपुदु बाहेर पडतात आणि आपआपल्या

गाईडभोवती घोळका करून उभे राहतात मग ती सर्वांना ऐकू जाईल अशा उच स्वरात किंवा मायक्रोफोनवर सागते, "गस्टॉव्ह इफेल यानी १८८९ सालच्या जागतिक प्रदर्शनासाठी हा ९८५ फूट उचीचा मनोरा बाधला सात हजार टन पोलाद या मनोऱ्याच्या उभारणीसाठी वापरण्यात आल लिफ्टच्या साहाय्यान या टॉवरवर जाता येत किंवा तुमचे पाय शक्तिमान असतील व तुमच्याजवळ भरपूर वेळ असेल तर पायी चढूनही जाता येत मनोऱ्यावर अनेक उपहारगृह आहेत. हवा स्वच्छ असेल तर वरून तुम्ही बेचाळीस मैलाचा परिसर पाहू शकाल या समोर दिसणाऱ्या पाढऱ्या शुभ्र इमारती म्हणजे युनेस्कोच्या कचेऱ्या आहेत " तिच्या या निवेदनानतर ती तुम्हाला इफेल टॉवरवर जाण्यासाठी किंवा जमिनीवरूनच त्याचे निरीक्षण करण्यासाठी, छायाचित्रे घेण्यासाठी पधरा मिनिटे देते ती सपल्यावर पुन. सारे प्रवासी बसमध्ये येतात आणि पुढची यात्रा सुरू होते

साँझे लिझा रस्त्यावरची ही भव्य कमान हिला आर्क द ट्रायफ किंवा विजयकमान असे नाव आहे या कमानीपासून अगदी आखीव-रेखीव असे बारा रस्ते निघतात १८०६ साली सम्राट नेपोलियनच्या सूचनेवरून या भव्य कमानीचं बाधकाम सुरू झाल तीस वर्षानतर ही कमान पूर्ण झाली १६२ फूट उच आणि १४७ फूट लाब असलेल्या या कमानीच्या मध्यभागी जमिनीवर एक ज्योत सतत पेटत असते फ्रान्ससाठी ज्या अज्ञात वीरानी आत्मसमर्पण केल, त्याची ही स्मृती आहे सम्राट नेपोलियनन जे १२८ विजय मिळविले, त्याची नोंद या कमानीवर कोरली आहे या कमानीसमोरचा साझा लिझे रस्ता हा जगातील एक अत्यत सुदर आणि प्रशस्त रस्ता आहे हा रस्ता म्हणजे पॅरीसचा दिमाख आहे. तिथून आपण व्हॅदोम चौकात जातो नेपोलियनचा ठसा पॅरीसमधील ज्या अनेक प्रेक्षणीय स्थळावर आहे, त्यापैकी हे एक या चौकात १४४ फूट उचीच्या गोल स्तभावर नेपोलियनचा पुतळा आहे. ऑस्टटलिझचा विजय हा नेपोलियनच्या जीवनातील सर्वात मोठा विजय त्याच्या स्मरणार्थ हा स्तभ व पुतळा उभारण्यात आला त्याचा विशेष म्हणजे या लढाईत शत्रूच्या ज्या १२०० तोफा नेपोलियनने हस्तगत केल्या, त्या वितळवून हा स्तभ आणि पुतळा तयार करण्यात आला आहे रात्री बारानतर या चौकात अद्यापही सम्राट नेपोलियन आणि त्याच्या सैन्याच्या घोड्याच्या टापाचा आवाज ऐकू येतो असे नेपोलियनचे भक्त सागतात

मात्र नेपोलियनच उदात्त, चिरंतन स्मारक म्हणजे हॉटेल द इन्व्हॅलिट्झ

या इमारतीतील त्याच थडग हे फ्रान्सच सर्वश्रेष्ठ स्मारक, देशाच स्फूर्तिस्थान या स्मारकाचा इतिहास चित्तथरारक आहे नेपोलियन हे फ्रान्सच सर्वश्रेष्ठ दैवत १८२१ साली ब्रिटिशाच्या बदोबस्तात नेपोलियन सेंट हेलिना बेटावर असताना त्याच निधन झाल नेपोलियनच्या अस्थी पॅरीसमध्ये आणाव्यात अशी मागणी फ्रेंचानी केली पण ब्रिटिशानी ती धुडकावून लावली पण फ्रेंचानी सतत १९ वर्षे आदोलन करून त्या अस्थी अखेर मिळविल्या लक्षावधी फ्रेंचानी अश्रुपूर्ण नेत्रानी या सम्राटाच्या अस्थींच स्वागत केल १५ डिसेंबर १८४० रोजी नेपोलियनच दुसऱ्यांदा दहन झाल पहिल दहन सेंट हेल्हीना बेटावर अज्ञातवासात झाल, तर दुसर सर्व राष्ट्रीय सन्मानात या ठिकाणी झाल नेपोलियनशी सबधित अशा अनेक वस्तूही या इमारतीत आहेत या स्मारकाच्या मध्यभागी हिरव्या ग्रॅनाईटचा चबुतरा आणि त्यावर लाल ग्रॅनाईटच्या पेटीत नेपोलियनच्या अस्थी आहेत या अस्थींचा मान म्हणून हॉटेल द इन्व्हॅलिट्झ या इमारतीवर सोन्याचा कळस चढविण्यात आला आहे हे पवित्र मदिर म्हणजे फ्रान्सची शान आहे

ऑपेरा या पॅरीसमधील भव्य व कलात्मक वास्तूसारखी दुसरी वास्तू इतरत्र क्वचितच आढळेल एखाद्या सम्राटाच्या राजवाड्यासारखी ही अवाढव्य आणि कलाकुसर केलेली अत्यत शोभिवत इमारत आहे प्रवेशद्वारावर निरनिराळ्या कलाच्या प्रतिकृती आहेत चार्ल्स गार्निवर यानी १८६० साली सुरू केलेली देखणी इमारत १८७५ साली पूर्ण झाली जगातील सर्वात भव्य अशा या ऑपेरागृहाच्या या रगमचावर एका वेळी ४५० कलावत काम करू शकतात! अडीच हजार प्रेक्षकाची बसण्याची सोय असलेल्या बादशाही नाट्यगृहात ऑपेरा किंवा नृत्यनाट्य पाहणे हा एक अविस्मरणीय अनुभव आहे मार्क छगाटा या विख्यात चित्रकाराने वीस वर्षापूर्वी या नाट्यगृहाचे इटिरियर डेकोरेशन केले आहे ऑपेरापासून जे अनेक रस्ते जातात, त्याना नामवत सगीत रचनाकारांची नावे देण्यात आली आहेत त्यामुळे या सबध भागात पॉप सगीताची वातावरणनिर्मिती झाली आहे ही इमारत व तिच्या समोरचा चौक रात्रीच्या अनत दिव्याच्या झगझगाटात स्वर्गातील इद्रपुरीसारखा दिसतो

☆☆☆

# २ / पॅरीसची भव्य नाट्यगृहे

पॅरीस ही रात्रीच्या वेळी मौजमजा करण्याची नगरी असा बहुधा समज असतो तशी ती आहेही पण त्यापेक्षा बरीच काही अधिक आहे. पॅरीस ही अतिशय धार्मिक नगरीही आहे नोत्रदेमच चर्च ही अत्यत पवित्र वास्तू इथ आहे नोत्रदेम म्हणजे ' आमची माता ' व्हिक्टर ह्यूगोची ' हचबॅक ऑफ नोत्रदेम ' ही जगप्रसिद्ध कादबरी आणि तीवर आधारलेला, चार्ल्स कॉटन याची अप्रतिम भूमिका असलेला त्याच नावाचा चित्रपट रसिकांना आठवतच असेल ११६० पासून दीडशे वर्षं या चर्चच बाधकाम चालू होत दगड आणि काच यावर कोरलेल बायबल असा या चर्चचा गौरवपूर्वक उल्लेख सर्वत्र होतो इग्लडचा राजा सहावा हेन्री १४३० साली फ्रान्सचाही राजा झाला, तो याच चर्चमध्ये त्याचा राज्याभिषेक झाला म्हणून नेपोलियन सम्राट झाला, तो याच चर्चमध्ये आणि तोही बळजबरीन त्यान पोपच्या हातून राजमुकुट हिसकावून घेतला आणि स्वत चा सम्राट म्हणून राज्याभिषेक करून घेतला तो याच चर्चमध्ये जोसेफाईनला सम्राज्ञी म्हणून मानण्यास पोपचा विरोध होता पण नेपोलियनने आपल्याबरोबर तिलाही याच चर्चमध्ये राज्याभिषेक करून सम्राज्ञीपद बहाल केल गेल्या महायुद्धात मशीनगन्सच्या गोळ्यांचा वर्षाव होत असताना द गॉल यानी याच चर्चमध्ये फ्रान्सच्या स्वातंत्र्याची प्रार्थना केली. चर्चच्या ३८७ पायऱ्या चढून आपण वर गेलो की गच्चीवर पोचतो तिथून पॅरीसच फार सुदर विहगम दृश्य दिसत चर्चच्या गाभाऱ्यात खिस्ताची माता (व्हर्जिन मदर) ही भव्य व नितात पवित्र मूर्ती आहे ती इतकी भव्य आहे की तिच्या शिरामागचा प्रकाशगोल एकतीस फूट व्यासाचा आहे.

चित्रकाराच्या दृष्टीने लुव्हर म्युझियम म्हणजे पॅरीसमधील प्रेक्षणीय स्थळाचा मुकुटमणी या वस्तुसग्रहालयातील चित्रे आणि शिल्पे याची संख्या

चार लक्ष आहे, यावरून त्याच्या विस्ताराची कल्पना येईल केवळ हे वस्तुसग्रहालय पहावे म्हणून जगाच्या कानाकोपऱ्यातून पॅरीसला येणाऱ्या कलावताची आणि कलारसिकाची सख्या लाखानी मोजता येईल १३व्या शतकातील फ्रान्सच्या राजाच्या या भव्य माडयात नेपोलियनने मोठी भर घातली 'विंग्द् व्हिक्टरी' आणि 'व्हीनस डि मिलो' ही जागतिक कीर्तीची शिल्पे आणि 'मोना लिझा' जिप्सी', 'सीटेड स्क्राईब' अशी ख्यातनाम चित्रे ही या वस्तुसग्रहालयाचे भूषण आहेत ग्रीस, इजिप्त, इटली, फ्रान्स, नेदर्लंड, जर्मनी, ऑस्ट्रिया इत्यादी अनेक देशातील श्रेष्ठ चित्रकार व शिल्पकार याच्या कलाकृती या ठिकाणी पाहणे हा जीवनातील एक अविस्मरणीय अनुभव आहे त्याशिवाय आधुनिक चित्रकला व शिल्पकला याचीही अनेक वस्तुसग्रहालये पॅरीसमध्ये आहेत मानवाचा विकास दाखविणारे व विशेषत मेंदूची स्थित्यतरे स्पष्ट करणारे 'म्युझी द अम्' हे वस्तुसग्रहालय अपूर्व आहे इतिहास, फ्रेंच सस्कृती, लष्कर अशी विशिष्ट विषयाना वाहिलेली वस्तुसग्रहालयेही डोळ्याचे पारणे फेडतात

'प्लास द ला कॉंकॉर्ड' हा ८५ हजार चौरस वाटाचा भव्य चौक म्हणजे फ्रान्सच्या इतिहासातील एक भीषण व तितकेच करुण पान आहे याच चौकात २१ जानेवारी १७९३ रोजी फ्रेंच क्रातिकारकानी बॅस्टीलचा तुरुग फोडल्यानतर फ्रान्सचा राजा सोळावा लुई आणि त्याची सौंदर्यवती राणी मेरी ॲन्टोनियर याचा गिलोटिनखाली त्याच्या माना ठेचून शिरच्छेद केला या सत्यघटनेवर काढलेला चित्रपट ज्यानी पाहिला असेल, त्याना मेरी ॲन्टोनियर झालेल्या नॉर्मा शिअरची 'आय विल बी द क्वीन ऑफ फ्रान्स' ही अखेरची किंकाळी अजूनही आठवत असेल याच चौकात १३४३ सरदार, उमराव व त्याचे सैनिक याना जाहीरपणे फाशी देण्यात आले होते 'प्लास द ला कॉंकॉर्ड' मध्ये साडेतीन हजार वर्षांपूर्वीचे इजिप्तहून आणलेले भव्य स्मारक आणि त्या भोवती फ्रान्समधील आठ प्रमुख शहराची प्रतीके आहेत लॅटिन कॉर्टर नावाचा एक कलात्मक भाग पॅरीसमध्ये आहे हा भाग कलाकार, लेखक, सगीतकार याच्या वास्तव्याचा आहे. सूरबॉन हे प्रसिद्ध विद्यापीठ या भागात असल्याने प्राध्यापक आणि विद्यार्थी याचीही गर्दी लॅटिन कॉर्टरमध्ये दिसते 'चर्च ऑफ् द सॅक्रेड हार्ट' हे पाढरे शुभ्र, गोल उच घुमटाचे चर्च मॉतमार्त्र भागात एका टेकडीवर असल्याने फार लाबूनही नजरेत भरते त्या चर्चजवळच्या चौकात

अनेक देशाचे चित्रकार चित्रे काढून खुल्या बाजारात तेथेच विक्रीला ठेवतात तुमच्यासमोर दहा मिनिटात तुमचे चित्र काढून देणारे चित्रकारही तेथे बसलेले असतात त्याचा हा चरितार्थाचा व्यवसायच असतो

सेंटस्च्या बाबतीत पॅरीसचा जगात पहिला क्रमाक लागतो पॅरीसच्या सध्याकाळी कोणत्याही रस्त्यावर फिरले तरी फ्रेंच व परकीय पुरध्रींच्या सेंट्स्मुळे वातावरण कसे प्रसन्न आणि सुगधित झालेले आढळते 'इव्हिनिंग इन पॅरीस' या नावाचा एक विश्वविख्यात सेंट आहेच अर्थात् अत्तरे आणि सेंटस् यात फरक आहे आपल्याकडे लखनौ-कनौजला तयार होतात ती अत्तरे, पॅरीसमध्ये तयार होतात ते सेंटस् 'शॅनेल नबर फाईव्ह', 'लॅन्विन', 'जॉय', 'चार्ली', 'ॲडव्हान्स' 'नोएल' ही पॅरीसच्या काही ख्यातनाम सेंट्सची नावे आहेत या सध्याकाळच्या सेंटस्मुळे पॅरीसचा रुक्ष, कामकाजाचा दिवस सपल्याची जाणीव होते आणि नादी होते ती वैभवशाली आणि मादक रात्रीच्या आनदाची!

रात्रीचे पॅरीस म्हणजे सौंदर्य, प्रतिभा आणि प्रणयचेष्टिते याचा एक अखड कल्लोळच असतो करमणुकीचे इतके अनत प्रकार असतात की त्याची विविधता आणि सपन्नता यानी आपण चकित होतो ही मौज लुटण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून उत्सुक प्रवासी येतात आणि रात्रीच्या रात्री प्लास पिगॅल, प्लास क्लिशी, प्लास ब्लान्श या भागात मदमत्त वातावरणात घालवून जीवनाचे सार्थक करून घेतात पैसा मिळवायचा तो कशासाठी? असा पृथ्वीवरील स्वर्ग पाहण्यासाठी, अनुभवण्यासाठी सध्याकाळी सहा-साडेसहालाच पॅरीसचा पहिला दिवस सपतो चोवीस तासातील दुसरा आणि अधिक उन्मादक, सुखद दिवस सुरू होतो रस्त्यावरचे दिवे लागतात न लागतात तोच पोलिसानी आपल्याला नेमून दिलेल्या जागा घ्याव्यात तशा पॅरिसच्या वारयोषिता हातात सिगारेट धरून त्या दिव्याखाली शेठची वाट पाहत उभ्या असतात तुम्ही त्याच्यापासून एक-दोन फूट अतरावरून जाऊ लागलात तर त्या सुदर स्मित करून 'गुड इव्हिनिंग सर' किंवा 'हॅव ए मॅच सर?' –अस आर्जवपूर्वक निमत्रण करतात तिच्या तोंडात सिगारेट असते पण ती पेटवलेली नसते तिच्याकडे काडयाची पेटी हमखास नसते येणाऱ्या-जाणाऱ्या अनोळखी माणसाकडे तिचे एकच मागणे असते– 'काडयाची पेटी किंवा लायटर आहे का?' पॅरीसमध्ये प्रथमच येणाऱ्या पाहुण्याला याचे बहुत आश्चर्य वाटते प्रत्येक दिव्याखाली उभ्या असलेल्या या सुदर, कमनीय, अद्ययावत फॅशन

अनेक देशाचे चित्रकार चित्रे काढून खुल्या बाजारात तेथेच विक्रीला ठेवतात तुमच्यासमोर दहा मिनिटात तुमचे चित्र काढून देणारे चित्रकारही तेथे बसलेले असतात त्याचा हा चरितार्थाचा व्यवसायच असतो

सेंटस्च्या बाबतीत पॅरीसचा जगात पहिला क्रमाक लागतो पॅरीसच्या सध्याकाळी कोणत्याही रस्त्यावर फिरले तरी फ्रेंच व परकीय पुरध्रींच्या सेंट्स्मुळे वातावरण कसे प्रसन्न आणि सुगधित झालेले आढळते 'इव्हिनिंग इन पॅरीस' या नावाचा एक विश्वविख्यात सेंट आहेच अर्थात् अत्तरे आणि सेंटस् यात फरक आहे आपल्याकडे लखनौ-कनौजला तयार होतात ती अत्तरे, पॅरीसमध्ये तयार होतात ते सेंटस् 'शॅनेल नबर फाईव्ह' 'लॅन्विन', 'जॉय', 'चार्ली', 'ॲडव्हान्स', 'नोएल' ही पॅरीसच्या काही ख्यातनाम सेंट्सची नावे आहेत या सध्याकाळच्या सेंटस्मुळे पॅरीसचा रुक्ष, कामकाजाचा दिवस सपल्याची जाणीव होते आणि नादी होते ती वैभवशाली आणि मादक रात्रीच्या आनदाची ।

रात्रीचे पॅरीस म्हणजे सौंदर्य, प्रतिभा आणि प्रणयचेष्टिते याचा एक अखड कल्लोळच असतो करमणुकीचे इतके अनत प्रकार असतात की त्याची विविधता आणि सपन्नता यानी आपण चकित होतो ही मौज लुटण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून उत्सुक प्रवासी येतात. आणि रात्रीच्या रात्री प्लास पिगॅल, प्लास क्लिशी, प्लास ब्लान्श या भागात मदमत्त वातावरणात घालवून जीवनाचे सार्थक करून घेतात पैसा मिळवायचा तो कशासाठी? असा पृथ्वीवरील स्वर्ग पाहण्यासाठी, अनुभवण्यासाठी सध्याकाळी सहा-साडेसहालाच पॅरीसचा पहिला दिवस सपतो चोवीस तासातील दुसरा आणि अधिक उन्मादक, सुखद दिवस सुरू होतो रस्त्यावरचे दिवे लागतात न लागतात तोच पोलिसानी आपल्याला नेमून दिलेल्या जागा घ्याव्यात तशा पॅरिसच्या वारयोषिता हातात सिगारेट धरून त्या दिव्याखाली शेठची वाट पाहत उभ्या असतात तुम्ही त्याच्यापासून एक-दोन फूट अतरावरून जाऊ लागलात तर त्या सुदर स्मित करून 'गुड इव्हिनिंग सर' किंवा 'हॅव ए मॅच सर?' – अस आर्जवपूर्वक निमत्रण करतात तिच्या तोंडात सिगारेट असते पण ती पेटवलेली नसते तिच्याकडे काडचाची पेटी हमखास नसते येणाऱ्या-जाणाऱ्या अनोळखी माणसाकडे तिचे एकच मागणे असते – 'काडचाची पेटी किंवा लायटर आहे का?' पॅरीसमध्ये प्रथमच येणाऱ्या पाहुण्याला याचे बहुत आश्चर्य वाटते. प्रत्येक दिव्याखाली उभ्या असलेल्या या सुदर, कमनीय, अद्ययावत फॅशन

केलेल्या, अत्तराचा घमघमाट करणाऱ्या बायकाजवळ साधी काड्याची पेटी नसावी ? एखाद्या उदार प्रवाशाच्या मनात येईल की आत्ताच्या आत्ता दोन-चार डझन काड्याच्या पेट्या विकत घ्याव्यात आणि दिव्याखाली काड्याची वाट पाहत असलेल्या या समस्त कामिनींना त्या देऊन त्यांच्या धूम्रपानाची सोय करावी मात्र खरोखरच असे करण्यासारखा दुसरा मूर्खपणा नाही

कारण पॅरीसच्या कायद्याप्रमाणे गिऱ्हाईकाला वेश्येने ' सॉलिसिट करणे ' म्हणजे [illegible] हा गुन्हा आहे. त्यातून पळवाट काढण्यासाठी त्या काड्याची पेटी मागून ओळख काढण्याचे निमित्त काढतात. त्या प्रत्येकीच्या पर्समध्ये लायटर असतो परीक्षा पाहायची असेल तर तुम्हीच सिगारेट हातात धरून तिला विचारा, लाईट आहे का ? ती पटकन् पर्समधून अद्ययावत् सिगारेट लायटर काढून तुमची सिगरेट पेटवीत विचारेल, "आपल्याला काही वेळ आनंदात घालवायचा आहे का ? तर माझ्याबरोबर जवळच्या हॉटेलवर चला फक्त दोनशे फ्रँक्स " प्रत्यक्ष खरेदी न करता उगीचच माल पाहणारे काही आबटशौकी असतात पण पॅरीसच्या परी त्याना अचूक ओळखतात आणि थडपणे सांगतात, "सॉरी, आय ॲम नॉट इटरेस्टेड " अधिक सुसस्कृत उत्तर म्हणजे, "नाही, मी माझ्या बॉयफ्रेंडची वाट पाहते आहे "

या मदनपुऱ्यात पहिली भेट होते ती वारयोषितेची तर त्या पाठोपाठ नाईट क्लब्जचे एजट तुम्हाला गाठतात कम इन सर, ऑल द ब्युटिफुल गर्ल्स् आर वेटिंग फॉर यू ! ' (महाशय, आत या सर्व सुदर पोरी तुमचीच वाट पाहात आहेत ) – अशा शब्दात नाईट क्लब्जच्या दरवाजाच्या आसपास घुटमळणारे हे प्रतिनिधी तुम्हाला आग्रहाच निमत्रण देतात तुम्ही नवीन असाल तर तुमचा अहकार सुखावतो तुम्ही मनात म्हणता, ' अरे ! मी किती दूर महाराष्ट्रात राहतो आणि पॅरीसच्या या अप्सरा केवळ माझ्यासाठी वाट पहात खोळबल्या आहेत ! किती आपुलकी ही याची ! चला तर, तीनशे फ्रँक्सच तिकीट काढू आणि त्याचा इतजार खतम् करू पण चार-सहा खपानतर तुम्हाला कळून चुकेल की अशा ठिकाणी फक्त तुमचा पैसाच खतम् होतो ! पण ठीक आहे, त्यातही गमत आहे मात्र नाईट क्लब्जच्या एजटाच्या भुलावणीला फसून पहिल्याच क्लबमध्ये गपकन् जाण्यात अर्थ नाही त्याआधी या भागात तासदीड तास फिरून त्या वातावरणाची अनुभूती – ' फील ' घेणे जरूर आहे कारण आत्ताच कोठे बाजार उघडला आहे. अजून वातावरण तापायचे आहे

तुम्ही हौसे-गवसे-नवसे याच्या घोळक्यातून इकडे तिकडे पाहात हळूहळू मौजेने जात असता अचानक कोणी तरी फ्रेंच माणूस तुम्हाला थाबवून अगदी जिवलग मित्रासारखा बोलू लागेल, “ फ्रेंड, आय नो व्हॉट यू वॉट आय हॅव गॉट इट ” तो काय म्हणतो ते तुमच्या लक्षात येण्यापूर्वीच तो इसम आपल्या ओव्हरकोटाची बटने काढून कोटाच्या आतला भाग दाखवील कोटाच्या आतल्या बाजूला त्याने दहा-बारा अश्लील फोटो लावलेले असतील मग हळू आवाजात तो म्हणेल, “ फक्त पन्नास फ्रॅक्सला बारा चित्राचा सेट मैत्रिणीला दाखवायला उत्तम ! बायकोपासून मात्र लाब ठेवा ” तुम्ही या अनपेक्षित माऱ्याने भाबावून जाता इतके कडक अश्लील फोटो जवळ बाळगण्याची तुमची हिंमत नसते. पैशाचा फारसा प्रश्न नसतो पण कुठे कस्टमने किंवा पोलिसाने हटकले तर नसती बिलामत ! तुम्ही ते फोटो नीट न्याहाळले आहेत अशी खात्री झाल्यावर तो फ्रेंच विक्रेता ओव्हरकोट बंद करतो अशा वेळी अचानक पोलीस आला तर तुम्हाला फुकटात एक जादूचा प्रयोग पाहायला मिळेल कारण अशी अश्लील छायाचित्रे विकायला कायद्याने बदी आहे पोलीस त्या विक्रेत्याला दरडावून विचारतो, “ काय विकतो आहेस ? ” तो विक्रेता साळसूदपणे सागतो, “ फोटो – पॅरीसचे फोटो ” मग पोलीस फर्मावतो, “ कसले फोटो ते दाखव ” विक्रेता पुन्हा पूर्वीसारखीच कोटाची बटने काढून आतील भाग दाखवतो आणि काय आश्चर्य ! तुम्ही एका क्षणापूर्वी जेथे अत्यत अश्लील चित्रे पाहिलेली असतात त्याच ठिकाणी आता आयफेल टॉवर, नोत्रदेमचे चर्च, व्हर्सायचा [illegible]

निराशेनेच पोलीस “ ओ के. ओ के ” असे पुटपुटत जातो तो गेल्यावर विक्रेता त्या कोटाचा दुसरा चोरकप्पा उघडतो, तीच अश्लील चित्रे तुम्हाला दाखवतो आणि म्हणतो, “ यू आर माय फ्रेंड फॉर यू फॉर्टी फ्रँक्स ओन्ली ”

सध्याकाळच्या पॅरीसमध्ये असे कोपऱ्याकोपऱ्यावर तुमचे मित्र आणि मैत्रिणी भेटतात अर्थात् त्याची मैत्री तुमच्यापेक्षा तुमच्या पैशाशीच अधिक असते हे कळायला फार वेळ जावा लागत नाही नाईट क्लब्जच्या दरवानाच्या प्रेमळ आग्रहातून तुम्ही पुढे जाता आणि एखाद्या पन्नाशीच्या आसपासचा, घरगुती शाळामास्तर [illegible] विचारतो, “ मे आय हॅव ए वर्ड वुईथ यू, सर ? ” या अचानक सलगीने चमकून तुम्ही त्याच्याकडे पाहता, तेव्हा तो स्वागतपर स्मित करून म्हणतो, “ तुमच्यासाठी

मी एक प्रपोजल आणल आहे माझी एक मैत्रीण आहे सुदर, तरुण अगदी उफाडयाची तुम्ही पाहिलीत की प्रेमातच पडाल तिच्या तिला एकाकी वाटत आहे तिला तुमच्यासारख्या आनदी, तरुण, रगेल प्रवाशाची कपनी हवी आहे येता का बोला! मी उगीच वाट्टेल त्याला बोलावणार नाही तुम्ही खास रसिक आहात याची खात्री झाल्यानच मी हे धाडस केल चला लवकर, ती तुम्हाला भेटायला अगदी उत्सुक आहे" अशी आमत्रणे कटाक्षाने टाळा हे लोक गोड गोड बोलून आडगल्लीत नेतात तिथ एखाद्या धंदेवाईक वेश्येची ओळख करून देतात कधीकधी ती वेश्या म्हणजे बाई नसून बाईच्या वेषातील पुरुषच असतो आणि तुम्हाला खोलीवर नेऊन तो तुमची फजिती करून वर पैसे लुबाडण्याचीही शक्यता असते या स्वप्ननगरीतील हा धोक्याचा, खाचखळग्याचा भाग मात्र तुम्ही मुख्य रस्त्याला चिकटून राहिलात तर कसलाही धोका वाटणीला न येता खूपच मौज पाहू शकाल, स्वत लुटू शकाल

या बाजूच्या इमारतीत छोटे छोटे क्रुसिबल्स किंवा गोल खोल्या आहेत त्या गोल भिंतीत आठ-दहा काचा बसविलेल्या आहेत तुम्ही पन्नास फ्रँक्स द्यायचे आणि दहा मिनिटे त्या काचेतून आतले दृश्य पाहायचे आत झगझगीत प्रकाशात दोन ते चार मुली नग्न होऊन नृत्य करीत असतात त्या नृत्याला पार्श्वभूमी म्हणून टेपरेकॉर्डरवरचे संगीत असते दर पंधरा मिनिटांनी मुली बदलतात ज्यांना नग्न मुली पाहायच्या असतात, पण नाईट क्लब्जचे दर परवडत नाहीत त्यांच्यासाठी ही सोय असते शेंगदाण्याला गरिबाचे बदाम म्हणतात, तसे हे गरिबाचे नाईट क्लब्ज आहेत या तीन-चार चौकाच्या क्षेत्रमर्यादित अनेक जगप्रसिद्ध नाईट क्लब्ज आहेत 'मूलाँ रूज' (ताबडा गुलाब) हा शभर वर्षाहून अधिक दीर्घ परपरा असलेला खानदानी नाईट क्लब! त्याउलट 'हॉट पँट्स' सारखा अत्याधुनिक व काहीसा उथळ क्लब आहे 'ईव्ह' हा तसा भारदस्त नाईट क्लब तर 'लिडो' हा उमराव, सरदार याचा उची नाईट क्लब 'क्रेझी हॉर्स' हा दुसऱ्या दर्जाचा, पण भरपूर व विविध करमणूक देणारा नाईट क्लब त्याशिवाय 'रिप ऑफ', 'इरॉटिक', 'बार्सीलोना', 'जॉकी', 'पुसी कॅट', 'पॅराडाईस लॅटीन' 'रोमियो', 'डॉन कॅमिलो', 'माँतमार्त्र', 'ले कपल' अशा अनेक नाईट क्लब्जच्या रागाच्या रागा या रस्त्यावर दुतर्फा लागल्या आहेत. जत्रेत मिठाईची दुकाने दुतर्फा असतात तशी ही स्त्रीसौंदर्याच्या बाजाराची मुक्त दुकाने दोन्ही बाजूना ठेचून भरलेली

आहेत

याच मॉंतमार्त्र भागात रोशुआर्ट रस्त्यावर 'एलिसी मॉतामात्र' नावाचे नाट्यगृह आहे तेथे रोज रात्री एक कार्यक्रम सादर केला जातो 'बॉटमलेस शो' अशी त्याची जाहिरात वाचून मी तो पाहण्यासाठी गेलो त्या कार्यक्रमाचे किंवा नाटकाचे नाव होते 'ओ पारी' पूर्वी 'ओ कलकत्ता' हे नग्न नाट्य फार गाजले होते. यावरूनच हे नाव सुचले होते हे उघड आहे

काही पाश्चात्य बार्समध्ये टॉपलेस वेट्रेसेस असतात. म्हणजे त्याचे स्तन उघडे असतात इथे हा कार्यक्रम टॉपलेसही होता आणि बॉटमलेसही होता सुमारे वीस दृश्यांचा हा रेव्ह्यू होता त्यात पंधरा स्त्रिया आणि दहा-बारा पुरुष यांनी भाग घेतला होता ही सर्व पात्रे सपूर्ण नग्न राहून कार्यक्रम सादर करीत मात्र चारशे जागा असलेल्या या नाट्यगृहातील पन्नास-साठ जागाच कशाबशा भरल्या होत्या त्यावरून नग्न पुरुष पाहण्यासाठी लोक फारसे उत्सुक नसावेत असा निष्कर्ष सहजच काढता येण्यासारखा आहे सगीत, विनोद व नृत्ये यातून पॅरीसच्या जीवनाचे दर्शन 'ओ पारी' या नग्न नाट्यात घडविण्यात येते

करमणुकीची थिएटर्स हा पॅरीसचा प्रकार नाईट क्लब्जपेक्षा अगदी वेगळा आणि अतिशय उच्च दर्जाचा असतो 'फॉलीज बर्जर' किंवा 'कसीनो द पारी' अशा नाट्यगृहाचा त्यात समावेश होतो जगात नाईटक्लब्ज अनेक शहरांत आहेत लडन, न्यूयॉर्क, सॅनफ्रॅन्सिस्को, बर्लिन, सात्झ बर्ग, ब्रुसेल्स अशा पाश्चात्य प्रमुख शहरांत आहेत तसच ते बँकॉक, हाँगकाँग, मनिला, सिंगापूर अशा पौर्वात्य शहरांतही आहेत पण भव्य नाट्यगृहातून सादर करण्यात येत असलेली 'फॉलीज बर्जर' सारखी विविध करमणुकीची परपरा लडनसारख्या एखाद्याच शहरात आहे व लडनचीही ती परपरा गेल्या काही वर्षात थडावत आहे

पॅरीसच्या थिएटर्समधील प्रयोग हे भव्यता आणि कलात्मकता यात अजोड आहेत आणि पॅरीसमधील 'फॉलीज बर्जर' किंवा 'कसीनो द पारी' मधील प्रयोग हे तर त्या क्षेत्रातील आनदबहारीची परिसीमाच असतात जादूचे प्रयोग, सर्कसचे खेळ, कसरतीचे खेळ, नाटकातील संवाद, गाणी, मदमस्त तरुणींची बेभान नृत्ये, भव्य व अतिभव्य दृश्ये यांचा तो अपूर्व मिलाफ असतो. पाच-पाच मजली सेट्स, वाहत्या नद्या, कारंजे, वीस फूट उचीचा पाण्याचा

पारदर्शक हौद अशी नेत्रदीपक दृश्ये पाहायला मिळतात ती केवळ पॅरीसच्या नाटयगृहातच हे पॅरीसचे बिनतोड वैशिष्ट्य आहे

नाईट क्लब्जमध्ये केवळ मादक तरुणींची कामुक नृत्येच असतात असे नाही त्या कार्यक्रमात अनत विविधता असते उदाहरणार्थ, ब्रीआ रस्त्यावर २७ क्रमाकाच्या इमारतीत 'ल व्हिला' (खेडे) हा नाईट क्लब आहे तिथे एकाच वेळी जास्तीत जास्त बशा फोडण्याची स्पर्धा असते! या क्लबमध्ये गेल्यावर तुम्ही आणि तुमची मैत्रीण टेबल धरून बसता एक प्रसन्नमुख वेटर तुमच्यापुढे शांपेनची बाटली आणून ठेवतो तुमच्या आसपासही टेबलावर स्त्रीपुरुष बसलेले असतात एक तरुणी छोटया व्यासपीठावर गाणे म्हणू लागते तिच्या अर्धनग्न शरीराकडे तुम्ही एकटक पाहात असता अशा वेळी अचानक तुमच्या जवळच्या टेबलावरचा माणूस उठतो, समोरची मोठी डिश घेतो आणि ती उच धरून तुमच्या डोकीवर आपटून फोडतो! तुम्ही बावचळून पाहू लागता आणि त्याचवेळी क्लबमधील सर्वजण टाळ्या व शिट्ट्या वाजवून डोकीवर प्लेटी फोडण्याचा कार्यक्रम उत्तम झाला असे शिफारसपत्र देतात! कारण त्या क्लबमध्ये ही प्रथा आहे हे तुम्हाला माहीत नसते आणि अशा नव्या गिऱ्हाईकाचा मामा करण्यात जुन्या गिऱ्हाईकाना मोठीच मौज वाटते.

थोड्या वेळाने तुम्हालाही धीर येतो. मैत्रिणीसमोर मघाशी झालेल्या फजितीचे उट्टे काढण्यासाठी तुम्हीही समोरची डिश उचलता आणि पलीकडच्या बेसावध इसमाच्या डोक्यावर फोडता! पुन्हा हशा, टाळ्या, शिट्ट्या याच नाईट क्लबमध्ये जास्तीत जास्त डिशेस् एकाच वेळी फोडण्याची चढाओढ लागते एका रात्रीत तीनशे ते चारशे डिशेस् फोडल्या जातात. या डिशेसचा खर्च नाईट क्लबच्या खात्यातून होतो. गिऱ्हाईकाला त्याचे बिल भरावे लागत नाही अर्थातच गिऱ्हाईके एकमेकांच्या डोकीवर डिशेस् फोडण्यात बरेच औदार्य दाखवितात या नाईट क्लबच्या रात्रीच्या अखेरच्या दृश्यात एक वेटर सर्वांसमोर येतो, हाताने एक डिश फोडतो आणि नारळाच्या वाटीसारखी ती डिश कचाकच खाऊन टाकतो!

अनेक हिंदी चित्रपटात नायिका स्नान करते असे दृश्य असते. आपल्या कडक सेन्सॉरमुळे ती आघोळ करणारी नटी काही सपूर्ण नग्न दिसत नाही पण दिसेल तेवढ्या अगप्रत्यागावर प्रेक्षक खूष असतात आणि काहीजण तर स्वत: चार चार दिवस स्नान न करताही त्या सुदरीची आघोळ पाहण्यासाठी

तिकीट काढून पुन्हा पुन्हा त्या चित्रपटाला जातात अशा रसिकाना पोटभर आघोळ पाहता यावी म्हणून पॅरीसमधील ‘ ईव्ह ’ या क्लबात एक मदालसा तुम्हा सर्वांच्या समोर अगाला साबण फासून टबमध्ये बराच वेळ स्नान करते मग प्रेक्षकाच्या सोयीसाठी टबमध्ये उभी राहते टॉवेल घ्यायचा ती हमखास विसरलेली असते तीही प्रेक्षकाचीच सोय सर्वांना सर्वांग दर्शन व्हावे म्हणून साबण लावतानाही ती टबमध्ये उभी असते आणि अगावर पाणी घेऊन हळूहळू साबण धुऊन टाकताना तिचे ओले, उन्मत्त शरीर सर्व बाजूनी लोकाना भरपूर दिसेल अशा निरनिराळ्या पोझेसमध्ये ती उभी राहते अखेर टॉवेल विसरल्यामुळे तिला ओल्या अंगाने रगमचावर सर्वत्र शोधाशोध करावी लागते रगमचावर व क्लबमध्ये इतके लोक असतात, पण कोणीही इतका अरसिक नसतो की तिला घाईघाईने एखादा टॉवेल, फडका किंवा निदान टेबलक्लॉथ देऊन शरीर झाकायला मदत करील सर्वांना असे सुभग दर्शन दिल्यावर तिला आठवते की आपला टॉवेल विंगमध्ये विसरला आहे मग ती धावत टॉवेलकडे जाते

“ हाफ मून ’ या नाईट क्लबमध्ये वेटर्स मद्य ओतण्यात भलतेच तरबेज असतात ते तुमच्या ग्लासात मद्य ओतीत नाहीत तर बाटली लाब धरून तीतून मद्याचा फवारा जो सोडतात तो बरोबर तुमच्या तोंडात! अशा रीतीने भरपूर मद्य अलगद पिऊनही पुण्याच्या सदाशिव पेठेतील एखादा जोशी, नेने, मेहेंदळे आत्मविश्वासाने म्हणू शकेल की, ‘ मी पॅरीसला गेलो, पण मद्याला हातसुद्धा लावला नाही! ’ त्याचेही खरेच असेल कारण प्रत्यक्ष हात न लावताही मद्याचा झरा अलगद तोंडात सोडण्याची सोय पॅरीसमध्ये आहे

स्ट्रिपटीझ हा जगातील सर्व नाईट क्लब्जमध्ये सर्वाधिक होणारा कार्यक्रम आहे स्ट्रिपटीझ म्हणजे एखाद्या सुदरीने आपल्या अगावरचे एक एक कपडे काढीत अखेर मूळ स्वरूपात उभे राहणे! अर्थात् ती रगमचावर आल्यावर भराभर कपडे उतरवत नाही तर सगीताच्या तालावर नाच करीत, हळूहळू, एक एक कपडे काढते त्यासाठी आधीच ती ओव्हरड्रेस्ड म्हणजे वाजवीपेक्षा अधिक कपडे घालून आलेली असते काही क्लब्समध्ये ती तोकडच्या कपडचात असताना क्लबच्या पुरुष गिऱ्हाईकात मिसळते आणि आपली ब्रेसियर किंवा चड्डी काढण्याची त्याना विनती करते तेही मोठ्या आनदाने अशी कामगिरी पत्करतात

लिडो-मूलाँ रूझसारख्या मोठ्या नाईट क्लबमध्ये कधी वाघ, चित्ते

याची सर्कसच रंगमंचावर दाखवितात. हा रंगमंचही प्रेक्षकाच्या अगदी जवळ असतो. लिडोमध्ये मी एकदा देवमासा पाहिला होता. वीस फूट काचेचा गोल हौद रंगमंचावर आणला होता. त्यात एक प्रचंड देवमासा सळसळत होता. त्याच्या हालचालींमुळे पाणी इतके उंच उसळत होते की त्याचे तुषार प्रेक्षकाच्या अंगावर पडत होते. मग ब्रेसियर व निकर्स घातलेली एक सुंदरी त्या पारदर्शक हौदात उतरली व देवमाशाबरोबर पोहू लागली. थोड्या वेळाने तिने खूण करताच देवमासा तिच्याजवळ आला नि त्याने दाताने तिची ब्रेसियर सोडली! हे विलक्षण दृश्य पाहून सर्वांनी त्या माशाचे कौतुक तर केलेच पण त्याच्या त्या भाग्याचा हेवाही केला!

नाईट क्लबच्या रंगमंचावर कुत्रे, माकडे, पोपट, काकाकुवा, घोडे, पाणघोडे व कधीकधी हत्तीही आणले जातात. ज्या प्राण्याचे खेळ आपण सर्कसमध्ये लांबून पाहतो, त्याचे खेळ या नाईटक्लबमध्ये अगदी हाताच्या अंतरावरून दिसतात. एका क्लबमध्ये तर रंगमंचावरून हत्ती सोंडेने शांपेनची बाटली उचलून ती जवळच्या टेबलावरच्या गिऱ्हाईकाला देतो. प्राण्याच्या या खेळाबरोबर जादूचे खेळही नाईट क्लबमध्ये लोकप्रिय आहेत. अशा एका खेळात एका जादुगाराने अंड्यातून कोंबडीची पिले काढून दाखविली व त्यानंतर त्याच पिलाची पुन्हा अंडीही करून दाखविली. प्रेक्षकातील एका महिलेला रंगमंचावर बोलावून एका जादुगाराने तिच्या ब्रेसियरमधून दोन कबुतरेच काढून दाखविली तर एका गिऱ्हाईकाच्या खिशातून ब्रेसियर काढून दाखविली. विनोद नि जादू यांचे गमतीदार मिश्रण या खेळात असते.

'बहोम' या नाईट क्लबमध्ये एक अर्धनग्न तरुणी आईस्क्रीम खात असताना तिच्या उघड्या स्तनावर आईस्क्रीमचा लपका पडतो. ती प्रेक्षकांना आवाहन करते, "तुमच्यापैकी कोणीही यावं नि हात न लावता जिभेनं माझ्या छातीवरचं हे आईस्क्रीम खाऊन दाखवावं. त्याला पांच डॉलर्स बक्षिस!" कोणीतरी रसिक रंगमंचावर येतो नि तिच्या भरदार उरोजावरच आईस्क्रीम चाटून खाऊ लागतो. मध्येच ती त्याला थांबवून म्हणते, "अहो मिस्टर, आईस्क्रीम तर मघाशीच संपलं, मग अजून तुम्ही तिथं काय खटपट करताय?" त्यावर प्रेक्षकातून जोरदार हशा पिकतो आणि तो रसिक ओशाळून रंगमंचाखाली उतरतो!
'ब्यूमॉंट' क्लबमध्ये एक नग्न तरुणी रंगमंचावर येते व प्रेक्षकांपैकी एखाद्या पुरुषाला बोलावते. त्याच्या गळ्यात हात टाकून ती म्हणते, "मला फार

थडी वाजते, तुमचा कोट देता का ? '' तो कोट देतो मग ती म्हणजे, '' अहो, माझ्या नाजुक शरीराला हा खरखरीत लागतो, तुमचा शर्ट दिलात तर बर होईल '' तो शर्ट देतो ती त्याचा शर्ट घालते त्यावर कोट चढवते कमरेखाली ती उघडीच असते मग तिला अचानक आठवण होऊन ती म्हणते, '' काय तरी मी वेंधळी! वर शर्ट, कोट घातला आणि खाली काहीच नाही ? गडे मला तुमची पँट द्या ना जरा वेळ– थडी फार आहे हो '' तो पँट काढून देतो आता तो गंजिफ्रॉक व चड्डी एवढ्याच कपड्यावर कुडकुडत उभा असतो त्याला वाटत आता काहीतरी गमतीचा खेळ होणार असेल इतक्यात ती त्याच्याशी हस्तादोलन करून म्हणते, '' थँक यू– गुड बाय '' अस म्हणून त्याचे कपडे हातोहात लाबवून ती पडद्यामागे पसार होते! आपण बनवलो गेलो हे ओळखून मग तोही तिच्यामागून धावत जातो अर्थात् रसिक गिऱ्हाईकाची भूमिका करणारा हा माणूस त्या तमाशातीलच एक नट असतो हे नतर आपल्या लक्षात येते

'नार्सिस' या नाईट क्लबमध्ये प्रेक्षक टेबलखुर्च्यांवर शॅम्पेन घेत रगमचावरील दृश्ये पाहत असतात आणि त्याच वेळी त्याच्या डोक्यावर तरुण सुदरी झोपाळ्यावर झोके घेत असतात काही रसिक प्रेक्षक अधूनमधून वरही पाहतात आणि हात उंच करून त्या पोरींना स्पर्शही करतात लास व्हेगसमध्ये सर्कस सर्कस नावाच्या नाईट क्लबमध्ये प्रेक्षकाच्या डोकीवर तारेची कसरत करणाऱ्या मुली मी पाहिल्या होत्या, त्याची यावेळी आठवण झाली

नाईट क्लबच्या रस्त्यावरून फिरताना कोणी अचानक तुम्हाला थाबवून म्हणेल, '' चला, मी तुम्हाला एका छानशा घरी नेतो तिथ तुमचं हार्दिक स्वागत होईल पैशाची काळजी करू नका त्या मुली धंदेवाल्या नाहीत. तुम्ही द्याल ते खुशीन घेतील पण तुम्ही त्याना भेटाव अशी त्याची फार फार इच्छा आहे. '' अशा उदार मित्राबरोबर तुम्ही गेलात तर तो जवळपासच्या एखाद्या घरात नेईल तिथे एका मोठ्या हॉलमध्ये पंधरा-वीस तरुणी उन्मादक कपडे घालून भरपूर रगरगोटी करून उभ्या असतील तुम्ही आत गेल्याबरोबर त्या ओळीने उभ्या असतील मग तुमचा तो अज्ञात मित्र म्हणेल, '' वाट्टेल ती निवडा, वरच्या मजल्यावर खोल्या आहेत जिवाची मौज करा '' एखादी [illegible] शापेन आणि दोन ग्लास ठेवलेले आढळतील शापेन ओतून तुमच्या ओठाला ग्लास लावण्याच काम ती हौसेन

करील खोलीत पलग, वॉशबेसिन, टेपरेकॉर्डरवरच सगीत आणि टॉयलेट ही सर्व व्यवस्था असेल तुमची काहीही माहिती नसतानाही अगदी जिवलग मैत्रिणीसारखी गप्पा मारण्यात ती पटाईत असते तुम्ही कोणत्याही देशाचे असा, त्या देशाचे नाव ऐकल्यावर ती तुम्हाला बिलगून 'हाऊ वदरफुल" म्हणेल मग तुम्ही भारत म्हणा, बोर्निओ म्हणा किंवा झैर म्हणा शापेनची बाटली सपेपर्यंत ती तरुणी पैशाच नावही काढणार नाही एक बाटली सपली की दुसरी बाटली ती आणून ठेवील हळूहळू ती तुम्हाला मिठी मारून म्हणेल, "मला खात्रीच आहे की तुम्ही पैशाकडे पाहणारे नाही. आपल्या डार्लिंगसाठी वाट्टेल तितका पैसा ओतणारे तुम्ही उदार प्रवासी आहात पॅरीसमधली सर्वात सुदर मैत्रिण मिळाल्यावर पैशाचा कोणी विचार करील काय ?" या लाडीगोडी बरोबरच तुम्ही या प्रकरणाला एकदरीत किती खर्च येईल याचा विचार करू लागता पण आता त्याला फार उशीर झालेला असतो कसलेल्या धदेवाईक पद्धतीने तिने तुम्हाला बरोबर पकडलेले असते

विशी-पचविशीतील देखणी तरुणी आणि पन्नाशीनंतरच्या उताराला लागलेला पुरुष याची पॅरीसमध्ये छान मैत्री जमते. दोघाच्या वयातलं अतर त्याच्या पाकिटामुळ कापल जात अशी एखादी तरुणी आपल्या नव्या मित्राला म्हणते, "पॅरीसच्या नेहमीच्या मौजमजेच्या जागा तुम्ही खूप पाहिल्या असतील आज मी तुम्हाला अगदी वेगळ्या क्लबमध्ये नेते " मग ती त्याला रू गिसार्डी या रस्त्यावरच्या एका अधाऱ्या बोळकडीत नेते तेथे असलेल्या क्लबचे नाव 'दि वर्स्ट क्लब इन पॅरीस' असे आहे पॅरीसमधील सर्वात भिकार क्लब! त्याच्या दरवाजाजवळ मवाल्यासारखा एक इसम उभा असतो त्याच्या हातात मोटारच्या फुग्याचा हॉर्न असतो गिऱ्हाईक दाराजवळ आले की तो इसम हॉर्न दाबतो त्याबरोबर दार उघडते. कोणीतरी गिऱ्हाईकाच्या हाताला खसकन धरून आत ओढते आतला देखावा घोड्याच्या तबेल्यासारखा असतो मोडक्या खुर्च्या, पालथी घातलेली दारूची पिंपे, इकडे तिकडे पडलेला कचरा आणि गवत घाणेरड्या कपड्यातले हलक्या दर्जाचे दारूडे याचा हा मौला अड्डा असतो आपल्या नव्या मैत्रिणीला घेऊन पन्नाशीचा प्रवासी घाबरतच एका पालथ्या पिंपाजवळच्या मोडक्या खुर्चीवर जपूनच बसतो मग ती मैत्रिण हाताने खूण करून वेटरला बोलावते एक लाबटांग्या वेटर येतो आणि खेकसतो नि "काय पाहिजे? नसती कटकट शिंची!" असे पुटपटतो ती सुंदरी शांपेन

मागवते तेव्हा तो उद्धटपणे ओरडतो, "पाहिजे तर तुम्ही जाऊन घ्या मला वेळ नाही" प्रवासी आणि त्याची मैत्रिण उठतात बारजवळ जातात शापेनची बाटली घेतात आणि टेबलाजवळ उर्फ पिंपाजवळ येतात इतक्यात भसाड्या आवाजाची आणि दिसायला अगदीच साधारण अशी बाई गाणं म्हणायला सुरुवात करते 'बद करा', 'बद कर गाण', 'पुरे पुरे' असा आरडा ओरडा करून गिऱ्हाईक ते गाण बद करतात. मग त्या प्रवाश्याची मैत्रिण हळूच आपल्या मित्राच्या गळ्यात हात घालून म्हणते, "तळघरात छानपैकी डान्सिग हॉल आहे त्याची प्रवेश फी पाचशे फ्रँक द्या मी तिकीट काढून आणते!" तो पाचशे फ्रँक देतो ती बारजवळ जाते. पाठमोरी असतानाच ती ते पैसे आपल्या पर्समध्ये ठेवते मग परत येऊन आपल्या मित्राला ती हात धरून उठवते आणि म्हणते, "चला, आता लिफ्टन तळघरात जाऊ आणि खूप खूप मौज करू." त्याच्या गळ्यात हात टाकून ती बारमागच्या एका जुनाट लिफ्टमध्ये त्याला जायला सागते आणि म्हणते, "एका वेळी त्यातून एकच माणूस जातो तुम्ही खाली जा मी येतेच मागच्या लिफ्टन" तो लिफ्टच दार बद करतो खाली जाण्यासाठी बटनं दाबतो लिफ्ट ढिम्म हलत नाही ती हसून म्हणते, "थँक यू, गुड बाय!" ती त्याला लिफ्टमध्येच सोडून सरळ चालायला लागते आणि रस्त्यावर येऊन पसार होते! मौज करण्याच्या हेतूने आलेला प्रवासी आपण खरोखरच पॅरीसमधील सर्वात भिकार नाईट क्लबमध्ये आलो आहोत या जाणिवेने लिफ्टचे दार उघडण्याचा प्रयत्न करतो पण ते उघडत नाही तो आरडाओरडा करतो, तेव्हा क्लबचा व्यवस्थापक बाहेर येऊन अगदी सहजपणे सागतो, "अहो, हा लिफ्ट फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी बद पडला, तो अजून सुरू झाला नाही शंभर फ्रँक द्याल तर या पिंजऱ्यातून मी तुम्हाला बाहेर काढीन" बिचारे गिऱ्हाईक शभर फ्रँक्स देते आणि जगातील सर्वात भिकार नाईट क्लबमधून सुटका करून घेऊन तडक आपले हॉटेल गाठते! या सगळ्या साहसात सापडण्यात आणि त्यातून निसटून जाण्यातही एक गमत असते

पॅरीसमधील नाईट क्लब्ज आणि नाट्यगृहे यात नृत्य करणाऱ्या तरुणी अत्यत सुंदर, अठरा ते चोवीस वर्षे वयाच्या, उच आणि उत्तम शिक्षण घेतलेल्या असतात 'लिडो' या जगप्रसिद्ध नाईट क्लबमध्ये ब्ल्यू बेल्स या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मुली असतात. त्याची निवड, त्याचे प्रशिक्षण, त्याची राहणी व जीवनमान यांची सत्यकथा विलक्षण आहे साँझे लिझे या रस्त्यावर

११६ क्रमाकाच्या इमारतीत ' लिडो ' १९१४ पासून जगातील सर्वोत्कृष्ट तरुणी पेश करीत आहे पूर्वी फॉलीज् बर्जरमध्ये काम करणाऱ्या मागरिट किली यानी ब्ल्यू बेल्स हा नृत्यागनाचा प्रकार सुरू केला निरनिराळ्या देशातील १८ ते २१ या वयोगयातील, पाच फूट दहा इच उचीच्या, भरदार उरोजाच्या, उत्तम शिक्षण घेतलेल्या मुलींची यासाठी निवड केली जाते क्लबच्या खर्चाने त्याची राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था केली जाते पहिले सहा महिने त्याना नृत्याचे शिक्षण देण्यात येते ' लिडो ' च्या सेवेत असताना या मुलींनी कोणाही पुरुषाशी सपर्क ठेवायचा नाही अशी अट असते या मुलींच्या लग्नाचे काय असा प्रश्न विचारला असता ' ब्ल्यू बेल्स ' च्या निर्मात्या मागरिट किली म्हणाल्या, ' लग्न ? त्याना लग्नाच्या इतक्या मागण्या येतात की आम्ही नकाराची छापील कार्डेच तयार ठेवली आहेत प्रत्येक मुलीला दरमहा निदान शभर तरुण लग्नाची मागणी घालतात। काहीजण तर नेमकी निवड न करता ' ब्ल्यू बेल्स ' पैकी कोणत्याही मलीशी लग्न करण्याची माझी तयारी आहे असे लिहितात या मुलींना कामावर घेण्यापूर्वीच आम्ही त्याना आश्वासन देतो की त्याचा पंचविसावा वाढदिवस होण्याच्या आधी एखादा चांगला आर्किटेक्ट, डॉक्टर, इजिनियर किंवा अन्य उच्चशिक्षित तरुणाशी आम्ही त्याचा विवाह करून देऊ तसा प्रत्येक पचविशीतील मुलीचा आम्ही विवाह करून दिला आहे. ह्या आमच्या क्लबमध्ये नृत्य करीत असेतो त्याना कडक शिस्तीत राहावे लागते कितीही श्रीमत किंवा प्रसिद्ध पुरुष असला तरी त्याच्याकडून मद्याचा ग्लासही स्वीकारण्याची या मुलींना बदी आहे, मग स्पर्श किंवा पुढील गोष्टींची बातच सोडा। अशा ११२ मुली आमच्याकडे आहेत त्यापैकी ७० मुली एका वेळी ' लिडो ' च्या नृत्यात भाग घेतात. राजा फरूक वाट्टेल तेवढे पैसे ओतण्यासाठी तयार होता. पण त्याला या मुलींशी हस्तादोलनही करण्याची सधी मिळाली नाही गॅरी कूपरसारखा हॉलिवुडचा नामवत नट, पण त्यालाही या बाबतीत निराशाच पत्करावी लागली कार्यक्रम चालू असताना रगमचाच्या मागे कोणालाही प्रवेश नसतो कार्यक्रम सपल्यावर आम्ही नेमलेले टॅक्सीवाले या मुलींना त्याच्या हॉस्टेलवर सोडतात हे टॅक्सी ड्रायव्हर्स त्याच्या दारापर्यंत सोबत करतात आणि त्या सुखरूप आपल्या फ्लॅटमध्ये गेल्या हे आम्हाला परत येऊन सागण्याचीही त्याच्यावर जबाबदारी असते या मुलींचे वजन जवळपास कायम राहील अशी काळजी घेतली जाते "

लिडोच्या रगमचावर या तरुण कामिनींना अर्धनग्न पाहून त्या चालू आहेत अशी समजूत करून घेणाऱ्याना पदरी निराशा घ्यावी लागेल, कारण त्या खानदानी नर्तकी असतात

पॅरीसमध्ये फॉलीज बर्जरची वट काही औरच आहे १९४४ साली युरोपमधले युद्ध सपले चार वर्षे चाललेले युद्ध सपल्यावर जेव्हा पहिला मुक्त अमेरिकन सैनिक पॅरीसच्या गार दु नॉर्द स्टेशनवर उतरला, तेव्हा त्याने हॉटेलची चौकशी केली नाही किंवा उपहारगृहाची, मयखान्याची चौकशी केली नाही तो सरळ 'चौकशी' हा फलक असलेल्या खिडकीजवळ गेला आणि त्याने विचारले, "फॉलीज बर्जर' ला कसे जायचे?" रू रिशे या रस्त्यावरील फॉलीज बर्जरची परपरा सत्तर वर्षांची जुनी झाली आहे ज्याला इग्रजीत स्पेक्टॅकल्स म्हणतात अशी भव्यातिभव्य दृश्ये या पृथ्वीच्या पाठीवर कुठे जास्तीत जास्त प्रकर्षाने दिसत असतील तर ती फॉलीज बर्जरमध्ये मी १९५० साली प्रथम पॅरीसला गेलो, तेव्हा रू रोशिपार्ट रस्त्यावर उतरलो होतो, तेव्हाही मी फॉलीज बर्जरची ख्याती ऐकलीच होती पहिल्या रात्री फॉलीज बर्जर पाहायचेच असे मी ठरविले होते पण प्रवासाच्या दगदगीने माझे डोके दुखत होते सध्याकाळी साडेसातला मी बाहेर पडलो एका केमिस्टकडून ॲनासिनच्या गोळ्या घेतल्या आणि त्यालाच विचारले, "फॉलीज बर्जर कुठे आहे? तो किंचित हसला त्याने मला रस्ता साागण्यापूर्वी जवळच्या विक्रेत्याला फ्रेंचमधून म्हणाला, "काय गंमत आहे पाहा! हा मोठा चिवट रसिक प्रवासी दिसतो याचं डोक दुखत आहे, तरीही त्याला फॉलीज सोडवत नाही" त्या बिचाऱ्याला कल्पनाही नव्हती की मला फ्रेंच भाषा समजते मी त्याला गमतीने फ्रेंचमध्ये उत्तर दिले, "अहो, फॉलीजला जायच नाही, तर पॅरीसमध्ये यायच कशाला?" त्यावर तो मोठ्याने हसला आणि म्हणाला, "पार्ले व्हू फ्रासे? थ्रॅ ब्यॉ!" (तुम्हाला फ्रेंच येत का? फार छान!) मग त्यान मला फ्रेंचमध्येच फॉलीजचा पत्ता सागितला

फॉलीज बर्जर हे एक विराट प्रकरण आहे. या आलिशान नाट्यगृहाच्या भव्य रंगमचावर एका वेळी दीडशेपर्यंत सुदरी नृत्य करतात नेपथ्य तर इतके विलक्षण श्रीमती की आपली कल्पनाशक्तीही थिटी पडावी ज्याला फायनेल किंवा अखेरचे दृश्य म्हणतात, ते पाहावे तर फॉलीजमध्येच! मी पाहिलेल्या एका फायनेलमध्ये या पाच मजली नाट्यगृहाचे सबध छत दुभंगले आणि त्यातून खाली आली ती आयफेल टॉवरची प्रतिकृती! या सत्तर फुटी आयफेल

टॉवरवर पन्नास अर्धनग्न मुली प्रेक्षकाना 'ऑरवॉ' 'ऑरवॉ' (गुडबाय) असे निरोप देत गाणे म्हणत होत्या! एकदा रंगमंचावरच प्रचंड कारंजे वाहत होते तीन मजली उंच असलेल्या या कारंजातून आठ मोठ्या बंबात पाणी वाहात होते व त्यावर इंद्रधनुष्याचे रंग बरसत होते एकदा इजिप्तची राणी क्लिओपात्रा हिचा अवाढव्य दरबार सादर करण्यात आला होता त्यात सरदार, दरकदार, गुलाम, मानकऱ्यानी आणलेले नजराणे, खाद्यपदार्थ आणि विविध प्रकारची मद्ये याची एवढी रेलचेल होती की आपण खरोखरच त्या दरबारात सहभागी होत आहोत असे वाटत होते. या दृश्यात पन्नास अर्धनग्न दासींच्या ताफ्यासह पालखीतून अतुलनीय सौंदर्याची सम्राज्ञी क्लिओपात्रा येते आणि जवळजवळ सर्व अंग उघडे टाकून मानकऱ्याची मानवंदना घेते, ते दृश्य खरोखर अद्‌भुतच होते अशाच एका कार्यक्रमातून फॉलीज बजरच्या छतातून एक विमान आले आणि प्रेक्षकाच्या डोकीवरून गिरक्या घेऊन थेट रंगमंचावर अलगद उतरले 'सिंड्रेला' या नृत्यनाटिकेत एकदा रंगमंचावर सात मजली राजवाड्याचा भव्य सेट उभारला होता आणि सव्वाशेवर कलावंत नृत्य करीत होते 'कॅन कॅन' हे पॅरीसच खास वैशिष्ट्याच नृत्य- जशी लावणी हे महाराष्ट्राच खास वैशिष्ट्य किंवा गरबा हे गुजरातच पॅरीसच्या अनेक क्लबमध्ये हे द्रुतगतीच कॅन कॅन नृत्य दाखवितात पण त्याची खरी बहार पाहावी ती फॉलीजमध्येच. फॉलीज म्हणजे 'अशी मौज न मिळे पाहण्या नरा'ची प्रचीतीच!

'कॅसिनो द पारी' हेही असेच खानदानी कलात्मक नाट्यगृह आहे फॉलीजप्रमाणे इथेही निवडक नृत्याप्सरा आणि भव्य देखावे याची लयलूट असते एकदा या रंगमंचावर पंचवीस लाकडी घोड्याचे चक्र व त्यावर आरूढ झालेल्या अर्धनग्न युवती दाखविल्या होत्या. मेरी अन्टोनिएटच्या काळातील पॅरीस आजच्या प्रेक्षकाच्या पुढे मूर्तिमत उभे करणे ही करामतही या नाट्यगृहात दाखविण्यात येते या दृश्यात पुरुषभर उंचीच्या मेणबत्त्या, अंगभर मोठे झगे घातलेल्या तरुणी, डोकीवर विग घातलेले उमराव आणि भरजरी पोशाख घातलेले नोकर असे बादशाही दृश्य दिसते कधी प्रचंड आकाराची चंद्रकोर आणि त्या चंद्रकोरीवर पहुडलेली नग्न युवती दिसते हिचा प्रियकरही तेथे येतो आणि चंद्रावरील नृत्याचे विलक्षण दृश्य नजरेला पडते स्पॅनिश नृत्य हेही एक वैशिष्ट्यपूर्ण जलद गतीचे नृत्य असते तसे नृत्य करणाऱ्या युवती हातात लाकडी गोल घेऊन ते वाजवतात आणि त्या तालावर अतिशय द्रुत गतीने नृत्य करतात

यावेळी त्याचे प्रियकर गिटार वाजवितात अशा वीस-पचवीस जोड्या एकावेळी रंगमंचावर नृत्य करताना दिसतात फॉलीज आणि कॅसिनो या नाट्यगृहात नृत्य व संगीत याबरोबरच अनेक विनोदी प्रवेशही दाखविण्यात येतात अशाच एका दृश्यात एक नवरा वर्तमानपत्र वाचीत बसला आहे असे दाखविले होते बायको एकसारखी 'मला कपडे नाहीत, नवे स्कर्ट आणा' असे बडबडत असते पण तो तिच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करतो शेवटी ती संतापून म्हणते, "तुम्ही मला नवे कपडे आणणार नसाल तर मी हे कपडे काढून अशी नागडी होते आणि रस्त्यावर उभी राहून सर्वांना ओरडून सांगते की माझा नवरा मला कपडे घेत नाही म्हणून!" तरीही नवरा वाचतच राहतो मग बायको अंगावरचे सर्व कपडे काढून संपूर्णपणे नग्न होते आणि नवऱ्याला धमकावते, "जाऊ का अशीच रस्त्यावर?" नवरा शांतपणे खिशातून एक पत्र काढतो आणि वर्तमानपत्रावरची नजर न काढता पत्र तिच्यापुढे धरीत म्हणतो, "तू बाहेर जातेच आहेस तर माझं एवढं पत्र पोस्टात टाक बर!"

नाताळ किंवा ईस्टरसारख्या सणात तर पॅरीसमधील नाईटक्लब्जमध्ये अपूर्व धमाल होते त्यावेळी प्रेक्षक हे प्रेक्षक राहात नाहीत महत्त्वाच्या [illegible] रंगत भरण्यासाठी क्लबतर्फे सर्वांना खास रंगीबेरंगी कागदी चित्रविचित्र आकाराच्या टोप्या देण्यात येतात काही क्लबमध्ये सर्व पुरुषांना आकडेबाज मिशा चिटकविण्यात येतात. आणि स्त्रियांच्या डोक्यावर बेगडी हॅटस् घालण्यात येतात कागदाच्या रंगीबेरंगी लांबलचक पट्ट्या आणि विविध आकाराचे फुगे यांचा तर क्लबमध्ये रात्रभर नुसता हैदोस असतो बँडच्या तालावर सर्वांना नृत्य करावे लागते इतकेच नव्हे, तर त्या नृत्यात 'चेंज पार्टनर्स' म्हटल्याबरोबर आपल्या कवेतील मुलगी सोडून दुसरी कवेत घ्यायची असते

३१ डिसेंबरला रात्री बारा वाजता क्लबमधील दिवे दोन मिनिटे मालवले जातात त्यावेळी तुमच्या कवेत जी मुलगी किंवा बाई असेल तिचे चुंबन घेऊनच नव्या वर्षाचे स्वागत करायचे असते ३१ डिसेंबर रोजी रात्रभर नाईट क्लब्ज चालू असतात पहाटे पहाटे लोक नृत्य, मद्य, संगीत व सौंदर्य पोटभर पिऊनच मैत्रिणीसह किंवा पत्नीसह घरी जातात १ जानेवारीला सकाळी आठ वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत पॅरीस शहर जवळजवळ निर्मनुष्य आणि वाहनरहित असते कारण रात्रीच्या श्रमामुळे लोक जे झोपलेले असतात, त्यांना

अद्याप जाग आलेली नसते रात्रीचा जल्लोष सपून त्याची आळसटलेली प्रतिक्रिया शहरावर दिवसभर असते मात्र सध्याकाळचे दिवे लागले की ही विलासनगरी पुन्हा जागृत होऊ लागते पॅरीसचा दिवस भाकड असू शकतो, पण रात्र कधीही भाकड, व्यर्थ, उदास जात नसते

पॅरीस ही आतरराष्ट्रीय ख्यातीचे अनेक साहित्यिक, चित्रकार आणि सगीतकार याची मक्का-मदिना आहे अर्नेस्ट हेमिंग्वे यानी ' मुव्हेबल फीस्ट ' असे या नगरीचे वर्णन केले असून पॅरीसमधील अनुभवाच्या या सग्रहाला नावही तेच दिले आहे ' देअर इज नेव्हर एनी एन्डींग टू पॅरीस ' (पॅरीसला अत नाही) असेही हेमिंग्वे यांनी म्हटले आहे. ऑस्कर वाईल्ड, मोलियर, एमिल झोला, चोपिन, रोझिनी, बेल्झाक, व्हिक्टर ह्यूगो, रूसो, व्होल्टेअर अशा विविध क्षेत्रातील कलावताचे व साहित्यिकाचे निधन याच पॅरीस नगरीत झाले अनेक देशाच्या कानाकोपऱ्यातून ज्येष्ठ चित्रकार आले आणि चित्रकलेच्या या जागतिक राजधानीत त्यानी आपल्या सर्वोत्कृष्ट कलाकृती निर्माण केल्या

या शहरात गेल्यावर त्या महान साहित्यिकाच्या सहवासातच राहिल्यासारखे वाटते हेमिंग्वे आणि चार्ली चॅप्लीन या विलासनगरीतील नाईट क्लब्जची मुक्त मौज स्वच्छद उपभोगतात हेमिग्वे तर म्हणत असे, की ' पॅरीसमध्ये आपण स्वर्गाच्या जितक्या जवळ असतो, तेवढे इतर कुठेच नसतो. ' आपल्या अमर कलाकृती निर्माण करण्यास मग त्याचे मन ताजेतवाने होते

# ३ / हे विमान फिरते नभांतरी !

मी प्रथम विमान पाहिले, ते वयाच्या दहाव्या वर्षी त्यावेळी मी कोल्हापुरात रहात होतो एकदा रस्त्यात लोकांची गर्दी दिसली, पूर्वी कधीही न ऐकलेला प्रचंड घरघरीचा आवाज कुठून तरी येऊ लागला आणि रस्त्यात वीतभर आकाराच्या जाहिरातींचा पाऊस पडला मी चटकन धावतच रस्त्यात गेलो तर तेथे लोकांचे घोळके उंच आकाशात पाहात होते मीही त्या दिशेने पाहिले पक्षी म्हणावा तर पक्षी नव्हे, कारण आकाराने प्रचंड पण इतकी जड वस्तू असूनही पक्ष्याप्रमाणे उडत असताना आकाशात दिसली आणि थक्कच झालो. रस्त्यात पडलेली एक जाहिरात मी उचलून घेतली. तीवर छापले होते, 'या आणि उडा फक्त पाच रुपयात विमानाने कोल्हापुरभोवती फेरी मारा' त्याचबरोबर इंग्रजीतही छापले होते, 'Come and Fly' अर्थात 'या आणि उडा' हे चमत्कारिक भाषांतर त्या इंग्रजी शब्दाचे होते हे ओघानेच आले कोल्हापुरपासून चार मैलावरच्या उजळाईच्या माळावर ते विमान उतरले होते म्हणून आम्ही मुले ते अंतर तोडून नागरलेले विमान जमिनीवर तरी जवळून पाहावे म्हणून चालत गेलो. विमान लहानच होते. पण ते अद्‌भुत वाहन पाहून आमच्या आयुष्यात चमत्काराचे युग सुरू झाले अशा विमानात बसून आपल्याला कधी आकाशात फेऱ्या मारता येतील का, तेथून लोक केवढे दिसत असतील, घरे, नद्या कशा दिसत असतील हे फार मोठे कुतुहल तेव्हा मला वाटत होते पाच रुपये ही आमच्या घरी काही मोठी रक्कम नव्हती त्याकाळी आमची मोटारही होती. पण विमानासारख्या धोक्याच्या वाहनात मुलांना बसण्याची परवानगी मिळणे अशक्य होते त्यातून कोल्हापुरात आलेले ते पहिले विमान, ते कोणत्याही क्षणी खाली कोसळेल, आपण सांभाळूनच रस्त्यावरून जावे, ही तेव्हा कोल्हापुरातली सार्वत्रिक भावना होती

त्यानंतर कित्येक दिवस आम्हाला विमानाचीच स्वप्ने पडत होती. घरीदारी

शाळेत विमानाचा विषय सर्वांच्या तोंडी होता बर्तमानपत्रात त्याची चित्तचक्षू चमत्कारिक वर्णने येत त्यानतर पचगगा नदीच्या पुलाखालून कोटच्यावधी गॅलन पाणी गेले पण मला विमानप्रवास घडला नाही १९५५ साली मी इग्लडला गेलो, तो बोटीने आणि परत आलो तो आगगाडीने व बोटीने खुद्द इग्लडच्या मुक्कामातही मी विमानात कधी बसलो नाही कारण विमान प्रवास मला त्या विद्यार्थीदशेत परवडण्यासारखा नव्हता मी १९५८ साली ‘ युसिस ’मध्ये म्हणजे अमेरिकन सरकारच्या माहिती खात्यात नोकरीला लागलो त्या नोकरीत मात्र मला विमानप्रवासाचे इतके प्रसग आले की पुढे रेल्वेसारखाच विमानप्रवास हा नेहमीचा, अगदी सहज घडू लागला मी पहिला विमानप्रवास केला तो अमेरिकेचे भारतातील राज्य प्रतिनिधी आणि जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ जॉन केनेथ गॅलब्रेथ याच्याबरोबर त्याची भोपाळला भेट होती काही पत्रकाराना इथून भोपाळला न्यायचे होते म्हणून आमच्या कचेरीने एक विमानच चार्टर केले म्हणजे सपूर्ण विमान परतीच्या भाड्याने घेतले मी तेव्हा ‘ युसिस ’च्या वृत्तविभागात काम करीत असल्याने पत्रकाराच्याबरोबर मीही गेलो होतो आमच्या कचेरीच्या व्यवस्थापकीय विभागात अनत नारायणन् नावाचा दक्षिण भारतीय होता तोही या विमानातून येणार होता विमान प्रवासाविषयीच्या त्याच्या कल्पना खूपच स्वप्नरजनात्मक होत्या आदल्या दिवशी तो मला म्हणाला, ‘ उद्या बघ मी त्या एअर होस्टेसला गटवतो या पोरी तशा मनमोकळ्या असतात त्याना अमेरिकेला पाठवायची लालूच दाखवली की त्या वश व्हायला वेळ लागणार नाही उद्या विमानात निदान दोन तरी विमान सुदरी असतील, त्यातल्या त्यात अधिक सुदर असेल तिच्यावर मी अस मोहजाल पसरतो की ती माझ्यावर खूष झालीच पाहिजे ’

मी मनात म्हटल, पाहू तर खर घोडा-मैदान जवळच आहे दुसऱ्या दिवशी माझा सहकारी सर्वात ठेवणीच्या सुटाबुटात हजर झाला राज्य प्रतिनिधी गॅलब्रेथ याच्याबरोबर आम्ही विमानात चढलो अनत नारायणन् माझ्याजवळच बसला होता विमान डाकोटा जातीचे होते त्यात आम्ही एकदर वीस बावीसजणच होतो विमान सुरू होण्याची वेळ आली, तरी विमान सुदरी दिसेनात अनत नारायणन् मला म्हणाला, ‘ त्या आधीच आत वैमानिकाच्या खोलीत जाऊन बसल्या असतील आता बाहेर येतील आणि मग मी माझ जाळ कस टाकतो ते पहाच तू ’

विमान सुरू झाल. ते हवेतही गेल. इतक्यात पाढरे कपडे घातलेला

तिशीचा एक पुरुष कॉफी घेऊन येत असलेला दिसला त्याच वेळी घोषणा झाली, ' आम्ही दिलगीर आहोत की, आमच्या विमान सुदरी दूर पल्ल्यावरच्या उड्डाणावर असल्यान त्याच्याऐवजी दोन पुरुष होस्टस् आपली सेवा करतील ' ते ऐकून अनत नारायणन्चा चेहरा इतका पडला की मला वाटले हा आता उडत्या विमानातून खाली उडी टाकतो की काय ?

माझा हा पहिला विमानप्रवास अतिशय वाईट झाला डाकोटा ही विमाने लढाईत वापरून मोडीत काढली होती व दुरुस्त करून वापरली जात होती ते विमान इतका मोठा आवाज करीत होते की कानात कापसाचे बोळे घातले असूनही भोपाळला जाईपर्यंत माझे कान दुखू लागले इतके की परत येताना मी त्या विमानाने न येता रेल्वेच्या वातानुकूलित डब्याने आलो तरीही पहिल्या विमानप्रवासाची नवलाई त्यात होतीच. आकाशातील एअरपॉकेटस् (पोकळ्या) मुळे ते विमान एकदम वर खाली व्हायचे व डळमळायचे तरीही ते चित्तथरारक वाटले. त्यानतर मी कचेरीच्या कामासाठी दिल्ली, पुणे, नाशिक, अहमदाबाद, गोवा, औरगाबाद, नागपूर अशा कित्येक गावी गेलो एकदा दिल्लीत ' अमेरिकन वार्ताहर ' विषयी एक बैठक चालू होती ती सोमवारी सकाळी नऊ वाजता सुरू होणार होती रविवार सकाळच्या विमानाचे माझे तिकीट रिझर्व्ह केले होते. मूळ विचार असा होता की, रविवारी दुपारी दिल्लीत पोचायचे, तेथे हॉटेल रणजितमध्ये कचेरीतर्फे रिझर्व्हेशन होतेच रविवारी दिल्लीच्या काही मित्राना भेटायचे, रात्री कोणा मित्राना आपल्याकडे बोलवायचे आणि मग सकाळी साडेआठला कचेरीकडे जायचे हा बेत मोठा नामी असला तरी इडियन एअरलाईन्सच्या कर्मचाऱ्याना माझे हे सुख किंवा सभाव्य सुख पाहवले नसावे त्यानी अचानक सप चालू केला. विमानतळावर आम्हाला सागण्यात आले की दिल्लीची उड्डाणे ' अनिश्चित काळपर्यंत स्थगित करण्यात आली आहेत ' ही मोठी वैताग आणणारी परिस्थिती असते सकाळी नऊऐवजी दुपारी तीनला विमान सुटेल असे जाहीर झाले तरी चालते कारण आपण दरम्यान घरी जाऊन विश्राती घेऊन दोन अडीचला परत येऊ शकतो पण अनिश्चित काल म्हणजे कोणत्याही क्षणी 'दिल्लीच्या उतारूनी विमानात जावे ' अशी घोषणा होईल. अर्थात आपण सतत विमानतळावरच दक्ष असायला पाहिजे. पण त्या दिवशी सकाळी नऊचे विमान रात्री पावणेबाराला सुटले ! इतर विमानाची तीच अवस्था असल्यामुळे विमानतळाला एस टी. स्टँडपेक्षाही अवकळा आली होती. बारा ते चौदा विमानांच्या उतारूची एवढी गर्दी झाली होती की अनेकाना

मोठ्या कष्टाने कशीबशी उभी राहण्यापुरती जागा मिळाली रात्री पावणे तीनला विमान दिल्लीला पोचले त्या आडवेळी टॅक्सीने शहरात जाणेही धोक्याचे वाटले उलट, दिवसभर इतका कटाळा नि वैताग आला होता की कोणताही धोका पत्करून आधी हॉटेलात जावे आणि झोप घ्यावी, कारण सकाळी साडेआठला बाहेर पडायचे आहे हीही तीव्र इच्छा होती अखेर मी हॉटेलवर जाण्याचा निर्णय घेऊन टॅक्सी केली आणि हॉटेल रणजितवर पावणेचार वाजता पोचलो

एकदा मी विमानाने मुबईहून नाशिकला गेलो त्यावेळी या प्रवासाचे तिकीट फक्त तेहतीस रुपये होते आणि अर्ध्या तासात विमान नाशिकला पोचत असे या छोट्या प्रवासाचा आणि विमानाचाही अनुभव माझ्या पत्नीला व मुलीलाही द्यावा म्हणून मी त्याची तिकीटे काढली विमानतळावर आलो विमानात आम्ही चढलो तेव्हा दिसून आले की त्या विमानात आम्ही तिघेच प्रवासी होतो ! आमच्याबरोबर एक विमानसुदरी आम्हा सर्वांना एक एक खिडकी वाटणीला येऊनही चिकार जागा व खिडक्या शिल्लक होत्या पुढे पुण्याला मात्र मी विमानान न जाता रेल्वेच्या पहिल्या वर्गानेच जाणे पसंत करीत असे कारण धरापासून विमानतळापर्यंत आणि पुन. लोहगाव ते पुणे हा प्रवास कटाळवाणा व वेळ खाणारा होता

एकदा मी बडोद्याला कचेरीच्या कामासाठी विमानाने जाणार होतो एक अमेरिकन प्राध्यापक आणि आमचे एक अमेरिकन अधिकारीही त्याच विमानाने येणार होते तिकीट चेकींग कौंटरजवळ सकाळी साडेसहाला आम्ही भेटायच आणि तिथून तिघानी मिळून विमानात जायच अस आधी ठरल होत मात्र मी ठरल्यावेळी त्या कौंटरजवळ गेलो, तेव्हा ते दोघही तेथे नव्हते. ते मलबार हिलवर रहात होते, तिथून येताना वाटेत उशीर झाला असेल म्हणून मी कौंटरवरून बाहेर येऊन पाच-सहा मिनिटे वाट पाहू लागलो. विमान सुटण्याची घोषणा झाली आणि 'लास्ट कॉल फॉर मिस्टर आर आर मत्री' अशी घोषणा झाली, तेव्हा मात्र आता त्या दोघाची वाट न पाहता आपण विमानात जायचे असे म्हणून मी घाईघाईने निघालो मी शेवटचा प्रवासी होतो विमानाचा अधिकारी दार बद करीत होता आणि जिना हलवण्याची तयारी चालली होती. एका खास जीपमधून मला टर्माइकवर घेण्यात आले आणि अगदी शेवटच्या क्षणी मी विमानात चढलो आत जाऊन पाहतो तो ते दोघे अमेरिकन निवातपणे त्या दिवशीचे दैनिक वाचत बसले होते मला पाहिल्यावर त्याच्यापैकी एकजण म्हणाला, 'सॉरी, तिकीट चेकिंग कौंटरवर भेटायच आम्ही विसरलोच ' मी

वाइचाइन विमान पकडले नसते तर त्या दिवशी बडोद्याच्या कार्यक्रमाचा खूपच घोटाळा झाला असता यावेळी चूक जरी अमेरिकन अधिकाऱ्याची होती, तरी सर्वत्र सरकारी रामरगाड्याप्रमाणे ठपका मात्र माझ्यावर आला असता.

मी न केलेल्या एक विमानप्रवासामुळे माझे नाव अतिशय गाजले होते एका पावसाळ्यात पुण्याहून मुबईला येणारे विमान कोसळले आणि त्यातले बरेच प्रवासी मरण पावले ही गोष्ट मला नतर कळली पण त्या दिवशी सकाळी सहा वाजताच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे याचा मला फोन आला. तो माझ्या मुलाने घेतला मी तेव्हा झोपलेलोच होतो बाळासाहेबाचा फोन आला त्याअर्थी काहीतरी महत्त्वाचे असले पाहिजे म्हणून मी लगेच उठून फोनवर म्हटलो, 'मी रमेश मत्री बोलतो आहे' त्यावर बाळासाहेब सुटकेचा निश्वास टाकून म्हणाले, 'तुम्हाला दीर्घायुष्य लाभो अहो आजच्या पेपरात बातमी आहे की काल कोसळलेल्या विमानात तुम्ही होता म्हणून.' मी म्हटले मी तर घरीच आहे तरीपण आपण अगत्याने फोन केल्याबद्दल आभार ' तोपर्यंत आमच्या घरी त्या दिवशीचे वृत्तपत्रही आले नव्हते त्यामुळे ती बातमी नक्की काय होती हेही मला कळलं नाही मी माझ्या मुलाला स्टेशनवरून दोन तीन दैनिके आणायला सागितली

थोड्याच वेळात पुन: फोन वाजला, 'मी रमेश मत्री बोलतोय असे म्हटल्याबरोबर फोन बद झाला स्टेशनवरून वृत्तपत्रे आणली गेली तेव्हा प्रवाश्याच्या यादीत आर आर. मत्री असे नाव असल्याचे आढळले नतर मात्र एकसारखे इतके फोन आले की काही वेळ फोन खाली ठेवणे भाग पडले. एकाने सागितले की फक्त फ्रीप्रेस मध्ये 'फेमस मराठी ऑथर रमेश मत्री असे छापून आले आहे फ्रीप्रेसचा सहाय्यक सपादक श्री. पिले हे माझे स्नेही व 'युसिस'मधील सहकारी होते त्यांना मी फोन करून दुरुस्ती करण्यास सागितले त्यानी चौकशी करून मला दुपारी कळवले की त्यांच्या पुण्याच्या वार्ताहराने मुबईची टेलिफोन डिरेक्टरी पाहिली तेव्हा माझे नाव मत्री रमेश आर कसे आहे त्यावरून त्याने तोच मी असा निष्कर्ष काढून बातमी खुलवली. वास्तविक जो उतारू निधन पावला तो म्हैसूरचा राचैय्या आर मैत्री होता पण दरम्यान दूरदर्शन, रेडिओ, काही वृत्तपत्रे यानी माझ्या घरी फोन केलेच. मुख्यमत्र्याच्या चिटणिसानीही फोन केला तेव्हा बहुधा 'मुख्यमंत्र्याना दु:ख ' अशी बातमी देण्याची त्याना घाई झाली असावी हे माझ्या लक्षात आले श्री शरद पवार याची व माझी ओळखही नाही, पण या शुभकार्यात

आपण मागे राहू नये अशा सदिच्छेने चिटणिसानी फोन केला होता

एकदा मी कचेरीच्या कामाकरता औरगाबादला विमानाने गेलो होतो माझ्यावरोबर एक अमेरिकन अधिकारीही होते परतीच्या प्रवासासाठी आम्ही विमानतळावर आलो तेथे विमान होते पण ते नादुरुस्त असल्याने सुटणार नाही असे आम्हाला सागण्यात आले आता मोठीच अडचण आली कारण औरगाबाद ते मुबई हा बसचा प्रवास अतिशय त्रासाचा व वेळ घेणारा आम्ही टॅक्सी केली असती तीमुळे त्रास थोडा कमी झाला असता पण वेळ फारसा वाचला नसता त्याच विमानाच्या उतारुत एक युरोपियन गृहस्थ होता त्याचे दोन्ही हात पूर्वी कधीतरी भाजले होते तो तावातावाने विमानतळाच्या प्रमुख प्रमुख नियत्रकाजवळ जाऊन म्हणाला, 'मी काश्मीर प्रिन्सेसच्या अपघातात भाजलो आहे त्यावेळी मला भारताच्या वाहतूक मत्र्यानी हॉस्पिटलमध्ये भेटून सागितले होते की कधीही अडचण आली तर मला सागा आता ती वेळ आली आहे कारण आजच रात्री स्वित्झर्लंडच्या विमानात माझी जागा रिझर्व्ह आहे विमानाखेरीज इतर कोणत्याही वाहनाने मी मुबईस ते विमान सुटण्यापूर्वी पोचणार नाही तुम्ही दिल्लीला फोन करून माझे नाव सागा!' आश्चर्य असे की औरगाबादच्या अधिकाऱ्याने खुद्द वाहतूकमत्र्याना फोन केला आणि त्यांच्या हुकुमाने मुबईहून दुसरे विमान औरगाबादला येऊन दाखल झाले आणि आमची अडचण अचानक सपली

माझा विमानाचा पहिला परदेश प्रवास म्हणजे १९७२ साली मी अमेरिकेला गेलो तो त्यावेळी विमानाचे तिकीट खूप स्वस्त म्हणजे मुबई-न्यूयॉर्क-मुबई हे फक्त साडेचार हजार रुपयाना होते आता ते दुप्पटीहून अधिक झाले आहे. रात्री नऊला मुबईहून निघणारे हे विमान दुसऱ्या दिवशी दुपारी साडेतीनला न्यूयॉर्कला पोचायचे होते वाटेत लडनला ते दोन तास थांबणार होते शिवाय रोमलाही पाऊण तास त्याचा थाबा होता माझ्या अमेरिकेतील एका मित्राच्या बायकोने आमटीत घालण्यासाठी कढीपत्त्याची पाने आणायला सागितली होती ती व इतर अनेक वस्तू मी बरोबर घेतल्या होत्या मुबई ते लडनपर्यंतचा आमचा प्रवास छान झाला. एअरइडियाच्या जबोजेटने मी गेलो होतो एवढ्या मोठ्या अलिशान विमानात मी प्रथमच बसलो होतो उत्तम मद्य, चांगले भारतीय जेवण, भारतीय सगीत यात प्रवासाचा वेळ चांगला गेला लडनच्या विमानतळावर माझी लंडनची १९५६ सालची एक मैत्रिण मला भेटायलाही आली होती तिला भेटता यावे म्हणून मला

तात्पुरता व्हिसाही घ्यावा लागला. एरवी उतारू आणि बिनउतारू याची विमानतळावर भेट होत नव्हती एकाचे ट्रॅन्झिट कार्ड घेऊन दुसरी व्यक्ती विमानातून जाऊ नये म्हणून ही खबरदारी होती विमानाने लंडन सोडले आणि नंतरचा सहा तासाचा प्रवास मात्र अतिशय कंटाळवाणा झाला कारण पुढे खाली पाणी, सभोवती निराकार आकाश याशिवाय काहीही दिसत नव्हते या प्रवासात दोन चित्रपट दाखविण्यात आले पण त्यापैकी एक मी आधीच पाहिला होता आणि दुसरा तद्दन भिकार होता न्यूयॉर्कच्या विमानतळावर माझा पासपोर्ट व माझे अमेरिकन कॉन्सुलेटचे ओळखपत्र मी दाखविले, तेव्हा मी अमेरिकन सरकारचाच नोकर असल्याने माझ्या सामानाची तपासणी न होता ' वेलकम् टू यु एस ए. सर ' असे म्हणून कस्टम अधिकाऱ्यानी माझे स्वागतच केले मात्र न्यूयॉर्कला माझे मित्र श्री शशिकांत देशमुख याच्याजवळ मी कढिपत्त्याच्या डहाळ्यांचा जुडगा देऊन तो फ्रीजमध्ये ठेवायला सांगितले तेव्हा ते आश्चर्याने म्हणाले, ' अहो, अमेरिकेत बाहेरून कोणतीही वनस्पती, रोपे, झाडे आणायला बंदी आहे. कारण परदेशातील झाडावरचे रोग अमेरिकेतील झाडावर पसरू नयेत म्हणून सरकार अतिशय दक्ष असते तुमच्या बॅगेची तपासणी झाली असती तर तुम्हाला दोन चार तास तरी विमानतळावर चौकशीसाठी अडकून पडावे लागले असते ! '

अमेरिकेस मी चार महिने होतो तिकिटाची मुदत १२० दिवसाची होती आणि अखेरच्या दिवसाचे परतीचे तिकीट रिझर्व्ह केले होते अमेरिकेतील जास्तीतजास्त शहरे मला कमीतकमी खर्चात पहायची होती, त्या दृष्टीने विविध प्रवासी कंपन्यात जाऊन मी चौकशी केली, तेव्हा मला कळले की ' व्हिजिट यू.एस ए. ' नावाचे १०५ डॉलर्सचे तिकीट आहे, ते २१ दिवस चालते या २१ दिवसात आपण अमेरिका व कॅनडा या दोन देशात कोठेही प्रवास करू शकतो १०५ डॉलर्स ही रक्कम सबंध अमेरिकेच्या प्रवासासाठी फारच अल्प होती कारण तेव्हा फक्त न्यूयॉर्क-लॉस एंजिल्स हा एकच परतीचा प्रवास ८६ डॉलर्सचा होता ' व्हिजिट यू एस ए 'चा जास्तीत जास्त फायदा घेण्याच्या दृष्टीने मी माझ्या अमेरिकेतील मित्राच्या मदतीने एक भरगच्च कार्यक्रम आखला शिकागो-डेन्व्हर-लास व्हेगस-लॉस एंजिल्स-सॅन फ्रॅन्सिस्को- अशी अमेरिकेतील सर्व प्रमुख शहरे आणि कॅनडातील टोरंटो हे शहर पाहण्याची योजना मी आखली. या तिकिटासाठी वेगवेगळ्या नऊ विभागातील नऊ कंपन्यांच्या विमानानी प्रवास करावा लागतो हे तिकीट इतके स्वस्त कसे

याची मी चौकशी केली, तेव्हा समजले की ' युनायटेड 'सारख्या बड्या अमेरिकन विमान कपन्यानी अमेरिकेतील बहुतेक विमान वाहतूक काबीज केली आहे. त्यामुळे अलिगनी किंवा एअर वेस्टसारख्या लहान, प्रादेशिक कपन्या तोट्यात जाऊ लागल्या अशा नऊ कपन्यानी एकत्र येऊन ' व्हिजिट टू यू.एस ए ' हे सयुक्त तिकीट काढले प्रत्येक विभागात कोणत्या कपनीने जायचे याची नोंद तिकिटावर असते मी प्रथम शिकागोला जायचे ठरवले न्यूयॉर्कच्या विमान तळावर अलिगनी विमान कपनीच्या कचेरीत तिकीट चेकिंगवर माझे सामान दिले आणि शिकागो असे स्पष्ट सागितले तरीही तेथील अधिकाऱ्याने ' ओहेट ' असे लेबल त्यावर लावून ते सारख्या पट्ट्यावर ठेवून आत पाठवलेही मी म्हटले, ' अहो, पण मला ओहेटला जायचे नसून शिकागोला जायचे आहे। ' तो शातपणे म्हणाला, ' ओहेट हे शिकागोच्याच विमानतळाचे नाव आहे '

अमेरिकन विमानात मी प्रथमच बसत होतो त्याचा बादशाही थाट काही पुसू नका विमानसुदरी हे नाव सार्थ करणाऱ्या लावण्यवती एअर होस्टेसेस् तळावरून गालिच्यावर चालत जाऊन थेट विमानात बसण्याची सोय ( म्हणजे टर्माईकवर जावे न लागता विमानच अगदी दरवाजापर्यंत येते ) इत्यादी पाहून लक्झरीचा खरा अर्थ पटतो शिकागो विमानतळावर उतरलो आणि त्याची भव्यता, नीटनेटकेपणा आणि असख्य विमाने पाहून मी दिपूनच गेलो शिकागोचा ओहेट विमानतळ हा जगातील सर्वात मोठा दर अर्ध्या मिनिटाला इथून एक विमान उडते अमेरिकेचे एक टोक न्यूयॉर्क तर दुसरे अडीच हजार मैलावरचे लॉस एन्जिल्स याच्याबरोबर मध्ये शिकागो असल्याने बहुतेक अतर्गत विमाने शिकागोला थाबतात जगातील सर्व देशात विमानांची अतर्गत वाहतूक त्या त्या देशाकडेच असते परदेशातील विमानाना दुसऱ्या देशात अंतर्गत वाहतूक करता येत नाही. नेपाळसारख्या छोटया देशापासून अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाना हा आतरराष्ट्रीय नियम लागू आहे याचे मुख्य कारण त्या त्या देशाची सुरक्षितता शिकागो विमानतळावरून मला तेथील माझे स्नेही श्री गोडबोले याच्याकडे जायचे होते मी एका चौकशीसुदरीकडे त्याबद्दल विचारणा केली, तेव्हा ती म्हणाली, ' आपण कृपा करून ' लूप ' घ्या असा चमत्कारिक सल्ला भलत्यावेळी आणि भलत्या जागी का द्यावा असा विचार मी बाहेर आलो तेव्हा Loop अशी अक्षरे असलेली बस तेथे दिसली त्यावरून शिकागोला लूप हे एका ठिकाणाचे नाव आहे. भारतातील लूप हा अर्थ त्या मार्गदर्शक बाईला अभिप्रेत नव्हता हे माझ्या लक्षात आले

शिकागोत दोन दिवस राहून मी लास व्हेगासला निघालो हे विमान थेट लास व्हेगासला जात नसे, फक्त डोव्हरपर्यतच जाई तिथे विमान बदलून पुढे लास व्हेगासला जावे लागत होते या ट्रॅन्स्फरसाठी फक्त पचवीस मिनिटे वेळापत्रकात दिली होती हा वेळ अपुरा होता कारण पहिल्या विमानातून सामान येण्यासाठी सात आठ मिनिटे लागत होती पुन दोन कपन्याचे तळ वेगळे म्हणजे धावपळच होणार होती त्यातच शिकागोहून सुटलेले आमचे विमान तेथे उशिरा पोहचले मी पहिल्या विमानातले सामान आल्याबरोबर ते घेऊन धावतच 'एअर वेस्ट' या कपनीच्या काऊटरवर गेलो आणि माझे तिकीट दाखवले त्यावर नकारात्मक चेहरा करून तेथील अधिकारी म्हणाले, 'आता विमानाची इंजिने सुरू झाली आहेत विमान सुटण्याला फक्त तीनच मिनिटे आहेत ' मी म्हटले, 'पहिले विमान उशिरा आले. मी जर इथे अडकून पडलो तर माझी फारच गैरसोय होईल काही प्रयत्न करता आला तर पहा ' या वेळपर्यंत विमानाची दारेही बद होत होती तरीही त्याने विमानात वायरलेस फोनवर सपर्क साधला आणि माझे सामान लेबल लावून घेतले मी धावतच विमानाकडे गेलो बंद होत असलेले दार उघडले आणि एका सुंदरीने मला आत घेतले

या एअर वेस्टसारखी जगात दुसरी कपनी नाही या कपनीच्या जाहिरातीत म्हटले होते की, 'आमच्या विमान सुदरी उदार आहेत. त्यांच्याशी आपण थोडाबहुत रोमान्स करू शकता !' डेव्हर ते लास व्हेगास या फाल्यावर पिवळ्या वर्षातील एअर वेस्टची एक विमान सुंदरी माझ्याजवळ येऊन बसली आणि तिने एक फॉर्म भरून देण्याची विनती केली. या विमान कपनीची सर्व्हिस कशी आहे यावर उतारूचे मत त्या फॉर्मवर घेण्यात येत होते विमानात फारच कमी उतारू होते आणि चार देखण्या विमान सुंदरी होत्या त्या जवळ येऊन हातात हात घेत असत, खेटून बसत असत त्याच्या गालाचे चुबन घेतले तरी त्याची हरकत नसे मात्र त्यापुढे जाता येत नसे. विमान कपनी लोकप्रिय करण्याचा त्या कपनीचा तो प्रयत्न होता सर्वच अमेरिकन विमान कपन्या आपल्या उतारूना उत्तम न्याहारी, लंच, डिनर देतात काही कंपन्या मद्याची

[illegible] पेयात. डेव्हर ते लास व्हेगास हा माझा प्रवास अतिशय सुखद झाला पण तेथे उतरल्यावर एक अनपेक्षित अडचण आली ती अशी की मी जरी घाईघाईने विमानात चढलो, तरी माझे सामान आत येऊ शकले नव्हते मी बरोबर एकच बॅग घेतली होती ती आली नाही अशी तक्रार मी एअर

वेस्टच्या कौंटरवर केली, तेव्हा त्या अधिकाऱ्याने सामान हरवल्याबद्दलचा एक फॉर्म देऊन मला सांगितले, 'तुमची बॅग सापडली नाही तर कंपनी तुम्हाला पाचशे डॉलर्स देईल' मला अत्यानंद झाला आणि माझी बॅग हरवू दे अशी मी मनातून प्रार्थना केली कारण माझ्या बॅगेतील कपड्यांची किंमत चारशे रुपयेही नव्हती आणि ती हरवली तर मला पाच हजार रुपये तेही डॉलर्समध्ये मिळणार होते पण माझ्या दुर्दैवाने नंतरच्या फ्लाईटने माझी बॅग आली आणि माझे पाच हजार रुपये बुडाले! लास व्हेगास हे जगातील सर्वात मोठे जुगाराचे केंद्र आहे इतकेच नव्हे तर तेथे विमानतळावरच जुगाराची यंत्रे आहेत त्यात नाणे टाकायचे आणि दांडा फिरवायचा तुम्ही भाग्यवान असाल तर एका नाण्याला शंभर नाणी त्या यंत्रातून खळाखळ पडतात

लास व्हेगासला दोन रात्री जुगार खेळून व नाईट क्लब पाहून मी एका सकाळी लॉस एंजिल्सला जाण्यासाठी निघालो एकवीस दिवसात अमेरिका व कॅनडा पहायचा असल्याने मला थोडीफार धावपळच करावी लागत होती या प्रवासात माझ्या असे लक्षात आले की विमानाने लवकर जाता आले व तसे तिकीट स्वस्त असले तरी सर्व शहरात विमानतळ हा गावापासून लांब असतो त्यामुळे विमानतळावरून शहरात व परत तळापर्यंत जाण्यासाठी टॅक्सीचा खर्च बराच येतो अमेरिकेत हा खर्च प्रत्येक गावी सरासरी तीनशे रुपये येत होता अमेरिकेत पाहण्यासारख्या जास्तीत जास्त गोष्टी आहेत त्या लॉस एंजिल्समध्ये जगप्रसिद्ध डिस्नेलँड, हॉलिवुड आणि जंगल सफारी ही ठिकाणे तेथेच आहेत त्यामुळे मी लॉस एंजिल्सला पाच दिवस दिले होते त्या नामवंत शहरी मी जे पाहिलं त्याच तपशीलवार वर्णन 'सुखाचे दिवस' या पुस्तकात मी केलं असल्यानं इथं पुनरावृत्ती करीत नाही.

या धावपळीच्या दिवसात 'आज इथं तर उद्या तिथं' असा प्रकार होत होता लॉस एंजिल्सहून सॅनफ्रान्सिस्कोला जायला निघालो तो फ्रन्टियर विमान कंपनीनं माझं व्हिजिट यू. एस ए तिकीट पाहून फ्रन्टियरचा एक चेकर म्हणाला, 'हे तिकीट असं आहे, एकदा यानं प्रवास केल्यावर पुनः विमानाचं तोंड पाहू नये असं तुम्हाला शेवटी वाटेल!' कमीत कमी वेळात जास्ती गाव पाहण्याचा मोह अशा वेळी प्रवाश्याला होतो आणि कधी कधी त्याचा अतिरेक होतो हेही खरंच पण मी दर्दी प्रवासी असल्यानं त्याचा अतिरेक न करताही जास्तीत जास्त सुखद प्रवास होईल असाच कार्यक्रम मी आखला होता लॉस एंजिल्स ते सॅनफ्रॅन्सिन्स्को हा प्रवास फक्त एक तासाचाच आहे

सॅनफ्रॅन्सिस्कोच प्रसन्न दर्शन मी विमानाच्या खिडकीतूनच घेतल विमानतळावर श्री प्रभाकर आपटे आणि सौ कुंदा आपटे मला उतरून घेण्यासाठी आले होते याच्या संगतीत सॅनफ्रॅन्सिस्कोचे दोन दिवस अत्यंत चागले गेले आता मी मायामीला जाणार होतो पण वाटेत न्यू ऑर्लिन्स हे सुदर बदर आहे अस कळल्यामुळ तिथ उतरलो हा प्रवास पुन: एअर वेस्टन केला जगप्रसिद्ध कोट्याधीश हॉवर्ड ह्यूडोस याची ही विमानकंपनी पण ते विमान फोनिक्सपर्यंतच जात होते फोनिक्स या शहरी दुपारी दोन वाजता उतरलो पुढच विमान सध्याकाळी सहा वाजता होत आणि ते 'टेक्सास इंटरनॅशनल' कपनीच होत अर्थात् चार तास फोनिक्समध्ये भटकण्यात, बियर घेण्यात घालवले साडेपाचला विमानतळावर आलो तिथून पुन डलासला विमान बदलून न्यू ऑर्लिन्स जायच होत या साऱ्या लहान कपन्या असल्याने त्यांची विमाने थेट लाब पल्ल्यावर जात नसत त्यामुळे मध्ये खूप वेळ फुकट जाई. म्हणूनच त्याना अमेरिकन प्रवाश्याचा फारसा आश्रय नव्हता हे विमान रात्री नऊ वाजून चाळीस मिनिटानी डलासला पोचणार होतं आणि पुढच न्यू ऑर्लिन्सच विमान दहा वीसला निघणार होत. म्हणजे जरा घाईच झाली असती.

तशातच हे विमान डलासला दहा मिनिट उशिरा पोचलं सामान घेऊन धावतच 'टेक्सास' च्या कौंटरवर आलो आणि म्हटल, 'अजून दहा मिनिट आहेत. मला न्यू ऑर्लिन्सच्या विमानान दोनशे सहा नबरच्या फ्लाईटन जायच आहे!' त्यावर ती निवांतपणे म्हणाली, 'सर, तुमची ही फ्लाईट उद्या सकाळी दहा वीसला आहे, आज रात्री नाही ' 'अरे बाप रे!' आता रात्रभर विमानतळावर मी कसा राहणार? सुदैवानं कुमार घोटाकर नावाचा माझा एक नातेवाईक डलासला आहे अस मला आठवल टेलिफोन डिरेक्टरीत नबर पाहून त्याला फोन केला. तो लगेच गाडी घेऊन आला आणि त्यान मला अत्यंत आग्रहानं दोन दिवस ठेवून घेतले. याच डलासमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी याचा खून झाला होता. तिथंच माझ्या आखीव कार्यक्रमापैकी दोन दिवसाचाही खून झाला मी न्यू ऑर्लिन्सला जाण्यासाठी नकाशा पाहिला, तेव्हा लक्षात आलं की ह्यूस्टन हे अवकाश सशोधन केंद्र वाटेवरच आहे माझ्याजवळ विमानाचे कुठेही जाण्याचे तिकीट होते, मग विचार केला की चद्रावर जाण्यासाठी अमेरिकन अवकाश वैमानिकाना जेथे शिक्षण दिले, तेही का पाहू नये? ह्यूस्टनच्या विमानाचे वेळापत्रक पाहिले, ते अतिशय सोईचे होते, म्हणजे सकाळी अकराला ते ह्यूस्टनला पोचत होते आणि दुपारी तीन वाजता न्यू

ऑर्लिन्सला विमान सुटणार होते चार तासात अवकाश सशोधन केंद्र सहज पाहता येईल असा मी विचार केला

'टेक्सास इटरनॅशनल' च्या विमानान मी बरोबर अकरा वाजता ह्यूस्टनला पोचलो विशेष म्हणजे त्या अवाढव्य विमानात आम्ही तीनच उतारू आणि विमानसुदरी होत्या एका सुदरीला मी त्याबद्दल विचारल, तेव्हा ती म्हणाली, 'आज तेरा तारीख तेरा हा आकडा अमेरिकन लोक अशुभ मानतात म्हणून आज अगदीच कमी प्रवासी आहेत'. मी या आपल्या लोक-भ्रमावर कधीच विश्वास ठेवीत नाही अर्थात ती तेरा तारीख आहे याची आधी मला जाणीव नव्हती आणि असती तरी मी प्रवास केलाच असता. ह्यूस्टनच माझ गणित साफच चुकल कारण मी बसने ह्यूस्टनला गेलो खरा पण तेथील सशोधन केंद्रे अवाढव्य होती, दूरवर पसरलेली होती आणि बऱ्याच केंद्राना खास परवानगीशिवाय भेटी देता येत नव्हत्या त्यावेळी माझ अमेरिकन कॉन्सुलेटच ओळख कार्ड उपयोगी पडल आणि बहुतेक महत्त्वाची खाती मी पाहू शकलो पण ती पाहण्यास एवढा वेळ गेला की मी पूर्वी मनात ठरवलेली बस निघून गेली पुढच्या बसन जायच तर तीनचं विमान चुकल असतं तिथ टॅक्सीही नव्हती कारण सर्वच कर्मचारी स्वत.च्या मोटारीन येणारे. सुदैवान त्यावेळी मला ह्यूस्टन केंद्रावर काम करणारे एक भारतीय तज्ज्ञ भेटले. आणि त्यानी मला आपल्या मोटारीन विमानतळावर नेऊन सोडल तेव्हा पावणेतीन झाले होते. मी मोठीच धावपळ करून विमान पकडल मी किती सुदैवी होतो हे दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रावरून मला समजल कारण मी त्या विमानतळावरून गेल्यावर पंधरा मिनिटातच तुरुगातून पळून आलेले दोन गुन्हेगार तेथे आले त्यानी गेटवरच्या माणसावर गोळ्या झाडल्या संरक्षकाचा खून केला आणि धावत जाऊन एका विमानात दोघे चढले. तेथे नॉर्थ सेंट्रलचं एक विमान उड्डाणाच्या तयारीत होत त्यात ते घुसले आणि वैमानिकावर पिस्तुल रोखून ते विमान पळवून नेलं! मी वेळेवर पोचलो नसतो तर मीही त्यावेळी त्याच विमानतळावर असतो. त्या दोन गुन्हेगारानी केलेल्या बेछूट गोळीबारात चार निरूपद्रवी प्रवासीही जखमी झाले होते

ह्यूस्टनहून मी सध्याकाळी न्यू ऑर्लिन्सला पोचलो आता मात्र या सतत विमानप्रवासाचा कंटाळा येऊ लागला होता. पण मी ती प्रदक्षिणा पूर्ण करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. अजून मला खूप प्रवास करायचा होता न्यू ऑर्लिन्सहून मायामीला जाण्यासाठी दोन दिवसानी सकाळी टॅक्सीने निघालो

वाटेवर दैनिक घेतल त्यावर ठळक बातमी होती की एक विमानकपनी बद पडली आणि तिचे हजारो प्रवासी निरनिराळ्या तळावर अडकून पडले माझ्या छातीत धस्स झाले म्हटल बहुधा ही माझीच म्हणजे ज्या ओझार्क विमान कपनीच्या विमानाने मी मायामीला जाणार होतो ती असावी कारण स्वस्तातल्या स्वस्त विमानानी माझा प्रवास होता होता त्या नऊ कपन्यांपैकी एखादी जरी गोत्यात आली असती तरी माझी पंचाईत झाली असती विमानतळावर जाऊन पहातो तर ओझार्कचा कौंटरच नव्हता! म्हटले, झालं! आपल्यांच कपनीन दिवाळ काढल पण धीर करून चौकशी केली तेव्हा कळलं की ओझार्कची तिकीट सदर्न एअरच्या कौटरवर मिळतात या दोन छोट्या कपन्याचा एकत्र कौंटर होता मग तिकीट घेतलं आणि मायामीला आलो त्या विमानतळावर एक नवी सोय आढळली ती अशी की एका यंत्रात दहा सेंटच नाण टाकल तर विमानाचा पायलट आणि ग्राउड इजिनियर याच्यातल सभाषण ऐकता येत आणि ते मी ऐकल पण त्याच्या बोलण्यात इतके पारिभाषिक शब्द होते की त्यातल्या फारच थोड्या सभाषणाचा मला बोध झाला मायामीहून मला बफेलोला जायचं होत कारण जगप्रसिद्ध नायगारा धबधबा हा बफेलोजवळच होता पण आमच्या विमानकपन्या लहान असल्यानं मायामी ते न्यूयॉर्क किंवा डेट्रॉईट अशी थेट फ्लाईट नव्हती अर्थात् मला विमानात ते समजल शिकागो या मध्यवर्ती शहरी अपरिहार्यपणे उतराव लागल तिथेही कार्यक्रम थोडा बदलला कारण शिकागोचे माझे मित्र अरुण टेंबे याचे स्नेही विद्याधर माद्रेकर याच्या खास निमत्रणामुळं मी शिकागोहून लॅन्सीगला विमानान गेलो त्या विमानतळावर मी एक अगदी वेगळेच दृश्य पाहिले ते म्हणजे दोनच माणसं बसतील अशी चाळीस पन्नास छोटी विमान तिथ नागरून पडली होती मला उतरून घेण्यासाठी आलेल्या माद्रेकरांना मी त्याबद्दल विचारलं तेव्हा ते म्हणाले लॅन्सींग हे छोट गाव असल्यान इथ फारच थोडी कमर्शियल म्हणजे, सार्वजनिक विमान येतात म्हणून इथल्या शभरावर लोकानी ही स्वत ची विमान घेतली आहेत रोज सकाळी ते या विमानानी मोठ्या शहरी कामासाठी जातात व परत त्याच विमानानी येतात ' लॅन्सींगहून मी डेट्रॉईटला गेलो इथे जगप्रसिद्ध फोर्ड मोटार कारखाना पाहिला आणि दुसऱ्याच दिवशी बफेलोला गेलो

डॉ पडित याच्याकडे मी राहिलो नायगारा धबधबा पाहिला आणि टोरटो या कॅनडातील प्रमुख शहरी गेलो आता विमानप्रवासाचा जाम कंटाळा आला होता वेळापत्रक पहायचं, कार्यक्रम ठरवायचा, त्यात बदल झाला

की पुन  नवी विमान, नव्या वेळा, नवी गाव  अक्षरश  या गावावरून त्या गावावर उडत जाण्यात २१ दिवस भर्रकन् गेले  पण विमानात सतत पाश्चात्य पद्धतीचे उपहार व जेवण मिळते. तेही पुढे नकोसे वाटू लागले  अखेर टोरंटोला मी माझा हा एकवीस दिवसाचा घाईगर्दीचा आणि धावपळीचा विमान प्रवास संपवला  येताना मी बसन न्यूयॉर्कला आलो

हॉलंडमधील माझ्या मैत्रिणीला भेटण्यासाठी मी न्यूयॉर्क-लडन-ॲमस्टरडॅम हा विमानप्रवासही एअर इंडियाने केला  सध्या एअर इंडिया मुबई-न्यूयॉर्क या सफरीत युरोपमध्ये एक थाबा देते  पण त्यावेळी प्रवाश्याना ही सवलत नव्हती म्हणून मला ॲमस्टरडॅमचे वेगळे तिकीट काढावे लागले होते  लडन ते ॲमस्टरडॅम हा प्रवास इतक्या थोड्या वेळात सपतो की आपल्याला आश्चर्य वाटते  कारण वेळापत्रकाप्रमाणे हा प्रवास दीड तासाचा असला, तरी त्यात एक तास घड्याळ पुढे करायचे असल्याने ज्याला फ्लाईंग टाईम किंवा प्रत्यक्ष उड्डाणाची वेळ म्हणतात, ती अर्धा तासच असते  विमान थाबता थाबता माझी कॉफी आली ती घाईघाईने घेऊन मी उतरलो

ऑक्टोबर १९७३ मध्ये मला अत्यत अनपेक्षितपणे अमेरिकेला जावे लागले  एका मित्राने शेतकऱ्याचे पथक अमेरिकेला नेण्याची सिद्धता केली  पण तोच खरा अमेरिकेला कधी गेला नव्हाता व अशी टूर कशी न्यावी हेही त्याला माहीत नव्हते  त्याने मला साकडे घातले  ही सफर इतकी ऐनवेळी झाली की दुपारी साडेचार वाजता मला न्यूयॉर्कचे तिकीट मिळाले आणि त्याच रात्री नऊ वाजता मी विमानतळावर हजर राहिलो  अनेक लोक पुण्या-मुबईचा प्रवासाठी चार चार दिवस आधी तिकीट रिझर्व्ह करून करतात  मी मुबई-न्यूयॉर्क हा प्रवास फक्त साडेचार तास आधी तिकीट हाती पडून केला  तेही तिकीट नरीमन पॉईंटला मिळाले  माझे वास्तव्य बावीस मैलावर मालाडला आणि तिथून परत, विमानतळ दहा मैल ! म्हणजे या साडेचार तासातही बत्तीस मैलाचा प्रवास आणि सामानाची बांधाबाध करावी लागली  सुदैवाने मी अमेरिकन सरकारमध्येच असल्याने मला व्हिसा मात्र ताबडतोब मिळाला होता

त्यानतरचा माझा सर्वात महत्त्वाकाक्षी विमानप्रवास म्हणजे १९८१ साली मी केलेली पृथ्वी प्रदक्षिणा  पचवीस हजार मैलाहून अधिक दीर्घ असा हा प्रवास मी पॅन ॲम या एकाच विमानाने केला  मुबई-बँकॉक-, हॉंगकॉंग-टोकियो, होनोलुलू-सॅनफ्रॅन्सिस्को, वॉशिंग्टन-न्यूयॉर्क, लडन, फ्रॅंकफुर्ट-मुबई असा हा प्रवास होता  पाश्चात्य देशात मी पूर्वी चार वेळा गेलो असलो तरी पूर्वेकडे

कधीच गेलो नव्हतो हे अर्धे जग मला अज्ञातच होते या पृथ्वी-प्रदक्षिणेचे तिकीट होते बारा हजार सहाशे पन्नास रुपये त्यामानाने स्वस्तच होते ऐंशी दिवसात हा प्रवास पूर्ण करायचा होता. म्हणजे पूर्वीच्या अमेरिका-कॅनडाच्या एकवीस दिवसाच्या तुलनेने जरा आराम होता. पॅन अमेरिका ही जागतिक कीर्तीची विमान कंपनी म्हणून शाही थाटात हा प्रवास होणार या स्वप्नरंजनात मी मशगूल होतो १८ जूनला रात्री अकराला या जगप्रवासाची सुरुवात होणार होती पण प्रथमग्रासे मधिकापात झाला कारण पहिलेच विमान सहा तास उशिरा! कारण काय, तर लंडनला हिथ्रो विमानतळावर म्हणे संप झाला तिथून सुटल्याशिवाय ते विमान इथे येणार नव्हते सात तास विमानतळावर एकट्यानेच कंटाळवाणा वेळ ढकलीत बसून राहिलो कारण विमान सुटण्याच्या मूळ वेळेपूर्वी तासभर मी तेथे दाखल झालो होतो सुदैवाने ही पहिली खेप सोडली तर पुढे या जगप्रवासात कोठेही पॅनअॅमचे विमान एक मिनिटही उशिरा निघाले नाही व्यवस्था चांगली होती चहा, कॉफी, ब्रेकफास्ट, डिनरमध्ये दर्जा होता आणि पुरेशी विविधता होती. जगात सर्व विमान कंपन्यात सर्वात निकृष्ट खाद्यपेये मिळतात ती इंडियन एअर लाईन्सच्या विमानात तुरुंगातील कैद्यांना देण्यात येणारे अन्न या विमानप्रवाश्यांना देण्यात येत असावे इंडियन एअर लाईन्सला पुरविल्या जाणाऱ्या खाद्यपेयांच्या कंत्राटात कोणीतरी कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार करीत असावा असं मानण्याला हे अन्न सहजच पुरावा देऊ शकेल पॅन अॅममध्ये वाचनासाठी भरपूर वृत्तपत्रे व नियतकालिकेही ठेवण्यात येतात. एअरइंडियाच्या बऱ्याच विमान सुंदरी या बेपर्वा व निष्काळजी असतात पण परदेशी विमान सुंदरी अतिशय दक्ष व निपुण आढळल्या

पॅन अॅमचे विमान सकाळी अकरा वाजता बँकॉकला पोचले आणि माझ्या जगप्रवासाचा पहिला टप्पा आला विमानाला उशीर झाला म्हणून मुंबईच्या विमानतळावरच आम्हाला रात्री अडीचला कंपनीतर्फे मोफत जेवण व पहाटे साडेचारला ब्रेकफास्ट दिला होता पुन. विमान सुरू झाल्यावर साडेसहाला मॉर्निंग टी व आठला हेवी ब्रेकफास्ट देण्यात आला पॅन अॅमला बहुधा लंचपूर्वी कंपनीतर्फे एक पेग व्हिस्की किंवा बियरचा कॅन देण्यात येई एअर इंडियाचा सारा दिमाख उत्तम जाहिरात करण्याचा प्रत्यक्ष सुविधा मात्र इतर आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या मानाने कमी असतात पॅन अॅमला मी निघण्यापूर्वी एक महिना आधी माझा कार्यक्रम दिला होता त्या माझे तिकीट दिले होते, त्याचा काही

| तारीख वार | कोठून कोठे | उड्डाण क्र | निघण्याची वेळ<br>पोचण्याची वेळ |
|---|---|---|---|
| 1916 FRI | BOM/BKK | PA002 | 0110/0640 |
| 2316 TUE | BKK/HKG | PA002 | 0750/1123 |
| 2516 THU | HKG/TYO | PA002 | 1230/1755 |
| 217 THU | TYO/HNL | PA 823 | 2100/0905 |
| 427 SAT | HNL/SFO | PA 842 | 0855/1649 |

भाग नमुन्यादाखल खाली देत आहे

या कार्यक्रमानुसार माझा हाँगकाँग व टोकियोपर्यंतचा विमानप्रवास अगदी ठरल्याप्रमाणे झाला आँगाँकचा विमानतळ अतिशय सुदर आहे. डोंगराच्या बेचक्यातल्या एका सपाट जागेवर विमान उतरते आणि अगदी समुद्राच्या काठाजवळ थाबते त्यामुळे डोंगर व सागर याच्या मधला हासर्वांगसुदर भाग विमान जमिनीला लागण्यापूर्वीच आपल्याला प्रसन्न करतो मी टोकियोला पोचलो तेव्हा आणि तेथून निघालो तेव्हा अशा दोन्ही वेळी अधार होता त्यामुळे विमान तळाचा बहिरग मला नीट पहाता आला नाही पण टोकियोचा विमानतळ आतून जेवढा सुदर, स्वच्छ अद्ययावत् आहे, तेवढा जगातील इतर कोणताही विमानतळ नाही मात्र हा तळ शहरापासून पंचेचाळीस मैल लाब असल्याने आणि टोकियो हे जगातील सर्वात महाग शहर असल्याने विमानतळावरनू गावात जाण्यासाठी व टॅक्सी मिळून किमान एक हजार रुपये व जास्तीत जास्त १६५० रुपये पडतात ! जपानमध्ये उतरल्याबरोबर प्रवाश्याला हा कराटेचा जबरदस्त फटका बसतो

मुबईच्या ट्रॅव्हल एजन्सीला माझे तिकीट तयार करणाऱ्या बाईने केलेल्या एका घोटाळ्यामुळे मला दोनशे रुपयाचा भुर्दंड बसला आणि थोडा त्रास झाला. २ जुलै रोजी माझे विमान रात्री ९ वाजता टोकियोहून निघून ३ जुलै रोजी सकाळी होनोलुलूला पोचेल असे तिने तिकीटावर लिहिले होते. त्यानुसार

होनोलुलूला हवाई विद्यापीठाला पत्र लिहून मी तेथे एक प्राध्यापक गाडी घेऊन येतील अशी व्यवस्था केली होती पण तेथे कोणीच आले नाही म्हणून मी टॅक्सी करून विद्यापीठात गेलो तेथे मला यजमानीणबाईंनी सांगितले, ' आज तीन तारीख नसून दोन तारीख आहे पॅसिफिक महासागरातील आंतरराष्ट्रीय डेट लाईन ओलांडल्यावर सबंध एक दिवस कॅलेंडर मागे करावे लागते ' वास्तवक ही गोष्ट मुंबईला तिकीट तयार करणाऱ्या बाईला माहीत असायला हवी होती या तारखेच्या घोटाळ्यामुळे मी २ जुलैला रात्री ९ वाजता निघून २ जुलैलाच सकाळी नऊ वाजता होनालुलूला पोहोचलो होतो !

होनालुलूसारखा स्वागतशील व सुखद विमानतळ पृथ्वीच्या पाठीवर कोठेही नाही कारण येथे प्रवासी उठल्याबरोबर त्याच्या गळ्यात माळ पडते ! हवाई राज्याच्या स्वागत विभागातर्फे अनेक सुदर दरुणी प्रत्येक विमानाच्या अगमनाच्या वेळी उपस्थित राहतात आणि प्रवाशाच्या गळ्यात पाढऱ्या चाफ्याची माळ घालून ' वेलकम् टु हवाई ' म्हणून त्याचे स्वागत करतात अनेक हॉटेल्सच्या प्रतिनिधी तरुणीही असेच स्वागत करतात. हवाई हे पॅसिफिक महासागरातले बेट आहे. तेथील विमानतळही समुद्रजवळ आणि निसर्गसुदर पार्श्वभूमी लाभलेला आहे होनालुलू ते सॅन फ्रॅन्सिस्को हा प्रवास अहोरात्र अल्हाददायक झाला खाली चम्चम् चमकणारा पॅसिफिक महासागर हातात शिवाय रीगलचा मोफत मिळालेला ग्लास, विमानात भरपूर जागा, उत्तमोत्तम खाद्यपेये आणि हसतमुख विमानसुदरी यामुळे मला हा प्रवास उत्तेजक वाटला सॅन फ्रॅन्सिस्कोला माझे जुने मित्र प्रभाकर आपटे मला उतरवून घ्यायला येणार होते त्यामुळे उतरण्याच्या व्यवस्थेविषयीही मी निश्चित होतो सॅन फ्रॅन्सिस्को हे माझे आवडते शहर नऊ वर्षांनी मी तेथे परत येत होतो तिथे मला अनपेक्षितपणे जागतिक कवि परिषदेला हजर राहण्याची सधी मिळाली तीनशेवर कवी भेटले मग मी माझा मूळचा दोन दिवसाचा मुक्काम पाच दिवसावर नेला

सॅन् फ्रॅन्सिस्को ते वॉशिंग्टन हा प्रवास मात्र फारच उपद्रवकारक ठरला कारण ही थेट फ्लाईट नव्हती खरे तर हा फार लंबचा, जवळजवळ दोन हजार मैलाचा पल्ला होता वाटेत डेव्हर आणि ह्यूस्टन अशा दोन ठिकाणीविमान बदलायच होते माझी जागा रिझर्व्ह होती त्यामुळ तो प्रश्न नव्हता पण सतत दहा तास विमानात घालवण मोठ कटाळवाण होत याप्रवासात माझ विमान सहा वेळा उड्डाण-उतरण करणार' होत एकसारखा विमानप्रवास करून माझे कान आता दुखू लागले होते सॅन् फ्रॅन्सिस्कोला उड्डाण-डेव्हरला उतरणे, डेव्हाला

उड्डाण, ह्यूस्टनला उतरणे, ह्यूस्टनला उड्डाण, वॉशिंग्टनला उतरणे अशा आरोह-अवरोहा त्या दिवशी माझे कान इतके दुखू लागले की, मला विमान प्रवासाचा अगदी वैताग आला हा एक प्रसग सोडला तर या सबध जग प्रवासात माझ्या प्रकृतीला कोणताही त्रास झाला नाही हवामान, खाण, पिण, पाणी हे सर्व वारवार बदलूनही मला कधी साधी अॅनॅसीनची गोळीही घ्यावी लागली नाही इतकी माझी तब्येत उत्तम होती या वेळपर्यंत मी पृथ्वीचा अर्ध्याहून अधिक प्रवास पूर्ण केला होता मुबईतून सुरुवात तर त्या शहरातून लोखडी सळी जर पृथ्वीच्या कागदी गोलात घातली तर ती दुसऱ्या बाजूला सॅन फ्रॅन्सिस्कोजवळ बाहेर येईल म्हणजे सॅन फ्रॅन्सिस्कोलाच माझा बरोबर निम्मा प्रवास सपला हेता वॉशिंग्टन न्यूयॉर्क हा प्रवास पुण्या मुबईसारखा मोटारीने चार तासाचा आहे, मग विमानाने तर पोरखेळच पचेचाळीस मिनिटात न्यूयॉर्कचा केनेडी विमानतळ आला या तळावर मी पूर्वी एकदा आलो होतो त्यामुळे ती त्याबाबत जुना व जाणता झालो होतो या विमानतळाला जोडून भुयारी रेल्वे आहे. तीत बसून मी मॅनहडनला माझ्या मित्राकडे अमान मोमीन याच्याकडे गेलो न्यूयॉर्कला मित्राना भेटून एलिझा बेथ टेलरचे नवे नाटक ' लिटल फॉक्सेस ' पाहून मी लडनला निघालो या उड्डाणात मात्र एक किरकोळ बाबीवरून उतारू व विमानतळावरील ड्यूटी फ्री दुकानचे विक्रेते याच्यात खूपच तापातापी झाली वास्तविक अशा दुकानात प्रत्येक उतारूला व्हिस्कीची एक बाटली अगदी स्वस्त (बाहेर दहा डॉलर्स तर इथे अडीच डॉलर्स) मिळते इथे मात्र खालच्या मजल्यावर पैसे घेतले, पावत्या दिल्या आणि वरच्या मजल्यावरजिथून थेट विमानात शिरायचे तिथे बाटल्या मिळतील असे सागण्यात आले वरच्या मजल्यावर आमचे न्यूयॉर्क-लडन विमान सुटण्याची घोषणा झाली तरी खालच्या मजल्यावरून बाटल्या आल्या नाहीत आता बाटलीचा मोह सोडावा तर पैसे फुकट जाऊन मूर्खपणा पदरी येतो आणि बाटलीसाठी थांबावे तर विमान हातचे जाते अशी विचित्र अवस्था झाली पैसे परत मिळण्याची शक्यता नव्हती कारण वरचा मजला त्या दृष्टीने अक्षरश रिकामाच होता उतारूनीखूप आग्रह दरला तरी पॅन अॅमच्या अधिकाऱ्याचे म्हणणे होते की ड्यूटी फ्री शॉप आमच्या कक्षेत येत नाही आम्ही विमानाला उशीर होऊ देणार नाही. कारण दारूच्या माटलीसाठी आम्ही वमानतळावरच्या सपूर्ण यत्रणेचा व इतर विमानाचा खोळबा करणार नाही अखेर आम्ही बाटल्याचा मोह सोडून विमानात गेलो इतक्यात ड्यूटी फ्री शॉपचे चार सेवक धावतच विमानात

आले आणि त्यानी विमान सुदरीकडे बाटल्याच्या चार मोठ्या पेट्या देऊन पावत्या प्रमाणे वाटप करण्याची विनती केली व सेवक बाहेर जाताच विमानाची दारे बद झाली आणि एक मिनिटही उशरी न होता विमान सुटले

लडन ते फ्रँकफूर्ट असे माझे विमानाचे तिकीट होते व मी विमातनळावर गेलो सुटच्या नाण्याचे डॉलर्स घेतले माझे फ्रँकफूर्टच विमान दुपारी बारा वाजून पचवीस मिनिटानी निघून मुबईला रात्री सव्वा बाराला पोचणार होत पण ते दोन तास उशीरान सुटल आणि रात्री दोन वाजता मुबईला पोचल. कस्टममधून सामान मिळेपर्यंत अडीच वाजले मी सहार विमानतळाजवळ म्हणजे विलेपार्ल्यालाच राहत असल्याने इतक्या जवळच्या अंतरावर टॅक्सीवाला यायला तयार नव्हता अखेर दीड मैलासाठी चाळीसरुपये भाडे द्यायचे ठरवून रात्री तीन वाजता मी घरी पोचलो आणि माझ्या विमानाच्या जगप्रवासाची सागता झाली.

# ४ / अन्नासाठी दाहीदिशा फिरण्यातली मौज

पृथ्वीच्या पाठीवर भटकता भटकता मी अनेक देशात इतक्या विविध प्रकारचे खाद्यप्रकार सेवन केलेले आहेत आणि इतक्या प्रकारची पेये घेतली आहेत की, त्याची नुसती यादी करायची म्हटले तरी एक पुस्तक होईल। बगदादमध्ये मी चहा घेतला पण तो तुरट लागला पैसे देताना मी म्हटले,

"इकडे चहात काय घालतात हो? चमत्कारिकच चव लागते"

त्यावर उपहारगृहाचा व्यवस्थापक म्हणाला, "तुम्हा भारतीयाना उटाच्या दुधाच्या चहाची सवय नसते, म्हणून वेगळी चव वाटली असेल।"

मी त्या उटावरच्या शहाण्याकडे पाहिले आणि मुकाटपणे पैसे दिले झाले जर्मनीत एकदा चहा घेतला, त्यात दूध नव्हते मनात आले ठीक आहे, कोरा चहा असला तरी चालेल – पण चहाची तल्लफ तरी भागेल तोही चहा काही वेगळाच होता. चौकशी केली तेव्हा कळले की तिथे चहात दुधाऐवजी रम घालतात! सकाळी सकाळीच मद्यपानात रमण्याची माझी इच्छा नव्हती पण ती रम आहे हे कळले तेव्हा फार उशीर झाला होता.

इस्तबूलमध्ये चहाला 'कावा' म्हणतात उकळल्या पाण्याचे काचेचे भाडे, त्याखाली शेगडी, त्या शेजारच्या काचेच्या भाड्यात चहाचा अर्क असा जामानिमा घेऊन तेथील चहावाले भटकत असतात रस्त्यावर कुठेही उभे राहून गळ्यात अडकवलेल्या त्या पोर्टेबल उपहारगृहातून ते काचेच्या कपात 'कावा' तयार करून देतात. मी तो एकदाच घेतला. त्याची चव इतकी उग्र आणि कडवट होती की तो 'कावा' नसून गनिमी कावाच आहे असे मला वाटले

बँकॉकमध्ये चहा क्वचितच मिळतो तेथे सकाळचे सर्वमान्य पेय म्हणजे सूप. मग ते व्हेजिटेबल असेल किंवा नॉनव्हेज असेल त्यापाठोपाठ लोकप्रियता कॉफीला आणि शेवटी चहाला. बँकॉकमध्ये चहा मागितल्यावर दोन ग्लास

आले आणि त्यानी विमान सुदरीकडे बाटल्याच्या चार मोठ्या पेटच्या देऊन पावत्या प्रमाणे वाटप करण्याची विनती केली व सेवक बाहेर जाताच विमानाची दारे बंद झाली आणि एक मिनिटही उशरी न होता विमान सुटले

लडन ते फ्रँकफूर्ट असे माझे विमानाचे तिकीट होते व मी विमातनळावर गेलो सुटच्या नाण्यांचे डॉलर्स घेतले. माझे फ्रँकफूर्टच विमान दुपारी बारा वाजून पचवीस मिनिटानी निघून मुबईला रात्री सव्वा बाराला पोचणार होत पण ते दोन तास उशीरान सुटल आणि रात्री दोन वाजता मुबईला पोचल कस्टममधून सामान मिळेपर्यंत अडीच वाजले. मी सहार विमानतळाजवळ म्हणजे विलेपार्ल्यालाच राहत असल्याने इतक्या जवळच्या अंतरावर टॅक्सीवाला यायला तयार नव्हता अखेर दीड मैलासाठी चाळीसरुपये भाडे द्यायचे ठरवून रात्री तीन वाजता मी घरी पोचलो आणि माझ्या विमानाच्या जगप्रवासाची सागता झाली.

# ४ / अन्नासाठी दाहीदिशा फिरण्यातली मौज

पृथ्वीच्या पाठीवर भटकता भटकता मी अनेक देशात इतक्या विविध प्रकारचे खाद्यप्रकार सेवन केलेले आहेत आणि इतक्या प्रकारची पेये घेतली आहेत की, त्याची नुसती यादी करायची म्हटले तरी एक पुस्तक होईल! बगदादमध्ये मी चहा घेतला पण तो तुरट लागला. पैसे देताना मी म्हटले,

" इकडे चहात काय घालतात हो ? चमत्कारिकच चव लागते "

त्यावर उपहारगृहाचा व्यवस्थापक म्हणाला, " तुम्हा भारतीयाना उंटाच्या दुधाच्या चहाची सवय नसते, म्हणून वेगळी चव वाटली असेल ! "

मी त्या उटावरच्या शहाण्याकडे पाहिले आणि मुकाटपणे पैसे दिले झाले जर्मनीत एकदा चहा घेतला, त्यात दूध नव्हते मनात आले ठीक आहे, कोरा चहा असला तरी चालेल -- पण चहाची तल्लफ तरी भागेल तोही चहा काही वेगळाच होता. चौकशी केली तेव्हा कळले की तिथे चहात दुधाऐवजी रम घालतात! सकाळी सकाळीच मद्यपानात रमण्याची माझी इच्छा नव्हती पण ती रम आहे हे कळले तेव्हा फार उशीर झाला होता

इस्तबूलमध्ये चहाला ' कावा ' म्हणतात. उकळल्या पाण्याचे काचेचे भाडे, त्याखाली शेगडी, त्या शेजारच्या काचेच्या भाड्यात चहाचा अर्क असा जामानिमा घेऊन तेथील चहावाले भटकत असतात रस्त्यावर कुठेही उभे राहून गळ्यात अडकवलेल्या त्या पोर्टेबल उपहारगृहातून ते काचेच्या कपात ' कावा ' तयार करून देतात मी तो एकदाच घेतला त्याची चव इतकी उग्र आणि कडवट होती की तो ' कावा ' नसून गनिमी कावाच आहे असे मला वाटले

बँकॉकमध्ये चहा क्वचितच मिळतो तेथे सकाळचे सर्वमान्य पेय म्हणजे सूप मग ते व्हेजिटेबल असेल किंवा नॉनव्हेज असेल त्यापाठोपाठ लोकप्रियता कॉफीला आणि शेवटी चहाला. बँकॉकमध्ये चहा मागितल्यावर दोन ग्लास

येतात एकात कडक चहा असतो, दुसऱ्या ग्लासात गरम, काळसर रंगाचे पाणी असते मूळ चहा फार कडक वाटला, तर त्यात सोबतच्या ग्लासातले पाणी मिसळून तो हवा तितका नरम करायचा आणि प्यायचा दोन्ही पेये मिसळल्यावर चांगले दोन मोठे ग्लास चहा होतो किंमत सुमारे अडीच रुपये हा रस्त्यावरचा चहा पण तोच उपहारगृहात घेतला तर सहा रुपये आणि उंची हॉटेलात घेतला तर चौदा रुपयांना पडतो त्यापेक्षा सूप बरे।

रस्त्यावर साधारण दीड रुपयाला काचेचा मोठा वाडगा भरून व्हेजिटेबल सूप मिळते आणि दोन रुपयांना मटण व चिकनचे तुकडे टाकलेले सूप मिळते बँकॉकमध्ये 'बाथ' हे नाणे आहे दोन बाथ म्हणजे साधारण एक रुपया मी बँकॉकमध्ये सकाळी कधीकधी सूप घेत असे पण ते शाकाहारी। कारण सकाळी उठल्याबरोबर साडेसहा-सात वाजताच मांसाचे लचके तोडणे मला आवडत नाही खाण्या-पिण्याच्या प्रत्येक गोष्टीला काही [illegible]

अत्यंत रुचकर अन्न मी अनेकदा घेतले आहे, पण सर्वांत बेचव अन्न घेतले ते मी १९५६ साली, ब्रिटिश सैन्यात काम करीत असताना तेव्हा मी लंडनमध्ये वृत्तपत्र व्यवसायाचे शिक्षण घेत होतो. नाताळच्या सुट्टीत मी ब्रिटिश सैन्यात स्टोअरमध्ये काम करीत असे तेव्हा थंडीच्या कडाक्यात पहाटे पाच वाजता उठायचे, चहा घ्यायचा नि साडेसहाला ब्रेकफास्ट नावाचा भयंकर प्रकार। त्यात बटाट्याचा लगदा (पोटॅटो मॅश) हे प्रमुख खाद्य दुपारी जेवणातले मुख्य पक्वान्न म्हणजे बटाट्याचा लगदा डिनर किंवा रात्रीचे जेवण व्हायचे ते संध्याकाळी पाच वाजता त्या डिनरमधला सर्वांत मोठा आणि महत्त्वाचा जिन्नस म्हणजे– तोच बटाट्याचा लगदा। त्यात तिखट नाही, मसाला नाही, मीठ वेगळे असे. ते त्यात टाकून पावाबरोबर खायचे. बेचव अन्न तयार करण्यात ब्रिटन हे जगात सर्वांत प्रसिद्ध आहेच, पण ब्रिटिश लष्कराला बेचव अन्नाच्या [illegible] क्रमांक द्यायला काहीच हरकत नाही हे माझे स्वानुभवावर आधारलेले मत बटाट्याच्या लगद्याबरोबरचे मिष्टान्न म्हणजे फिंगर चिप्स किंवा बटाट्याचे तळलेले लांबट तुकडे. अशा या लष्करात महिनाभर काढला की, डोकीत बटाटेच बटाटे होऊन जातील यात शंका नाही

प्रवासात अनेकदा मिळेल त्या खाद्यपदार्थांवर गुजराण करावी लागते इस्तंबूल ते बगदाद हा रेल्वेचा प्रवास सतत चार दिवस होता पंधरा-वीस तासांनी एक स्टेशन येई. अर्थात् आगगाडीत मिळणाऱ्या बेचव जेवणावर वेळ मारून न्यावी लागे ते जेवण म्हणजे पाव, उकडलेले मटण, अंडे आणि

सिझानो नावाची इटालियन वाईन मी जवळ घेतलेली चटणीही संपली होती आणि वाटेत मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती तेव्हा मला स्टेशनवर छानशी रसरशीत कलिंगडे दिसली मी तीन-चार कलिंगडे घेतली आणि तहान व भूक या एकाच पदार्थाने भागवण्याचा प्रयत्न केला अमेरिकेत भटकताना हॉट डॉग आणि सलामी (पातळ चटणी) यावर अनेकदा भागवून घ्यावे लागले

पॅरीसमध्ये एकदा एका उपहारगृहात मी गेलो तेव्हा वेटरने, ''बेडूक हवा का? फार रूचकर आहे!'' अशी शिफारस केली हाती पॅरीसमध्ये बेडूक ही खास चीज असते अनेक दुकानात शोकेसमध्ये मृत बेडूक चांगले सजवून ठेवलेले असतात आणि हे बेडूक तरी केवढे मोठे म्हणता? तर माजराएवढे! त्याचे बटबटीत डोळे आपल्याकडे रोखून पाहतात असे वाटते

लंडन आणि पॅरिसच्या काही उपहारगृहात तर काचेच्या टाकीत मोठेमोठे मासे सोडलेले असतात आपल्याला हवा तो मासा दाखवायचा मग वेटर एका छोट्या जाळ्यात किंवा चिमट्याने तो मासा वर काढतो आणि हवा तसा तो भाजून किंवा उकडून देतो गिऱ्हाईकाला ताजा मासा मिळावा म्हणून ही सोय असते. थायलंड, चीन, कोरिया इत्यादी पौर्वात्य देशात बिनविषारी सर्प असेच पाण्यात सोडलेले असतात गिऱ्हाईकाची ऑर्डर मिळाल्यावर ते मारून पकडून वाढले जातात (मराठी टीकाकाराचे हे आदर्श खाद्य-फक्त ते साप विषारी असावेत, म्हणजे एखाद्या गरीब बिचाऱ्या लेखकावर आणि विशेषत: नवोदितावर डंख मारण्यास त्याना चेव येईल!)

पौर्वात्य देशातील लोकाना मसालेयुक्त जेवणाची सवय असते आपल्या खाद्यपदार्थात तिखट, मीठ, मोहरी, दालचिनी, लवंग, मिरी इत्यादी अनेक पदार्थ असतात उलट पाश्चात्य देशांतील जेवण अगदी सपक असते. मटन, चिकन किंवा बटाटे, भाज्या नुसत्या उकडून ठेवायच्या. बरोबर वेगळ्या मिरच्या व मिरपुडीच्या बाटल्या ठेवायच्या त्याला हवे तेवढे चवीपुरते मीठ, मिरपूड घेऊन उकडलेले पदार्थ खायचे ही पाश्चात्य पद्धत आहे त्यामुळे बायकाचे काम सोपे होते हे खरे आमच्याकडे बायकाचा कितीतरी वेळ वाटणे आणि मसाला तयार करणे यात जातो आता चवीबद्दल म्हणाल, तर तो सवयीचा प्रश्न आहे आपण लहानपणापासून मसालेयुक्त पदार्थ खातो म्हणून आपल्याला पाश्चात्य जेवण बेचव लागते. पण तेथील लोक जन्मभर तेच जेवण घेत असल्याने त्यांना ते निश्चितच चवदार वाटते एकदा माझे एक ब्रिटिश मित्र मला म्हणाले, ''तुम्ही भारतीय लोक मासात किंवा इतर अन्नात इतके मसाले

मिसळता की गहू, मटन, चिकन, मासा याची मूळची उत्तम चव तुम्ही मारून टाकता " त्याच्या या बोलण्यात तथ्य आहे हे खरेच जेवणाला सुरुवात करण्यापूर्वी तुम्ही गरम चपाती नुसती खाऊन पाहा, गव्हाची मूळ चव किती चागली असते याची तुम्हाला कल्पना येईल मसाला भरलेली वागी लावून चपाती खाल्ली, तर चपातीची चव जाऊन त्या मसाल्याचीच चव जिभेवर रेंगाळत राहील

लखनौच्या नवाबाच्या काळी नवाबाला जी कोंबडी शिजवून [illegible] तिला आधी महिनाभर कस्तुरी खायला घालीत असत नवाब जेव्हा जेवायला पर्शियन गालिचावर बसत असे, तेव्हा त्याच्यासमोर सव्वाशे ते दीडशे पदार्थ माडलेले असत! ज्या कापडावर हे पदार्थ मांडलेले असत, त्या कापडावर उर्दू कविता लिहिलेल्या असत पाच-सहा प्रकारचा पुलाव, सात-आठ प्रकारचे चिकन, चार-सहा प्रकारचे परोठे, कुलचा, सात-आठ प्रकारचे मटण, मासे, अशी पक्वान्नाची रेलचेल असलेल्या 'दस्तरखान्या' ला जेव्हा नबाब बसत असे, तेव्हा कोणी मराठी भोजनभाऊने 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' हा श्लोक म्हटला असता, तर नबाबाने त्याला हद्दपारच केला असता कारण 'भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा' ही आपली अल्पसतुष्टता एका टोकाला तर दीडशे वर्षांपूर्वी एका जेवणासाठी सव्वाशे पदार्थ आणि हजार रुपये खर्चणाऱ्या लखनौच्या बादशहाचे वैभव दुसऱ्या टोकाला असा प्रकार झाला असता!

पेयांमध्ये शांपेनचे जगात सर्वत्र फार कौतुक केले जाते पण मला मात्र ते अजिबात आवडत नाही चिंचेच्या आंबट पाण्यासारखी लागणारी शांपेन मी सहसा टाळतो व्हिस्की हे माझे आवडते मद्य आहे '[illegible]' [illegible] (एका बाटलीला एक हजार रुपये) असली, तरी चवीला हिच्यापेक्षा शिवास रीगल, जॉनी वॉकर, ब्लॅक लेबल आणि कटी सार्क या स्कॉच व्हिस्की अधिक उजव्या आहेत लोबेन ब्रॉसारखी जर्मन बियर जगात दुसरी नाही त्यापाठोपाठ हेनिकेनचा क्रम लागेल हॉलंडमध्ये मात्र हेनिकेन सर्वत्र क्रमाक एकवर आहे भारतीय व्हिस्कीची गुणवत्ता वारंवार बदलत राहते एखादी व्हिस्की चागली म्हणून खपू लागली, की लगेच त्या कारखानदाराला कमी वेळात अधिक पैसा मिळवण्याचा मोह होत जातो आणि त्या व्हिस्कीचा दर्जा खालावतो. सध्याच्या भारतीय व्हिस्कीत मॅक्डॉवेल, प्रीमियम, पीटर स्कॉट आणि डायरेक्टर स्पेशल चागल्या आहेत पार्टीच्या वेळी मद्य कोणते हे महत्त्वाचे नसून पार्टीतील माणसे कोण हे अधिक महत्त्वाचे

असते उत्तमोत्तम स्कॉच व्हिस्कीच्या बाटल्याचा समोर खच पडला आहे आणि अरसिक व्यापारी किंवा उद्योगपती बाजारभावावर चर्चा करीत आहेत अशा काही पार्ट्यांतून मी अनेकदा शक्यतो काढता पाय घेतला आहे याउलट आमचे एक परम स्नेही व ज्येष्ठ साहित्यिक याच्या सहवासात भारतीय रमबरोबर तासच्या तास मी अत्युच्च आनदात घालविले आहेत हल्ली कधीकधी बदल म्हणून मी लडनची बूथ्स जिनही चवीने घेतो मद्य हेच मुळी गप्पागोष्टी करीत, हळूहळू चवीने घेण्याचे पेय आहे काही लोक औषधासारखे एका घुटक्यात मद्याचा पेला सपवतात तेव्हा मला त्याची गमत वाटते बियरसारख्या पेयाला इग्रजीत लॉंग ड्रिंक हे नाव दिले आहे, ते सार्थच आहे कॉकटेल या नावाने अनेक पेयाचे केलेले धेडगुजरी मिश्रणही मला आवडत नाही तसेच ब्लडी मेरीसारखे जीन, टोमॅटोचा रस अशी विचित्र मिश्रणेही मला आनद देत नाहीत व्हिस्कीबरोबर मी सोडा घेतो या बाबतीत पाणीवाले महाराजही अनेकजण असतात, म्हणजे पाण्यात व्हिस्की मिसळून घेतात अनेक भारतीय व्हिस्कीच्या लेबलवर ‘ ब्लेंडेड वुईथ फायनेस्ट स्कॉच ’ असे लिहिलेले असते पण त्यात स्कॉचचे प्रमाण नक्की किती हे चातुर्याने गुलदस्तात ठेवलेले असते ‘ ससा व घोडा याचे मिश्र रुचकर मांस ’ अशी जाहिरात करणारा एक खानावळीचा मालक एक ससा व एक घोडा अशा प्रमाणात ते मिश्रण करीत असे त्यातलीच ही गत व्हायची !

मासाहारामध्ये चिनी पद्धतीचे चिकन फ्राय राईस मला सर्वात अधिक आवडते. लखनौच्या चरण हॉटेलमध्ये हा पदार्थ उत्तम केला जातो तसेच बनारसला दशाश्वमेध घाटाजवळ नव्यानेच सुरू झालेल्या ‘ गंगोत्री ’ रेस्टॉरंटमध्येही चिकन फ्राय राईस अगदी रुचकर मिळाला दिल्लीच्या चादणी चौकात किंवा लाल किल्ल्यासमोर रस्त्यावर बसलेल्या विक्रेत्यांकडे पहिल्या दर्जाची बिर्याणी मिळते केरळमध्ये त्रिचूरला ‘ चांडीज् होम ’ या हॉटेलसमोर एक मासाहारी रेस्टॉरट आहे, तेथेही उत्तम बिर्याणी मिळते अलाहाबादला काटजू रस्त्यावर कॉन्टिनेन्टल रेस्टॉरटमध्येही मटण कोफ्ताकरी, परोठा अगदी आठवणीत राहण्याइतका चागला मिळतो लखनौला हजरतगज विभागात विधानसभेजवळच्या चायनीजमध्ये माचुरीयन चिकनची चव सर्वोत्कृष्ट वाटली पॅरीसमध्ये इद्र आणि विष्णू अशा देवाची नावे घेतलेली हॉटेल्स उत्तम भारतीय जेवण देतात पण इतकी महाग आहेत की इद्राला व विष्णूलाच ती परवडू शकतील असे मनात आल्यावाचून राहत नाही त्या मानाने लडनला ‘ शहाज् ’,

ताजमहाल, राजाराणी अशी अनेक भारतीय जेवण देणारी उपहारगृहे स्वस्त आहेत व जेवणही चागले देतात

वॉशिंग्टनमध्ये एम रस्त्यावरचे ‘ताजमहल’ हे उत्कृष्ट बिर्याणी व इतर उत्तर हिंदुस्थानी पद्धतीचे पदार्थ देते फ्रेंच जेवणात काही गमत नसते, पण इटालियन जेवणात आपल्याइतके नसले तरी बऱ्या प्रमाणात मासे असल्याने ते जेवण आपल्याला आवडण्यासारखे असते मेक्सिकन जेवणही आपल्या उत्तर हिंदुस्थानीच्या बरेचसे जवळचे असते मात्र इटालियन पिझ्झा हा प्रकार मला मुळीच आवडत नाही टोकियोत गिन्झा विभागात एक आतरराष्ट्रीय उपहारगृह आहे. त्यात सुमारे पचवीस देशाचे विभाग असून भारतीय, चिनी, सिलोनी, इटालियन, फ्रेंच, स्पॅनिश, जपानी, मेक्सिकन, ब्रिटिश, ग्रीक, मलेशियन, इडोनेशियन इत्यादी विविध प्रकारचे जेवण एकाच भव्य इमारतीत मिळण्याची सोय आहे.

टोकियोचे माझे स्नेही नरेश मत्री, श्रीमती प्रतिमा कुलकर्णी व मी या रेस्टॉरटमध्ये छान भारतीय जेवण घेतले होते, शिबुया स्टेशनसमोर (टोकियो) इडियन पॅलेसमध्येही थाकामारू या जपानी मित्राने मला चागले भारतीय जेवण दिले होते होनोलुलूला सिंधी व पजाबी लोकानी चालविलेली काही निवांत व उत्तम उपहारगृहे वायकीकी चौपाटीजवळ आहेत

हाँगकाँगमध्ये कौलून भागात उत्कृष्ट व स्वस्त जेवण व इतर खाद्यपदार्थ देणारी उपहारगृहे वाटेल तेवढी आहेत रस्त्यावरच्या ढकलगाड्यांतही गरम जेवण मिळते थायलडमध्ये तर कावडीत स्टोव्ह, मासे, चिकन व मटणचे तुकडे, भात, सूप, पाव वगैरे जिन्नस घालून थाई बायका फिरती उपहारगृहे खाद्यावर टाकून हिंडतात केव्हाही कुठेही त्या बायाना थांबवावे आणि हवा तो प्रकार गरम गरम करून घ्यावा हे जेवण इतके स्वस्त असते की चिकन फ्राय राईस, सूप व भाजी फक्त सात रुपयात मिळते

जर्मनीत मला फारसे रुचकर जेवण मिळाले नाही पण आपले माजी उपमुख्यमत्री रामराव आदिक यानी ज्या गावाचे नाव अमर केले, त्या हॅनोव्हर स्टेशनसमोरच्या उपहारगृहात मला अत्यत चवदार हॅंबर्गर आणि फ्राय राईस मिळाला फ्रॅंकफुर्टहून बर्लिनला जाताना गाडी बदलण्यासाठी मी या हॅनोव्हरमध्ये दोन तास होतो. उत्तर प्रदेशात झाडाखाली उघड्या जागेवर ठेले आणि धाबे असतात त्यात चार-चार चुली असलेली प्रचड मातीची चुलवणे असतात. कोळशाच्या निखाऱ्यावर अत्यंत चवदार व खरपूस भाजलेली रोटी व परोठे

या ठेल्यावर व धाब्यावर मिळतात त्याची चव गॅसच्या शेगडीवर ताजमहल किंवा ओबेरॉयमध्ये केलेल्या रोटी व परोठ्यालाही येणार नाही

टोकियोचे माझे मित्र बाळ देशमुख याच्या 'गंगा' या उपहारगृहातही त्यानी अविस्मरणीय असे उत्तम भारतीय जेवण दिले होते ग्रीसमधील थिसोलिनी या गावी द्राक्षाच्या माडवात, डोंगर उतरणीवर एक छोटे उपहारगृह होते तिथे मला अत्यंत चवदार असे माशाचे तिखट कालवण व भात मिळाला होता युरोपमधील इटली, ग्रीस, तुर्कस्थान या उष्ण देशात आपल्याइतका नसला, तरी जवळपास तिखटाचा उपयोग जेवणात करतात भजी हा आपल्याकडील एक उत्तम खाद्यपदार्थ आह जपानमध्येही तेंदुरा हा मासे ... निवडक पदार्थ आहे पण सूझी नावाचा जपानी पदार्थ म्हणजे कच्चे मासे! ते लोक कच्चे मासे चवीने कसे खातात याचे इतराना आश्चर्य वाटते जपानी व चिनी लोक इतरही अनेक प्राणी खातात म्हणा!

जेवणाइतकेच आजुबाजूच्या प्रसन्न व कलात्मक वातावरणालाही महत्त्व असते. टेबलावर व जवळपास सुदर फुले आहेत, भिंतीवर उत्तम चित्रे आहेत, वातावरणात सुगधाचा हलकासा दरवळ आहे आणि सस्मित चेहऱ्याच्या, प्रेमळपणे जेवण आणून आग्रहाने वाढणाऱ्या सुदर पुरध्री आहेत, हास्यविनोदाच्या गप्पांनी मन प्रसन्न होत आहे, अशा वातावरणात जेवण घेण्याची मौज अवर्णनीय आहे.

पॅरीस, ब्रुसेल्स, ॲमस्टरडॅम अशा शहरांत रस्त्याच्या कडेला माडलेल्या टेबलावर बसून येणाऱ्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या लोकाच्याकडे पाहत भोजन करण्यातही मोठी गमत असते बेल्जियम व हॉलंडमधील काही उपहारगृहांत तर खाद्यपदार्थ आणि पेये याच्याबरोबरच बुद्धिबळे,पत्ते, डार्ट (बाण), बिलियर्ड असे खेळही ठेवलेले असतात जेवणे म्हणजे बकाबका घशाखाली घास ढकलणे नसून रमतगमत, क्रीडा-गप्पात वेळ घालवीत, अन्नाचा स्वाद घेणे ही एक कला आहे, हेच या खेळाची व्यवस्था ठेवण्यामागचे सूत्र आहे

मोकळ्या हवेत खमंग जेवण करण्यासाठी पाश्चात्य देशात— 'बार्बेक्यू'ची पद्धत आहे. वनभोजनाच्या वेळी व विशेषत रात्री ही पद्धत फार उपयुक्त ठरते तिकडे आधीच थंडी असते पेटत्या धुनीवर मास किंवा मासे भाजले जातात. वनभोजनासाठी जमलेले लोक मद्यपान करीत, नृत्यगायनात रममाण होत या बार्बेक्यूच्या उबेभोवती मौज करीत असतात. वॉशिंग्टनचे माझे स्नेही अमान मोमीन याच्या घरामागे विस्तृत हिरवळ असून त्यात बार्बेक्यूची

सोय आहे

शाकाहारी पदार्थांत गोड पदार्थ माझ्या फारसे आवडीचे नाहीत पण मसालेभात, फ्लॉवरची भाजी, काकडीची कोशिंबीर, आमटी हे पदार्थ मला आवडतात बासुदी मला अजिबात आवडत नाही लाडू तर नकोच वाटतात श्रीखंड मात्र कमी गोड असेल तर बरे लागते. शाकाहारी जेवणात अनेक गोड पक्वान्ने असतात पण एकंदर गोडाकडे माझा कलच नसल्याने मी त्या बाजूला फिरकत नाही. मांसाहारी जेवणात गोड पदार्थ अजिबात नसतात हे कोणाच्याही सहजच लक्षात येईल

आपल्याकडे भात खाण्यावर विशेष भर त्यातल्या त्यात कोकण- केरळ तामिळनाडू व बंगालमध्ये भात हा अत्यावश्यक. बंगालमध्ये भाताबरोबर मासे हेही अत्यावश्यक तेथे तर मासे हे मांसाहारी पदार्थच मानले जात नाहीत! पण तामिळनाडूमधील जेवण एकंदरीत बेचव कारण ढीगभर भात, भरपूर चिंच घातलेली आंबट भाजी आणि पालेभाजी किंवा घेवडा-चवळीसारख्या शेंगांची भाजी हेच जेवणातले मुख्य जिन्नस तेथे असतात केरळ व तामिळनाडू हे दोन्ही प्रांत धार्मिक वर्चस्वाचे असल्याने इतर राज्यांच्या मानाने तेथे मांसाहारी जेवणाची ठिकाणे फार कमी असतात पण महाराष्ट्रात व दिल्लीला मांसाहारी जेवणाची उपहारगृहे भरपूर आहेत चित्रपट दिग्दर्शक राजा ठाकूर म्हणत असत की कोल्हापुरसारखे उत्कृष्ट मटण जगात कुठेही मिळत नाही एके काळी कोल्हापूरची ही कीर्ती रास्त होती आता मात्र कोल्हापुरातही उत्तम मटण देणारी उपहारगृहे फारच थोडी उरली आहेत

खाद्यपदार्थांत (स्नॅक्स) मध्ये महाराष्ट्राचे कांदेपोहे व चकली यांचा दर्जा बराच वरचा आहे मात्र इडली-सांबार व मसाला दोसा यांनी जगातील बहुतेक प्रमुख शहरांत भक्कम ठाण मांडले आहे लंडन, न्यूयॉर्क, टोरंटो, टोकियो, वॉशिंग्टन, पॅरीस अशा अनेक शहरांत या दक्षिण भारतीय पदार्थांनी आपले चांगले बस्तान बसविले आहे मिसळ हा आपला एक रुचकर पदार्थ, पण महाराष्ट्राबाहेर तो फारसा आढळत नाही

विमानातले जेवण हा एक अगदी वेगळाच प्रकार असतो वाहतुकीच्या अडचणींमुळे सर्वसामान्यपणे हे कोरडे जेवण असते. काही विमान कंपन्या लांबच्या प्रवासात जेवणापूर्वी एक मद्य मोफत देतात पहिल्या वर्गाला सर्वत्र मद्ये मोफत असतात सूप या प्रकाराला अर्थातच फाटा देण्यात येतो पाय, मटण, अंडी, पुडिंग, चिकन, भाजी किंवा ग्रीन [illegible]

[illegible]

आतरराष्ट्रीय विमानप्रवासाच्या जेवणाचे सर्वसाधारण स्वरूप असते. एअरइंडियात मात्र बिर्याणी, पचरत्न कुर्मा, मटण मसाला असे भारतीय पद्धतीचे पदार्थ देण्यात येतात प्रत्येक उतारूने तिकीट घेतानाच आपण मासाहारी आहोत की शाकाहारी हे नमूद करायचे असते पण एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने मला सागितले, "बरेच लोक आधी मासाहारी म्हणून नाव नोंदवतात पण प्रत्यक्ष विमानप्रवास सुरू झाल्यावर त्याना गरगरते व मासाहारीऐवजी शाकाहारी जेवण द्यावे असा ते आग्रह धरतात विमान सुटताना मोजकीच जेवणाची पाकिटे घेतलेली असतात व वेळप्रसगी उपयोगी पडावीत म्हणून पाच-सहा टक्के अधिक घेतली जातात पण मासाहारी प्रवाशांनी ऐन वेळी मोठ्या प्रमाणावर शाकाहारी जेवण मागवले तर ते देणे शक्य होत नाही " सर्वत्र विमान कपन्याची जेवणे यथातथाच असतात. पण विमानप्रवासात सर्वात भिकार जेवण अगदी न्याहारी देणाऱ्या कपनीला बक्षिस देण्याचे ठरवले तर ते पहिले बक्षिस इडियन एअरलाईन्सलाच मिळेल यात शका नाही ! वाळून कडक झालेला, ऐतिहासिक स्थळ म्हणून दाखविता येणारा पाव, लोण्याची लहानात लहान वडी, कळकट कॉफी आणि लाकडाच्या भुश्याची चव असलेली दोन बिस्किटे हा इडियन एअरलाईन्सचा ब्रेकफास्ट, लच व डिनरचा मेन्यू असतो असे माझे मत झाले आहे

बोटीने परदेशप्रवास ही आता एक दुर्मिळ चीज झाली आहे कारण आधुनिक जगात लोकाना वेळ वाचवायचा असल्याने विमानप्रवास हाच लाबच्या अतरावर जाण्याचा राजमान्य मार्ग झाला आहे.

पण १९५५ साली मी पी अँड ओ कपनीच्या स्ट्रॅथमोर बोटीने इग्लडला गेलो, तेव्हा बोटीवर जे सपन्न अन्न मिळत होते ते कायमचे लक्षात राहण्यासारखे. सकाळी सहा वाजता वेटर आमच्या खोलीत चहा व बिस्किटे घेऊन यायचा आठ वाजता डायनिंग हॉलमध्ये ब्रेकफास्ट - त्यात दूध, पॉपकॉर्न किंवा खीर, मासे, अडी, पाव, जाम, लोणी, हवा तेवढा चहा असे एक वाजता लच. त्यात सूप, मटन, चिकन, पाव, सॅलड, कॉफी असे शिवाय आपल्या खर्चाने बियर, व्हिस्की किंवा जिन जेवणापूर्वी घेता येत असे ही मद्ये तेव्हा फारच स्वस्त म्हणजे सहा आण्याला बियरचा मोठा ग्लास असे

हे तुडुब जेवण घेऊन दोन वाजता आम्ही सिएस्ता किंवा वामकुक्षीला आमच्या केबिनमध्ये येत असू. झोप होते न होते तोच चार वाजता चहाची

घटा होई चहाबरोबर केक्स, बिस्किटे, जॅम, पाव, लोणी याची रेलचेल असे ते सर्व पचविण्यासाठी डेकवर फिरायचे

सात वाजता सर्वांची मद्यपानाची वेळ होई डेकवर सुदर पाण्याच्या झुळकींत, मित्रमैत्रिणींच्या समवेत गप्पा मारीत बियर किंवा व्हिस्कीचे आकठ पान करायचे तेवढ्यात डिनर बेल वाजे हे रात्रीचे जेवण एवढे चमचमीत असे की काही विचारू नका चिकन, मटन, मासे, हॅंबर्गर, हॉट डॉग, बेकन, इत्यादींचा नुसता खच पडलेला असायचा भरगच्च जेवण झाल्यावर स्वीट डिश म्हणून पुडिंग, आईस्क्रीम, जेली, त्यावर कॉफी. कॉफी हे मात्र जेवणाचे भरतवाक्य !

पण बोटीवरचे आदरातिथ्य एवढ्यावर सपत नाही कारण जेवणानतर बॉल डान्स, खेळ, हौजी नावाचा जुगार वगैरेत सर्वजण रमत. या विलासानी दमलेल्यासाठी रात्री अकरापासून एक वाजेपर्यंत सपर, नावाचा उशिरा जेवणाचा प्रकार असे त्यात सॅंडविचेस्, हॉट डॉग्ज्, कॉफी, लोणी, पुडिंग असे अनेक प्रकार असत ही सर्व जेवणे मोफत असत, म्हणजे मुंबई ते लडन या बोटीच्या तिकीटातच समाविष्ट असत.

१९५५ साली हे तिकीट फक्त नऊशे रुपये होते आणि या प्रवासाला अठरा दिवस लागत म्हणजे नऊशे रुपयात नव्वद वेळा आम्हाला भरपूर खायलाप्यायला मिळूनही लडनला जाता येत होते !

सिगारेट, तंबाखू, चिरूट, पाईप अशा कोणत्याही प्रकारच्या तबाखूचे मी अजिबात सेवन करीत नाही मी पानसुद्धा खात नाही कधीकधी तरी सुपारीचे खाड तोंडात टाकतो एवढेच. इतक्या वेळी परदेशी राहूनही मी सिगारेट ओढीत नाही याचे अनेकांना आश्चर्य वाटते इग्लडमध्ये शिक्षण घेत असताना मी क्वचित सिगारेट ओढीत असे पण ती मला मनापासून कधीच आवडली नाही काही लोक रोज पन्नास-साठ सिगारेट्स कसे काय ओढतात याचे मला आश्चर्य वाटते

जगाच्या पाठीवर मी अनेक देशात शेकडो प्रकारचे अन्न घेतले व्यकटेशस्तोत्रात म्हटले आहे, "अन्नासाठी दाहीदिशा, आम्हा फिरविशी जगदीशा !" पण विविध प्रकारच्या उत्कृष्ट, निवडक अन्नासाठी देशाच्या देश फिरण्यातही केवढी मौज असते, ती मी प्रत्यक्ष अनुभवली आहे.

भू-प्रवा
क्र. मा. ६६६५३

# ९ / जग हे आगगाड्यांचे

मी प्रथम आगगाडी पाहिली, ती कोल्हापुरच्या स्टेशनावर वाफेचे उसासे टाकणारे ते अजस्त्र इंजिन, त्या राक्षसाला सहजतेने हाताळणारा रुबाबदार इंजिन ड्रायव्हर, जमिनीवर घागरींची उतरंड उभी असते त्याऐवजी डब्याची आडवी उतरंड, पाढरे शुभ्र कडक इस्त्रीचे कपडे घालून हातात हिरवी - लाल निशाणे घेऊन बूट खडखडावित फलाटावरून फिरणारा ऐटबाज गार्ड, उतारूंची धावपळ, स्टेशनमास्तरच्या शिट्टीचा दबदबा हे सारेच दृश्य अभूतपूर्व होते. त्यावेळी मी सात आठ वर्षांचा असेन कोल्हापूरच्या महाराजाचा एक खास डबा होता अशी वदता ऐकली होती महाराजाना जेव्हा प्रवास करायचा असेल तेव्हा हा बादशाही डबा गाडीला जोडण्यात येई, अस ऐकून होतो घराना चाक लावून ती रुळावरून त्या गावी नेणाऱ्या आगगाडीची किमया मला त्यावेळी अद्भुत वाटत असे कधीतरी आपल्यालाही अशा फिरत्या घरातून प्रवास करायला मिळेल का असा सुखद विचार मनास येई मिरजेहून कोल्हापुरला गाडी नेण्यास त्यावेळी अडीच तास लागत. हे अतर फक्त तीस मैलांचे होते आजही तेवढेच आहे मात्र रात्रीच्या वेळी गाडी सव्वादहाऐवजी सव्वानऊलाच कधी कधी येत असे. आम्ही त्यावेळी असे ऐकले होते की जेव्हा ड्रायव्हरला साडेनऊचा सिनेमा पहायचा असे. तेव्हा तो अतिवेगाने गाडी धोपटून बरोबर सव्वानऊलाच स्टेशनवर आणून सोडीत असे ज्याच्या सिनेमाच्या शौकासाठी सबध गाडी सव्वा तास आधी येते तो ड्रायव्हर फार पराक्रमी असला पाहिजे अशी त्यावेळी साहजिकच कोल्हापुरकराची आदराची भावना होती कोणी कोणी आगाऊ प्रवासी तर मिरजलाच ड्रायव्हरला गाठून तो कोल्हापुरला सिनेमाला जाणार आहे काय याची आस्थेवाईक चौकशी करीत असत

माझा पहिला आगगाडीचा प्रवास म्हणजे कोल्हापूर ते रुकडीचा आम्ही मुलामुलांनीच घरातून चारचार आणे घेऊन हा प्रवास केला तेव्हा कोल्हापूर

ते रुकडी या प्रवासाला प्रौढाना दोन आणे आणि मुलाना एक आणा तिकीट होते आम्ही चार मुलानी हा नऊ मैलाचा प्रवास अत्यत मजेत केला पुढे धावणारी गाडी मागे धावणारी झाडे नि घरे आणि प्रवास चालू असतानाच गाडीत येणारे चुरमुरे, शेंगदाणे किंवा चहाचे विक्रेते याची आम्हाला फारच मौज वाटली त्यावेळी गाड्याना अजिबात गर्दी नसे चाळीस जागाच्या डब्यात मात्र आठ उतारू जेमतेम असत त्यामुळे आम्हा मुलाना आगगाडीचा डबा म्हणजे क्रीडागण, खाद्य-पेयाचे कोठार, शयनगृह, प्रसाधनगृह (हा लुसलुशीत शब्द त्यावेळी प्रचारात नव्हता त्या खोलीवर "पैखाना" अशी रागडी व रोखठोक अक्षरे असत. अर्थात दारावर नाव काहीही असले तरी आत गेल्यानतरची कृती तीच असते ) अशा अनेक सुविधाचे एकत्रीकरण होते परतीच्या तिकिटाला दोन आणे दिल्यावर खाऊसाठी दोन आणे म्हणजे त्या काळात भक्कम रक्कम होती पोटात अनत माणसे व सामान घेऊन जाणाऱ्या त्या गाडीविषयी आम्हाला विलक्षण कुतुहल आणि आदर वाटत होता कोल्हापुरपासून पचवीस मैलावर नियामीजवळ आमची शेती होती तेथे फक्त खाजगी मोटार सर्व्हिस जात असे त्या बाजूलाही आगगाडी सुरू करावी, असा अर्ज आमच्या शाळेच्या हेडमास्तराच्याकडे द्यायचा निर्णय या पहिल्याच आगगाडीच्या सफरीत मी आणि माझ्या मित्रानी घेतला रुकडीला उतरल्यावर धावत जाऊन आम्ही इजिनजवळ उभे राहिलो वरच्या फनेलमधून येणारा काळा धूर, इजिनाच्या धडाडणाऱ्या आगीत फावड्याने कोळसे टाकणारा कामगार, इजिनच्या बाजूने येणाऱ्या पांढऱ्या वाफा, इजिनमधून आयते मिळणारे कढत पाणी नेण्यासाठी बायकानी लावलेली घागरीची नि बादल्याची राग आणि या सर्व दृश्याने हरकून न जाता आपल्या उच जागेवर शातपणे बसून सिगारेटचे झुरके घेणारा महारथी इजिन ड्रायव्हर हे जग आम्हाला अत्यत आकर्षक वाटले ज्याना रोज आगगाडीचा रोमाचकारक प्रवास करायला मिळतो, ते इजिन ड्रायव्हर नि गार्ड किती भाग्यवान असा असूयेचा विचारही त्यावेळी आमच्या बालमनात येऊन गेला मला नऊ मैलाचा हा प्रवास इतका चित्तथरारक वाटला

मी १९५६ साली लडनपासून बगदाद बसऱ्यापर्यंतचा हजारो मैलाचा आगगाडीचा प्रवास केला या दीर्घ प्रवासात एकदा तर सतत चार रात्री नि चार दिवस आगगाडीतच काढले आतापर्यंतच्या आयुष्यात आगगाडीचे छोटे मोठे प्रवास किती केले असतील याची नोंद ठेवणेच अशक्य शिवाय विमान, बस, खाजगी मोटार, आगबोट अशा इतर वाहनानीही लाखो मैलाचे अंतर

मी तोडले असेल पण अजूनही आगगाडीच्या प्रवासाचे आकर्षण सपत नाही या विषयाचे माझे कुतुहल इतके अपार आहे की, मी आगगाडीचा एक एन्सायक्लोपीडियाच विकत घेतला माझी अडीच वर्षांची नात मानसी जेवढ्या कुतुहलाने ते अगडबंब पुस्तक पाहते त्याच नवलाईने मीही ते वारवार पाहतो माझ्या परिचयाच्या जगातील अनेक रेल्वे स्टेशनची छायाचित्रे त्या ज्ञानकोशात देण्यात आली आहेत आठशे छायाचित्रानी समृद्ध असलेला, विविध कालखडातील, विविध देशातील आणि अनेक प्रकाराच्या आगगाड्याची व रेल्वेमार्गाची सागोपाग माहिती देणारा हा ग्रथराज म्हणजे आनदाचा एक कायमचा ठेवाच आहे वाफेच्या इजिनचा शोध कुणी लावला, सुरुवातीची बेंगरुळ दिसणारी पण या शास्त्राचा पाया घालणारी इजिने, पहिले रेल्वे मार्ग, आगगाड्यांत विविध शोध लावून त्याचा विकास करणारे सशोधक, ओरिएट एक्सप्रेससारख्या जागतिक कीर्तीच्या गाड्या, इग्लडच्या राणी व राजे ज्या डब्यातून प्रवास करतात त्या त्या डब्याचे अतरग अशी अत्यत वैशिष्ट्यपूर्ण व रजक माहिती या पुस्तकात दिली आहे. बर्फातून धावणाऱ्या गाड्या, खतरनाक पुलावरून जाणाऱ्या गाड्या, भुयारी गाड्या, विजेवर चालणाऱ्या गाड्या, एकाच रुळावर चालणाऱ्या गाड्या, ताशी अडीचशे ते तीनशे मैलाच्या वेगाने विमानासारख्या धावणाऱ्या गाड्या, कामगाराच्या गाड्या, बादशाही डामडौलाच्या आरामशीर गाड्या, काचच्या बाजू व छप्पर असलेल्या गाड्या, असे गाड्याचे अनंत प्रकार पाहून आपण थक्क होतो विमानाच्या पहिल्या वर्गात जशा स्लंबरेट म्हणजे पाय लाब करून झोपण्याची व्यवस्था असलेल्या जागा असतात तशा स्लबरेटच्या गाड्या आहेत आणि वातानुकूलीत व्यवस्थेत चादरी उशा याची सुविधा असलेल्या गाड्या या ग्रथात दाखविण्यात आल्या आहेत

आत्मनिवेदनाकडे पुन: वळायचे तर माझा दुसरा आगगाडीचा प्रवास रुकडीच्या पुढचे हातकामंगले व त्यापुढचे जयसिगपूर स्टेशनपर्यंत झाला नरसोबाची वाडी हे तीर्थक्षेत्र स्टेशनजवळ असल्याने आमच्या घरातल्या मडळीच्याबरोबर मी तेथे गेलो होतो हा लहानसा प्रवासही मी पहिल्याइतकाच कुतुहलाने केला. श्री पु ल देशपाडे यानी 'काही अप काही डाऊन' या नॉस्टॅल्जिक लेखात जुन्या काळच्या लहान स्टेशनचे जे हृद्य चित्र रेखाटले आहे, अगदी तशीच जयसिगपूर व हातकमगले ही स्टेशने तेव्हा होती व आजही आहेत श्री वसंत सरवटे यानी श्री पु. ल देशपाडे याच्या त्याच लेखात अशा स्टेशनचे जे चित्र काढले आहे ते हुबेहूब जयसिगपूर - हातकमगलेचे

केवळ आगगाडीच नव्हे तर हिचे स्टेशन हेही मोठे कुतुहलजनक ठिकाण असते ते तिकीट घर, ती वेटिंग रूम, विशेषत पहिल्या वर्गाच्या वेटिंग रूमचा व हिच्यातील उतारुचा रुबाब ही सारी संस्मरणीय असतात एस् टी च्याच काय पण विमानाच्या तळालाही रेल्वे स्टेशनची सर येत नाही गाडीची वाट पहाता पहाता आजूबाजूला अनत चेहरे, अनत व्यक्ती, अनत अनुभवाची गाठोडी आढळतात. गप्पिष्ट लोकात मिळून मिसळून वागणारा माणूस अशा वेळी अनेक नव्या ओळखी काढतो आणि मित्र जोडतो विमानप्रवासाच्या वेळी मात्र तळावरचा जो तो आपला आपल्याच 'ह्या'त असतो अशा शिष्टाच्याबरोबर दोनचार औपचारिक वाक्यापलीकडे मजल जात नाही

त्यावेळी कोल्हापूर ते बेळगावचे रेल्वेचे तिकीट अडीच रुपये होते पण मोटारीने हाच प्रवास फक्त बारा आण्यात करता येई अर्थात लोक मोटारीचाच आश्रय घेत रेल्वेने बेळगावला जायचे तर कोल्हापुरपासून मिरजेला जायचे, मग गोवा किंवा बगलोरला जाण्याच्या आणि पुण्याहून आलेल्या गाडीला हा डबा जोडला जायचा व तिथून त्याचा बेळगावला प्रवास सुरू व्हायचा पुण्याहून मिरजेत येणारी गाडी वेळेवर येण्याची शक्यता कमीच एम् एस् एम् म्हणजे आसामी सदर्न रेल्वे एका बाबतीत मात्र आदर्श आहे. उशिरा येण्याचा आपला धर्म ती रेल्वे तीस चाळीस वर्षांपूर्वी जेवढ्या निष्ठेने पाळत होती, तीच निष्ठा व सचोटी आजही हिच्यात दिसते अधिक तिकीट व अधिक वेळ यामुळे कोल्हापुरचे प्रवासी रेल्वेने बेळगावला जात नसत वास्तविक रेल्वे कधी खाजगी मोटार सर्व्हिसशी चढाओढ करीत नाही तेव्हा एस् टी. सुरू झाली नव्हती व मोटार वाहतूक खाजगी क्षेत्रातच होती कशी कुणास ठाऊक, पण त्यावेळी रेल्वेने तिकीटाच्या दराबद्दल [illegible]

अडीच रुपयावरून बारा आण्यावर आणले! मात्र त्या तिकीटात अशी मेख होती, की बेळगावच्या आधीच्या स्टेशनवर उतरले तर पूर्ण अडीच रुपये भरावे लागत त्या तिकीटावर फक्त बेळगाव स्टेशनवरच प्रवास संपवण्याची अट होती. रेल्वेने तिकीटाचा दर मोटारीच्या बरोबरीने आणल्यावर मात्र रेल्वेचा मजेचा प्रवास त्याच दरात करण्यासाठी लोक रेल्वेने बेळगावला जाऊ लागले. माझे एक नातेवाईक बेळगावला रहात होते बेळगावइतका लाबचा प्रवास आगगाडीने करता यावा, एका रेल्वेतून काढून डबा दुसऱ्या रेल्वेला कसा जोडतात ते पहायचे म्हणून त्या नातेवाईकाना भेटण्याचे निमित्त करून मी रेल्वेने त्यावेळी बेळगावला गेलो हा प्रवास चागला सहा तासाचा असल्याने मला तो विशेष

सुखकर वाटला. वेळ कसा वाचवावा हा त्यावेळी प्रश्न नसून रिकामा वेळ कसा घालवावा हाच यक्षप्रश्न असल्यामुळे मी बारा आण्यात सहा तासाच्या प्रवासाची सधी साधली

त्यानतर मी अनेकदा कोल्हापूर ते पुणे व पुढे मुबई असा रेल्वेचा प्रवास केला मात्र ज्या मुबईत मी पुढे स्थायीक झालो, त्या मुबईत मी प्रथम आलो, ते बोटीने १९३६ साली पुणे आणि मुंबई याच्या दरम्यान खडाळ्याच्या घाटाचा प्रवास आगगाडीने करतोना ज्याचे भान हरपत नाही, तो खरोखरच अरसिक आणि दुर्दैवी म्हटला पाहिजे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा कोणताही ऋतू असो, खडाळ्याच्या घाटातून जाणारी आगगाडी हा एक स्वप्निल अनुभव असतो भुरूभुरू पडणाऱ्या पावसात किंवा अगदी सकाळच्या दाट धुक्यात या प्रवासाची शोभा अधिकच वाढते चादण्या रात्री या घाटातून केलेल्या आगगाडीचा प्रवास तर अत्यत बहारदार आपण एखाद्या चित्रपटातच भूमिका करतो आहोत असे त्यावेळी वाटते

परदेशातला माझा पहिला आगगाडीचा प्रवास म्हणजे बोटीच्या धक्क्यावरून लडन शहरापर्यंतचा प्रवास १९५५ साली स्ट्रथमोर या पी अँड ओ कपनीच्या आलिशान बोटीने इग्लडला वृत्तपत्र व्यवसायाच्या शिक्षणासाठी गेलो. ही बोट थेट लडनपर्यंत जात नसे तर टिलबटी या तीस मैलावरच्या बदरातच थाबत असे लडन येथे राहणारे माझे मित्र श्री वि शं वर्टीकर मला उतरून घ्यायला आले होते आम्ही आगबोटीच्या धक्क्यावरच्या रेल्वे स्टेशनवर पायीच गेलो. ते स्टेशन पाहून मी चकीतच झालो आगगाडीच स्टेशन म्हणजे गर्दी, केरकचरा, विक्रेत्याचा आरडाओरडा, भिकारी, हे सर्व असायचेच, हा माझा भारतातला अनेक वर्षांचा अनुभव पण हे स्टेशन अत्यत स्वच्छ. गर्दी नाही. गाडीत जेवढ्या जागा, त्याच्या साधारण एक दशाश प्रवासी एकही विक्रेता नाही, आरडाओरड नाही की धावपळ नाही सर्व ब्रिटिश प्रवासी अगदी टापटिपीचा पोषाख केलेले झकपक. बोटीतून उतरलेले आम्ही भारतीय प्रवासी मात्र त्यांच्या तुलनेने अगदीच गावढळ व गबाळे दिसू लागलो तरी मी कोल्हापुरच्या सर्वात उत्तम शिप्याकडून माझ्या दृष्टीने सर्वात किंमती कापडाचा नवा सूट शिवला होता ! गाडीत चढलो तर जमिनीवर गालीचे, आसनावर मखमली आवरणे आगगाडीतील जमीन भारतीय स्टाईल म्हणजे धूळ, विड्याची थोटके, जळलेल्या काड्या, कागद कचरा आणि प्रचंड सामान याचे कोठार, ही माझी कल्पना इग्लंडमधील त्या पहिल्याच

गाडीने पार बदलून टाकली राजवाड्याच्या दरबार हॉलमध्ये आपण आलो आहोत असे वाटले आम्ही आमच्या जागेवर बसतो न बसतो तोच माझा मित्र म्हणाला, "अरे तुझा हा सूट तू टाकून दे तो अगदीच गावठी दिसतो लडनला नवा चागला तयार सूट विकत घे" माझ्या आधी दीड वर्षे तो लडनला राहात असल्याने मला त्याचा सल्ला मानावाच लागला

इग्लडमध्ये सव्वावर्ष मी राहिलो त्या मुदतीत आगगाडीचे अनेक प्रवास केले पण अपूर्वाई होती ती भुयारी गाड्याची जमिनीखाली साठ सत्तर फूट खोलावर या गाड्या धावतात लडनच्या या भुयारी गाड्याना ट्यूब म्हणतात सबध लडन शहराखाली आणि जवळपासच्या भागात या ट्यूबचे जाळे पसरले आहे त्या गाड्याचा उपयोग करायचा, तर आधी जमिनीवरच्या यत्रात पैसे टाकून तिकीट काढायचे मग फिरत्या जिन्याने (एस्कलेटर्स) जमिनीखाली जायचे तेथे फलाट असतो एका बाजूला जाणाऱ्याच गाड्या त्या फलाटावर थाबतात उलट बाजूला जाणाऱ्या गाड्यासाठी वेगळा फलाट असतो त्यामुळे प्रवाश्याचा गोंधळ होत नाही दर दोन मिनिटानी गाडी येते हिची दारे पूर्णपणे झाकलेली असतात गाडी फलाटावर उभी राहिल्यावरच दारे उघडतात. उतारू बाहेर पडतात, नवे उतारू आत चढतात गार्ड बटन दाबून सर्व दारे बद करतो या गाड्यांचा विशेष असा, की गाडीची सर्व दारे बद झाल्याशिवाय ती चालूच होत नाही गाडीच्या वर विजेची तार नसते, तर खाली रुळातूनच वीज खेळवलेली असते म्हणून स्टेशनवर धोक्याचा इशारा असतो की 'कोणीही रुळावर उतरू नये, त्यात हाय व्होल्टेजची वीज आहे' लडनमध्ये काही ठिकाणी एका स्टेशनच्या खाली दुसरे भुयारी स्टेशन असते त्यामुळे दोन दोन गाड्या एकमेकींच्यावरून जात असतात लडन शहरातून थेम्स नदी वाहते साहजिकच अनेकदा या गाड्या नदीखालून जातात. जलद गती आणि वेळ वाचविणे या दृष्टीने या भुयारी गाड्या अतिशय सोयीच्या असल्या तरी आगगाडीच्या खिडकीतून बाहेरची दृश्ये पाहण्यातल्या आनदाला या गाड्याच्या प्रवाश्याना मुकावे लागते कारण सगळ्या गाड्या काळ्याकभिन्न बोगद्यातून जातात त्यामुळे लडनच्या या ट्यूबचा प्रवास म्हणजे उदरासारखे या बिळातून त्या बिळात गेल्यासारखे वाटते

माझ्या आयुष्यातला सर्वात दीर्घ आणि सर्वात रोमाचकारक आगगाडीचा प्रवास म्हणजे १९५६ साली लडनहून परत येताना लडन ते बसरा हा पाच हजार मैलाहून अधिक लाबचा प्रवास माझे शिक्षण सपवून परत येण्याची

वेळ ठेपली तेव्हा मी भारताकडे जाण्याच्या मार्गांची चौकशी करू लागलो विमानाचे तिकीट मला परवडण्यासारखे नव्हते बोटीने मी येताना प्रवास केला होता त्यामुळे पुन त्याची पुनरावृत्ती करायला मी तयार नव्हतो दुसरे असे की वाटेत जाताना फ्रान्स, हॉलड, जर्मनी,ग्रीस इत्यादी देश पहावे असेही मला वाटत होते या देशाची सफर घडवून आणणाऱ्या प्रवासी कपन्या मौजूद होत्या पण त्याचे भारी दर माझ्या आटोक्याबाहेरचे होते तेव्हा मी विद्यार्थी होतो आणि शक्य तितक्या काटकसरीने प्रवास करीत जास्तीत जास्त देश पहावे अशी माझी भावना होती एका मित्राने मला अचूक माहिती दिली. ती अशी की, लंडन ते मुबई असे रेल्वे व बोटीचे तिकीट मिळते त्यावेळी या सपूर्ण तिकीटाची किंमत फक्त साडेपाचशे रुपये होती! तो मार्ग असा होता - लडन ते डोव्हर आगगाडी, डोव्हर ते ऑस्टेंड (बेल्जियम) बोट, ऑस्टेंडपासून आगगाडीने ब्रुसेल्स (बेल्जियम) म्युनिक (प - जर्मनी), साल्झबर्ग (ऑस्ट्रीया), थिसोलिनिकी (ग्रीस) जुब्लिजना (युगोस्लाव्हिया) इस्तबूल (तुर्कस्तान) बगदाद (इराक) व बसरा (इराक). बसऱ्याहून बोटीने मस्कतमार्गे कराची व तेथून मुबई असा हा मार्ग होता सलग प्रवास केला तर १८ दिवसानी मुबईस जाता येत होते पण हे तिकीट दीड महिना चालत असल्याने मी अनेक देशात थाबत थाबत आणि विविध शहरे पहात भारताला जाण्याचा निर्णय घेतला बगदादहून अफगाणिस्तानातून खैबर खिंडीतून कराचीला व तेथून मुंबईस बसने जाण्याचाही एक पर्याय होता पण बगदाद - काबूल ते खैबर या मार्गावर बसेस थांबवून लुटमार करणाऱ्या पठाणाच्या टोळ्या वावरतात अशी माहिती मिळाल्यामुळे मी ते धाडस केले नाही मला पॅरीस पाहण्याची अतिशय इच्छा होती म्हणून मी ब्रुसेल्सहून वेगळं तिकीट काढून पॅरीसला जायचे ठरवले हॉलडमध्ये ॲमस्टरडॅमजवळ माझी लडनची एक डच मैत्रीण रहात होती तिला भेटण्यासाठी मी हॉलंडलाही जायचे ठरवले मूळ साडेपाचशे रुपयाच्या तिकीटात या दोन मार्गांच्या तिकीटाची भर मला घालावी लागली

रुळावरून जाणाऱ्या सगळ्याच गाड्याना आपण आगगाडी म्हणतो हे खरे असले तरी, रेशनिंगच्या दिवसात ज्याप्रमाणे राईस प्लेटमध्ये राईस नसे त्याप्रमाणे हल्लीच्या बहुतेक आगगाड्यात आग नसते त्या गाड्या डिझेल किंवा विजेवर चालतात अणुशक्तीवर चालणाऱ्या गाड्यांचाही विकास होत आहे तरीही रुळावरच्या सर्व प्रकारच्या गाड्यांना आगगाड्या हे सामान्य नाव आहे सप्टेंबर १९५६ मध्ये मी लंडनच्या व्हिक्टोरिया स्टेशनवरून निघालो.

तेथून आगगाडीने दहा वाजता निघालो तो साडेबाराला डोव्हरला पोचलो ही बोट ट्रेन होती म्हणजे पुढे बोटीची तिकीटे ज्याच्याजवळ [illegible] था। गाडीन प्रवास करता येत असे डोव्हर स्टेशनला लागूनच बोटीचा धक्का होता आम्ही लगेच बोटीवर चढलो या प्रवासात मी अगदी एकटाच होतो कारण लडन-मुबई या लाबलचक आणि काहीशा धोक्याच्या प्रवासात दुसरा कोणीही भारतीय विद्यार्थी माझ्याबरोबर यायला तयार नव्हता एक वाजता आमची बोट सुटली आणि साडेतीनला ऑस्टेंड हे बदर आले. आता इथून आगगाडीचा ब्रुसेल्सचा प्रवास माझे तिकीट हे एकच तिकीट नव्हते तर निरनिराळ्या रेल्वे मार्गाचे एक एक स्वतत्र तिकीट असे कूपन्सचे एक पुस्तकच होते मुबईला पोचेपर्यंत ते साभाळून ठेवण्याची मोठीच जबाबदारी माझ्यावर होती कारण या दीर्घ प्रवासात ते हरवले तर माझा निकालच लागला असता ! पन तिकीट [illegible]

बेल्जियमच्या आगगाड्या फारच छान होत्या. त्यातून माझे तिकीट वरच्या वर्गाचे होते युरोपमध्ये तेव्हा पहिला, दुसरा व तिसरा वर्ग होता माझे तिकीट दुसऱ्या वर्गाचे होते आधीच गाड्याना कमी गर्दी आणि माझे तिकीट दुसऱ्या वर्गाचे त्यामुळे मी जेव्हा ऑस्टेंडला डब्यात चढलो तेव्हा त्या आलिशान डब्यात मी एकुलता एक उतारू होतो आता आणखी उतारू आले नाहीत, तर सुरक्षिततेच्या दृष्टीने या डब्यातून उतरून तिसऱ्या वर्गाच्या डब्यात जायचे मी ठरवले पण सुदैवाने थोड्याच वेळात तीन चार युरोपियन उतारू माझ्या डब्यात आले आणि माझा जीव भाड्यात पडला गाडी सुरू झाल्यावर थोड्याच वेळात वेटर आला आणि त्याने मेन्यू कार्ड माझ्याजवळ दिले गाडीत उपहारगृह होते आणि बारही होता मी त्याला म्हटले, "मीच तिकडे येतो", त्या निमित्ताने युरोपियन आगगाडीतील मद्यशाळाही पहावी हा माझा उद्देश होता. मी रेस्टॉरंट कम-बार मध्ये गेलो सर्व प्रकारची व्हिस्की, ब्रॅन्डी, जिन, बियर वगैरे पेये आणि खाद्य - पदार्थ तेथे होते मी खिडकीजवळच्या एका गुब्रगुबीत खुर्चीवर बसलो बियर मागवली थडगार बियरचे घुटके घेत बाहेरची वनश्री पहात हा प्रवास फारच चागला झाला 'लक्झरीत कस जगाव' हे अनुभवण्यासाठी एक दोनतीनशे वर्षे मागे मोगल बादशहाच्या काळात जावे किंवा आधुनिक युरोप-अमेरिकेत जावे कारभार आणि थोड्या साधन सामुग्रीत कसेबसे, 'भागवून घ्यावे' हा आम्हा मराठी माणसाचा खाक्या असतो. ऑस्टेंड ते ब्रुसेल्स् हा रेल्वे मार्ग बेल्जियमच्या ग्रामीण भागातून जातो छोटी कौलारू घरे, झाडाच्या

राया, हिरवीगार शेते आणि नद्या व जलाशय अशा मनोरम दृश्यातून आमची गाडी डौलात चालली होती आणि बियरची मौज चाखीत मी हा सुखद प्रवास केला

ब्रुसेल्सला तीन स्टेशने आहेत सूद म्हणजे दक्षिणेकडील, मिडी म्हणजे मधले आणि नॉर्द हे उत्तरेकडचे त्यापैकी मिडीवर सध्याकाळी साडेपाचला आमची गाडी थाबली मी बाहेर पाहिले आणि मला आश्चर्य वाटले कारण ब्रुसेल्स ही बेल्जियमची राजधानी असूनही स्टेशन अगदीच लहान होते शिवाय राजधानीच्या स्टेशनवर नुसते रुळ आणि फलाट होते एकही दुकान नाही, उपहारगृह नाही. वृत्तपत्राचा स्टॉल नाही की बार नाही आपल्याकडच्या पळसदरी किंवा तिनशिरगाव स्टेशनसारखे ते उजाड स्टेशन होते फलाटावर कोणी तिकीट कलेक्टरही दिसला नाही. एका टोकाला (सोरटी) म्हणजे फ्रेंच भाषेत 'बाहेर जाण्याचा रस्ता' असा शब्द तेवढा होता मी सामान उचलले आणि त्या दिशेने निघालो तो रस्ता मला एका तळघराकडे घेऊन गेला तेथील बोगदा ओलाडून मी गेलो तर जमिनीच्या पोटात अगदी लखलखीत प्रकाशातले भव्य स्टेशन होते तेथे मात्र अद्ययावत रेल्वे स्टेशनच्या सर्व सुविधा होत्या त्या पाहून माझ्या लक्षात आले की जमिनीवरचे रुळ व फलाट हे फक्त गाडी थाबविण्यासाठी होते आणि स्टेशनचा मायाबाजार जमिनीच्या पोटातच होता.

ती रात्र मी स्टेशनच्या वेटिंगरूममध्ये काढली माझ्या दीर्घ प्रवासाच्या तिकीटाचा एक मोठा फायदा म्हणजे माझा अनेक ठिकाणी हॉटेलमध्ये राहण्याचा खर्च वाचला माझ्याकडे वरच्या वर्गाचे तिकीट होते आणि युरोपमधील वेटिंग रूम्स अतिशय स्वच्छ व प्रसन्न असत. बऱ्याच वेटिंग - रूममध्ये थोडेसे पैसे देऊन अथरुण पाघरुण उशी मिळण्याचीही सोय होती कॉफी व शीतपेय देणारी यत्रे रात्रंदिवस उघडी होती त्यात पैसे टाकून काहीही घेता येत असे त्या वेटिंगरूममध्ये निवात झोपून मी सकाळी हॉलंडची गाडी पकडली ब्रुसेल्स ते खडान्दाल (हॉलड) हा प्रवास साडेतीन तासाचा होता ॲमस्टरडॅमची माझी डच मैत्रीण ब्रेडा या गावी शिक्षणासाठी राहात होती, म्हणून मी खडान्दालला जाऊन तेथे गाडी बदलून ब्रेडाला गेलो हॉलंड हा खेळण्यातला देश वाटतो. छोटी घरे, सुदर कालवे, वनश्री, गायी व मेंढ्याचे कळप, आगगाड्या अत्यत देखण्या व स्वच्छ सकाळी तर सर्वच आसमत टवटवीत व प्रसन्न होता. ब्रेडा ॲमस्टरडॅम आणि आतरराष्ट्रीय न्यायालय जेथे आहे, ते हेग, अशी हॉलड - मधील ठिकाणे रेल्वेने प्रवास करून मी पाहिली आणि माझ्या मैत्रिणीला पुन.

ब्रेडाला सोडून मी पॅरिसला गेलो

ॲमस्टरडॅमहून रात्री मी पॅरीसकडे निघालो या आगगाडीच्या प्रवासात झोप येणे अशक्य आहे कारण हॉलंड, बेल्जियम आणि फ्रान्स अशा तीन देशातून ही गाडी जाते प्रत्येक देशाच्या सरहद्दीवर पूर्वीच्या व नव्या अशा दोन देशाचे तीन अधिकारी तुमच्या कागदपत्राची तपासणी करतात एकजण व्हिसा व पासपोर्ट पाहतो दुसरा कस्टम अधिकारी सामानाची तपासणी करतो आणि व्हिसा रेल्वेचा तिकीटचेकर तिकीटाची तपासणी करतो जवळजवळ रात्रभर हा गोंधळ चालूच असतो त्यातून कशाबशा डुलक्या घेऊन झोपाळलेल्या डोळ्यांनीच मी पहाटे पॅरीसला गार दु नॉर्द या स्टेशनवर उतरलो रात्री गाडीत तशी विशेष गर्दी नव्हती पण पॅरीस जवळ येऊ लागले, तेव्हा मात्र त्या महानगरात कामासाठी जाणाऱ्या लोकाची गर्दी वाढू लागली मग मला झोप सोडून उठून बसावे लागले. पॅरीसमध्ये जी भुयारी रेल्वे आहे, हिचे नाव मेट्रो असे आहे पॅरीसची मेट्रो ही जगातील अद्वितीय अशी भुयारी रेल्वे आहे कारण अगदी अलिकडेपर्यंत हिचा कोणत्याही स्टेशनला एकच दर असे मी प्रथम पॅरीसला गेलो. तेव्हा हा दर ३० फ्रँक्स होता तीस फ्रॅक्सचे तिकीट काढायचे स्टेशनात जायचे, आणि मग कितीही लाब स्टेशनावर उतरलो तरी चालत असे 'सब घोडे बारा टक्के' असे हे तिकीट होते. हल्ली मात्र अगदी लाबच्या स्टेशनाकरिता पॅरीसच्या मेट्रोनी अधिक तिकीट ठेवले आहे. वॉशिंग्टन येथे जी भुयारी रेल्वे आहे, हिची आणखीनच वेगळी तऱ्हा आहे तेथे खेळातल्या पत्त्याच्यासारखे एक कार्ड मिळते ते कार्ड घेण्यासाठी यंत्रात नाणी टाकायची कार्ड घेऊन दरवाजावरच्या खाचेत खुपसायचे म्हणजे एकच माणूस जाण्यापुरता दरवाजा उघडतो त्याच वेळी तुमच्या कार्डाला एक भोक पडते. त्यामुळे ते कार्ड स्टेशनात जाण्यासाठी पुन. वापरता येत नाही आत शिरल्यावर हे कार्ड जपून ठेवायचे मग बाहेर पडताना पुन तेथील दरवाजावरच्या खाचेत ते कार्ड घालायचे मग त्यावर शिक्का उठतो आणि एका माणसासाठी दरवाजा खुला होतो एरव्ही ही पद्धत ठीक असते पण, गर्दीच्या वेळी लाबच लाब रागा लागतात आणि विलंब अटळ होतो

पॅरीसहून मी जर्मनीला जाणार होतो. पण तशी थेट गाडी नसल्याने मला आधी ब्रुसेल्सला जावे लागले हा प्रवास साधारण पाच तासाचा आहे तिथून सध्याकाळी सहा वाजता निघणारी गाडी जर्मनीतील म्युनिक या शहरी दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता पोचणार होती म्हणजे एका रात्री भरपूर

झोप मिळणार होती रात्री एका कडक्टरने डब्यात येऊन गादी. पाघरुण हवे काय याची चौकशी केली मी किती पैसे पडतील असे विचारता तो म्हणाला, 'पाच ब्रिटिश पौंड' म्हणजे शभर रुपये! तेवढ्याच भावात त्या काळी चार गाद्या व आठ अथरुणे पाघरुणे विकत घेता आली असती! खरे तर डब्यातले कोच व बर्थच मखमली होते, मग वेगळी यादी कशाला? शिवाय मी एक उशी व ओव्हरकोट बरोबर घेतलाच होता मी मनात विचार केला की हे पाच पौंड नुसत्या गादी उशीसाठी घालविण्यापेक्षा त्यात जर्मन बियर आणि नाईट क्लब यांचा मनमुराद आस्वाद घेता येईल! मी झोपी गेलो खरा, पण पहाटे कडाक्याची थंडी पडली. मी गारठू लागलो उजाडले तरी बाहेर दाट धुके होते आता रगाची आवश्यकता होती पण यावेळी तो मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती ब्रुसेल्सहून निघालेली ही गाडी जर्मन होती, आणि अत्यत सुदर व आरामशीर होती. पण बाहेरच्या कडाक्याच्या थडीपुढे तिचाही इलाज नव्हता थंडीने कुडकुडताना मात्र मला वाटले की नतरच्या नाईट क्लबची ऊब सकाळची थंडी कमी करू शकत नाही

तो ऑक्टोबर महिना होता जगप्रसिद्ध जर्मन बियरचा मोसम आताच सुरू झाला होता ऑक्टोबर फर्स्ट हा जर्मन बियरचा महोत्सव मी मनमुराद पाहिला, अनुभवला, अक्षरश पचवला आणि पुढे साल्सबर्ग ह्या ऑस्ट्रियातील शहरी रात्री पाऊण वाजता पोचलो आता स्टेशनच्या वेटिंगरूममध्ये रात्री झोपाव, आणि सकाळी शहर पहायला बाहेर पडाव या विचारान मी वेटिंग - रूममध्ये गेलो. सुमारे शभर लोक सुखाने झोपू शकतील अशा त्या भव्य व स्वच्छ वेटिंगरूममध्ये पाच सहाच प्रवासी अवघडून बसले होते त्याना कदाचित् लगेच पुढली गाडी पकडायची असेल अशा विचाराने मी एका बाकावर आडवा झालो मला डोळा लागतो न लागतो तोच एक रेल्वे पोलीस माझ्याजवळ येऊन म्हणाला, "सर आपल्याला इथे झोपता येणार नाही ही वेटिंगरूम फक्त बसण्यासाठी आहे" मी उठून बसून म्हटले, "भल्या गृहस्था, एवढी मोठी जागा, इथ रिकामी पडली असताना माझ्या झोपेच्या आड तू कशासाठी येतोस?" तो म्हणाला, "वरच्या मजल्यावर पैसे भरून झोपण्याची व्यवस्था आहे आम्ही जर इथेच लोकाना मोफत झोपायला परवानगी दिली, तर आमच्या 'वरचा मजला रिकामा राहील ना!" मी मनात म्हटले, जगात कुठेही जा रेल्वेवाल्यांचा वरचा मजला रिकामाच असतो!

म्युनिकहून मी युगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड या शहरी गेलो. या

देशातील रेल्वे मात्र तद्दन भिकार होती एकदर देशाच गरीब, तेथील अर्थव्यवस्था अशी होती की सर्वांना किमान सुविधा होत्या पण, त्याचा दर्जा निकृष्ट म्हणजे पाव भरपूर, आणि स्वस्त, पण त्याचा दर्जा सर्वात वाईट रेल्वेही तशाच. माझा वरचा वर्ग असूनही एम् एस् एम् चा जयसिंगपूर फाट्याच्या तिसऱ्या वर्गाची अवकळा पुढे जुब्लिदानाला मी ग्रीसच्या रेल्वेमध्ये बसलो, तेव्हा कुठे पुन गुबगुबीत गाद्याचे डबे मिळाले या ग्रीक रेल्वेने मी थिसोलिनीकी आणि अथेन्स या शहराना भेटी दिल्या मात्र या गाडीच्या रेस्टॉरटमध्ये जे ग्रीक मद्य देण्यात येत होते ते [illegible]

जर्मन बियर आणि स्कॉच व्हिस्की बरी. ग्रीसच्या पुढचा मुक्काम होता इस्तबूल. या गावाचे नाव जसे मौला वाटते तसेच त्याचे स्वरूपही आहे अथेन्स ते इस्तबूल या प्रवासात मला इरीक शेठी नावाचा एक प्रवासी भेटला तोही माझ्याच मार्गाने कराचीला जाणार होता. लडनपासून इस्तबूलपर्यंतचा दीर्घ प्रवास मी एकट्याने केला होता आता प्रवासात कोणीतरी गप्पा गोष्टी करायला मिळाल्याने मला फार बरे वाटले हा इरीक शेठी पूर्वी काबूलला राहात असे एका पहाटे बर्फ पडत असताना सुभाषचद्र बोस त्याच्याकडे मुक्कामासाठी आले होते.

[illegible] वैशिष्ट्यपूर्ण शहर आहे त्याचा अर्धा भाग युरोपमध्ये आणि अर्धा आशियात आहे या दोन भागाना जोडणाऱ्या पुलाचे नाव गलाता ब्रिज असे आहे इस्तबूल हे एकेकाळी जगातील प्रभावी शहर होते ती मुस्लिम साम्राज्याची राजधानी होती चेंगेजखान, तैमूरलग, अकबर, औरगजेब हे सर्व मूळ याच भागातले इस्तबूलहून मला व इरीक शेठीला बगदादला जायचे होते. इस्तबूलच्या रेल्वेस्टेशनचे नाव हैदरपाशा. या स्टेशनावरून आठवड्यातून दोनच वेळा (सोमवारी, शुक्रवारी) बगदादला गाडी जात असे. आम्ही बुधवारी हैदरपाशा सोडले. आणि वाटेत अकाराला दोन दिवस राहिलो. या गावी फार चागले व स्वस्त टरबूज मिळत होते शेठीने हा प्रवास पूर्वी केला होता म्हणून त्याने सल्ला दिला की अकारा ते बगदाद या रेल्वे प्रवासात आपण चारसहा टरबुजे जवळ घेऊ कारण ही गाडी अत्यत कोरड्या, रुक्ष आणि उष्ण प्रदेशातून जाते त्यावेळी पाणी मिळाले नाही तर टरबुजावर तहान भागवावी लागते म्हणून गाडीत चढण्यापूर्वी आम्ही भरपूर टरबुजे बरोबर घेतली.

अकारा ते बगदाद या आगगाडीसारखी गाडी मी पूर्वी आणि नंतर कधीही पाहिली नाही. या गाडीच्या प्रत्येक डब्यात एक स्वयपाकघर होते

कारण हा सतत चार दिवसाचा प्रवास होता त्या दीर्घ प्रवासात अनेकाना रेल्वे रेस्टॉरंट अन्न परवडत नाही किंवा मानवत नाही, त्याच्यासाठी स्वत अन्न शिजवण्याची सोय या चालत्या स्वयपाकघरात होती या प्रवासातील अनेक तुर्की प्रवाशानी आपल्याबरोबर जिवत कोंबड्या, त्याचे पाय बाधून घेतल्या होत्या प्रवासाच्या सुरुवातीला त्या शेकडो कोंबड्याच्या कलकलाटाने कान किटायचे. पण मग हा आवाज हळूहळू कमी झाला आणि शेवटी पूर्णपणे बद झाला. त्यावरून त्या कोंबड्याचे चार दिवसाच्या प्रवासात काय झाले असेल याची आम्हाला कल्पना आली हा प्रवास अत्यंत एकसुरी आणि कंटाळवाणा कारण बाहेर पहायला वनश्री नाही की पाणी नाही. उजाड गरम जमीन, धुळीचे लोट, दहा बारा तासानी येणारे ओसाड स्टेशन, आजूबाजूच्या तुर्की भाषा अपरिचित रेल्वेत मिळणारे तुर्की मद्य अत्यत हलक्या दर्जाचे आणि रेल्वे कॅंटीनचे अन्नही तद्दन भिकार बाहेर स्टेशनात टरबुजाशिवाय काहीही मिळत नसे हा सतत चार दिवसाचा कंटाळवाणा प्रवास, कसेबसे तास ढकलीत आम्ही आवेट बगदादला येऊन पोचलो. अरेबियन नाईट्स वाचून बगदादविषयीच्या आमच्या कल्पना अतिशय रोमहर्षक झाल्या होत्या ते जादूगार, त्या चेटकिणी, ते बादशहा, धाडसी सिंदबाद,, जादूचा दिवा - सारे अद्भुत वातावरण बगदाद या एका नावाभोवती होते पण प्रत्यक्षातले बगदाद म्हणजे अमेरिकन शहराची तिसऱ्या दर्जाची नक्कल होती. दुकाने, चित्रपट, मोटारी सर्व काही अमेरिकन धर्तीवर. त्यामुळे बगदाद या नावातील जादू व काव्य नष्ट झाले व आमची अतिशय निराशा झाली एका सध्याकाळी मी आणि इरीक शेठी बगदादहून निघालो आणि रात्रभर धुळीचा व निष्प्रभ प्रवास करून बसऱ्याला पोचलो तिथे बोटीवर चढलो आणि कराचीला शेठीला सोडून मी मुबईला आलो या रेल्वे मार्गावरील ओरिएट एक्सप्रेसवर आगाथा ख्रिस्ती यानी 'मर्डर ऑन द ओरिएट एक्सप्रेस' ही रहस्यकथा लिहिली असून तिच्यावर चित्रपटही झाला आहे.

माझ्या आयुष्यातला सर्वात चागला आणि सर्वात वाईट रेल्वे प्रवास कोणता याचा मी विचार करतो तेव्हा, मला स्विझलॅंड आणि जोधपूर-जैसलमेर यांची आठवण होते १९६१ साली मी जगप्रवास केला. अगदी पृथ्वीच्या या बाजूने निघून दुसऱ्या बाजूने प्रदक्षिणा घालून परत आलो अर्थात् तो प्रवास विमानाचा होता, तरी त्यावेळी मी युरोप निवातपणे पाहता यावा म्हणून महिना भराचा युरोरेलचा पास काढला होता तो पहिल्या वर्गाचा होता आधीच

युरोपमधील रेल्वे आलिशान, वातानुकूलात, त्यात माझा पाहल्या वर्गाचा पास त्यामुळे इटली, स्वित्झर्लंड, जर्मनी, हॉलड, फ्रान्स इत्यादी देशाचा माझा रेल्वे प्रवास अतिशय सुखद झाला त्याहूनही माझ्या आयुष्यातला सर्वात आनददायक रेल्वे प्रवास म्हणजे इटलीतील तुरीनपासून स्वित्झर्लंडमधील अर्सफील्ड या गावचा ती स्विस रेल्वे होती स्वित्झर्लंड हे जगातील एक अत्यत श्रीमत सुखदायक राष्ट्र त्याच दरडोई उत्पन्न सर्व देशात पहिल्या क्रमाकाचे तिथल्या रेल्वेच्या कमीतकमी तिकीटाच्या वर्गातही गालिचे, मखमलीच्या गाद्या आणि वातानुकूलित व्यवस्था मग पहिला वर्ग म्हणजे स्वर्गच असेल यात काय शंका गाडीतील रेस्टॉरंटचा डबा म्हणजे फ्रान्सच्या राजाच्या वाड्यातले एक दालनच वाटावा असा बादशाही या डब्यात बसून जर्मन बियरचे घोट घेत आणि स्विस हॅंबर्गरचा आस्वाद घेत खिडकीतून जगप्रसिद्ध स्विस निसर्गसौंदर्यात डुबून केलेला प्रवास हा माझ्या आयुष्यातील सर्वात सुदर व सस्मरणीय असा एक प्रवास

आता सर्वात वाईट प्रवास जोधपूरपासून जैसलमेर (राजस्थान) पर्यंत एप्रिल १९०५ मध्ये मी केलेला आगगाडीचा प्रवास हा सर्वात भयकर होता. जोधपूरहून सकाळी आठला गाडी निघणार होती व सध्याकाळी सहाला जैसलमेरला पोचणार होती हॉटेलमधून निघताना मी नुसता चहा घेतला होता कारण इतक्या दूरवरच्या गाडीत कॅन्टीन असणारच, नऊ साडेनऊला काहीतरी ब्रेकफास्ट घेऊन एक वाजता गाडीत जेवण कराव असा मी बेत केला आठ वाजता गाडी सुरू झाली गाडीला अगदीच कमी गर्दी होती म्हणजे चाळीस पन्नास जणाच्या डब्यात तीन ते चार उतारू होते मी वर्तमानपत्र मासिक वाचून नऊ वाजता गाडीच्या रेस्टॉरट कारची चौकशी करू लागलो तेव्हा माझ्या डब्यातल्या एका उतारूने 'या गाडीत खाण्यापिण्याची सोय नाही' असे सागून मला पहिला धक्का दिला मी मनात म्हटले ठीक आहे, स्टेशनवर काहीतरी खायला मिळेलच दरम्यान दहा वाजल्यापासूनच ऊन भयकर तापू लागले गाडी वाळवटातून जात होती अकराच्या सुमाराला एक स्टेशन आले मी खाली उतरून काही खायला मिळेल की काय ते पाहिले पण खाद्यपदार्थ घेऊन येणारा एकही विक्रेता दिसला नाही इतकेच नव्हे तर, सबध गाडीतून दोनच उतारू उतरले आणि एकच गाडीत चढला गाडी सुरू झाली आणि नवीनच उपद्रव सुरू झाला तो म्हणजे भोवतालच्या वाळवटातले वाळूचे असख्य बारीक कण वाऱ्याने डब्यात येऊ लागले आणि घुसमटून टाकू लागले.

आधीच कडक उन्हाळा, पोटात अन्नाचा कण नाही आणि त्यात अश्रुधूर सोडल्यासारखे हे गरम वायूचे कण. जीव अगदी बेजार झाला दीड वाजेपर्यंत चहाचा कप आणि बटाटा चिप्ससुद्धा मिळाल्या नाहीत डब्याच्या दोन टोकांना आम्ही दोन उतारू या वैराण वाळवटात कोणी बदूकधारी किंवा सुराधारी आत शिरला असता तर आम्हाला धाक दाखवून लुबाडून डब्यातून सहज उडी मारून पसार होऊ शकला असता

दीड वाजता आलेल्या एका स्टेशनवर मात्र 'खारा पुरी' असा पुकार करीत एक विक्रेता आला मी चार पुऱ्या घेतल्या त्याला विचारल, ''या गाडीवर कोणी काही विकताना का दिसत नाही ?'' तो म्हणाला, ''दोन चार प्रवासी असतात. स्थानिक राजस्थानी लोक इतके गरीब आहेत की त्याना आगगाडीचे तिकीटही परवडत नाही ते सरळ फुकट प्रवास करतात मग खाद्यपदार्थ विकत कोण घेणार, आणि विक्री होत नसली तर विकणार तरी कोण ? माझा बाप या स्टेशनवर बावटे ओढतो मी आपला जमेल तेवढी विक्री करतो पण सबध दिवसात दोन अडीच रुपये जमत नाहीत मीसुद्धा हा धदा सोडणार आहे '' गाडी हलली तेव्हा मी एक खारापुरी तोंडात टाकली. हिची चव इतकी भयकर होती की, पोस्टकार्ड खजूर तेलात तळून त्याला चटणी मीठ माखल्यासारखी ती लागली पण भुकेला धोंडा या न्यायाने तीही खावी लागली जैसलमेर येईपर्यंत वाळूचे हवेत फिरणारे कण, गाडीचा उन्हाने झालेला बॉयलर आणि भक यांनी मला इतके हैराण केले की आता कोणत्याही परिस्थितीत या मार्गाने पुन. रेल्वे प्रवास करायचा नाही, असा मी निर्णय घेतला

मार्गावरील अपघात किंवा इतर कारणामुळे गाडी मधेच अडकून पडून चार सहा तास अतिशय कटाळवाणे व तणावाचे जाणे, गाडी उशिरा सुटणे, रिझर्व्ह जागा असूनही डब्यात बेसुमार गर्दी होणे असे अनत प्रसग माझ्यावर आले आहेत पण प्रत्यक्ष रेल्वे अपघातात मात्र कधी मी सापडलो नाही इटलीमध्ये तुरीन या रेल्वे स्टेशनमध्ये मी काढलेली रात्र ही सर्व प्रवासातील अत्यंत भयंकर रात्र कारण त्या रात्री आमच्या वेटिंगरूममध्ये काही हिप्पी व काही इटालियन याच्यात प्रचड मारामारी होऊन एका हिप्पीने पिस्तूल काढून गोळ्या झाडल्या मी बॅगा घेऊन बाहेर पळून जाता जाता माझ्या डोक्यापासून एक फूट अतरावर दरवाजाच्या काचांवर एक गोळी लागून काचा फुटल्या आणि मी अगदी कसाबसा वाचलो.

रेल्वे प्रवासाच्या अनेक सुखद आठवणीही आहेत एका प्रवासात

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय लेखक श्री मनोहर माळगावकर याची ओळख झाली आणि त्याच्या मैत्रीचा मला लाभ झाला कै सुभाषचद्र बोस यांना एक रात्र आश्रय देणाऱ्या इरीक शेठीची भेट झाल्याचा उल्लेख वर झालाच आहे महाराष्ट्रातील एका रेल्वे प्रवासात एका रात्री फर्स्ट क्लासमध्ये मी एकटाच व्हिस्की घेत होतो तेवढ्यात तिकीटचेकर आला त्यालाही मी मद्य दिले मग तो दोन अडीच तास माझ्याबरोबर गप्पा मारीत होता रेल्वेत भ्रष्टाचार कसा चालतो आणि आपणही त्यात कसा हात धुवून घेतो याची इत्थभूत व अतिशय मनोरजक माहिती त्याने मला सागितली अनेक रेल्वे प्रवासात काही सुदर स्त्रियाचाही परिचय झाला आगगाडीच्या प्रवासात गाडी हलत असल्याने वाचनातही एकाग्रता करणे कठीण असते अशावेळी एखाद्या जिवलग मित्राबरोबर गप्पा मारीत अंतर काटणे ही अतिशय सुखद बाब आहे

जगाच्या अनेक देशात फिरल्याने मी अनत प्रकारच्या आगगाड्या पाहिल्या आहेत सॅनफ्रान्सिस्को येथे बार्ट नावाची स्वयचलित गाडी होती तिला ड्रायव्हर, कडक्टर, गार्ड नसे. मध्यवर्ती केंद्रातून इलेक्ट्रॉनिक्सवर ही गाडी चालविण्यात येई रस्त्याच्यामध्ये लांबीच्या दिशेने उच पूल बाधून ही स्वयचलित गाडी चालविण्याचा प्रयोग झाला गाडीची दारे स्टेशन आल्यावर आपोआप उघडत गाडी सुरू होण्यापूर्वी आपोआप बद होत हा प्रयोग फारसा यशस्वी झाला नाही तरी एकविसाव्या शतकातल्या गाडीची झलक म्हणून तो लक्षात राहील जपानमध्ये याकोहामा ते टोकियो या रस्त्यावर लाबलचक गाडीने मी प्रवास केला आहे नेहमीच्या गाडीचे रुळ खाली असतात पण या गाडीचे रुळ वर आणि त्यावर गाडीची चाके असतात. मात्र गाडी रुळावरून पाळण्यासारखी लोंबकळत जाते फ्रान्समध्ये ऑटोरेल पॅनोरामिक नावाची गाडी आहे ही गाडी म्हणजे एकच मोठा डबा असतो त्यात सुमारे दोनशे उतारू बसतात खरे तर तिला आगगाडी म्हणण्याऐवजी रुळयात्री बस म्हणणेच योग्य होईल निसर्गसुदर भागातून प्रवाशाना रसिकतेने जाता यावे म्हणून हिची खास बाधणी असते तिला दोन मजले असतात आणि तिन्ही बाजूला काचा असतात ताशी ऐंशी मैल वेगाने ही गाडी धावते विमानात विमान सुदरी असतात तशा जर्मनीतील आगगाड्यावर ट्रेन सुदरी मी पाहिल्या आहेत गोव्यात जशा बोटीत बसेस घालून पैलतीरी नेतात, तशा प्रचड बोटीत सबध आगगाडी घालून ती नदीच्या पलीकडच्या बाजूच्या रुळावर सोडण्याची व्यवस्था बारतिकमध्ये आहे मोटारीचे एकमेकावर तीन थर ठेवून त्या कारखान्यापासून विक्रीला शहरी नेणाऱ्या

खास आगगाड्या अमेरिकेत, इंग्लंडमध्ये व प जर्मनीत आहेत महायुद्धानंतर बॉन ही प जर्मनीची राजधानी झाली पण तेथील स्टेशन फक्त चार रुळांचे आहे बर्लिनचीही तीच अवस्था याउलट जर्मनीत कलोन या शहरी बावीस रेल्वे मार्ग आहेत. मुलांच्यासाठी खास पाळणे व पाळणाघर याची व्यवस्था असलेल्या गाड्या स्वीडनमध्ये आहेत रुळावर बर्फाचे ढीग पडले असतानाही त्यांना बाजूला सारून धावणाऱ्या खास गाड्या आहेत ताशी बावीस मैल डुगडुग करीत सुस्त चालणाऱ्या बार्शी लाईटसारख्या गाड्या आहेत आणि ताशी तीनशे मैल धावणाऱ्या जपानमधील बुलेटसारख्या गाड्याही आहेत भारताचे शेवटचे टोक रामेश्वर येथे जाताना गाडी समुद्राच्या एका पट्ट्यावरून जाते ते दृश्य विलक्षण वेधक आहे समुद्राला भरती आली तर कधी कधी हे पाणी इतके वर येते की दरवाजातून हातपाय खाली केला तर ते पाणी हाताला लागते अशावेळी गाडी अतिशय हळूहळू व जपून चालवावी लागते हॉगकाँगला पर्वतावर चढणारी व उतरणारी रोप ट्रेन आहे माणसासाठी गाड्या आहेत. मालासाठी आहेत. गुरासाठी आहेत. हत्ती गेंड्यासाठी खास गाड्या आहेत रेसच्या घोड्यांसाठीही आहेत. १६७१ साली आगगाडीचे तत्त्व विकसित झाले आणि राल्फवुड यांनी पहिली आगगाडी सुरू केली त्यापूर्वी १७६० साली वॅट यांनी वाफेच्या इंजिनाचा शोध लावला होता पण त्याचा विकास करून प्रत्यक्ष रेल्वेसाठी त्याचा वापर करण्यास अकरा वर्षे लागली त्यावेळेपासून आजगायत जगाच्या पाठीवर लक्षावधी गाड्या डोंगर पोखरून, समुद्र पार करून, नदीच्या खालून, दुर्गम जंगलातून धावतच आहेत मला आगगाड्यांचे हे जग नेहमीच अद्भुत वाटले आहे आता विमाने निघाली आणि एकविसाव्या शतकात रॉकेटमधून माणूस परग्रहावरही जाईल पण मानवजातीच्या अखेरीपर्यंत आगगाडीबद्दलचे माणसाचे कुतुहल आणि आगगाडीच्या प्रवासाची मोहिनी कधीही कमी होणार नाही

# ६ / हॉटेल विश्वातील फेरफटका

जो माणूस या ना त्या निमित्ताने घराबाहेर पडतो, प्रवास करतो आणि इतरत्र राहतो, त्याला तेथील निवासाची व्यवस्था करावीच लागते नातेवाईक किंवा मित्र याच्याकडे राहणे बहुतेकाना आवडत नाही अर्थातच त्या गावातील तात्पुरते घर म्हणजे हॉटेल किंवा पथिकाश्रम महाराष्ट्रातील बरीच हॉटेल्स ही पथिकाश्रम या नावाला शोभेशीच असतात कारण एकेकाळी आश्रमात राहणे हे जसे कष्टकारक होते, तसेच या पथिकाश्रमातील राहणेही त्रासाचे असते आमच्याकडे निवासी हॉटेलाची जाहिरात 'राहण्याजेवण्याची उत्कृष्ट सोय' अशी करण्यात येते प्रत्यक्ष तेथे राहून अनुभव घेतला, तर मात्र 'राहण्याजेवण्याची उत्कृष्ट गैरसोय' असे वर्णन करावे लागेल!

हॉटेल हा शब्द आपण काहीशा सैलपणे वापरतो इंग्रजीत रेस्टॉरंट म्हणजे उपहारगृह आणि हॉटेल याचा अर्थ, राहण्याची सोय असलेले ठिकाण, असा करण्यात येतो आपण मात्र 'हॉटेलात जाऊन चहा घेऊन आलो' म्हणतो तेव्हा हॉटेलचा अर्थ उपहारगृह असा करतो आपल्याकडे उपहारगृह, खाणावळ आणि निवासी हॉटेल असे, तीन भिन्न सोयी असलेले तीन, शब्द आहेत इंग्रजीतील लॉज हा शब्द मुख्यत: राहण्याची सोय दर्शवितो माझी हॉटेलमध्ये राहण्याची पहिली आठवण सुमारे चाळीस वर्षांपूर्वीची आहे तेव्हा मी कॉलेजात शिकत होतो. एका मित्राच्या लग्नासाठी कोकणात कुडाळला गेलो होतो लग्न आटोपून परत येताना वाटेत सावंतवाडीला राहण्याचे मी आणि माझा मित्र गोविंद शिरगुटकर यानी ठरवले, माहोर स्टँडजवळ 'राहण्याची सोय' अशी एक पाटी पाहिली आत जाऊन चौकशी केली मालकानी आपल्या घरातच काही काथ्याच्या लाकडी खाटा टाकून ही सोय केली होती माणशी एक रुपया दर होता आम्हाला तेवढाच परवडत होता आम्ही राहिलो आघोळीसाठी विहिरीतून स्वत. पाणी काढावे लागत होते. काथ्याच्या खाटेवर झोपण्यासही

एक काबळे टाकले होते ते अर्थातच झोपताना टोचत होते आम्ही लग्नघरातच जाणार होतो म्हणून स्वत चे अथरुण पाघरुण काही नेले नव्हते जागा अधारी होतीच, शिवाय सावतवाडीचे कुप्रसिद्ध डास भरपूर होते आमच्याकडून माणशी रुपया तोही आगाऊ घेतला होता पण डासाना मोफत प्रवेश असावा, हे त्याच्या प्रचड सख्येवरून सहजच लक्षात येत होते आयुष्यातल्या पहिल्याच हॉटेलात झोप फारशी लागली नाही. पण डासाना अन्न पुरविण्याचे सात्विक समाधान मात्र खूपच मिळाले महाराष्ट्रात तरी हॉटेलाच्याकडून मला नेहमीच त्यागाची शिकवण मिळाली त्याची सुरुवात चाळीस वर्षांपूर्वी सावतवाडीच्या त्या निनावी हॉटेलने केली. त्या हॉटेलला नावसुद्धा दिलेले नव्हते कारण मालकाची प्रसिद्धी पराङ्मुखता हेच होय!

याच्या अगदी उलट टोकाचा अनुभव म्हणजे १९७३ मधील अमेरिकेचा ती माझी अमेरिकेची तिसरी भेट होती या भेटीत शिकागो येथील जगप्रसिद्ध पिक कॉंग्रेस या हॉटेलात माझ्याकडे चक्क दहा वातानुकूलित खोल्या दोन दिवस होत्या आणि त्या बादशाही दहा खोल्यात मी व माझी पत्नी असे दोघेच राहात होतो अर्थात आमचे वास्तव्य एकाच खोलीत होते पण आमच्याकडे दहा खोल्याच्या किल्ल्या होत्या त्या दहा खोल्याचे रोजचे भाडे पाच हजार रुपये होते! अगदी योगायोगाने त्या खोल्या माझ्याकडे आल्या होत्या. त्याचे असे झाले, की १९७३ साली भारतीय शेतकऱ्याच्या एका पथकाचे नेतृत्व मी केले होते. न्यूयॉर्कच्या ट्रॅव्हल एजन्सीने आमचा कार्यक्रम आखला होता त्या कार्यक्रमाला शिकागो येथील पिक कॉंग्रेस हॉटेलात तीन दिवस मुक्काम ठरला होता आमच्या पथकात एकदर वीसजण होते म्हणून दहा खोल्या राखून ठेवल्या होत्या पण प्रत्यक्षात असे झाले, की आम्ही वॉशिग्टन सोडल्यावर आमच्या पथकातील शेतकरी म्हणाले की, "आम्हाला अमेरिकन शेती पहायची आणि तीही प्रत्यक्ष शेतीवाडीवर मुक्काम करून" त्याच्यासाठी ओहामा येथे मुक्कामाची व शेती पाहावयाची ऐनवेळी सोय करण्यात आली मला स्वत.ला शेती पाहण्यात स्वारस्य नसल्याने मी पूर्वी ठरल्याप्रमाणे शिकागोला गेलो शेतकरी मडळी मात्र ओहामाला रात्रभर मुक्काम करून, दुसरी रात्र प्रवासात घालवून तिसऱ्या रात्री शिकागोला पिक कॉंग्रेसमध्ये येणार होती. प्रवासी कपनीने आधीच दहा खोल्याचे आरक्षण केले असल्याने आम्ही त्यापैकी नऊ खोल्याचे आरक्षण रद्द करू शकत नव्हतो म्हणून ते दोन दिवस माझ्याकडे खोल्याचा ताबा आला

हे पिक कॉंग्रेस हॉटेल म्हणजेच बडे प्रकरण होते परिषद, सभा, समेलने, परिसवाद यासाठी सबध अमेरिकेतही हे सर्वात मोठे व सर्वात सोयीचे असे अवाढव्य हॉटेल होते भुयारी रेल्वेप्रमाणे या हॉटेलात फिरते जिने (एस्कलेटर्स) होते शभर लोकाच्या बसण्याच्या सोयीपासून दीड हजार आसने असलेल्या भव्य सभागृहापर्यंत सहा ठिकाणी या हॉटेलात परिषदाच्या सोयी आहेत लॉस एजेलिस आणि न्यूयॉर्क ही अमेरिकेची दोन टोके त्यातले अतर अडीच हजार मैलाचे या दोन्हीच्याबरोबर मध्ये शिकागो हे उद्योगप्रधान शहर असल्याने परिषदासाठी हे सर्वात सोयीचे असे शहर आहे. या भव्य हॉटेलच्या रिसेप्शनजवळ मी गेलो आणि माझे नाव व ज्या ट्रॅव्हल एजन्सीने आमच्या खोल्या राखून ठेवल्या होत्या त्या कपनीचे नाव सागितले त्याबरोबर स्वागत करणाऱ्या महिलेने रजिस्टरमध्ये पाहून लगेच दहा किल्ल्या काढल्या आणि म्हटले, "यस सर वेलकम् टु पिक कॉंग्रेस रूम नबर्स फाईव्ह टू नाईन टू फाईव्ह थ्री एट"

मला आता एकाच खोलीची चावी द्या बाकीचे लोक उद्या किंवा परवा येतील," मी सागितले

"ॲज यू प्लीज सर हियर यू आर" असं म्हणून तिनं ५२९ क्रमांकाच्या खोलीची चावी माझ्याकडे दिली मी लिफ्टने पाचव्या मजल्यावर गेलो आणि ती खोली उघडली, आतील दिवे लावून पाहतो तर काय, गालीचावर दहाबारा टॉवेल्स पडले होते! स्नानगृहातही तीनचार ओले टॉवेल्स पडले होते याचा उघड अर्थ असा होतो, की आमच्या आधी जे कोणी एक दोन लोक तिथे रहात होते त्यानी खास स्टीम बाथ किंवा कसले तरी गरम टॉवेल अगावरून गुडाळल्याचे स्नान केले होते मी हाऊस कीपरला फोन करून 'खोली साफ करून घ्या आणि येताना रिसेप्शनकडून ५३० क्रमाकाची चावी आणा' म्हणून सागितले पाच सहा मिनिटातच एक वेटर कोरड्या इस्त्रीचे टॉवेल्स, चादरी याची गाडी घेऊन आला खोल्या साफ करणारी आणखी एक बाई आली माझ्या हाती ५३० क्रमाकाची चावी देऊन ती वेट्रेस म्हणाली, "माफ करा खोली साफ करण्यापूर्वीच आपल्याला चावी दिली गेली आपण शेजारच्या खोलीत थोडा वेळ थांबा दहा मिनिटात ही खोली तयार होईल!"

मी म्हटले, "आम्ही शेजारच्या खोलीत राहतो या खोलीची चावी नतर खाली द्या म्हणजे झाल"

या हॅटेलमध्ये मी तीन दिवस राहिलो पहिल्या दिवशी रात्री मी टेलिफोन ऑपरेटरला फोन करून सागितले, "मॉर्निंग कॉल ॲट सिक्स वुईथ टी"

त्यावर ती म्हणाली, "डिअर सकाळी सहा वाजता मी फोन करून उठवते, पण रूम सर्व्हिस सात वाजता सुरू होते त्यामुळे चहा खोलीत त्यावेळी येणार नाही पण तळमजल्यावरच रेस्टॉरंट पहाटे पाचपासून चालू होत तेथे आपण आलात तर तेथल्या सर्व्हिसमध्ये चहा मिळू शकेल, डिअर"

"थँक यू डार्लिंग" म्हणून मी फोन ठेवला तिचा आवाज फारच मधुर होता तिन 'डिअर' म्हटल तर आपण जरा पुढ जाऊन 'डार्लिंग' का म्हणू नये, या विचाराने मी तिला तस म्हटल तेव्हा माझी पत्नी म्हणाली, "आता इथं कुठली डार्लिंग आणलीत?" मी उत्तर दिल, "ती कोण, ते, मी तरी कुठे पाहिल आहे? टेलिफोन ऑपरेटर, कोण असेल ती पण ती नक्की सुदर आणि तरुण असणार अस तिच्या आवाजावरूनच ताडल मी"

आणि सहा वाजता उठून तोंड धुवून पहिल्या चहासाठी तळमजल्यावर गेलो. पासष्ट वर्षाच्या आसपासची एक वृद्ध बाई तिथ बसली होती बारमध्ये उच स्टुल असतात, तशी चहा देणाऱ्याच्या भोवती तिथ स्टुल होती आम्ही बसतो न बसतो तोच त्या वृद्ध बाईन विचारल, "आपण इडियाचे का?" मी म्हटले "होय" ती वृद्धा म्हणाली, "तुम्ही कसं ओळखलत?" "तुम्ही ६४३ मध्ये राहता ना? मीच तुम्हाला सहा वाजता फोन केला आणि सहाची ड्यूटी सपवली" त्यावेळी माझ्या पत्नीच्या चेहऱ्यावर आसुरी आनंद दिसत होता कारण एका सुदर तरुणीला आपण 'डार्लिंग' म्हटल हा माझा भ्रमाचा भोपळा त्या म्हाताऱ्या बाईन फोडला होता!

पुण्याला मी एका लहानशा हॉटेलात पूर्वी उतरलो होतो सुमारे १९५७ साली. मला दुसऱ्या दिवशी पहाटे पाचला उठवायला मी मालकाला सागितले कारण सहाला गाडीन मला जायच होतं. मालक म्हणाले, "साहेब, तुमच्या खोलीवर जाताना जिन्यात तीन चार पोर झोपलेली असतील त्यांच्या मारुती नाही तर गणूला सागा तो बरोबर पाच वाजता हाक मारील तुम्हाला. मी 'बर' म्हणून पुढ जाणार, तोच मालकान मला हाक मारून म्हटल, "तुम्हाला उद्या पहाटे अगदी अर्जंट जायलाच पाहिजे काय?" मी म्हटल, "अर्थातच, काही अडचण आहे का? खरं तर मी सर्वसाधारणपणे पहाटे पाचला जागा होतोच" त्यावर मालक म्हणाले, "हे छान झाल साहेब. मग तुम्हीच जाताना जिन्यावरच्या पोराना हाक मारून उठवा ना अहो, आठ आठ वाजेपर्यंत उठत नाहीत कार्टी!"

ब्ल्यू डायमड या पुण्याच्या हॉटेलचा दिखाऊ थाटमाट कितीही मोठा

असला, तरी हे एक अत्यत भिकार हॉटेल आहे असे माझे मत तेथे चार पाच वेळा राहिल्यानतर झाले आहे अर्थात मी 'पुलिस' मध्ये होतो तेव्हाच तेथे रहात असे कारण दररोज दोनशे ते अडीचशे रुपये मला व्यक्तिश. परवडणारे भाडे नाही एका डिसेंबरमध्ये मी ब्ल्यू डायमडमध्ये गेलो. वास्तविक बाहेर थडी असतानाही खोलीतील एअर कडिशनिंग चालू होते मोठ्या हॉटेलमध्ये अशी व्यवस्था असते, की बाकीच्या भागासाठी एअर कडिशनिग चालू असले, तरी तुम्ही तुमच्या खोलीतील एअर कडिशनिगची प्रखरता कमी करू शकता किंवा ते अजिबात बद करू शकता या खोलीतही तशी व्यवस्था होती म्हणून मी ते चक्र फिरवू लागलो पण ते मोडले आहे हे माझ्या लक्षात आले मी रिसेप्शनला फोन करून माझी तक्रार सागितली कारण खोलीत इतका गारवा होता की आपण उत्तर ध्रुवावर आहोत अस वाटू लागल रिसेप्शनवाल्या गृहस्थान सागितल, "हाऊसकीपरला फोन करा " हाऊसकीपरला फोन केला तेव्हा तिथल्या कर्मचाऱ्यान सागितले, "मेंटेनन्सला फोन करा " मेटेनन्सला फोन केला, तेव्हा तेथील माणूस म्हणाला, "तुमच्या खोलीतला एअर कडिशनिंग कट्रोलर नादुरुस्त आहे " मी म्हटल, "ते मला माहीत आहे. पण खोलीत येणारे गार वारे कसे कमी करायचे तो तुमचा प्रश्न आहे, माझा नव्हे " तो म्हणाला, "माणूस पाठवतो " पण अर्धा तास झाला तरी 'माणूस' आला नाही मी पुन. फोन केला आता रात्रीचे अकरा वाजत आले होते मी खोलीतले दोन्ही रग व दोन्ही चादरी अगावर घेऊनही कुडकुडत होतो मी मॅनेजरकडे तक्रार केली तो म्हणाला, "हाऊसकीपरला सागा " मी म्हटले, "ते सगळे करून झाले त्याचा उपयोग होत नाही " तो म्हणाला , "मी आता पाठवतो," माणूस आला नाही पुन. पुन्हा फोन केल्यावर साडेबाराला माणूस आला आणि म्हणाला, "कागद चिकटवून या फटी बद केल्या पाहिजेत." मी म्हटल, "अरे बाबारे, मी नुसता सल्ला विचारला नाही या कुणी बद केल्या पाहिजेत ? तुम्ही की मी ?" आणि रात्री एक वाजता उच शिडी घेऊन एकजण आला आणि त्याने एअर कडिशनिंगच्या फटींना कागद लावले.

हे एकच नव्हे तर अशा अनेक गैरसोयींनी हे हॉटेल भरले आहे एकदा मी ऑफिसच्या कामासाठी एका अमेरिकन प्राध्यापकाबरोबर हॉटेलमध्ये राहात होतो आम्ही जेवणासाठी डायनिंग हॉलमध्ये गेलो तिथे त्या प्राध्यापकाने दोन जिन्नस सागितले व इतरासाठी तो मेन्यू पहात असतानाच ऑर्डर घेण्याऱ्याने त्याच्या हातातून खस्‌कन मेन्यू ओढून घेतला आणि तो चालू लागला. मला

जेवायला काय हव याचीही त्यान चौकशी केली नाही भारतीय लोकांना तिथ तुच्छ मानल जात असा मी दोनतीनदा अनुभव घेतला अमेरिकन माणूस हॉटेल सोडून निघाला, तर त्याची बॅग एकजण उचलेल, दुसरी बॅग दुसरा नोकर उचलेल आणि नुसता कॅमेरा तिसरा नोकर उचलेल. ही तिन्ही टॅक्सीत ठेवून प्रत्येकजण पाच पाच रुपये टिपसाठी हात पसरेल हा माझा प्रत्येक वेळेचा अनुभव आहे पुन या हॉटेलवाल्याच नाव मोठ आणि जाहिरातबाजी मोठी.

अमेरिकेत मी लॉस एंजेल्स, शिकागो, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन अशा अनेक शहरी हॉटेल्समधून राहिलो आहे न्यूयॉर्कचे रॉयल मॅनहटन हे चाळीस मजली भव्य हॉटेल आहे पण मला अमेरिकेतील सर्वात आवडलेले हॉटेल ऑर्लॅंडो येथे आहे त्याचे नाव गोल्डन की हॉटेल. त्याचा विशेषच असा की ते भव्य नाही केवळ दोन मजली आहे लांब चौकोनी अशा त्या दुमजली इमारतीच्या मधोमध अतिशय सुदर असा पोहण्याचा तलाव आहे प्रत्येक खोलीच्या एका बाजूला हा तलाव दिसतो आणि दुसऱ्या बाजूला रमणीय असे निसर्गसौंदर्य दिसते प्रत्येक खोलीत व्हिस्की, जिन वगैरेच्या बाटल्या ठेवल्या आहेत. त्यातले हवे तेवढे तुम्ही घ्यायचे हॉटेल सोडताना त्या बाटल्यातले जेवढे मद्य सपले असेल तेवढ्याचाच आकार बिलात लावतात मग पुन· बाटलीवर खूण करून ठेवतात नंतरच्या गिऱ्हाईकाने किती मद्य घेतले किंवा अजिबात घेतले नाही, ते बाटलीवरच्या खुणावरून समजते तेथे प्रत्येक खोलीत रेफ्रिजरेटर, रंगीत टी व्ही , व्हिडिओ, टेलिफोन आहे सर्वांना समान अशा काही व्यवस्था आहेत त्यासाठी कॉमन रूम्स आहेत तेथे विजेची इस्त्री, शीतपेय, कॉफीचे यत्र, खाद्यपदार्थ वगैरे ठेवलेले असतात नाणी टाकून त्यापैकी हवे ते आपण घ्यायचे असते हॉलडमधील हॉटेलातून तर आणखी एक सोय मी पाहिली आहे ती म्हणजे खेळाची तेथे प्रशस्त हॉलमध्ये बिलियर्ड, डार्ट, बुद्धिबळे, चेकर्स अशा खेळाची हॉटेलतर्फे मोफत सोय असते टोकियोतील दाद इ ची व इतर अनेक हॉटेलाच्या लॉबीमध्ये इलेक्ट्रॉनिक्सचे खेळ ठेवलेले असतात त्यासाठी बटने दाबून लढाईचे किंवा फुटबॉल सामन्याचे खेळ खेळता येतात जगातील सर्वत्र मोठ्या हॉटेलमध्ये विविध वस्तूचे स्टॉल्स असतात त्यात विशेष करून त्या देशात तयार होणाऱ्या मालाची विक्री होते उदाहरणार्थ, भारतात रेशमी कापड, चदनाच्या व हस्तिदती वस्तू, ब्रॉंझच्या मूर्ती वगैरे पण हॉंगकॉंगमधील शेरेटेन हॉटेलमध्ये जेवढे भव्य व विविध स्टॉल्स आहेत, तेवढे मी जगात इतरत्र कोठेही पाहिले नाहीत त्या स्टॉल्सना भेटी द्यायला तर फिरत्या

जिन्यानेच जावे लागते पायी अनेक मजले उतरून जाणे अत्यत अवघड आहे

एकदा पुण्याहून मी कोल्हापूरला जाण्यासाठी निघालो पण कोल्हापुरची एस टी नव्हती म्हणून सागलीला जाऊन तिथून कोल्हापुरला जाण्याचा बेत केला पण सागलीला आमची एस टी पोहोचली तेव्हा रात्री अकरा वाजले होते व कोल्हापुरला जाणाऱ्या गाड्या बद झाल्या होत्या अर्थातच सागलीला राहावे लागले. हमालाने मला त्याच्या दृष्टीने उत्तम हॉटेलात नेले मी 'सेल्फ कटेंड' खोली मागितली ती मला देण्यात आली पण दुर्गंधी, डास आणि रस्त्यावरचे आवाज याचा मला इतका त्रास झाला की एक मिनिट मी झोपू शकलो नाही उग्र वास कमी करण्यासाठी मी माझ्याजवळचा सेंट खोलीत शिपडला आता सुगध व दुर्गंध असा समिश्र उग्र दर्प येऊ लागला सुगधाने मोहित होऊन की काय अधिकच डास आले दुसऱ्या दिवशी हॉटेल सोडताना मालकाला वस्तुस्थिती सागितली, तेव्हा तो निर्विकारपणे म्हणाला, ''पण बाकीचे पॅसेंजर ढाराढूर झोपतात की हो''

लडनला मी तसाही हॉटेलमध्ये राहिलो होतो हँपस्टेड हीथ या भागात ते होते. त्याची मालकीण एक वृद्ध ब्रिटिश बाई होती त्या बाईला आरशांचेच भयकर वेड होते तिथे प्रत्येक भितीवर चार चार, सहा सहा आरसे होते! खोलीत दरवाज्याला एक, प्रत्येक भिंतीवर एक एक, बाथरूममध्ये दोन असे आरसेच आरसे होते हे हॉटेल आहे, की आरशाचे दुकान आहे असा प्रश्न पडायचा कशाला त्या बाईने इतके आरसे लावले होते, कोण जाणे! मी रजिस्टरवर सही केल्याबरोबर तिने हॉटेलच्या नियमाची एक पुस्तिकाच मला दिली त्यात 'रात्री दहापूर्वी पॅसेंजरनी यावे सकाळी सहापूर्वी बाहेर जाऊ नये, खोलीत रेडिओ अगर इतर यत्राचे आवाज इतराना त्रास होण्याइतके मोठे नसावेत, असे अनेक नियम होते आणखी एक नियम होता तो असा 'No two persons of opposite sex, not married to each other should spend the night in one room or, should not spend long time with each other during the day' (ज्याचे एकमेकाबरोबर लग्न झाले नाही अशा स्त्रीपुरुषानी रात्री एका खोलीत झोपू नये किंवा दिवसा एकमेकाच्याबरोबर फार वेळ खोलीत राहू नये) यात मख्खी अशी होती, की त्या पुरुषाचे नुसते लग्न झालेले असता कामा नये, तर एकमेकाशी लग्न झाले असले पाहिजे साराश, एकाची बायको आणि दुसरीचा नवरा यांनी केवळ आमचे लग्न झाले आहे असे सागून तेथे एकत्र राहता येणार नाही!

इस्तबूलमध्ये मी सिरकेशी स्टेशनवर रेल्वेने उतरलो आणि 'ओटेली' करीत दहा बारा पोरानी मला गराडाच घातला त्याच्या हातात व्हिजिटिंग कार्डे होती त्याना काय म्हणायचे आहे, हेच प्रथम माझ्या लक्षात येईना मी काही विचारणार तोच त्यातल्या दोन पोरानी माझ्या हातातल्या बॅगा जवळ जवळ हिसकावूनच घेतल्या इस्तबूल हे तुर्कस्तानात आहे मला तिथे दोन दिवस रहायचे होते एस टी सुरू होण्यापूर्वी आपल्याकडे सर्व्हिस मोटारी होत्या तेव्हा आपण बस स्थानकावर गेल्यावर तीन चार सर्व्हिसचे एजट आपल्या हातातले सामान पळवून त्याच्याच मोटारीने प्रवास करावा असा आग्रह करीत, त्याची मला इस्तबूलमध्ये आठवण झाली मी एकाच्या हातातले कार्ड पाहिले, तेव्हा माझ्या लक्षात आले की, इस्तबूलच्या विविध हॉटेलाचे ते प्रतिनिधी होते ओटेली म्हणजे हॉटेल हे कळल्यावर मी आधी दर विचारले प्रत्येकाने आपण स्वस्तातली स्वस्त आणि जास्तीत जास्त चागली खोली देतो असे सागितले अखेर ज्याच्या हाती ससा तो पारधी या न्यायाने ज्याच्या हाती मोठी बॅग होती त्याला मी 'चलो' म्हटले पण दुसरी बॅग दुसऱ्याच्या हाती होती त्याच्याकडून मोठ्या मुष्किलीने ती घेऊन आम्ही स्टेशनजवळच्याच 'सिरकेशी ओटेली' मध्ये गेलो दर दिवसाला एक पौंड असा होता कुरुस हे तुर्कस्तानचे अधिकृत चलन पण डॉलर आणि पौंड याचा सहज स्वीकार होत असे सिरकेसी ओटेलीच्या व्यवस्थापकाने दोन दिवसाचे दोन पौंड घेतले आणि मला तेवीस नबरच्या खोलीकडे नेण्यास पोऱ्याला सागितले मी कुलुपाची चावी विचारली, तेव्हा त्याने मोडक्यातोडक्या इग्रजीत 'त्याची काही गरज नाही' असे सागितले

मी दुसऱ्या मजल्यावरच्या तेवीस नबरच्या खोलीकडे गेलो आणि मॅनेजरचे म्हणणे मला पटले चावीची गरज नव्हती कारण खोलीला कुलूप नव्हते कारण दाराला कडीकोयडाच नव्हता! नतर मॅनेजरला विचारले, तेव्हा त्याने सागितले, "अहो पॅसेंजर लोक कुलुपाची चावी हरवतात मग कुलूप फोडावे लागते म्हणून आम्ही कडीकोयडे आणि कुलुपे ही पद्धतच बद केली" मी मनात म्हटले, कपडे फाटतात म्हणून कपडे घालायची पद्धतही याने बद केली नाही, हे नशीबच! खोली म्हणजे साक्षात अधारकोठडीच होती सिरकेसी या शब्दाचा तुर्की भाषेतला अर्थ 'तुरुग' असा होता की काय कोण जाणे खोलीत सामान ठेवल्यावर मी पोऱ्याला दिवा लावण्यास सागितले तेव्हा तो म्हणाला, "दिवा लावलेलाच आहे" मी वर पाहिले, तर काजव्याच्या पाठीवर

असतो तेवढाच प्रकाश सिलिंगमधून येत होता झिरो पॉवरचा दिवा हा सर्वात कमी शक्तीचा अशी माझी समजूत होती पण इस्तबूलला हॉटेल मालकाने दीर्घ सशोधनानतर झिरोपेक्षाही कमी शक्तीचा दिवा शोधून काढला होता।

हॉटेलचे इतर वातावरणही बकाल आणि भीतीदायक होते. तुर्की लोक पठाणाच्यासारखेच उच धिप्पाड व दिसायला उग्र त्याचे कपडेही गबाळे आणि घाणेरडे ठग, लुटारू यांच्यासारखे ते लोक दिसतात मी स्वतत्र खोली घेतली होती, तर बाकीच्या खोल्यातून चार चार पाच पाच हुमदांडगे तुर्की दाटीवाटीने राहात होते. पैशासाठी हे लोक वाटेल ते करायला मागेपुढे पहाणार नाहीत असे त्याना पाहिल्यावर वाटत होते सबध हॉटेलमध्ये तेलाचे पदार्थ तळल्याचा उग्र दर्प पसरला होता विजेचा पखा हा आधुनिक शोध अद्यापपर्यंत त्या ओटेलीपर्यंत पोचला नव्हता. आता दोन दिवस या भयाण हॉटेलमध्ये आपले कसे होणार हा मला प्रश्नच पडला खोलीत सामान ठेवल्यावर तिथल्या जुनाट, मोडक्या खुर्चीवर बसून मी पोऱ्याला म्हटले, 'टी वन् कप टी' त्याने मला उलट विचारले, 'कावा कावा सर.' मला त्याचा कावा कळला नाही मी पुन्हा सागितले, 'नो कावा. टी' तो जाता जाता म्हणाला, 'कावी टी ब्रिंग ' थोड्या वेळाने एक चमत्कारिक यंत्र गळ्याला बाधलेल्या ट्रेवर घेऊन एक तुर्की इसम आला त्यात एक शेगडी होती शेगडीवर काचेचे गोल भाडे होते त्यात कसलातरी काळा द्रव उकळत होता आत आल्यावर त्या इसमाने मला विचारले, ''कावा'' मी सागितले, ''नो कावा टी.'' तो म्हणाला, ''हिअर टी इज कावा '' असे म्हणून त्याने माझ्या हाती काचेचा छोटा ग्लास दिला आणि त्यात तो काळा उकळता रस ओतला त्याला चहाचा वास आला म्हणून तो चहा असावा असे मी अनुमान काढले. पण त्याबरोबर दूध देण्याचे काही चिन्ह दिसेना. तेव्हा मी विचारले, ''मिल्क।'' त्याने सांगितले, ''नो मिल्क'' खुणेने त्याने सुचवले की कावा नामक चहा तसाच प्यायचा असतो मी तो द्रव पदार्थ चाखून पाहिला तर मला तो फारच कडवट वाटला म्हणून मी दुधाचा आग्रह धरला तो इसम खाली गेला आणि त्याने एका भाड्यातून दूध आणून ते माझ्या ग्लासात ओतले मी चहा घेतला तो कमी कडक होता. पण आता तो तुरट लागला मी खुणेने तसे सुचवले. गोड नाही म्हटले तेव्हा त्याने सागितले, ''ते उटाचे दूध आहे ते तसेच लागते.''

दिवसभर मी इस्तबूल शहर पाहिले आणि रात्री सिरकेसी ओटेलीतल्या अधारकोठडीत येऊन झोपलो दाराला कडी कुलूप नसल्याने सामान चोरीला

जाईल की काय ही भीती होती पण तसे काही झाले नव्हते तरीही मला झोप येईना हॉटेलमध्ये गुन्हेगार प्रवृत्तीचे निदान पन्नास साठ दाडगे तुर्की लोक आणि माझ्या खोलीला आतून कडी लावण्याची सोय नाही त्यातल्या त्यात खबरदारी म्हणून दाराला अडसर म्हणून माझ्या दोन बॅगा दाराला खेटून रचून ठेवल्या आणि देवावर हवाला टाकून झोपी गेलो दिवसभर शहर भटकल्यामुळे मी इतका दमून गेलो होतो की अथरुणावर पडल्याबरोबर मला झोप आली तो मी सकाळी दारावरच्या 'कावा, कावा,' या हाकेने जागा झालो पण आता मी तुर्की लोकाचा 'कावा' ओळखला होता पैसे देऊन कडक, तुरट चहा घेण्याची माझी तयारी नव्हती त्या भयकर हॉटेलात मी दोन दिवस कसे काढले तरी कोणताही अनुचित प्रकार सुदैवाने घडला नाही दोन दिवसानतर मी बगदादला रवाना झालो

बगदाद म्हटल्याबरोबर आपल्याला अरेबियन नाईट्स या अद्भुतरम्य पुस्तकाची आठवण होते ती अल्लाउद्दनचा जादूचा दिवा, ती अलिबाबा आणि त्याचे चाळीस चोर, प्रचड आकाराचे पक्षी, सिंदबादच्या सफरी अशा भव्य कल्पना मनाशी घेऊन मी बगदादमध्ये उतरलो पण त्या आधुनिक बगदादमध्ये माझी साफ निराशा केली त्याची अद्भुतरम्यता पार लयाला गेली होती आणि आता बगदाद हे सपूर्णपणे अमेरिकनाईझ्ड शहर झालं होत. अर्थात त्यातली हॉटेलंही अमेरिकेच्या धर्तीवरची होती हे ओघानच आल आणि महागडी होती कुठल्यातरी प्रिमरोझ नावाच्या हॉटेलमध्ये मी तिथे राहिलो दिवसाला सतरा डॉलर्स दर होता तो काही महाग नव्हता पण बगदादला एखाद्या जुन्या परपरच्या अल्लाउद्दन किवा सिदबाद हॉटेलमध्ये प्राचीन मुस्लिम सस्कृतीत राहता आलं असत तर ते मला अधिक आवडल असत काही काही लोक आणि वास्तू याच्याशी आपल्या ज्या कल्पना निगडित असतात, त्यालाच त्याना पहायला आपल्याला आवडत कृष्ण बासरी वाजवतो आहे आणि रासक्रिडा करणारी राधा जर टाईट स्वेटर आणि अमेरिकन जीन घालून नाचू लागली, तर आपल्याला ते विसगत वाटेल तीच गत बगदादसारख्या स्वप्नरजनात्मक शहरात अमेरिकन पद्धतीच्या हॉटेलमध्ये राहण्याची

अमेरिकेतील मायामी येथे मी प्रथमच गेलो तेव्हाची गोष्ट विमानतळावर उतरलो. कुठेही स्वस्तातलं स्वस्त हॉटेल म्हणजे वाय् एम् सी. ए 'यग मेन्स ख्रिश्चन असोशिएशन ' विमानतळावरच त्याचा पहिला पत्ता पाहिला. टॅक्सीवाल्याला तिथ न्यायला सागितल त्यान टॅक्सी चालू केली आणि तो

म्हणाला, "मागे मी तुम्हाला एकदा झूपर्यंत सोडल होत तुम्ही भारतातून हत्ती, सिह, वाघ वगैरे प्राणी आणून इथल्या प्राणिसग्रहालयाला विकता ना ?"

मी म्हटल, "छे! छे! तो मी नव्हेच मी आज प्रथमच मायामीला येतो आहे. आणि हत्ती-सिह-वाघ या बड्या असामींचा नि माझा अजिबात सबध नाही." टॅक्सीवाला म्हणाला, "पण तो भारतीय माणूस तुमच्यासारखाच दिसत होता मी दोन वर्षे मुबईला होतो. मागच्या युद्धाच्या वेळी तुम्ही वाय् एम् सी ए त कशाला राहाता ? मी तुम्हाला त्यापेक्षा स्वस्त आणि अधिक चागलं हॉटेल दाखवतो मी भारतात असताना तिथले लोक माझ्याशी इतके चागले वागले की, एखाद्या भारतीयासाठी काही करता आल तर मला आनद वाटेल." मी रुकार दिला. त्यान मला लॅमिंग्टन हॉटेलमध्ये नेलं तो स्वत. मॅनेजरपर्यंत आला आणि म्हणाला, "हे माझे भारतीय मित्र आहेत त्याना कन्सेशनने खोली द्या " आश्चर्य म्हणजे वाय् एम् सी. ए. मध्ये आठ डॉलर दर होता व या हॉटेलमध्ये बारा डॉलर होता पण त्या टॅक्सीवाल्याच्या ओळखीने मला फक्त सहा डॉलर्सला उत्तम खोली मिळाली. रंगीत टी व्ही, फोन, एअर कडिशनिंग वगैरे सर्व व्यवस्था असलेली. इतके करून त्या टॅक्सी ड्रायव्हरने माझ्याकडून टीपसुद्धा घेतली नाही या हॉटेलच नाव लॅमिंग्टन हॉटेल. त्याची मला अजून आठवण आहे, ती त्यातल्या टॉयलेटच्या चमत्कारिक व्यवस्थेची [illegible]

टॉयलेट होता त्याला अर्थात दोन दारे होती. एक आपल्या खोलीत आणि दुसरे शेजारच्या खोलीत आपण आत गेल्याबर दोन्ही दरवाजे आतून लावून घ्यायचे आणि परत येताना अगदी आठवणीने पलीकडच्या खोलीत जाणाऱ्या दरवाजाची कडी काढायची. ते करण्यास तुम्ही विसरलात तर पलीकडच्या खोलीत राहणाऱ्याला टॉयलेटचा वापर करता येणार नाही आणि तो इसम जर कडी काढण्यास विसरला, तर तुमचीही तीच गत होईल काटकसर म्हणूनही समान टॉयलेटची योजना ठीक असली तरी राहणाऱ्याच्या स्मरणशक्तीवरच हिचे यश अवलबून असते.

त्रिचूर हे केरळमधील अत्यत प्रसिद्ध गाव तेथे केरळची साहित्य, संगीत, नृत्य व नाट्य अॅकॅडमी आहे हे त्याचे एक कारण पण दुसरे अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे आद्य शंकराचार्यांनी आपल्या महान् धार्मिक कार्यास याच त्रिचूरमध्ये सुरुवात केली. त्याचे जन्मग्राम कालाडी हे इथून जवळच आहे. या त्रिचूरमध्ये मी चँडीज् होम नावाच्या लहानशा हॉटेलमध्ये राहिलो होतो

वास्तविक केरळमध्ये दारूबदी नाही पण मी ज्या हॉटेलमध्ये राहात होतो, तेथे मात्र, 'बियर व मद्य याना पूर्णपणे बदी' अशी पाटी होती अर्थात त्याची मला काहीच अडचण नव्हती कारण हे गाव आद्य शकराचार्यांचं असल तरी तिथे भरपूर परमिट रूम होत्या पण एकदा या बाबतीत अडचण झाली माझ्याकडे प्रा एन् के शेषन् हे मल्याळी साहित्यिक एकदा सध्याकाळी आले त्याच स्वागत करून मी म्हटल, "आपण काय घ्याल ? चहा, कॉफी ?" ते अगदी सहजपणे म्हणाले, "मी बियर घेईन" आता माझी पचाईत झाली. आपल्याकडे आलेल्या पाहुण्याला "बाहेर परमिट रूममध्ये जाऊ" म्हणण प्रशस्त नव्हत आणि त्या हॉटेलात तर मद्यपानाला बदी होती प्रा शेषन् हे स्थानिक असल्यान तेच हा प्रश्न सोडवतील म्हणून मी म्हटल, "मी आनदान दिली असती आणि तुमच्याबरोबर घेतलीही असती पण इथ बियरसुद्धा प्यायला बदी आहे" प्रा शेषन् म्हणाले, "मालकाला इथ बोलवून घ्या" मी घटी दाबली आणि पोऱ्याला सागितल की हॉटेलच्या मालकाला बोलावून घे चाळीस बेचाळीस वयाचा केरळी मालक आला मी काही बोलण्यापूर्वीच प्रा शेषन् याना पाहताच त्याने वाकून नमस्कार केला आणि विचारल, "काय साहेब, काय हुकूम आहे?" प्रा शेषन् म्हणाले, "दोन किंगफिशर पाठव" त्याने पुन: नमस्कार करून "होय साहेब, ही माझ्यातर्फे म्हणून घ्या" अस म्हणाला पाच मिनिटात मालकातर्फे दोन मोफत बियर, काजू वगैरे सामान आल तेव्हा मी विचारल, "हे कस काय झाल ?" त्यावर प्रा शेषन् म्हणाले, "कारण मी केरळचा अर्थमत्री होतो जनता राजवटीत" माजी का असेना, पण खुद्द अर्थमत्रीच हॉटेलमध्ये आल्यावर कोणता मालक त्याला बदीची सबब सागणार

वीस बावीस वर्षांपूर्वी मी आणि माझी पत्नी बंगलोरला गेलो होतो चिकमगळूर हे गाव लहानसेच असले तरी ते फार रमणीय आहे असे मी ऐकले होते परत येताना तेथे एखादा दिवस राहावे म्हणून आम्ही एस् टी ने तेथे गेलो चागल्यातल्या चागल्या हॉटेलची चौकशी केली तेव्हा खूप स्वस्ताई होती आणि आठ दहा रुपयापर्यंतही उत्तम दर्जाचे हॉटेल मिळत असे बारा आणे ते एक रुपयाला पहिल्या दर्जाचे जेवण मिळत असे बसस्टँडवरच्या हमालाने आम्हाला एका हॉटेलकडे नेले खोल्या अगदीच साधारण होत्या म्हणजे एका हॉलला लाकडी पार्टिशन्स घालून त्याच्या खोल्या केल्या होत्या तरीही आम्ही राहिलो असतो कारण एकच दिवस काढायचा होता. मॅनेजरशी आम्ही दराविषयी बोलत असतानाच त्या हॉटेलमध्ये राहणारा एक पॅसेंजर

बाहेरून चिकार दारू पिऊन आला. मॅनेजरचे व त्याचे प्रथम भांडण झाले मग यथास्थित मारामारीही झाली ते वातावरण पाहिल्यावर आम्ही येथे राहायचे नाही असे ठरविले इतकेच नव्हे, तर इथले सर्वांत चांगले हॉटेल जर हे असेल तर इतर हॉटेले पहाणेच नको म्हणून आम्ही चिकमगळूरचा मुक्काम रद्द करून पुन: एस् टी स्टँडकडे गेलो

भारताच्या निरनिराळ्या राज्यात असलेली महाराष्ट्र मंडळेही हॉटेलातच जमा होतात कलकत्ता व मद्रास येथील महाराष्ट्र मंडळात मी राहिलो आहे आणि लखनौसारख्या शहरातही महाराष्ट्र मंडळे मी पाहिली आहेत पण या सर्वांत कलकत्ता येथील हजारा रोडवरील महाराष्ट्र मंडळ सर्व दृष्टींनी उत्कृष्ट आहे प्रशस्त, स्वच्छ खोल्या, चहा, नाष्टा व जेवण याची आदर्श व्यवस्था आणि दर माणशी फक्त पंचवीस रुपये आहे, हे कलकत्याचे आदर्श महाराष्ट्र मंडळ आहे. जे मराठी लोक परदेशात गेले नाहीत, त्यांची तेथील महाराष्ट्र मंडळाविषयी चुकीची समजूत असते वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, लंडन वगैरे शहरातील महाराष्ट्र मंडळातही कलकत्त्यासारखी निवासाची सोय असेल अशी त्यांची कल्पना असते पण ती साफ चुकीची आहे. इंग्लंड, अमेरिकेतील महाराष्ट्र मंडळे या सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्था असतात त्यांच्या स्वत च्या इमारती किंवा राहण्याच्या जागा नसतात त्यांचे पत्ते म्हणजे मंडळाचे अध्यक्ष किंवा चिटणीस यांचे घरचे पत्ते असतात, व, हे पदाधिकारी बदलले की साहजिकच हे पत्तेही बदलतात अलिकडेच लंडन येथील महाराष्ट्र मंडळ स्वत ची इमारत घेण्याकरिता निधी जमवीत आहे पण तो अपवादच साराश, लंडन, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क वगैरे शहरी जाऊन तेथे महाराष्ट्र मंडळात रहाता येईल ही कल्पना परदेशी जाऊ इच्छिणाऱ्यानी सोडून द्यावी

[illegible]

आहे त्याला सेल म्हणतात. ही सेल्स शिबुया, टोकियो इत्यादी मोठ्या स्टेशनाजवळ किंवा विमानतळाजवळ असतात प्लॅस्टिक व रबरची ही सेल्स असतात रेल्वेच्या बर्थसारखी सहाफूट X साडेतीन फूट अशी झोपण्यापुरती जागा त्यात असते ज्यांची शेवटची गाडी चुकते किंवा ज्यांना पहाटे लवकर गाडी पकडायची आणि किंवा ज्याना तीस चाळीस मैलावरच्या गावी रात्री जाऊन पुन: सकाळी शहरात यायची दगदग नको असते अशा लोकांसाठी ही सेल्स् तयार करण्यात आली आहेत प्रत्येक रूममध्ये रेडिओ, टी. व्ही , नाईट ड्रेस, टूथब्रश, पेस्ट आणि रेझर व ब्लेड वगैरे दाढीचे सामान

असते अनपेक्षितपणे ज्याना मुक्काम करावा लागेल त्याना कोणतीही अडचण येऊ नये असा त्यात हेतू असतो इतकेच नव्हे, तर झोप आणण्याचे नवे जपानी यत्रही प्रत्येक सेलमध्ये ठेवलेले असते ज्याना पहाटे ठराविक वेळी उठायचे असते, त्याच्यासाठी गजराच्या घड्याळ्याचीही सोय असते अवेळी सुटणाऱ्या गाड्या किंवा विमान पकडण्यासाठी अखेरच्या क्षणी धावपळ करावी लागू नये म्हणून हजारो जपानी लोक आता या स्वस्त व उपयुक्त अशा सेल्सचा उपयोग करतात

हाँगकाँगमध्ये मी प्रथमच गेलो, तेव्हा या अवाढव्य, अपरिचित शहरात कोठे उतरायचे याची मला अजिबात कल्पना नव्हती कौलुन भागात खूप हॉटेले आहेत, एवढेच मी ऐकले होते विमानतळावर उतरल्याबरोबर मी टॅक्सी शोधू लागलो, तेव्हा आपल्याच विमानातील एक उचापुरा, रुबाबदार माणूस मला म्हणाला, "तुम्ही लेखक आहात काय ?" मी म्हटले, "होय पण तुम्ही ते कसे ओळखलेत." तो म्हणाला, "तुमचा पासपोर्ट पाहणाऱ्या अधिकाऱ्याने तसे विचारले मी तुमच्या मागेच होतो तुम्ही गावात येत असाल तर मी तुम्हाला सोडतो. मी स्वत पूर्वी लेखक होतो आता हाँगकाँगमध्ये व्यापार करीत आहे. मला लेखकाच्याविषयी खूप आदर आहे" तो सिंधी व्यापारी होता "कौलुनमध्ये रहाण्यासाठी जागा कोठे मिळेल ?" असे मी त्याला विचारले, तेव्हा तो म्हणाला, "मी तुम्हाला चुकिंग पॅलेसजवळ सोडतो. त्या इमारतीत पधरा वीस हॉटेले आहेत तिथ तुम्हाला जागा मिळेल"

त्यान ज्या इमारतीसमोर मला सोडल, ती 'चुकिंग पॅलेस' ही इमारत डोंगरासारखी उच आणि अवाढव्य होती मी दोन बॅगा घेऊन आत शिरलो तर इमारतीच्या नामफलकावर वीसपचवीस हॉटेलाची नाव होती 'नॅथेन हॉटेल' हे बाराव्या मजल्यावर होत. मी रांग लावून लिफ्टमध्ये शिरलो त्यात लिफ्टमन होता प्रत्येक उतारू आपल्याला जिथ उतरायच, त्या मजल्याचं बटन दाबत होता मी बाराव्या मजल्याच बटन शोधू लागलो, तर ते मला मिळेनाच ११ नतर एकदम १३ हा आकडा होता मी लिफ्टमध्ये एका चिनी माणसाला विचारल तेव्हा तो म्हणाला, "तुम्ही तेराव्या मजल्यावर उतरा आणि एक जिना खाली या हा लिफ्ट फक्त विषम मजल्यावरच जातो. शेजारचा लिफ्ट सम मजल्यावर थाबतो" मी तेराव्या मजल्यावर गेलो एक जिना सामानासह उतरलो पण नॅथेन हॉटेलमध्ये जागा नव्हती सर्व हाऊसफुल्ल होते. रिसेप्शनिस्टला विचारले, "दुसरे हॉटेल कुठे आहे" तो म्हणाला, "प्रत्येक

मजल्यावर हॉटेल आहे अकराव्या मजल्यावर पहा '' पुन. दोन जड बॅगा घेऊन एक जिना उतरलो कुठल्यातरी चिनी नावाचे हॉटेल होते हाँगकाँगमध्ये पचावन्न टक्के लोक चिनी आहेत, त्यामुळे ते साहजिकच होते ,एका वृद्ध चिनी गृहस्थाने दार उघडले पण त्याने मला दाखवलेली खोली इतकी लहान होती की एक पलंग आणि पाणी वगैरे ठेवायला आदी छोटे टेबल सोडले तर आजूबाजूला फक्त एक फूट जागा होती पलंगावर झोपले तर आपल्याला या चार भिंतीत चिरडून मारले जाईल की काय अशी भीती वाटावी अशी परिस्थिती होती दर बारा डॉलर्स म्हणजे स्वस्त होता. पण श्वासोच्छवास करणेही कठिण अशा त्या खोलीत चार दिवस राहणे अतिशय कठिण होते मी पुन खालच्या मजल्यावर आलो तिथे फक्त पधरा डॉलर्सला त्यातल्या त्यात बरी खोली मिळाली तेही चिनी हॉटेल होते तिथे स्नानगृह व टॉयलेट-ही कॉमन होती चहासुद्धा मिळत नसे पण स्वस्ताईच्या हॉटेलात सर्व सोयींची अपेक्षा करणे व्यर्थ होते सुदैवाने तळमजल्यावर शहा नावाच्या गुजराथ्याचे चहा फराळाचे उपहारगृह होते, त्यामुळे कोणतीच गैरसोय होणार नव्हती हाँगकॉग म्हणजे खरेदी करणाऱ्यांचा स्वर्गच आहे. मी ज्या प्रचड चुकिंग हाऊसमध्ये राहात होतो, त्याच्या तळमजल्यावर हाँगकाँगमधील सर्वात मोठा बाजार आहे अत्यत स्वस्त अशा परकीय बनावटीच्या वस्तू इथे मिळतात पण बाजार हा आपला आजचा विषय नसून हॉटेल हा असल्याने जगाच्या विविध भागातील हॉटेलाची ही धावती सफर इथेच थाबवतो

# ७ / राणीचा बाग

मी प्रथम मुबईत आलो त्याला आता पन्नास वर्षे झाली. त्यावेळी मुबईत पाहण्यासारखी दोन स्थळे मशहूर होती एक राणीचा बाग आणि दुसरे दर्या म्हणजे समुद्र मी कोल्हापुरहून आलो होतो त्यामुळे समुद्र ही एक नवलाईच होती. समुद्रापासून लाब राहणाऱ्या कोट्यावधी लोकाना अथाग लाटा व क्षितिजापर्यंत पसरलेल्या या भव्य जलाशयाचे फार कौतुक वाटते तसेच राणीच्या बागेबद्दलही कौतुक होते. गिरगावच्या एका नातेवाईकाकडे तेव्हा मी राहात होतो जवळच राहणाऱ्या दोन समवयस्क मुलाना घेऊन तेव्हा राणीचा बाग मी मोठ्या उत्सुकतेने पाहिला होता आजच्यापेक्षा या प्राणिसग्रहालयाची अवस्था त्यावेळी कितीतरी चागली होती. वाघ, सिंह, हत्ती, उट, हस, अस्वल, माकडे, ससे असे कितीतरी प्रकारचे पशू आणि पक्षी मी पाहिले त्यानतर देशात व परदेशात मी निदान शंभर तरी प्राणिसंग्रहालये पाहिली असतील. पण राणीच्या बागेने माझ्या बालमनावर पाडलेला प्रभाव अजून ताजा आहे. १९५५-५६ साली मी लडनला वृत्तपत्र व्यवसायाच्या शिक्षणासाठी होतो, तेव्हा तेथील जगप्रसिद्ध प्राणिसग्रहालय अनेकदा मी पाहिले आहे न्यूयॉर्क, सॅनफ्रान्सिस्को, वॉशिग्टन, पॅरीस, टोकियो, फ्रँकफर्ट, लॉसएन्जेलिस अशा परदेशातील इतर शहरातली प्राणिसग्रहालये मी पाहिली आहेत तशीच आपल्या देशात कलकत्ता, लखनौ, मद्रास, हैद्राबाद, जयपूर, पुणे अशा शहरातील प्राणिसग्रहालयेही पाहिली आहेत आपल्या 'प्राणिसग्रहालय' या लाबलचक अवघड शब्दापेक्षा 'झू' हा इग्रजी शब्द अगदी सुटसुटीत व सोपा वाटतो, हेही इथे जाता जाता नमूद करावेसे वाटते मियामी, लॉसएजेलिस, सॅनफ्रान्सिस्को अशा शहरी प्रचड मत्स्यालयेही आहेत तेथे केवळ विविध प्रकारचे मासे पहायलाच मिळतात असे नव्हे तर त्याचे अत्यत रोमहर्षक खेळही पहायला मिळतात त्यासाठी मासे व इतर जलचर यांना प्रदीर्घ शिक्षण देण्यात येते लडनच्या झूमध्ये रोज

दुपारी चार वाजता माकडाची टी पार्टी असते त्यावेळी आठ-दहा माकडे चहा, बिस्किटे वगैरे पाहुण्याना देतात व स्वत ही त्याचा आस्वाद घेतात प्राणिसग्रहालय पहायला आलेली मुलेही त्या माकडाचे पाहुणे असतात मुले व माकडे याचे सयुक्त चहापानाचे ते दृश्य अत्यत मनोरम दिसते

लॉस एजेलिस येथे तर खुले प्राणिसग्रहालय आहे 'लायन कट्री' हे त्याचे नाव आहे इतर प्राणिसग्रहालयात प्राणी व पक्षी बदिस्त असतात आणि त्याना पाहायला आलेली माणसे मुक्त असतात इथे उलट प्रकार आहे एका विस्तीर्ण जगलात प्राणी मोकळे सोडलेले असतात आणि प्रेक्षक मात्र मोटारीत बदिस्त असतात मोटारीच्या काचातून आपण मुक्त भटकणारे प्राणी पहायचे कधी कधी सिह आपल्या मोटारच्या बॉनेटवर चढून बसतात पण लायन कट्रीच्या खास मोटारीत असलेले रक्षक आपल्याला दिलासा देतात मद गतीने चालणाऱ्या मोटारीच्या बॉनेटवरून थोडा वेळ प्रवास केल्यावर हे सिह मोटारीवरून उड्या मारून पसार होतात पूर्वी मुबईच्या ट्रॅमच्या पायरीवर उभे राहून कंडक्टर येण्यापूर्वीच दोन तीन स्टॉपचा चोरटा प्रवास पदरात पाडून गर्दीत नाहीसे होणाऱ्या लोकाची त्यावेळी मला आठवण झाली लायन कट्रीवर काढलेले एक गमतीचे व्यगचित्र मी 'पच' मध्ये एकदा पाहिले सिंहाचा छावा एका झाडाखाली आपल्या आईबरोबर बसला आहे. त्याच्याकडून प्रेक्षकाची बद मोटार जाताना तो छावा म्हणतो, 'आई, या माणसाना गुन्हेगारासारख अस पिंजऱ्यात बद करण म्हणजे क्रौर्याची कमाल आहे की नाही?'

अमेरिकेतील मियामी येथील 'सी अक्वेरियम' ही एक अद्‌भुत मयसभा आहे जगातील सर्वात मोठे आणि सर्वात चमत्कृतिजन्य असे हे मत्स्यालय आहे या अवाढव्य जागेत देवमासा, सील, शार्क, क्लिपर, प्रचंड कासवे, जलचर केवळ पहायलाच मिळत नाहीत तर त्याचे अतिशय चित्तवेधक असे सर्कशीचे खेळही पहायला मिळतात पाण्याच्या पातळीवर पधरा फूट उच एक घंटा बाधलेली असते देवमाशाला त्याच्या ट्रेनरने खूण करताच तो उंच उडी मारून ती घटा वाजवतो देवमासा खाली कोसळतो तेव्हा पाणी इतके उच उडते की ते काचेच्या भिंतीबाहेर पडून प्रेक्षकाच्या पहिल्या दहा-बारा रागा भिजून जातात माशाने फेकलेल्या या पाण्याची प्रेक्षकाना खूप गमत वाटते सील प्राणी अतिशय अवघड असे सर्कशीचे खेळ करून दाखवितात. उदाहरणार्थ, एक सील डोकीवर पाण्याने भरलेला ग्लास घेऊन जिना चढून दाखवतो क्लिपर मासे व सील याचा क्रिकेटचा खेळही होतो एक माणूस

प्रचड देवमाशाच्या पाठीवर झोपून आरामात 'नौकाविहार' करतो सर्कशीत सिंह जसा जळत्या कड्यातून उडी टाकतो, तसे डॉल्फिन मासे उच धरलेल्या कड्यातून अचूक उड्या मारतात डॉल्फिन हा सर्व माशात बुद्धिमान मासा असतो हा डॉल्फिन पियानो वाजवून दाखवतो शार्क हा अत्यत क्रूर मासा येथे आहे तो लहान मासे आपल्या असख्य दाताच्या करवतीत कापून कसे खातो याचे प्रात्यक्षिकही मियामीच्या सी अक्वेरियममध्ये दाखविण्यात येते जवळ जवळ तीन तास या ठिकाणी जलचरांचे खेळ होतात

अमेरिकेतील ' सॅन डिअगो वाईल्ड ॲनिमल पार्क हा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण प्राणिसंग्रह अठराशे एकर पसरलेला हा झू जगातील एक महत्त्वाचा अद्‌भुत झू आहे कारण तो पाहण्यासाठी उचावरून जाणारी मोनोरेल किंवा एकचाकी आगगाडी आहे. ही आगगाडी निरनिराळ्या प्राण्याच्यावर थाबते खाली रानात मोकळे सोडलेले सिह, हत्ती, वाघ, जिराफ, चित्ते वगैरे प्राणी मुक्त संचार करीत असतात आणि दहा फूट अतरावरून प्रेक्षक त्याच्याकडे निवात पाहू शकतात

जगातील अनेक प्राणिसग्रहालये व पक्षी-अभयारण्ये पाहून मला या जगाविषयी विलक्षण कुतुहल वाटू लागले मग मी त्या शास्त्राचा थोडाफार अभ्यास करू लागलो, तेव्हा हे जग मला अधिकाधिक आकर्षक वाटू लागले प्राण्याच्या जगात किती जाती किंवा प्रकार असावेत? तर पृथ्वीच्या पाठीवर व हवेत मिळून एकंदर दहा लाखावरील प्रकारचे प्राणी आहेत. पशू, पक्षी व कीटक हे सर्वांना दिसणारे व समजणारे प्रकार त्यात जलचर हा आणखी एक भेद, पण या शास्त्रात जगातील सर्व प्राण्यांचे दोन मुख्य प्रकार करण्यात आले आहेत. ते म्हणजे ज्याना कणा आहे असे प्राणी व ज्याना कणा नाही असे प्राणी. कणा असणाऱ्या प्राण्यात माणूस, माकड, सिह, हत्ती, वाघ वगैरे येतात कणा नसलेल्यात कीटक, किडे, फुलपाखरे इत्यादींचा समावेश असतो दहा लाख प्रकारच्या प्राण्यापैकी कणा असलेले फक्त चाळीस हजार प्रकारचे प्राणी आहेत बाकीची प्रचड सख्या कणा नसलेल्याची आहे. किड्याचेच तीन लाख प्रकार आहेत, सरपटणारे प्राणी म्हणून जी जात ओळखली जाते, त्यात नाग, साप, सरडे इत्यादींचा समावेश होतो. बेडूक, सुसर, कासव असे काही प्राणी पाण्यात व जमिनीवर राहू शकतात उलट मासे फक्त पाण्यातच जगू शकतात हत्ती एवढा प्रचड प्राणी, पण तो मासाहार करीत नाही. तो फक्त शाकाहारी असतो. पण बेडकासारखा छोटा प्राणी कृमी-कीटक गट्ट करून

जगतो. काही प्राणी असे चमत्कारिक असतात की त्याना प्राणी म्हणावे की वनस्पती म्हणावे असा सभ्रम पडतो कारण या वनस्पती स्वतत्र हालचाल करतात आफ्रिकेच्या जगलातील काही 'हिंस्र' झाडे जवळून जाणाऱ्या प्राण्याना पकडतातही समुद्रात खोलवर स्पजसारखे काही जलचर असतात त्याचे नावही स्पज आहे त्यात जीव आहे असे त्याना निश्चल अवस्थेत पाहिल्यावर खरेच वाटत नाही. पण त्याची स्वतत्र हालचाल सुरू झाली की, मगच त्यात प्राण आहे असे जाणवते फुलपाखरे किती सुदर, रगीबेरगी व मोहक दिसतात त्याच्या दोन हजारावर जाती आहेत! निसर्गाने प्राण्याच्या रक्षणासाठी केलेली स्वय-व्यवस्था पाहून मन थक्क होते. कारण बहुतेक प्राण्याचे रग असे असतात की, त्याच्या नैसर्गिक वातावरणात ते मिसळून जावेत व शत्रूला त्याचे अस्तित्व लक्षात येऊ नये. कोल्हा, तरस, हरण याचे रंग त्याच्या नैसर्गिक पार्श्वभूमीशी मिळते-जुळते असतात चमत्कार असा की, एकच प्राणी निरनिराळ्या विभागात वेगळ्या रगाचा असतो जैसलमेरच्या वाळवटातील विंचू वाळूच्याच रगाचे पिवळे असतात, तर महाराष्ट्रात त्याना सहज खपावा असा काळसर रग मिळतो

पक्ष्याचे रग तरी किती मनोहर असतात! त्याचा राजा म्हणजे मोर देवाने त्याची निर्मिती करताना आपल्याकडचे सर्व रग त्याच्यावर प्रसन्न होऊन त्याच्या पिसावर व मानेवर उधळून टाकले आहेत किंगफिशर, ताबट, पोपट, ठिपक्याचे कबुतर, हरितालक, ससाणा, फ्लेमिंगो, गायबगळा या पक्ष्याचे रग पाहून डोळ्याचे पारणे फिटते त्यापैकी फारच थोडे पक्षी प्राणिसंग्रहालयात पहावयास मिळतात कारण किती पक्षी ठेवता येतील यावर साहजिकच जागेची व पालनपोषणाच्या खर्चाची मर्यादा पडते. प्राणिसग्रहालयाचा मुख्य उपयोग सर्वसामान्य लोकाच्या दृष्टीने प्राणी मनसोक्त पाहण्याचा आनद लुटणे हा आहे. पण प्राणिशास्त्राचा अभ्यास, प्राण्याची निपज इत्यादी इतर कारणासाठीही ही सग्रहालये अत्यत उपयुक्त असतात ज्यांना एनडेन्जरड स्पेसीज असे म्हणतात, त्या नष्ट होत जाणाऱ्या प्राण्याना येथे ठेवून त्याची निगा करावी व एक जात वाचवावी या हेतूनेही काही प्राणिसग्रहालये प्रयत्नशील असतात बहुतेक प्राणिसग्रहालये ही मोठ्या उद्यानात असतात त्यामुळे वनस्पतीशास्त्राचा अभ्यास, नवीन रोपे तयार करणे, इत्यादी अनुषगिक कामेही या केंद्रात होतात मुबई येथील राणीच्या बागेतही कलमे, बी-बियाणे व रोपे देण्याचे केंद्र आहे. कलकत्ता येथील प्राणिसग्रहालय विशाल अशा बोटॅनिकल गार्डनमध्ये आहे. मी अनेक देशात जी प्राणिसग्रहालये पाहिली, त्यात टोकियो येथील प्राणिसग्रहालय सर्वात

सुदर व सर्वात स्वच्छ आहे अनेक प्राणिसग्रहालयाच्या कचेरीतर्फे प्राणी व वनस्पती याविषयीची पुस्तके व नियतकालिके प्रसिद्ध होतात ते त्याचे फार मोठे ज्ञानवर्धक कार्य आहे

भारतातील प्राणिसग्रहालयांची प्राथमिक तयारी 'ॲग्रो हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इडिया' या सस्थेच्या स्थापनेने १८३० साली झाली मुबईत १८३५ साली शिवडी येथे हे फळे-फुले व बागायतीचे उद्यान सुरू झाले १८४२ साली त्या काळच्या आधुनिक कल्पनाप्रमाणे उद्यानाची पुर्नरचना करण्यात आली. १८५८ साली राणी व्हिक्टोरिया याच्याकडे भारताचा कारभार सोपविण्याच्या समारभाच्या निमित्ताने जनता व सरकार यानी एक मोठा निधी उभारला त्यातून व्हिक्टोरिया अलबर्ट म्युझियम सुरू करण्याचे ठरले. त्यासाठी सध्याच्या राणीच्या बागेची जागा राखून ठेवण्यात आली. मात्र नतर हे म्युझियम फोर्ट विभागात उभारण्याचे ठरले व उद्यान आणि प्राणिसग्रहालय सध्याच्या जागेतच राहावे असा निर्णय घेण्यात आला हा विभाग माऊंट इस्टेट या नावाने ओळखला जात असे मध्य रेल्वेच्या भायखळा व करीरोड या स्टेशनाच्या दरम्यान डॉ. आबेडकर रस्त्यावर ही राणीच्या बागेची जागा आहे. मद्रास येथे भारतातील पहिले प्राणिसग्रहालय उघडले गेले त्यानतर थोड्याच दिवसानी ९ नोव्हेंबर १८६२ साली मुबईच्या राज्यपालाच्या पत्नी लेडी फ्रिया याच्या हस्ते व्हिक्टोरिया गार्डन्स व प्राणिसग्रहालय याचे उद्घाटन झाले १८६३ साली या उद्यानात प्राणिसग्रहालय सुरू करण्यात आले १८६३ साली हे उद्यान व प्राणिसग्रहालय याची जबाबदारी मुबई महापालिकेकडे सोपविण्यात आली आता या उद्यानाचे नाव 'वीरमाता जिजामाता उद्यान' असे ठेवण्यात आले आहे पण बहुतेक लोक अद्यापही 'राणीचा बाग' या जुन्या व सुटसुटीत नावाचाच वापर करतात

राणीच्या बागेचे क्षेत्रफळ ४८ एकर आहे, पण प्राण्याच्यासाठी त्यापैकी अकरा एकर जागा उपलब्ध आहे सुमारे चाळीस प्रकारचे प्राणी, साठ जातींचे पक्षी व दहा प्रकारचे सरपटणारे प्राणी सध्या या उद्यानात आहेत प्राण्यात १५ सिंह, ४ हत्ती, ४ वाघ, २ उंट, ३ देशी व २ हिमालयीन अस्वले, ३ बिबळे, ३ तरस, ४६ हरणे, ३५ साबर, ५ काकर (हरणाच्या जातीचा, लहान आकाराचा भुकणारा प्राणी) ९ नीलगाई, ६ सिंह माकडे, २० आसामी माकडे, ४ पाणघोडे, १ गेंडा, ६ कोल्हे, २ ऊद-माजरे, २ उट, ८ श्वेत काळवीट, १ साळ इत्यादी प्रामुख्याने येथे दिसतात सरपटणाऱ्या प्राण्यात

जगतो काही प्राणी असे चमत्कारिक असतात की त्याना प्राणी म्हणावे की वनस्पती म्हणावे असा सभ्रम पडतो कारण या वनस्पती स्वतत्र हालचाल करतात आफ्रिकेच्या जगलातील काही 'हिंस्त्र' झाडे जवळून जाणाऱ्या प्राण्याना पकडतातही समुद्रात खोलवर स्पजसारखे काही जलचर असतात त्याचे नावही स्पज आहे त्यात जीव आहे असे त्याना निश्चल अवस्थेत पाहिल्यावर खरेच वाटत नाही पण त्याची स्वतत्र हालचाल सुरू झाली की, मगच त्यात प्राण आहे असे जाणवते फुलपाखरे किती सुदर, रगीबेरगी व मोहक दिसतात त्याच्या दोन हजारावर जाती आहेत! निसर्गाने प्राण्याच्या रक्षणासाठी केलेली स्वय-व्यवस्था पाहून मन थक्क होते कारण बहुतेक प्राण्याचे रग असे असतात की, त्याच्या नैसर्गिक वातावरणात ते मिसळून जावेत व शत्रूला त्याचे अस्तित्व लक्षात येऊ नये. कोल्हा, तरस, हरण याचे रग त्याच्या नैसर्गिक पार्श्वभूमीशी मिळते-जुळते असतात चमत्कार असा की, एकच प्राणी निरनिराळ्या विभागात वेगळ्या रगाचा असतो जैसलमेरच्या वाळवटातील विंचू वाळूच्याच रंगाचे पिवळे असतात, तर महाराष्ट्रात त्याना सहज खपावा असा काळसर रग मिळतो.

पक्ष्याचे रग तरी किती मनोहर असतात! त्याचा राजा म्हणजे मोर. देवाने त्याची निर्मिती करताना आपल्याकडचे सर्व रग त्याच्यावर प्रसन्न होऊन त्याच्या पिसावर व मानेवर उधळून टाकले आहेत किंगफिशर, ताबट, पोपट, ठिपक्याचे कबुतर, हरितालक, ससाणा, फ्लेमिंगो, गायबगळा या पक्ष्याचे रग पाहून डोळ्याचे पारणे फिटते त्यापैकी फारच थोडे पक्षी प्राणिसग्रहालयात पहावयास मिळतात कारण किती पक्षी ठेवता येतील यावर साहजिकच जागेची व पालनपोषणाच्या खर्चाची मर्यादा पडते प्राणिसग्रहालयाचा मुख्य उपयोग सर्वसामान्य लोकाच्या दृष्टीने प्राणी मनसोक्त पाहण्याचा आनद लुटणे हा आहे पण प्राणिशास्त्राचा अभ्यास, प्राण्याची निपज इत्यादी इतर कारणासाठीही ही सग्रहालये अत्यत उपयुक्त असतात ज्याना एनडेन्जरड स्पेसीज असे म्हणतात, त्या नष्ट होत जाणाऱ्या प्राण्याना येथे ठेवून त्याची निगा करावी व एक जात वाचवावी या हेतूनेही काही प्राणिसग्रहालये प्रयत्नशील असतात बहुतेक प्राणिसग्रहालये ही मोठ्या उद्यानात असतात त्यामुळे वनस्पतीशास्त्राचा अभ्यास, नवीन रोपे तयार करणे, इत्यादी अनुषगिक कामेही या केंद्रात होतात. मुबई येथील राणीच्या बागेतही कलमे, बी-बियाणे व रोपे देण्याचे केंद्र आहे कलकत्ता येथील प्राणिसग्रहालय विशाल अशा बोटॅनिकल गार्डनमध्ये आहे. मी अनेक देशात जी प्राणिसग्रहालये पाहिली, त्यात टोकियो येथील प्राणिसग्रहालय सर्वात

सुदर व सर्वात स्वच्छ आहे अनेक प्राणिसग्रहालयाच्या कचेरीतर्फे प्राणी व वनस्पती याविषयीची पुस्तके व नियतकालिके प्रसिद्ध होतात ते त्याचे फार मोठे ज्ञानवर्धक कार्य आहे

भारतातील प्राणिसग्रहालयाची प्राथमिक तयारी 'ॲग्रो हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इडिया' या सस्थेच्या स्थापनेने १८३० साली झाली मुंबईत १८३५ साली शिवडी येथे हे फळे-फुले व बागायतीचे उद्यान सुरू झाले १८४२ साली त्या काळच्या आधुनिक कल्पनाप्रमाणे उद्यानाची पुर्नरचना करण्यात आली. १८५८ साली राणी व्हिक्टोरिया याच्याकडे भारताचा कारभार सोपविण्याच्या समारभाच्या निमित्ताने जनता व सरकार यानी एक मोठा निधी उभारला त्यातून व्हिक्टोरिया अलबर्ट म्युझियम सुरू करण्याचे ठरले त्यासाठी सध्याच्या राणीच्या बागेची जागा राखून ठेवण्यात आली मात्र नतर हे म्युझियम फोर्ट विभागात उभारण्याचे ठरले व उद्यान आणि प्राणिसग्रहालय सध्याच्या जागेतच राहावे असा निर्णय घेण्यात आला हा विभाग माऊंट इस्टेट या नावाने ओळखला जात असे मध्य रेल्वेच्या भायखळा व करीरोड या स्टेशनाच्या दरम्यान डॉ आंबेडकर रस्त्यावर ही राणीच्या बागेची जागा आहे मद्रास येथे भारतातील पहिले प्राणिसग्रहालय उघडले गेले त्यानतर थोड्याच दिवसानी ९ नोव्हेंबर १८६२ साली मुबईच्या राज्यपालाच्या पत्नी लेडी फ्रिया याच्या हस्ते व्हिक्टोरिया गार्डन्स व प्राणिसग्रहालय याचे उद्‌घाटन झाले १८६३ साली या उद्यानात प्राणिसग्रहालय सुरू करण्यात आले १८६३ साली हे उद्यान व प्राणिसग्रहालय याची जबाबदारी मुबई महापालिकेकडे सोपविण्यात आली आता या उद्यानाचे नाव 'वीरमाता जिजामाता उद्यान' असे ठेवण्यात आले आहे पण बहुतेक लोक अद्यापही 'राणीचा बाग' या जुन्या व सुटसुटीत नावाचाच वापर करतात

राणीच्या बागेचे क्षेत्रफळ ४८ एकर आहे, पण प्राण्याच्यासाठी त्यापैकी अकरा एकर जागा उपलब्ध आहे सुमारे चाळीस प्रकारचे प्राणी, साठ जातींचे पक्षी व दहा प्रकारचे सरपटणारे प्राणी सध्या या उद्यानात आहेत प्राण्यात १५ सिह, ४ हत्ती, ४ वाघ, २ उट, ३ देशी व २ हिमालयीन अस्वले, ३ बिबळे, ३ तरस, ४६ हरणे, ३५ साबर, ५ काकर (हरणाच्या जातीचा, लहान आकाराचा भुकणारा प्राणी) ९ नीलगाई, ६ सिह माकडे, २० आसामी माकडे, ४ पाणघोडे, १ गेंडा, ६ कोल्हे, २ ऊद-माजरे, २ उट, ८ श्वेत काळवीट, १ साळ इत्यादी प्रामुख्याने येथे दिसतात. सरपटणाऱ्या प्राण्यात

१७ मगरी, १२ नाग, १२ धामण, १४ रेती अजगर, १ मोठा अजगर, २५० पाण्यातले साप, २० कासवे वगैरे आहेत पक्षी विभागात ३ मोर, १ मकॉव ऊर्फ काकाकुवा, २५ पोपट, तुऱ्याचा करकोचा, १२ रिंग डोव्ह, २ फिजट (कवडे), ३ रेड टर्टल डोव्ह, ९८ कबुतरे, २५ परकीट, १० कॉकटेल, ११ लव्हबर्डस, ३ मैना, ४ कोकीळ, १९ पेंटेड स्टॉर्क, १८ हस, ३ ब्लॅक स्वान, ९ बार हेडेड गज, ३ करकोचे (पाँड हेरॉना), ९ व्हाईट थ्रोटेड मुनिया, ३ स्पॉटेड मुनिया, १ गिधाड, ६ बदके, वगैरे पक्षी या उद्यानात पाहता येतील.

प्राणिसग्रहालयाच्या विस्तीर्ण जागेत शिरल्यावर दिसेल त्या रस्त्याने जाण्याची बहुतेकाना, विशेषत मुलाना सवय असते त्यातल्या त्यात ज्या पिंजऱ्यापुढे किंवा विभागापुढे गर्दी असेल तिकडे लोक आकर्षित होतात पण असे केल्याने त्याना प्राणिसग्रहालयातील सर्व प्राणी पाहता येत नाहीत व काही महत्त्वाचे प्राणी व पक्षी पहावयाचे राहून जातात म्हणून पद्धतशीरपणे व क्रमाक्रमाने, निवातपणे प्राणिसग्रहालय पहावे, म्हणजे इतक्या लाब येण्याचे श्रम घेतल्याचे सार्थक होईल प्रेक्षकाची निराशा होणार नाही जे प्राणी आपण पाहतो त्याचा इतिहास, सवयी, वैशिष्ट्ये व पार्श्वभूमी याची माहिती असेल तर ही भेट अधिकच सफ़ल होईल म्हणून राणीच्या बागेत मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यावर प्रथम डावीकडे वळा. पहिलाच विभाग सिंहाचा आढळेल तिथे तुम्हाला अमर नावाचा भव्य व रुबाबदार सिंह दिसेल या उद्यानात एकदर १५ सिहापैकी २ बच्चे आहेत

सिह, वाघ, चित्ते, बिबळे इत्यादी प्राणी भाजराच्या जातीचे असून इग्रजीत 'बिग कॅटस्' म्हणून या गटाचा उल्लेख करण्यात येतो. आपण माजराला 'वाघाची मावशी' म्हणतोच हे प्राणी हिंस्र व मासाहारी असतात सिंह व वाघ हे या गटातील सर्वात महत्त्वाचे व प्रसिद्ध प्राणी आहेत या गटातील प्राण्यात फक्त सिहच कळप करून राहतात इतर प्राणी सुटे सुटे फिरतात दोन-तीन वाघ मात्र एकत्र आढळतात पण सिहाचे दहापासून चाळीस पन्नासाचे कळप असतात, तसे वाघाचे नसतात, तसेच बिबळ्या वगैरे तर एकएकटेच राहतात सिहाचे दात व पजे बळकट असतात तो इतका शक्तिमान असतो की गाडीला बाधलेल्या बैलावर झडप घालून त्याचे वेसण तोडून तो प्रचड बैलाला जगलात ओढत नेऊन मारतो व आपल्या कुटुंबाला बैल खायला घालतो सिंहाची शक्ती आणि रुबाब यामुळे त्याला 'जगलचा राजा' म्हणतात.

सिंह हा युरोप, आफ्रिका, आशिया या भागात निर्माण झाला इराक

व इराणमध्येही सिह होता, पण आता तो या भागातून नष्ट झाला आहे सिहाची नाकापासून शेपटीपर्यंत लाबी सर्वसाधारण ९ फूट ६ इचापर्यंत असते व उची तीन फूट असते त्याचे वजन ३५० ते ४०० पौंड असते त्याचे पाय शरीराच्या मानाने आखूड असतात नराला आयाळ असते, सिंहाची चाल डौलदार असते सुदर स्त्रियाच्या देखण्या चालीला सिंहाच्या चालीची व सिंहकटीची उपमा देतात नवजात सिंहाच्या बच्चाच्या अगावर काळसर डाग असतात, पण पुढे ते नाहीसे होतात जन्मत सिंहाचे छावे अध असतात, एक आठवड्याने त्याचे डोळे उघडतात सिंहाचे आयुर्मान २५ ते ३० वर्षांचे असते. सिंहाची गर्जना प्रसिद्ध आहे. सिंह रात्रीची शिकार करतो व दिवसा झोपतो सिंह सावजाजवळ चोर पावलानी येतो आणि भक्ष्यावर एकदम झडप घालतो भूक लागल्याशिवाय सिंह कोणावर हल्ला करीत नाही.

सिहाइतकाच ज्याचा दबदबा आहे, असा भव्य, जड व रुबाबदार दुसरा प्राणी म्हणजे वाघ राणीच्या बागेत चार वाघाची खास बडदास्त ठेवण्यात आली आहे त्याना पिंजऱ्यात कोंडून घातलेले नाही. नैसर्गिक वातावरणात हे चार वाघ राहावे म्हणून झाडे, खडक, वेली, पाणी असे नैसर्गिक वातावरण तयार करण्यात आले आहे तेथे त्याना मुक्तविहारासाठी सोडण्यात येते या उद्यानाभोवती जाड सळ्याचे उच कुपण घालण्यात आले आहे. या वाघाची नावे, भरत, पाड्या, सुनीता व राणी अशी आहेत वाघ हा त्याच्या पिवळ्या - जर्द रंगामुळे, काळ्या पट्ट्यामुळे आणि मिशा व मोठ्या सुळ्यांमुळे विशेष उठून दिसतो. सिंहापेक्षा वाघ वजनाने अधिक असतो वाघाचे वजन पाचशे पौंडापर्यंत असते सिह हा कळपात राहणारा प्राणी असला तरी वाघ मात्र तसा नाही. वाघ एकटे एकटे फिरतात कधी कधी नर व मादी काही काळापुरते एकत्र राहतात पण बव्हंशी ते एकलकोंडेच असतात वाघाना रात्री दिसते त्यामुळे रात्री मोकाट हिंडावे, शिकार करावी, व दिवस झाडाच्या गर्द जाळ्यात झोपून काढावा हा वाघांचा दिनक्रम असतो सिंहापेक्षा वाघाची लाबी अधिक असते 'बेंगाल टायगर' हा वाघ दहा फुटापर्यंत असतो, वाघ हा मुख्यत आशियात सापडतो त्याची मादी एकावेळी तीन ते सहा पिल्लाना जन्म देते वाघ हा दहा फुटापर्यंत उंच उडी व २० ते २५ फुटापर्यंत लाब उडी मारू शकतो वाघ इतका सामर्थ्यवान असतो की भक्ष्याचे ओझे खांद्यावर घेऊनही तो १२ फुटापर्यंत उडी मारू शकतो. वाघाच्या दातात दैवी शक्ती असते अशी वन्य जमातीत समजूत आहे. त्यामुळे जगाच्या अनेक भागातील वन्यजातीच्या

लोकानी दातासाठी वाघाची शिकार करून त्या भागातून ही जात नष्ट केली आहे वाघाच्या दाताच्या माळा करून हे लोक गळ्यात बाधतात व त्यामुळे भुताखेताच्या कोपापासून सरक्षण मिळते असे मानतात वाघ सर्वात लाब ३४ फूट उडी मारल्याचा उच्चाक असून सिंहाच्या बाबतीत हा उच्चाक ३९ फुटाचा आहे चितळ, साबर, हरीण ही वाघाची नेहमीची खाद्ये आहेत वाघाची नखे तीक्ष्ण व बळकट असतात त्यावरून वाघनखे नावाचे भयकर जालीम शस्त्र तयार करण्यात येते शिवाजीमहाराजानी वाघनखे वापरल्याचा उल्लेख इतहासात आला आहे वाघ हा पृथ्वीच्या पाठीवरील सर्वात सशक्त व सक्षम असा शिकारी प्राणी आहे पण आश्चर्य असे की, वाघाचे तळवे अतिशय नाजुक असतात काटेकुटे, तापलेले खडक इत्यादी टाळण्याकडे वाघाची त्यामुळे प्रवृत्ती होते भारत सरकारने वाघाच्या निर्यातीचा दर प्रत्येक वाघास पधरा हजार रुपये असा ठरवून दिला आहे, वाघाच्या सरसकट निर्यातीस बदी आहे मात्र केंद्र सरकारच्या पूर्व-परवानगीने परदेशातील प्राणिसग्रहालयाना वाघ पाठविता येतात वाघाला दररोज १२ ते १५ किलो मास लागते

राणीच्या बागेत हत्तीच्या विभागात आपल्याला चार हत्तीणी दिसतील सर्वात मोठी आहे ती पवनकली दोन एकत्र बाधलेल्या आहेत त्याची नावे राधा व लैला अशी आहेत स्वतत्रपणे बाधली गेलेली चपा हत्तीण यात नर का नाही अशी शका साहजिकच येईल त्याचे उत्तर असे की नर जेव्हा मस्तीत येतो तेव्हा तो अनावर होतो कधी कधी बळकट साखळदड तोडून तो मोकाट सुटण्याची भीती असते जेथे मुले, बायका वगैरे निर्धास्तपणे प्राणी पहायला येतात, तेथे अशी भयकर धोक्याची शक्यता टाळण्यासाठी नर ठेवीत नाहीत. दुसरे असे की हत्तीची पैदास जगलात होते बदिस्त जागेत होत नाही त्यामुळे त्या दृष्टीनेही नर अशा ठिकाणी ठेऊन उपयोग नसतो

सस्तन व स्तन नसलेले असे प्राण्याचे दोन प्रकार आहेत सस्तन प्राण्यात सर्वात भव्य व सर्वांचा आवडता असा प्राणी म्हणजे हत्ती त्याच्या प्रचड उचीमुळे हत्ती हा इतर प्राण्यापासून वेगळा दिसतो अत्यत शक्तिमान असूनही हत्ती मूलत गरीब असल्याने सर्वाचा व विशेषत. मुलाचा तो अत्यत प्रिय असा प्राणी आहे हत्तींचे दोन प्रकार आहेत एक आफ्रिकन हत्ती आणि दुसरा भारतीय हत्ती आफ्रिकन हत्ती अधिक उच असतो व त्यांचे कान व सुळे अधिक मोठे असतात आफ्रिकन हत्तीची उची अकरा फुटापर्यंत असते व त्याचे दात सहा ते आठ फुटापर्यंत लाब असतात भारतीय किंवा आशियाई

हत्तींची उची दहा फुटापर्यंत व दात चार ते पाच फुटापर्यंत लाब असतात सर्वात मोठा हत्ती अगोला येथे १९५५ साली सापडला त्याची उची तेरा फूट होती हत्ती इतका मोठा व शक्तिमान असूनही तो शाकाहारी असतो हत्तीच्या मादीचे दात नराच्या मानाने खूप लहान असतात कधी कधी ते जबडच्याच्या बाहेरही येत नाहीत आफ्रिकन हत्तीचे वजन दहा टनापर्यंत असते तर भारतीय हत्तीचे वजन सात ते आठ टन असते

गणपती हे आपले आराध्य दैवत त्याचे शीर हत्तीचे असल्याने धार्मिक दृष्टचाही आपल्याकडे हत्तीला अतिशय महत्त्व आले आहे. गणपती हा महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय व उत्सवप्रिय देव आहे सोंड हे हत्तीचे बहुउद्देशीय इद्रिय असून ते त्याचे भूषणही आहे स्पर्श व वास यासाठी हत्ती सोंडेचा उपयोग करतो, शिवाय पाणी व खाद्य तो प्रथम सोंडेत घेतो व मग ते तोंडात घालतो पाणी सोंडेत ओढून घेऊन पपासारखे तोंडात सोडतो, ती गमत पाहण्यासारखी असते वेगवेगळे आवाज काढण्यासाठीही हत्तीला सोंडेचा उपयोग होतो सोंड आकाराने प्रचड दिसत असली तरी तिचे टोक इतके सूक्ष्म असते की हत्ती तिने अगदी लहान पदार्थही उचलून घेऊ शकतो उदाहरणार्थ हत्तीला दिलेली छोटी नाणी हत्तीच्या नवजात पिलाकडे पहात राहिले, तर फार गमती दिसतात. पिल्लू तोंडानेच आईचे दूध पिते त्यावेळी त्याची सोंड मधे मधे येते व सोंड ही त्याला अडचणीची वाटते हत्तीचे पिल्लू जेव्हा प्रथम चालू लागते तेव्हा त्याची लाबलचक सोंड त्याच्या पायात अडखळते व त्याला चालणे कठीण होते हळूहळू हे पिल्लू चालताना सोंड वर करण्यास व त्याची गोल चकलीसारखी सुरळी करण्यास शिकते, तेव्हा ते गोजिरवाणे पिल्लू फारच छान दिसते

हत्तीची निर्मिती कशी झाली हे पाहणे अतिशय मनोरजक आहे हत्तीच्या जातीचा प्रारभ साडेचार कोटी वर्षांपूर्वी इजिप्तमध्ये झाला मोरिथेरियम या नावाचा फक्त दोन फुटाचा प्राणी हा आजच्या हत्तीचा पूर्वज त्यावेळी त्याला सोंड नव्हती लक्षावधी वर्षांच्या विकासाच्या काळात या प्राण्याच्या वरच्या ओठाचे रूपांतर हळूहळू सोंडेत होऊ लागले व त्याची उचीही वाढू लागली बर्फावरील प्रदेशात हा प्राणी स्थानातरित झाला व ती हवा त्याला इतकी मानवली की त्याची उची पंधरा फुटापर्यंत झाली, त्याला बारा फुटापर्यंत सुळे आले तेव्हा तो मॅमथ म्हणजे महाप्रचंड या नावाने ओळखला जाऊ लागला अर्थात हे सक्रमण होण्यास दीड कोटी वर्षे लागली त्याचा उत्तरेत विशेष

सचार होता त्याला खूप लाब केसही होते अतिशय थड प्रदेशात त्याचे रक्षण करण्यासाठी निसर्गाने त्याला हे केस दिले होते सैबेरियाच्या बर्फाळ प्रदेशात काहीशा लहान आकाराचे पण या जातीचे हत्ती आजही आढळतात

"खायचे दात आणि दाखवायचे दात वेगळे" असे आपण लबाड माणसाच्या बाबतीत म्हणतो पण बिचाऱ्या निष्पाप हत्तीच्या बाबतीत हे अक्षरशः खरे आहे त्याचे डौलदार सुळे फक्त शोभेसाठी असतात हत्तीच्या जबड्यात २४ दाढा असतात व करवतीसारखा तो त्याचा उपयोग गवत किंवा पाला कापून बारीक करून खाण्यासाठी करतो. त्याचे चार दात जबड्यातून पडतात, तेव्हा त्याच्यामागून नवे चार येतात व ते हळूहळू पुढे सरकत जातात हत्तीला नवे दात येईनासे झाले की, त्याचा मरणकाळ जवळ येतो हत्तीचे आयर्मान साठ वर्षांचे असते, हत्तीला सरासरी दररोज शभर पौंड वजनाचे खाद्य लागते तो दररोज सुमारे दोनशे गॅलन पाणी पितो हत्ती हा कळपात राहणारा प्राणी आहे विशेष म्हणजे या कळपाची प्रमुख मादी असते सिंहाच्या कळपाचा प्रमुख नर असतो. पण हत्तीत हे स्थान मादीला मिळते नर हत्ती लहान असतो, तोपर्यंत त्याला कळपात सामावून घेतले जाते तो मोठा झाला की त्याची कळपातून हकालपट्टी हाते तो मग नर हत्तींच्या कळपात फिरतो किंवा एकटा राहतो तीस चाळीस हत्तींचा प्रचड कळप जेव्हा नदीत किंवा तलावात आघोळ करतो तेव्हा, एकमेकाच्या अगावर सोंडेने पाणी मारणे व इतर खेळ पाहण्यासारखे असतात. हत्तीणीचा गरोदरपणाचा काळ १९ ते २२ महिने असतो. नवजात हत्तीच्या पिल्लाचे वजन २२० पौंड व उची ३४ इच असते. हत्तीचे पिल्लू अत्यत गोजिरवाणे दिसते हत्तीच्या कळपाचा विशेष असा की, एका भागातून दुसऱ्या भागात जाताना सर्व हत्ती अगदी लष्करी शिस्तीत एका रागेत जातात व त्याच्या अग्रभागी कळपाची नेती हत्तीण असते. हत्तीची सर्वसाधारण गती ताशी दहा किलोमीटर्स असते हत्ती हा अतिशय बुद्धिमान प्राणी आहे त्याची स्मरणशक्ती तीव्र असते. सर्कशीतील अनेक अवघड कामे हत्ती सहजपणे व अगदी थोड्या वेळात शिकतात जन्मल्यापासून वीस मिनिटातच हत्तीचे पिलू उभे राहते, फक्त मस्तीत आल्यावर हत्ती अनावर व आक्रमक होतो. मात्र एरवी हा अत्यंत शात व निरुपद्रवी प्राणी आहे

राणीच्या बागेत नंतर दिसतात ते लहान प्राणी. त्यात गिनीपिग. उदीर- [illegible] संशोधनासाठी गिनीपिग्जचा फार उपयोग होतो. त्याना औषधे व इजेक्शने देऊन त्याच्यावर कोणता परिणाम होतो हे पाहून

शास्त्रज्ञ मानवावर प्रयोग करतात  या विभागाजवळच मोर आणि मोरपखी कबुतरे आहेत  मोर हा सर्वांत सुदर पक्षी आहे  त्याच्याइतके विलोभनीय रग इतर कोणालाही मिळालेले नाहीत  मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी आहे  नराला डोकीवर सुदर तुरा असतो पण मादीला तो नसतो  मोराच्या मादीला लाडोर म्हणतात  ती तपकिरी रगाची असते  व हिच्या गळ्याखालचा भाग चकचकीत हिरवा असतो  मोराचे रग लोभसवाणे असले तरी आवाज कर्कश्य असतो  तो मे ऽऽ असे ओरडतो  त्याला केका असे म्हणतात  लाडोर एका वेळी ३ ते ६ अडी घालते  तित्तर पक्षाच्या जातीत मोराचा समावेश होतो  मोर दिसायला अतिशय सुदर व निरुपद्रवी, अनाक्रमक असतो  सरस्वतीचे वाहन म्हणून मोराचा मान मोठा आहे  त्याचा आहार मिश्र असतो  कदमुळे, वनस्पती, दाणे याबरोबरच मोर बारीक किडे व सरडेही खातो  मोर हा अतिशय सावध पक्षी असतो

जवळच एक तट्टू आहे  अर्थात घोडा हा मुद्दाम प्राणिसग्रहालयात जाऊन पहावा असा दुर्मिळ प्राणी नाही, पण या तट्टूचा उपयोग मुलाना त्याच्यावर बसवून बागेत सहल घडवून आणण्यासाठी होतो  उट हा दिसायला ओबडधोबड असा प्राणी असला तरी, वाळवटात व निर्जल प्रदेशात तो अतिशय उपयोगी असतो  कारण उंट हा अत्यत चिवट प्राणी आहे  पाण्याशिवाय तो कित्येक दिवस राहू शकतो  राजस्थान किंवा सहारा वाळवटात उटाशिवाय प्रवास करणे अशक्य असते  इतर कोणीही प्राणी किंवा वाहन वाळवटात टिकाव धरू शकत नाही  वाळवट दिवसा अतिशय तापते व रात्री अतिशय थड होते  शिवाय वाळूची वादळेही होतात. या सर्व प्रतिकूल परिस्थितीला तोंड देणारा उट हा एकमेव प्राणी आहे. त्याचा रगही वाळवटासारखा पिवळसर असतो त्याची गती ताशी वीस मैलापर्यंत असते  त्यामुळे तातडीच्या कामासाठी साडणास्वाराचा उपयोग करण्याची पद्धत हजारो वर्षांची जुनी आहे लढाईतही उट चागला उपयुक्त असतो

माकडेही मुलाना अत्यंत आवडतात  माकड हा प्राणी माणसाला सर्वांत जवळचा  डार्विनच्या तत्त्वाप्रमाणे माणसाची उत्पत्ती माकडापासूनच झाली  सर्व प्राण्याचे मूलतत्त्व असे आहे की, त्याचा मज्जातंतू जोपर्यंत आडवा असतो, तोपर्यंत त्याच्या बुद्धीचा विकास फारसा होत नाही  उदाहरणार्थ सिह, वाघ, चित्ता वगैरे प्राणी शक्तिमान असले तरी त्याना बुद्धिमान म्हणता येणार नाही. माकड हे जोपर्यंत चार पायावर चालत होते, तोपर्यंत त्याच्या पाठीचा कणा

व त्यातील मज्जातंतू आडवे होते व माकडाची बुद्धी मर्यादित होती उराग उटाग मादी ही आपल्या पिलाला माणसासारखी कडेवर घेते माकड हे चपळ असते व उड्या मारण्यात पटाईत असते त्याचे खेळ पाहून मुलाना अतिशय गमत वाटते रस्त्यावरचे गारुडीसुद्धा माकडाच्या नर-मादीला कपडे घालून माणसासारखे नाट्यप्रसग करायला शिकवतात माकडाची उत्पत्ती सहा कोटी वर्षांपूर्वी आमोमियाऊ नावाच्या प्राण्यापासून उत्तर अमेरिकेत झाली तेथून ही माकडे युरोप, आफ्रिका व आशियात आली निरनिराळे हवामान व नैसर्गिक पार्श्वभूमी यानुसार माकडाच्या विविध जाती झाल्या सध्या आफ्रिकन व आशियाई अशा त्याच्या दोन मुख्य जाती आहेत. माकडाची मादी दोनशे दिवसांच्या गरोदरपणानतर पिलाला जन्म देते, लहान पिले आईच्या पोटाला घट्ट धरून राहतात व त्याना घेऊन माकडीण जेव्हा झाडावरून किंवा इमारतीवरून उड्या मारते, तेव्हा ते दृश्य अतिशय मनोरजक दिसते माकडाचे आयुर्मान २० ते ३० वर्षे असते गोरीलासारखी मोठी माकडे ४० वर्षांपर्यंत जगतात गोरीला, उराग, चिपाझी आणि गिबन या जातीच्या माकडाच्या अवस्था व मेंदू माणसासारखेच असतात फक्त आकाराने लहान असल्याने माणसांच्याइतकी बुद्धी त्याना नसते चित्रे काढणे, टायपिंग करणे, पियानो वाजविणे इत्यादी शिकवलेली कामे माकडे करू शकतात सिह माकडाना सिंहासारखी आयाळ असते ही माकडे आपल्याला राणीच्या बागेत पहायला मिळतात

बिबळ्या व तरस याचे पिंजरे जवळच आहेत राणीच्या बागेतील तीन बिबळ्यापैकी शारदा व लक्ष्मी या माद्या असून पिंटो हा नर आहे शारदा ही मादी चटकन् प्रक्षुब्ध होणारी व आक्रमक असल्याने तिला वेगळ्या पिंजऱ्यात ठेवली आहे पिंटो व लक्ष्मी याना एकत्र ठेवण्यात आले आहे बिबळ्याचे अग पिवळसर असते व त्यावर काळे ठिपके असतात. पण काळ्या बिबळ्याचे सर्वांग काळ्या रगाचे असते या प्रकारची बिबळ्या मादी राणीच्या बागेत आहे हिचे नाव हिरा १९७७ साली तिला इथे आणण्यात आले बिबळे अत्यत चपळ असतात जवळच्याच पिंजऱ्यातील तरस हे हिंस्र आहे येथे तीन तरस आहेत जगलातून रात्री गावात येऊन हे तरस शेळ्या, कोंबड्या व कधी कधी माणसेही मारते त्याच्या पिवळसर करड्या अगावर काळे ठिपके असतात मोठ्या आकाराच्या कासवाला 'जायंट टर्टल' म्हणतात. हे स्थिर असले की लाबून एखाद्या खडकासारखे दिसते. कासवाच्या पाठी अत्यत चिवट असल्याने ऐतिहासिक काळात त्याच्या ढाली करीत असत कासव आपल्या

आखूड पायानी तुरुतुरु धावते तेव्हा मोठे गमतीचे दिसते

अस्वल आणि माणूस याच्यात बरेच साम्य आहे  माणसाप्रमाणे अस्वल दोन पायावर उभे राहू शकते  आदिमानवाप्रमाणे अस्वल गुहेत राहते व अन्नाचा साठा करते  माणसाप्रमाणे अस्वलाच्या पायाला पाच बोटे असतात  माणसाप्रमाणे अस्वल शाकाहारी व मासाहारी असते  अस्वलाला मध फार आवडतो  अस्वलाच्या एका जातीत अगावर जानव्यासारखी पाढरी रेषा असते, त्या जातीला ब्राह्मण अस्वल म्हणतात  सुस्तपणाबद्दल अस्वलाची ख्याती आहे  हल्ला करताना अस्वल नखानी ओरबाडते  त्यामुळे अस्वल गुदगुल्या करून भक्ष्याला मारते असे म्हणतात  भारतात अश्मयुगापूर्वीचेही अस्वलाचे अवशेष सापडले आहेत  वेदातही अस्वलाचे उल्लेख आहेत

अस्वलाचे दोन प्रकार राणीच्या बागेत दिसतात  एक  देशी अस्वल, ही अस्वले घेऊन दरवेशी दारोदार जातात आणि त्याचे खेळ लोकाना दाखवून उदरनिर्वाह करतात  ' अस्वलाच्या आधी दरवेशाची आरोळी ' अशी आपल्या भाषेत म्हण आहे  पिंजऱ्यातल्या पिंजऱ्यात एकसारख्या फेऱ्या मारणे आणि स्वत.शीच घुमत राहणे ही पिंजऱ्यातल्या अस्वलाची वैशिष्ट्ये आहेत  खेडोपाडीची मुले भीती घालविण्यासाठी अस्वलाचा केस जवळ बाळगतात  ३ देशी अस्वले व २ हिमालयन अस्वले राणीच्या बागेत मुलाची करमणूक करतात  हिमालयातील अस्वलाच्या पाठीवर इग्रजी ' व्ही ' अक्षरासारखी खूण असते, त्यापुढच्या विभागात नीलगायी, साबर हे प्राणी आहेत  नीलगायी फक्त भारतातच सापडतात  त्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्या पाण्याशिवाय अनेक दिवस राहू शकतात  टेकड्या किंवा पठारावर नीलगायी पाच ते दहाच्या कळपाने राहतात  राणीच्या बागेत नऊ नीलगायी आहेत  साबरे दिसायला सुदर दिसतात  येथे ३५ साबर आहेत  काकर हे लाबून हरणासारखे दिसते पण त्याचा आकार लहान असतो  ते भुंकल्यासारखा आवाज करते म्हणून त्याला इग्रजीत बार्किंग डियर म्हणतात  पाढऱ्या रगाचे (अल्बीनो) काळवीट हे भारतीय असून देखणे असतात

सर्प विभागात आपल्याला नाग, साप, धामण, अजगर, पाणसर्प इत्यादी प्रकार दिसतील  सर्पगृहाजवळ पाणघोड्याची जागा आहे  राणीच्या बागेत जे चार पाणघोडे ऊर्फ हिपोपोटेमस आहेत, त्यात राजा, मुन्ना, मुन्नी व एक बच्चा याचा समावेश आहे  पाणघोडा हा एक प्रचड वजनाचा प्राणी  तो जमिनीवर व पाण्यातही राहतो  सर्वसाधारण पाणघोड्याचे वजन चार टन असते  त्याचे

आयुर्मान ४० ते ५० वर्षांचे असते पाणघोड्याचे वैशिष्ट्य असे की त्याचे खालचे दोन 'कानईन' दात जन्मभर वाढत असतात व नंतर सुळे होऊन तोंडाच्या बाहेर येतात वजन मोठे असले तरी आकारही मोठा असल्याने ते पाण्यात लिलया तरगतात किंवा पोहतात पाणघोडीचा गरोदरपणाचा काल २४० दिवसाचा असतो नवजात पिलाचे वजन १० पौंड असते जन्मल्याबरोबर ते पोहू शकते पाणघोड्याचा भूक प्रचंड असते पण हा प्राणी शाकाहारी आहे पाण्यातील वनस्पती व जमिनीवरील झाडाचा पाला, गवत खाऊन तो जगतो हा प्राणी सहसा आपण होऊन हल्ला करीत नाही, पण उतारवयातील पाणघोडे रागीट बनतात व हल्ला करतात बऱ्याच बाबतीत पाणघोडे व डुकरे याच्यात साम्य असते पाणघोड्याजवळच गेंड्याचा विभाग आहे राणीच्या बागेत एक गेंडा आहे व त्याचे नाव शिवा असे आहे.

गेंडा व हत्ती सस्तन प्राण्यांपैकी सर्वांत मोठे व अवजड प्राणी आहेत गेंडा हा प्राणी इतका चमत्कारिक दिसतो की एकीकडे त्याच्या प्रचंड आकाराची व त्याच्या नाकावरील टोकदार शिंगाची भीती वाटते, तर दुसरीकडे चिलखत घातल्यासारखे त्याचे बोजड शरीर पाहून हसू येते, गेंड्याची सर्वसाधारण उंची सहा फूट व वजन तीन टन असते त्याच्या नाकावरील तथाकथित शिंग हे वास्तविक शिंग नसून केसाचा अगदी घट्ट झालेला जुडगा असतो गेंडा लांबून पाहताना हिंस्र व आक्रमक दिसत असला तरी कोणी हल्ला केल्याशिवाय तो आपण होऊन चढाई करीत नाही गेंड्याच्या अवजड व बोजड शरीरामुळे त्याला वळणे फार कठिण होते त्यामुळे तो कधी जोरात मुसंडी मारून आलाच तर त्याच्या सरळ रेषेतून बाजूला झाले तरी तो वेगाने लांब जातो व गती हळू करून सावकाश परततो, तोपर्यंत माणूस स्वरक्षणासाठी दूर जाऊ शकतो किंवा झाडावर चढू शकतो गेंडा ही सुस्त जमात आहे. चिखलात पडून राहणे त्याला आवडते सध्या जगात सुमारे बारा हजार गेंडे आहेत त्यापैकी एक तृतियांश गेंडे टांझानियात आहेत हत्तीप्रमाणेच आफ्रिकन व भारतीय असे गेंड्याचे दोन मुख्य प्रकार आहेत भारतीय गेंड्याला एक शिंग असते व आफ्रिकन गेंड्याला दोन शिंगे असतात, हा त्याच्यातील मुख्य फरक आहे गेंड्याच्या जाड कातडीवरून निगरगट्ट माणसाला 'गेंड्याच्या कातडीचा' असे म्हणण्याचा प्रघात आहे गेंड्याच्या कुंपणामागे राणीच्या बागेचे रुग्णालय आहे आजारी झालेल्या प्राण्यावर व पक्ष्यावर या ठिकाणी औषधोपचार करण्यात येतात

राणीच्या बागेत पाणपक्ष्याच्या विभागात आपल्याला पेलिवून पक्षी दिसतील पेलिवून पक्ष्याची चोच शरीराच्या मानाने खूप मोठी असते या मोठ्या चोचीमुळे तो एका घासात अनेक मासे पकडू शकतो जड शरीर, मोठी चोच व आखूड पाय यामुळे पेलिवून चालताना मोठा गमतीशीर दिसतो पक्ष्यात दोन प्रकार असतात फ्लाईटलेस बर्ड म्हणजे ज्याना उच उडता येत नाही असे पक्षी व उडणारे पक्षी बदक, पेलिकन, हस हे फ्लाईटलेस पक्षी आहेत पक्ष्याचे घ्राणेंद्रिय त्याच्या चोचीतच असते पक्ष्याना दात नसतात पण टणक चोची त्यांचे दाताचे काम करतात पेलिकन पक्षी पाणथळ प्रदेशात राहातात त्याच्या पायाना पडदे असतात पेलिकन पक्षी पोहण्यात पटाईत असतो बगळे, ढोक इत्यादी प्राणी एकाच मोठ्या प्रकारचे असतात. त्याचे पाय खूप लाब असतात बगळे पाण्यात एका पायावर निश्चल उभे राहतात व अचानक झडप घालून मासे पकडतात म्हणून विरक्तपणाचे सोंग आणणाऱ्या स्वार्थी माणसाला 'बकध्यान लावून बसणारा' असे म्हणतात पेंटेंड स्टॉर्क नावाचा ढोक लाल पायाचा व लाल चोचीचा असतो. स्पून बिल या पक्ष्याची चोच चमच्यासारखी असते. फ्लेमिंगो हा गुलाबी रगाचा पक्षी उच पायाचा व देखणा असतो फ्लेमिंगोचे कळप पाण्यात विहार करतात तेव्हाचे दृश्य अतिशय मनोरम दिसते तुरेधारी करकोचा नावाची करकोच्याची एक जात असते, हिच्या डोकीवर मोरासारखा डौलदार तुरा असतो स्वान, गूज व डक्स हे पाण्यातील पक्षी जवळ जवळच्या जातीचे आहेत त्यापैकी हस हा सर्वात देखणा असतो हसाचा कळप पाण्यावर तरगताना अतिशय सुदर दिसतो बदके विविध रगाची असतात राखी बदके ही खास जात आहे बदकात मन्डेरिन डक नावाचा पक्षी असतो, त्याचे रंग अतिशय मोहक असतात गिधाड हा पक्षी सर्वसाधारण लोकाचा नावडता पक्षी असतो. परंतु एरवी जो मूळ प्राणी कुजून गेला असता व त्याचे प्रदूषण झाले असते असा प्राणी खाऊन गिधाडे-ही स्वच्छतेला मदत करतात फीझट किंवा कवडे रगात आले की त्याच्या डोकीवरचे तुरे फुलतात फीझटचे रग अतिशय सुदर असतात गोल्डन फीजट, आर्गस फीजट व रिंगनेकड् फीजट असे त्याचे प्रकार आहेत

क्रेनसारखे पक्षी हजारो मैल स्थलातर करतात रशियातील सैबेरियामधून हजारो मैल उडत येऊन राजस्थानच्या भरतपूर येथील काही काळ सुखाने राहून नियमितपणे दरवर्षी परत जाणारे शेकडो क्रेन पक्षी आहेत राखी बदके भारतात पाण्याजवळ विपुलतेने दिसतात. ती उथळ तळ्यात राहतात व

जमिनीवरही चालतात घारीत, घार व ब्राह्मण घार असे दोन प्रकार आहेत घारीची शेपटी दुभगलेली असते घारीची नजर फार तीक्ष्ण असते खूप उंचावरूनही ती आपले भक्ष्य हेरते 'घार हिंडते आकाशी, परि तिचे लक्ष पिलापाशी' या काव्यात घारीचे वात्सल्य दर्शविले आहे ब्राह्मणी घारीचा रंग तांबडा व डोके व पोट पांढऱ्या रंगाचे असते आपल्या महाराष्ट्रात पक्ष्यांचा खूप सखोल अभ्यास झाला आहे सुतार, तांबट, तिरदाज, चष्मेवाला प्लबर, खंड्या, शिंपीण, लाला, गाल्या बुलबुल, सातभाई, वटवट्या अशी त्या त्या पक्ष्यांची वैशिष्ट्ये दाखविणारी नावे आपण दिली आहेत उदाहरणार्थ सातभाई हे पक्षी नेहमी साताच्या गटाना हिंडतात इंग्रजीत ज्याला बॅबलर म्हणतात तो, पक्षी नेहमी आवाज काढतो, म्हणून त्याला वटवट्या हे नाव दिले आहे पक्षी - निरीक्षण हे करमणूक व ज्ञान यांचा अजोड लाभ देणारे शास्त्र आहे, श्री सलीम अली यानी या क्षेत्रात जागतिक कीर्ती संपादन केली आहे राणीच्या बागेत मुनिया पक्षी आहेत या पक्ष्यांचे वैशिष्ट्य असे की, एरवी यातील नर व मादी सारखीच दिसतात पण विणीच्या हंगामात ते वेगळे दिसतात हे पक्षी गवताचे गोलाकार घरटे करतात व त्याच्या बाजूला प्रवेशद्वार ठेवतात

राणीच्या बागेचे डेप्युटी सुपरिंटेंडेंट डॉ एम व्ही वाणी यानी माझ्याबरोबर सर्वत्र फिरून मला प्राण्यांची व पक्ष्यांची तपशीलवार माहिती दिली सुपरिंटेंडेंट सौ शैला साने याही यावेळी आमच्याबरोबर होत्या त्यानीही बरीच माहिती पुरवली डॉ वाणी म्हणाले, 'दररोज सुमारे दहा हजार प्रेक्षक राणीच्या बागेला भेट देतात त्यानी खाद्यपदार्थ खाऊन टाकलेले कागद, कचरा वगैरेची साफसफाई हे रोज सकाळचे मोठे काम असते मे महिना किंवा दिवाळीच्या सुट्टीत प्रेक्षकांचा आकडा पंधरा ते वीस हजारावर जातो अर्थात जास्तीत जास्त लोकानी या प्राणिसंग्रहालयाचा फायदा घेतला तर त्यात [illegible]
आहे पण काही लोक अनुचित वर्तन करतात. म्हणजे प्राण्याना त्रास देतात पिंजऱ्याच्या सळ्याजवळ एखादा प्राणी आला तर त्याला छत्रीने किंवा काठीने ढोसणे, खडे मारणे, अर्धवट खाल्लेले अन्न त्याला देणे इत्यादी मार्गांनी काही प्रेक्षक उपद्रवकारक ठरतात. आमच्याकडे पन्नास सेवक आहेत पण इतक्या मोठ्या संख्येच्या प्रेक्षकांवर सतत लक्ष ठेवणे त्यांच्या आटोक्याबाहेरचे आहे जनतेला पशुपक्ष्यांच्याविषयी प्रेम वाटावे हा तर प्राणिसंग्रहालयाचा एक प्रधान हेतू असतो लोकांच्यात या दृष्टीने सामाजिक जाणीव वाढली पाहिजे '

डॉ वाणी पुढे म्हणाले, 'सध्या राणीच्या बागेत प्रवेश करण्याचा प्रौढाना वीस पैसे व मुलाना दहा पैसे हा दर नगण्य आहे इतका कमी दर असल्याने ज्याना प्राणी पहाण्यात स्वारस्य नाही पण फक्त कुठेतरी वेळ घालवायचा आहे, असे निरुद्योगी लोक वीस पैसे टाकतात आणि झाडाखाली सावलीत झोपतात किंवा चार - सहा लोक मिळून पत्ते खेळतात हेच दर एक रुपया व पन्नास पैसे केले, तर, याला आळा बसेल व जागेचे उत्पन्नही वाढेल ' भविष्यकाळाबद्दल बोलताना डॉ वाणी म्हणाले, 'प्राणिसग्रहालयाच्या कल्पना आता बदलल्या असून लोकाच्या अपेक्षाही वाढल्या आहेत सिह, वाघ इत्यादी प्राणी जगलात मुक्त सचार करणारे आहेत त्याना लहान पिंजऱ्यात कोंडून न ठेवता त्याच्यासाठी मोठी जागा ठेवावी, तिथे जगलसदृश्य पार्श्वभूमी करावी व त्या भागात त्यानी मुक्त सचार करताना प्रेक्षकानी पहावे अशी झूविषयी प्रशस्त कल्पना आहे त्यासाठी चार - पाचशे एकर जागा लागेल राणीचा बाग हा मुबईत मध्यवर्ती व दाट लोकवस्तीत असल्याने तशी जागा येथे उपलब्ध होणे शक्य नाही, म्हणून मुलुंदजवळ साडेचारशे एकर जागा घेऊन प्रशस्त व अद्ययावत कल्पनाना साजेसे प्राणिसग्रहालय सुरू करावे अशी एक सूचना आहे बोरिवली येथील राष्ट्रीय उद्यानात सिह, वाघ, बिबळे वगैरे प्राणी हलवून त्यांना अधिक मोठी जागा वावरण्यास द्यावी अशीही एक कल्पना आहे या प्राणिसग्रहालयातील पशु - पक्ष्याना दररोज तीन हजार रुपयाचे अन्न लागते. त्यात मास, भाजीपाला, फळे, गवत, ऊस, करडी, चणा, भुसा, काग याचा समावेश आहे

प्राणिसग्रहालय हे राणीच्या बागेचे एक कार्य आहे तसेच झाडे वाढविणे, रोपे तयार करून विकणे, वनस्पतिशास्त्राचा अभ्यास हेही या जिजामाता उद्यानाचे एक कार्य आहे डॉ गारखिल हे या कामावर आपले लक्ष केंद्रित करतात अलिकडेच या बागेत एक उत्तम जपानी उद्यान तयार केले आहे त्यात धबधबा, जलाशय, मासे व खास जपानी झाडे व वेली आहेत हे उद्यान अत्यत प्रेक्षणीय आहे राणीच्या बागेचा निवात फेरफटका करण्यासाठी तीन ते साडेतीन तास लागतात. मुलाच्यासाठी हत्तीवरून व तट्टावरून सफर काढण्याचीही येथे सोय आहे राणीच्या बागेला भेट दिल्यावर प्राणी व पक्षी याच्याविषयी अधिक आपुलकी वाटून त्याच्या जगाचे अधिक ज्ञान घेण्याची आबालवृद्धाना इच्छा होईल

राणीच्या बागेच्या प्रवेशद्वारानजीक डाव्या बाजूला डॉ भाऊ दाजी लाड

सग्रहालय आहे हेही मुबई महापालिकेच्या वतीने चालविण्यात येते या सग्रहालयाची प्राथमिक तयारी १८४० सालापासूनच सुरू झाली पण वस्तू जमविणे, जागा शोधणे, व्यवस्थापन करणे इत्यादीत पधरा - सोळा वर्षे जाऊन १८५७ ला ते सुरू झाले पण त्याच वर्षी भारताच्या स्वातत्र्य समरास प्रारभ होऊन अस्वस्थता व असुरक्षितता वाढल्याने ते काही काळासाठी बद करण्यात आले १८५८ साली थोर सामाजिक नेते डॉ भाऊ दाजी लाड, श्री जगन्नाथ शकरशेठ इत्यादींच्या पुढाकाराने या सग्रहालयासाठी जनतेकडून निधी जमविण्यात आला त्यात सरकारने भर घालून सध्याची भव्य इमारत बाधण्यात आली तिला ३ लक्ष ६० हजार रुपये खर्च आला ही इटालियन रिनॅसन्स शैलीची इमारत १८० फूट लाब, ८० फूट रुद व ५२ फूट उंच असून दुमजली आहे २ मे १८७२ रोजी या नव्या भव्य वास्तूत 'व्हिक्टोरिया' व 'प्रिन्स अल्बर्ट म्युझियम' या नावाने ते जनतेसाठी खुले करण्यात आले शभरहून अधिक वर्षे ते त्याच नावाने चालू होते

हे सग्रहालय उभारण्यात डॉ भाऊ दाजी लाड यानी पुढाकार घेतला होता जीवनाच्या अनेक क्षेत्रात त्यानी जनतेची सेवा केली होती त्याची स्मृती चिरतन रहावी म्हणून १ नोव्हेंबर १९७५ रोजी या सग्रहालयाचे नाव बदलून त्याला 'डॉ भाऊ दाजी लाड सग्रहालय' असे नाव देण्यात आले त्यापूर्वी मुबई महापालिकेने तशा आशयाचा ठराव केला या सग्रहालयात तळमजल्यावर शस्त्रास्त्रे, मातकामाचे नमुने, सगमरवरी पुतळे, पाषाणाच्या मूर्ती, काशी येथील काशीविश्वनाथाच्या मदिराची पितळी प्रतिकृती, पहिल्या महायुद्धात मुबईजवळ सापडलेला जर्मन पाणसुरुग, कुटिरोद्योग, कागदाच्या लगद्याच्या व भेंडाच्या वस्तू, (त्यात मीनाक्षी मदिर व गणेश मदिर याच्या भेंडाच्या प्रतिकृती विशेष प्रेक्षणीय आहेत), भारतीय कलेचे नमुने, हिमालयातील वन्य जमातीच्या लोकांचे तांब्याचे मुखवटे इत्यादी वस्तू आहेत या सग्रहालयाचा खास उल्लेख करावयाचा असेल तर तो मुबईच्या विकासाशी निगडीत असलेल्या छायाचित्रे व वस्तू यासाठी मुबईतील पूर्वीचे किल्ले, ईस्ट इडिया कपनीची जहाजे, मुबईच्या विकासातील प्रमुख टप्पे, मुबईच्या जीवनातील महत्त्वाच्या व्यक्ती याची मोठी छायाचित्रे येथे आहेत पोर्तुगीजाना मुबई ज्यावेळी आदण देण्यात आली, त्यावेळच्या या नगरीचा रिलीफ मॅपही येथे आहे तसेच लाकूडकाम, काचकाम, भारतीय नाणी, भारतीय वाद्ये, ललितकला इत्यादींशी संबधित वस्तू प्रेक्षणीय आहेत १९७१ च्या भारत-पाक युद्धातील भारतीय सेनेची विजय चिन्हेही

येथे पहावयास मिळतात चिलखत, तुर्की तोफ, डचानी ओतलेली व ' उदाजी पवार ' असे नाव कोरलेली तोफ, हिंदू देवता व दशावतार, विविध धर्मियाच्या प्रतिकृती, पारशी स्मशानभूमीची प्रतिकृती वगैरे वस्तू पहिल्या मजल्यावर पहावयास मिळतात

१६७० साली ब्रिटिशानी बाधलेल्या किल्ल्याची प्रतिकृती, भरतकामाचे नमुने, मुबई बदरातील नौकाच्या प्रतिकृती, मुबईच्या विविध भागाची जुनी छायाचित्रे, या सग्रहालयाला लंडन व इतर ठिकाणच्या विविध प्रदर्शनात मिळालेली पदके इत्यादींचा सग्रह येथे आहे शिवाय एक सदर्भ ग्रथालयही येथे असून मुंबईच्या विकासाचा अभ्यास करणाऱ्याना ते विशेष उपयुक्त आहे डॉ भाऊ दाजी लाड सग्रहालय व राणीच्या बागेचे कपाऊड याच्यामध्ये असलेल्या मोकळ्या जागेत अनेक पुतळे दिसतील जवळ जाऊन पाहिले असता त्या पुतळ्यांपैकी कुणाचे नाक तोडले आहे, तर कोणाचा हात तोडला आहे असे दृश्य दिसेल भारतात ब्रिटिशाच्या विरुद्ध जे स्वातन्त्र्य-समर सुरू झाले, त्यात वेळोवेळी स्वातन्त्र्य सैनिकानी ब्रिटिशाच्या पुतळ्याची मोडतोड केली असे विद्रुप पुतळे प्रमुख चौकात ठेवणे अयोग्य वाटल्याने महापालिकेने ते हलवून येथे ठेवले आहेत. अडगळीत पडलेल्या या ब्रिटिशकालीन पुतळ्याची अवस्था दयनीय झाली आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. प्र.
वा. क्र. ६५०
२११५३

# ८ / पाच शहरांच्या पाच तऱ्हा

मी भारतभर खूपच भ्रमण केले आहे स्थूलमानान सागायचं झाल, तर भारताचा सत्तर टक्के भूप्रदेश मी पाहिला आहे दिल्ली, प बगाल, मध्य प्रदेश, तामिळनाडू, केरळ, राजस्थान, गुजराथ, पाँडेचरी, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि आध्र याना मी भेटी दिल्या आहेत सख्येने पाहिले तर भारतातील बावीस राज्ये आणि सात केंद्रशासित प्रदेश यापैकी नऊ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेश मी पाहिले आहेत. आणि तरीही यात सत्तर टक्के भारत येतो. कारण मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि राजस्थान ही लोकसख्या व क्षेत्रफळ यात सर्वात मोठी राज्ये मी पूर्ण केली आहेत या विशाल भटकतीत पाच प्रमुख शहरानी माझ्या मनावर कोणते ठसे उमटवले ते आज मी सागणार आहे मुबई, दिल्ली, मद्रास, कलकत्ता आणि म्हैसूर ही ती शहरे आहेत त्यापैकी चार ही भारतातील सर्वात महत्त्वाची आणि पाचवे भारतातील माझे सर्वात आवडते म्हणून या पाचाची निवड मी केली आहे

प्रथम मुबई ही महानगरी घेऊ मी कोल्हापुरचा १९३७ साली मी शाळेत बहुधा इग्रजी पाचवीच्या वर्गात असताना प्रथम मुबईला आलो, त्याला आता अर्ध शतक होऊन गेले पण त्या वेळेपासून या शहराचा जो ठसा माझ्या मनावर उमटलेला आहे, तो तसाच आहे, तो अधिक खोल उठत गेलेला आहे. तो ठसा म्हणजे चैतन्य है मुंबईचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे इथे जे काही घडते ते प्रचड प्रमाणावर रुटुखुटु, किरकोळ, चिल्लरपणा मुबईला माहीत नाही इथे गर्दी उसळते ती सागरासारखी अफाट, पाऊस कोसळतो तो आकाश फाटल्यासारखा, उत्सव होतो तो आसमतातील लोकात अपार उत्साह ओतणारा आणि स्फोट होतो तोही १९४४ साली झालेल्या स्फोटासारखा महाप्रचड ! पुणेरी पिरपिर या महानगरीला मंजूर नाही इथे श्रीमती कुबेराला लाजवणारी आणि दारिद्र्यही काळजाला घरे पाडणारे, मलबारहिलवर

भारतातील सर्वात धनाढ्य व्यापारी, उद्योगपती राहतात, तर धारावीची झोपडपट्टी म्हणजे आशियातीलच नव्हे तर जगातील सर्वात भयकर! मुबईला एका अतिश्रीमत माणसाच्या मालकीच्या १९० रोल्स राईस गाड्या आहेत, यावर विश्वास बसणे कठीण, एका चित्रपटातील भूमिकेसाठी चाळीस ते पन्नास लाख रुपये घेणारा अभिनेता इथे आहे, तर, त्याच चित्रपट सृष्टीत रोज दीड दोन रुपये मिळाले तरी डोकीवरून पाणी गेल अस मानून स्टुडिओभोवती आशाळभूतपणे घिरट्या घालणारे फालतू किंवा एक्स्ट्रा याच नगरीत आहेत

देवनारच्या कत्तलखान्यात रोज शेकडो आणि सणावाराला हजारो मेंढ्या व भाकड जनावरे सराईतपणे बेदरकार कापली जातात, तर त्याच शहरात जीवनातील अत्यत कोमल भावनाना वाट करून देणाऱ्या स्वर्गीय सगीताचे सूर घुमविणाऱ्या किशोरी आमोणकर आणि लता मगेशकर स्वरानदाची बरसात करीत असतात जगातील सर्वात अधिक प्रयोग करणारे शिवाजी मदिर हे नाट्यगृह आणि प्रायोगिक नाटकाच्या दुष्काळामुळे भकास, उजाड झालेले छबिलदास सभागृह ही जवळजवळच पण एकमेकाकडे पाठ फिरवून बसली आहेत भारतात जास्तीत जास्त इग्रजी आणि गुजराथी नाटके याच महानगरीत होतात मराठी रगमच तर दीर्घकाळ चैतन्याची आणि श्रेष्ठतेची परपरा लाभलेला, भारतातील सर्वात अधिक कार्यशाली मच हजार, दीड हजार, दोन हजार प्रयोगाची सख्या सहज सागणारा हा उर्जेने भरगच्च भरलेला मच भारतात अद्वितीय आहे पण याच मराठी नाट्यसृष्टीच्या वेडापायी घरदार विकून कफल्लक झालेले निर्माते, व्यसनापायी ससारातून उठून गेलेले नट आणि नाटकाच्या आकर्षणाने सुखी ससार टाकून ज्याच्या जीवन होड्या प्रवाहात वाकड्या तिकड्या उलटल्या अशा अभिनेत्रीही आहेत

एके काळी अमेरिकेतील हॉलिवुड हे जगातील सर्वात अधिक चित्रपट निर्माण करणारे केंद्र होते आता हा पहिला क्रमाक मुबईने हॉलिवूडपासून खेचून घेतला आहे देशाला स्वप्ने पुरवणारा राजकपूरसारखा जादूगार, मीनाकुमारीसारखी स्वत च्या व्यथित जीवनाचा होम करूनही लोकाना कलानदाच्या अत्युच्च शिखरावर नेणारी अभिनेत्री, नर्गिससारखी सर्व भूमिकात सारखीच उत्कृष्ट अभिनयाची झलक दाखविणारी असामान्य कलाकार, देव आनद सारखा सदाबहार नट, वर्षानुवर्षे सतत राहणारी स्वप्नसुदरी हेमामालिनी, आणि कलेप्रमाणेच राजकारणाच्याही क्षेत्रात सर्वात अधिक खळबळ उडविणारा-अमिताभ बच्चन यानी या शहरालाच नव्हे तर सबध भारताला,

अनेक परदेशाना आणि परदेशात स्थायिक झालेल्या लक्षावधी भारतीयाना जीवनाचे नवे परिमाण दिले आहे मुबईतील चित्रपटसृष्टीतील नटनट्यांच्या खऱ्या खोट्या लफड्यानी कोट्यावधी लोकाना चुरचुरीत विषय पुरवून त्याच्या जीवनाला वेगळी खुमारी आणली आहे. राजन नर्गिसला किंवा राजेशन डिंपलला वाईट वागणूक दिली हे सांगताना एखादा भेळपुरीवाला किंवा केशकर्तन करणारा कलाकारही आपल्या घरच्याच मुलीला नवऱ्यान छळल्याचा सूर लावतो, आणि डोळ्यांना न आलेल पाणी पुसण्याचा फर्मास अभिनय करतो हिंदी चित्रपटांनी गरीब, श्रीमत, मराठी-अमराठी, मालक-नोकर अशा अनेक भिन्न प्रवृत्तीच्या लोकांना एकत्र कुटुंबाचे सभासद केले आहे. जगातले ऐंशी टक्के पारशी या एका शहरात राहतात. श्रीमंत, कर्तबगार, पाश्चात्य जीवन जगणारी ही जमात कठेही उठन दिसते

मुबइला एक वेगळीच ग्लॅमर आहे या इग्रजी शब्दाला अचूक मराठी शब्द नाही शब्दकोशात जादू आणि मोहकता असे दिलेले शब्द फारच मिळमिळीत आहेत. ग्लॅमरमध्ये जोश, झुळझुळीतपणा, सफाई, नेत्रदीपकता, एकदम हृदयात घुसणाऱ्या प्रेमाच्या बाणाची झळाळी आहे, ती या मराठी प्रतिशब्दात नाही मुबईला ग्लॅमर देणाऱ्या अनेक वैशिष्ट्यात जाहिरातींचे जग हे एक आहे. मुबईत जेवढ्या जाहिरात संस्था आहेत, तेवढ्या भारतात इतरत्र नसाव्यात हे साहजिकच आहे. कारण दिल्ली ही देशाची राजकीय राजधानी [illegible]

डबानायर, बॉम्बे, आयलंड सोसायटी अशी नियतकालिके आणि त्यावरील व आतील फॅशनेबल, अर्ध्याहून उघडया मस्त सुंदर तरुणी हा या ग्लॅमरचाच एक भाग आहे या नियतकालिकाची निर्मिती इंग्लड-अमेरिकेतील नियतकालिकाच्यासारखी पॉश असते. डेबॉनियर तर प्लेबॉयशी चढाओढ करून जवळजवळ नग्न उन्मादक तरुणींची छायाचित्रे प्रसिद्ध करते या महाराष्ट्रात रामदासानतर इतके अपुरे कपडे घालून जाहीर दर्शन देणाऱ्या याच धाडशी मदनिका ! स्त्री-मैत्रीचा व्यवसाय करणारेही बॉंबाईट नावाचे मासिक आहे. अर्थात रामदासाच्या कार्यापेक्षा या मासिकांचे कार्य अगदी वेगळे आहे हे सागणे नकोच.

चित्रपटाप्रमाणेच दूरदर्शनच्या गतिमान झटपट जगामुळेही मुंबईच्या ग्लॅमरमध्ये भर पडली आहे मुबई हे दूरदर्शनच्या कार्यक्रमाचे एक प्रमुख केंद्र आहे इथे मराठी, गुजराथी, हिंदी आणि इग्रजी कार्यक्रम तयार होतात त्यापैकी

काही देशभर दाखविले जातात दररोज घडणाऱ्या अनेक महत्त्वाच्या घटनापैकी निवडक घटना त्याच दिवशी सध्याकाळी पडद्यावर साकार होतात आतरराष्ट्रीय क्षेत्रात महनीय व्यक्ती, अतिवृष्टी, आग, पूर, अपघात, चित्रकला प्रदर्शने, नृत्य महोत्सव, नाट्य महोत्सव, शास्त्रोक्त सगीताचे कार्यक्रम, दूरदर्शन मालिका याचा छोट्या पडद्यावर नुसता खच पडलेला असतो कधी सौंदर्य स्पर्धा, तर कधी कबड्डी, कधी चित्रपट महोत्सव तर कधी पतप्रधान, राष्ट्राध्यक्ष याच्या भेटी, कधी हजारो मैलावरच्या ऑलिंपिक्सचे सामने तर कधी भरतनाट्य मोहिनी अट्टम यानी हा छोटा पडदा आपले जीवन गजबजून टाकतो

सामने मुबईत असोत किंवा लाहोर, दिल्लीला असोत आता दूरदर्शनमुळे सारी अतरे नाहीशी झाली आहेत अशा वेळी कचेऱ्यातून हजारो-लाखो मुलाचे गावसकर होण्याचे जथाबद प्रयत्न यानी मुबई महानगरी अगदी क्रिकेटमय होते. गावसकर, विजय मर्चंट, वेंगसरकर याच्यासारखे आतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रिकेटपटू मुबईचे मग मुबईकराच्या रक्तातून क्रिकेटप्रेम का वहाणार नाही? कधी कधी यांचा अतिरेक होऊन जातीजातीत किंवा गटागटात मारामाऱ्या आणि खूप खटाबेट्टी झाले आहेत. या क्रिकेटवरून आठवण झाली इतर शहरात पावसाळा, हिवाळा, उन्हाळा असे ऋतू असतात पण मुंबईची सगळीच गोष्ट वेगळी आहे. मुबईचे सीझन्स अगदी वेगळे असतात क्रिकेट हा मुबईचा एक सीझन! जेव्हा घरातली आजोबा आजीसुद्धा गावसकरची सेंचुरी फक्त दोन धावानी चुकली म्हणून देवळात जाताना चुकचुकत असते शाळा कॉलेजाच्या परीक्षा हा मुबईचा आणखी एक सीझन, तेव्हा पुस्तके, पाट्या, पेन्सिल, दप्तरे, वह्या, अभ्यास, पेपर्स याशिवाय मुबईकराच्या तोंडी दुसरा विषय नसतो त्या पाठोपाठ येतो तो सुट्ट्याचा मोसम शेकडो बसेस, आगगाड्या, खाजगी मोटारी यातून लक्षावधी मुबईकर नोव्हेंबर आणि मे महिन्याच्या सुट्ट्यात परगावी जातात भारताच्या फाळणीच्या वेळी लोक टपावर बसूनही प्रवास करीत त्याची आठवण यावेळी होते गणेशोत्सव हा मुबईचा आणखी एक ऋतू-जेव्हा गणपती बाप्पा मोरयाच्या निनादाने आकाश भरून जाते

लोकल गाड्या ही मुबईची एक अफाट सोय आणि त्यात काही बिनसले की अफाट गैरसोय आहे भारतातल्या दुसऱ्या कोणत्याही शहरातले लोक मुबईइतके लोकल गाड्यांवर अवलबून नाहीत डोंबिवली, विरार, कल्याण अशा दूरदूरच्या ठिकाणाहून रोज आठ-पाच, आठ बत्तीस, किंवा नऊ-सात बडा फास्ट गाड्या पकडणारे किंवा त्या गाड्याना लोंबकळणारे चाकरमाने

मुबईकर ही अजब चीज आहे लोकलच्या गाड्यात गर्दीच्या वेळी जरा कुठे बिघाड झाला की या प्रामाणिक नोकरदाराच्यावर शरण तुला भगवता अशी लोकलची करुणा भाकण्याचा प्रसग येतो. अशा या लोकलवाल्याच्या अडचणी, जागेची टचाई, वाढती महागाई, अफाट गर्दी अशा अनेक आपत्तींना तोंड देऊनही मुबईकर चिकाटीने आणि उत्साहाने जगतो या घाईगर्दीतही त्याने आपल्या जीवनाचा एक कोपरा भाषणे नाट्य-सगीत चित्रपट यासारख्या सास्कृतिक गोष्टींसाठी राखून ठेवलेला असतो मुबई हे शहर नाही चागल्या अर्थाने ते एक व्यसन आहे लडनविषयी एक गोम आहे **Once a Londoner, always a Londoner.** तेच मुबईलाही लागू पडते जो एकदा मुबईकर झाला, तो कायमचा हिचाच झाला

दिल्ली हे मात्र अगदी वेगळे प्रकरण आहे दिल्लीला आदब आहे, शान आहे, ग्रेस आहे पण खलिस्तान पूर्वीची दिल्ली आणि आजची दिल्ली यात जमीन अस्मानाचा फरक आहे आजची दिल्ली ही भयग्रस्त दिल्ली आहे कोणी अतिरेकी अचानक स्कूटरवरून येईल आणि मशीनगन किंवा रिव्हॉल्वरच्या फैरी झाडून अनेक जणांना ठार करील याचा नेम राहिलेला नाही अधार पडल्यावर तर दिल्लीला एखाद्या लष्करी छावणीचेच स्वरूप येते अतिरेक्याच्या बेछूट कारवायामुळे ही खबरदारी आवश्यक आहे हे खरे असेल, तरी, त्यामुळे दिल्लीच्या निशाजीवनातील सहजता समूळ नष्ट झाली आहे प्रत्यक्ष अतिरेकी येऊन गोळ्या झाडण्याचे प्रकार जरी तुरळक असले तरी आजच्या दिल्लीकर सतत त्या धसक्यात असतो घरातून कामावर गेलेला कर्ता पुरुष सुखरूप सध्याकाळी परत येईपर्यंत गृहिणीच्या जिवात जीव नसतो खलिस्तान चळवळीपूर्वीची दिल्ली मात्र अशी नव्हती ती राजेशाही होती राजधानीची मुद्रा हिच्यावर खोल उमटलेली होती. कॅनॉट सर्कस विभागात फिरताना आपणच कोणी अमीर उमराव आहोत असे सामन्य कारकुनालाही वाटावे अशी त्या भागाची छाप होती

मी प्रथम दिल्ली पाहिली ती १९६० साली बद्रिनाथ-केदारनाथची यात्रा करून परतताना दीड दिवस दिल्लीला राहिलो होतो अर्थात ती दिल्ली आणि लाल किल्ला, बिर्ला मदिर, जम्मू मशीद इत्यादी प्रेक्षणीय स्थळे पहायची टागा अधिक बरा, कारण त्यातून जाताना हळूहळू दिल्लीचे, सौंदर्य उलगडत जाते तरी ती घाईगर्दीचीच भेट होती त्यानतर नोकरीसाठी मुलाखतीला, युसिसमध्ये असताना कचेरीच्या कामासाठी आणि नतर अनेक इतर कामांसाठी

मी दिल्लीला गेलो राहिलो एकदा तर पतप्रधान राजीव गाधी याची भेट घेण्यासाठीही महाराष्ट्राच्या मुख्यमत्र्याच्याप्रमाणे मीही दिल्लीला डेरेदाखल झालो होतो नतर माझ्या परप्राताच्या भेटीच्या योजनेसाठी गेलो त्यावेळी खुशवंत सिग, अमृता प्रीतम, श्रीकात वर्मा, बलवत गार्गी या नामवत लेखकानाही मी भेटलो होतो

पूर्वीच्या काळचा दिल्लीतील सर्वात मोहक भाग म्हणजे विशाल, हिरवेगार, डेरेदार वृक्ष आणि विस्तीर्ण हिरवळी इतकी झाडे आणि हिरवळी असलेले दुसरे शहर भारतात नाही या हिरवळीवर निवांतपणे फिरताना मोठी मौज वाटत असे दिल्लीत जसे खुल्या आकाशाचे सुखद दर्शन घडते, तसे मुबई-कलकत्त्यास घडत नाही दिल्ली शहराच्या वाढीला भरपूर वाव आहे पण मुबई हे बेट असल्याने शहराची वाढ इमारतीच्या उचीनेच होऊ शकते मुबईतल्या या उच इमारती म्हणजे बिन चेहऱ्याची सिमेंटची खुराडी. त्याना व्यक्तिमत्त्व नाही दिल्ली खुशवत सिगांचे घर निराळे, अमृता प्रीतम याचे निराळे आणि श्रीकात वर्मा याचेही वेगळे त्या घराना स्वत चे व्यक्तिमत्त्व आहे, स्वत ची शान आहे उलट मुबईच्या साहित्य सहवासात सब घोडे बारा टक्के अर्थात लेखकाना घोडे म्हणणे योग्य नाही पण मुबईतील मोठे फ्लॅट्स व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीने अगदी फ्लॅट्स जातात

शहर दिल्लीला जसा ओजस्वी व अनत घडामोडींनी भरलेला इतिहास भरलेला आहे इथे अनेक वैभवशाली बादशहा सम्राट आले आणि गेले सौंदर्य, क्रौर्य, पराक्रम, रक्तरजित क्रात्या, दगलबाजी, एकनिष्ठा, कत्तल आणि कलात्मकता याचे मानवाला स्तिमित करणारे प्रचड उलथापालथीचे प्रसग दिल्लीत घडले. त्या मानाने मुबईचा इतिहास अगदीच मिळमिळीत. कुतुब-मिनार, लाल किल्ला, जुम्मा मशीद, अशोकस्तभ, सफदरगज कबर, मोती मशीद अशी शेकडो वर्षांचा उज्ज्वल इतिहास उराशी धरून ठामपणे उभी असलेली स्मारके मुबईत अभावानेच तळपता औरंगजेब, शहाजहान, अकबर, इत्यादी मोगल बादशहानी दिल्लीला केवळ वास्तूच दिल्या नाहीत तर पाहणाऱ्याला चितन करायला लावणारा इतिहासही दिला या तक्तावर आलेले आणि गेलेले पराक्रमी, वैभवसपन्न सम्राट, बादशहाचा इतिहास आठवून उमर खय्यामचे बोल आठवतात.

दिल्ली हे शेरोशायरीचे शहर आहे, हे त्याचे एक मोठे आकर्षण आहे तीनशे वर्षांपूर्वीच्या मोगल बादशहांनी शायरीचा सन्मान केला बहादूर जाफर

तर स्वत च शेर लिहित असे अनेक नामवत शेरकार दिल्लीत होऊन गेले त्यानी प्रेयसीबरोबरीचे स्थान कोठ्याला आणि मदिरेलाही दिले दिल्लीकर अजूनही रात्र रात्र शेरोशायरीत रगून जातील. याउलट घड्याळाकडे सतत लक्ष ठेवून असलेल्या मुबईकराला सर्वोत्कृष्ट सगीत नाटकाच्या प्रयोगाच्या वेळीही शेवटची गाडी मिळेल असे जाहीर आश्वासन द्यावे लागते. शेर आणि गझल म्हटल्यावर दिल्लीतला कोणत्याही वयातला रसिक 'अभी तो मैं जवान हूँ' म्हणतो गाण्यावरून जीव ओवाळून टाकणारी ही जिद्द मुबईकराना नाही त्यांच्या वेळापत्रकात ८ ते ९ ब्रेक फास्ट, १० ते ५ कचेरी, रात्री ९ ते ११ ३० भीमसेन जोशी, अशा निर्जीव नोंदी असतील. अकरा पस्तीस झाले की भीमसेन कितीही का रंगलेले असेनात, मुंबईकर सकाळी मीटिंग आहे, म्हणून तर बैठकीतून उठून जाईल. दिल्लीकर मात्र मिटींग जाऊ जहन्नममें म्हणून बैठक सपेपर्यंत जागचा हलणार नाही. नासीर काजमी म्हणतो, अपनी धून में रहता हूँ म्हणजे मी माझ्या मस्तीत जगणारा मुक्त शायर आहे. मिर्जा गालीब सागतो, दिल ढूढता है वही फुरसत के चार दिन! दिल्लीकर इश्क आणि खुशालीसाठी फुरसत शोधतील तर मुंबईकराना कचेरीच्या कामापुढे प्रेम करण्यासाठी फुरसत नसते. त्याला वेळ असतो फक्त सेक्ससाठी पण प्रेमासाठी !तोबा तोबा!

ऊर्दु भाषेत एक काल्पनिक पक्षी आहे त्याची सावली ज्याच्या अगावर पडते तो बादशहा बनतो अशी समजूत आहे उर्दू शायरवाल्याच्या अंगावर या हुमाची सावली पडलेली असते. या कावळ्याने पिंडाला स्पर्श केला की माणसाला सद्गती मिळते ही आपली समजूत. जिवतपणी सामान्य माणसालाही बादशहा करणाऱ्या हुमा पक्षाच्या कल्पनेतील रसिकता कुठे आणि भकास स्मशानात कावळ्यासारख्या बेसूर, कुरूप आणि अरसिक पक्षाचे पिंड स्पर्शासाठी पाय धरणारे मुंबईकर कुठे? अशी ही रसिक दिल्ली पण आता ती भीतीग्रस्त झाली आहे बादशहा जाफरच्याच एका गजलेत म्हटल्याप्रमाणे दिल्लीची आज अवस्था झाली आहे तो म्हणतो,

*आग था ये शहर देहली अब हुआ ऊजाड दयार!*
*क्यों जफर ये क्या हुआ? जीवन किधर जाता रहा!*

(हे दिल्ली शहर किती पुढारलेले होते आता ते उजाड स्मशानघर झालं आहे, अरे जफर काय झालं हे? तुझ्या तारुण्यातील जवान दिल्ली कुठे गेली)

मुंबई आणि कलकत्ता यापेक्षा कलकत्ता हे अगदीच वेगळे शहर आहे.

या शहराची बसमधून किंवा रिक्षातून धावती सफर केली, तर हे भयकर बकाल, घाणेरडे, गर्दीचे आणि गडबडाटाचे शहर आहे एवढीच त्याची छाप आपल्या मनावर उमटते. कलकत्ता असे आहे हे तर खरेच पण कलकत्ता याहून कितीतरी अधिकही आहे एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका या जगातील आदर्श ज्ञानकोशात म्हणतो आहे की भारतातील सांस्कृतिक कार्याचे सर्वश्रेष्ठ केंद्र म्हणजे कलकत्ता शहर. नोबेल पारितोषक हे जागतिक कीर्तीचे पारितोषक ज्या तीन जणाना मिळाले व ते तिघेही कलकत्त्याचे. रविंद्रनाथ टागोर, जगदीश चद्र बोस आणि मदर तेरेसा. कलकत्त्यास दर चौरस किलोमीटरला जेवढे कवी आहेत तेवढे जगातील इतर कोणत्याही शहरात नाहीत. जगातील सर्वात गलिच्छ शहर म्हणून याच कलकत्त्याचा पहिला क्रमाक आहे या शहराच्या काही भागात जेवढी दाट वस्ती आहे, तेवढी जगाच्या इतर कोणत्याही ठिकाणी नाही. तागावर प्रक्रिया करणारे कलकत्ता हे जगातील पहिल्या क्रमाकाचे महानगर आहे. समुद्रापासून शभर मैल दूर असूनही हुगळी या गंगेच्या विशाल फाट्यामुळे भाताची ४५ टक्के आयात-निर्यात या कलकत्ता बदरातून होते लोकसंख्येच्या बाबतीत कलकत्त्यावर जेवढी आक्रमणे झाली, तेवढी भारतातील इतर कोणत्याही शहरात झाली नाहीत १९०५ साली लॉर्ड कर्झनने बगालची फाळणी केली तेव्हा लोकांचे लोंढे कलकत्त्यात घुसले भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी बगालची पुन्हा फाळणी झाली आणि पूर्व बंगाल पाकिस्तानला दिला गेला, तेव्हा लाखो लोक-बहुतेक हिंदू-कलकत्त्याच्या आश्रयाला आले त्यानतर स्वतंत्र बगाल निर्मिती झाली, तेव्हा पुनः लोकाचे लोंढे आधीच गर्दी व गलिच्छता असलेल्या या कलकत्ता शहरात आले.

इतके जगप्रसिद्ध कलकत्ता. पण आश्चर्य असे, की कलकत्ता या नावाचे रेल्वे स्टेशन अस्तित्वात नाही. कलकत्त्याला जायचे तर हावडा स्टेशनचे तिकीट काढायचे, सुप्रसिद्ध हावडा पूल ओलांडायचा आणि कलकत्ता शहरात जायचे असा प्रकार आहे कलकत्त्याच्या सार्वजनिक बसेस म्हणजे मधाचे पोवळे मधमाशानी लहडलेली असते तशी एक लाबलचक बस माणसांनी लहडलेली असते हे दृश्य. त्या गर्दीतून तुम्ही आत घुसण्यात किंवा बाहेर लटकण्यात यशस्वी झालात तर तुम्हाला बस कडक्टरचा तारस्वर ऐकू येईल, आशून, आशून, बोशून बोशून, धोरून धोरून, चोलून चोलून! कलकत्त्याचा सराव झाली की या अगम्य शब्दांचा तुम्हाला अर्थ कळतो तो असा · या, या बसा, बसा. धरा, धरा चला, चला! शेवटचे बोलून हे ड्रायव्हरला उद्देशून म्हटलेले

असते पन्नास माणसाची क्षमता असलेल्या बसमध्ये दीडशे माणसे कोंबलेली व लटकत असलेली पाहिल्यावर नव्याने लटकणाऱ्या उतारूच्या दृष्टीने बसून घ्या, या शब्दाना काहीच अर्थ नसतो येथील टॅक्सीत चार उतारू घेण्याचा सरकारी नियम असला, तरी आठ ते अकरा उतारू बिनदिक्कतपणे घेणे हा टॅक्सीवाल्याचा नियम आहे साठ हजार सायकल रिक्षा या महानगरीत आहेत मोठ्या रस्त्यावरून या न्यायच्या नाहीत असा नियम असूनही लॅन्डस डाऊन किंवा पार्क या मोठ्या रस्त्यावरही या सर्रास दिसतात अलिकडे या शहरात जमिनीखालची रेल्वेही सुरू झाली आहे, ती मात्र नवी असल्याने झगझगीत आहे

मुबईसारख्या शहरात झोपडपट्ट्या आहेत, पण कलकत्ता त्याही पुढे गेले आहे तिथे टेकडीत गुहा खोदून त्या गुहेत राहणारे लोक आजही दिसतात याच कलकत्त्यात व्हाइसरॉयचा वाडा इतका मोठा आहे की, व्हाइसरॉयला आपल्या शयनगृहातून दिवाणखान्यापर्यंत चालण्यासाठी तीनशे यार्डाचे अंतर काटावे लागत असे सर्वात दरिद्री म्हणून गणल्या जाणाऱ्या या शहरात साहित्य, सगीत याचा परमोत्कर्ष असावा ही कुतुहलाचीच घटना आहे आपल्याकडे दिवाळी अक निघतात ते फार तर दोनशे अडीचशे पानाचे पण कलकत्त्यात प्रसिद्ध होणारे पूजा अक आठशे ते हजार पानाचे असतात यावर विश्वास बसण्यासाठी ते प्रत्यक्षातच पहायला हवे रवींद्र सगीत हा भारतीय सगीताचा अगदी वेगळा प्रकार याच शहरातील रवींद्रनाथ टागोर यानी दिला देशातील सर्वाधिक खपाचे दैनिक आनद बझार पत्रिका आणि सर्वाधिक खपाचे साप्ताहिक देश याच शहरातून प्रसिद्ध होतात वंदे मातरम् या राष्ट्रगीताचे लेखक बकिमचद्र याच शहराचे, रामकृष्ण परमहस, स्वामी विवेकानद, देशबधू दास, नेताजी कॅ सुभाषचद्र बोस, योगी अरविंद घोष, रविंद्रनाथ टागोर, जगदीशचद्र बोस, बिपिनचद्र पाल याच्यापासून ते आजचे सर्व श्रेष्ठ दिग्दर्शक सत्यजित रे याच्यापर्यंत कलकत्ता शहराने देशाला जेवढी नररत्ने दिली तेवढी कोणत्याही एका भारतीय शहराने देशाला दिली नाहीत जवळचेच शातीनिकेतन हा जागतिक शिक्षण क्षेत्रातील एक अभिनव व यशस्वी झालेला शिक्षण प्रकार आहे फुटबॉलच्या क्षेत्रात कलकत्त्याचा मोहन बगान सघ अजिक्य आहे सी व्ही रामन हे मद्रासचे असले तरी त्याना १९३० साली नोबल पारितोपिक मिळाले तेव्हा ते कलकत्त्यातच होते जात्रा हा अद्भुत बगाली नाट्य प्रकार म्हणजे जागतिक नाट्यक्षेत्रातील चमत्कार आहे

महाराष्ट्र आणि कलकत्ता याचा अतूट सबध आहे वदे मातरम् या गीताचे लेखक बकिमचद्र यानी सुप्रसिद्ध आनदमठ ही कादबरी लिहिली या कादबरीचा नायक म्हणजे महाराष्ट्राचे क्रातिकारक वासुदेव बळवत फडके याच्यावरून घेतलेली चरित्ररेखा आहे वदेमातरम् या गीताचा समावेशही याच कादबरीत आहे भारताच्या स्वातत्र्यलढ्यात लाला लजपतराय, लोकमान्य टिळक आणि बिपिनचद्र पाल ही त्रयी लाल बाल पाल या नावाने मान्यता पावली होती खुदिराम बोस यानी १९०८ रोजी न्यायाधीश किंग्जफोर्डवर टाकलेला बॉम्ब पुण्याहून नेला होता क्रातिकारक व नतर योगी झालेले अरविंद घोष याना माडवले या मराठी क्रातिकारकाने क्रातिकार्याची दीक्षा दिली होती लोकमान्य टिळकानी महाराष्ट्रातच नव्हे तर कलकत्त्यातही शिवजयती उत्सव सुरू केले त्यापासून स्फूर्ती घेऊन बगालच्या दुर्गापूजेला कलकत्याने राष्ट्रीय स्वरूप दिले रविंद्रनाथ टागोरानी मराठी व बगाली बाधवाना एकत्र जोडणारे काव्य छत्रपती शिवाजी महाराजाच्यावर लिहिले, त्यात त्यानी म्हटले आहे

*मराठी साथे आज बगाली*

*एक कठ बोलो*

*जयतु शिवाजी*

आजही मुबईत रविंद्र नाट्यगृह आहे आणि लोकमान्य टिळक याचा पुतळा कलकत्त्याच्या प्रमुख चौकात आहे नेताजी सुभाषचद्र बोस याना ब्रिटिशानी हद्दपार करून मडाले येथे ठेवले होते तेथून नेताजी सुभाषचद्र यानी लोकमान्याचा असा गौरव केला आहे की, तिथे साधी झोप येणेसुद्धा शक्य नाही अशा या खडतर जागी ज्या लोकमान्यानी गीतारहस्यसारखा अलौकिक ग्रथ लिहिला, ते लोकमान्य धन्य होत! १९३९ साली स्वातत्र्यवीर सावरकर आणि नेताजी सुभाषचद्र याची भेट झाली होती. नतर नेताजींनी जी स्वतत्र हिंदवी सेना उभारली, हिची स्फूर्ती त्याना या भेटीतून मिळाली होती

कलकत्ता ही भारतातील ब्रिटिश साम्राज्याची पहिली राजधानी होती १७७२ साली ईस्ट इडिया कपनीने कलकत्याची निवड राजधानी म्हणून केली १९१२ पर्यंत ब्रिटिशानी याच शहरातून देशावर राज्य केले दरम्यान ईस्ट इडिया कपनीचे विसर्जन होऊन ब्रिटनच्या राजाकडे किंवा राणीकडे ही सत्ता सर्वे सर्वा झाली पण लॉर्ड कर्झन याने बगालची फाळणी केली, तेव्हा देशात आणि विशेषत बगालमध्ये ब्रिटिशाच्या विरुद्ध एवढा तीव्र असतोष उफाळला की, प्रक्षुब्ध बगालपासून ब्रिटिशानी अक्षरश: पळ काढला आणि राजधानी

दिल्लीला नेली पण अजूनही व्हिक्टोरिया मेमोरियल किंवा राजेशाही क्लब्समध्ये या ब्रिटिश साम्राज्याची परंपरा कलकत्यास दिसते आजही अलिपूरसारख्या विभागातील बिर्ला किंवा इतर कोट्याधीशाचे तटबदी आडाचे बगले व्हाइसरॉयच्या वैभवाला लाजवतील पण हे अपवाद. सर्वसाधारण कलकत्ता निवासी हे बकाल व निर्धन. पण मला या कलकत्याचे कौतुक वाटते ते अशासाठी की उत्तुंग सास्कृतिक कामगिरीच्या आड कलकत्याने आपले हे दारिद्य कधी येऊ दिले नाही. जगातील सर्वात गलिच्छ अशा या शहराचा झेंडा साहित्य, नाट्य, संगीत, नृत्य, चित्रकला या क्षेत्रात उच्च फडकत आहे विमल मित्र याच्या रूपाने श्रेष्ठ बगाली साहित्याची परंपरा आजही अभिमानाने मिरवीत आहे माझे भाग्य असे की साहेब बिबी गुलामचे हे लेखक, विमल मित्र, माझे जिव्हाळ्याचे स्नेही झाले आहेत आणि, त्यानी आपले एक पुस्तक मला अर्पण करताना मेरे अभिन्न मित्र असा माझा उल्लेख केला आहे. कोणत्याही पारितोषिकापेक्षा हा सन्मान मला मोठा वाटतो.

मुंबई, दिल्ली आणि कलकत्ता यांच्यापेक्षा मद्रासचीतऱ्हा काही औरच आहे. आपण सर्वत्र दाक्षिणात्याना मद्रासी म्हणतो, पण मद्रास ही तामीळनाडूची राजधानी आहे आणि केरळ तर वेगळेच राज्य आहे या जितके गतिमान तितकेच मद्रास हे थंड, हळूहळू जाणारे. अगदी स्लो मोशन मधले शहर आहे. तिथे कुणालाही कसलीही घाई नाही. मद्रासमधील कोणत्याही सरकारी अगर बिनसरकारी कचेरीत तुम्ही दुपारी बारा ते तीनपर्यंत केव्हाही गेलात, आणि कोणा अधिकाऱ्याची किंवा कारकुनाची चौकशी केलीत, तर इथे त्याच्या दुर्दैवाने हजर असलेला माणूस सागेल, बाबू टिफिन के लिये गया है टिफिन म्हणजे जेवण मद्रासच्या कचेऱ्यात तीन तीन तास कर्मचारी बेपत्ता असतात ते टिफिन खाण्यासाठी महाराष्ट्रात पेशवाईच्या कारभाराची या वेळी आठवण होते. अजूनही पुण्यातील काही कचेऱ्या दुपारी बारा ते तीन पर्यंत पेशवाई काळाप्रमाणे जेवणासाठी बंद असतात पुणेकर सकाळी डाळभात आणि रात्री भात डाळ खाणार. पण त्याला त्यासाठी सुटी मात्र तीन तास पाहिजे असते मद्रासी कर्मचारी साबार भात खातो, तो कसलीही घाई, गडबड न करता अगदी निवातपणे हे शहर इतके सुस्त आहे की, मला वाटते मद्रासच्या शर्यतीत घोडेसुद्धा एकमेकाना म्हणत असतील, तुम्ही पुढे जा, मला काही घाई नाही. मी येईन सावकाश तासाभरान.

मुंबईचे फ्लोरा फाऊंटन, दिल्लीची कॅनॉट प्लेस, कलकत्याची चौरंगी

तसे मद्रासचे पेरीज कॉर्नर हे अतिशय गजबजलेले ठिकाण या पेरीज कॉर्नरवर बसेस आणि मोटारी किंचित वेग वाढवत असतील पण बाकी सर्वत्र आराम आशियातील द्राविड संस्कृतीचे माहेरघर म्हणजे मद्रास द्राविडी प्राणायामा-प्रमाणे ही संस्कृतीही निष्कारण वेळकाढू तामीळ ही त्याची भाषा तामीळ ही जगातील सर्वश्रेष्ठ भाषा आहे असे येथील पंडित मानतात कलकत्ता आणि मद्रास यांच्यातील एक लक्षणीय समान दुवा म्हणजे या दोन्ही शहरांनी आणि या दोन्ही राज्यांनी आपले पारंपारिक कपडे बदलले नाहीत मराठी माणूस शंभर वर्षांत पागोटे, खमीस, धोतर यातून बुशशर्ट आणि पँटमध्ये गेला पण बंगाली आणि तामिळी लोकांनी झब्बा धोतर किंवा सदरा-लुंगी यात कसलाही बदल केला नाही तामिळनाडूचा मुख्यमंत्री रामचंद्रन पंतप्रधानांना भेटायला जाताना कोट-पँट घालीत नाही सदरा आणि लुंगीतूनच जात असे सी. राजगोपालाचारी हे भारताचे पहिले गव्हर्नर जनरल होते तेही मद्रासच्या पारंपारिक साध्या वेषातच इतकेच नव्हे तर गव्हर्नर जनरल असतानाही श्री राजगोपालाचारी आपले कपडे स्वत.च धूत असत. या मद्रासी लोकांचे एक कौतुक आहे त्यांना धनाढ्यतेने दिपवले नाही त्यांना पैशाची मस्ती कधी चढली नाही. कामराज आदी साध्या वेषात काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून देशाची सूत्रे चालवीत होते

उलट मला मुंबईची एक गोष्ट अजिबात आवडत नाही ती म्हणजे पैशाची मस्ती मुंबईत काम-धंदे करून आणि वाममार्गाने कोणी असंस्कृत माणूस पैसा मिळवतो लाल रंगाची मारुती गाडी घेतो आणि अशा दिमाखात फिरतो की जणू तो म्हणजे, माझीच लाल रस्त्यावरून भीमसेन गेले काय, किंवा कुसुमाग्रज चाले काय, असा अर्ध्या हळकुंडाने पिवळा झालेला मुंबईकर एका फडतूस मोटारीच्या जोरावर त्यांना तुच्छ मानतो मद्रासमध्ये हा गर्व नाही हा अहंकार नाही. मद्रासी लोक गुरुपरंपरा मानणारे आहेत. अत्यंत धार्मिक आहेत मद्रासचा अधिकारी आय सी एस असो, एखाद्या देशाचा ॲम्बॅसॅडर असो किंवा पंतप्रधानाचा चिटणीस असो, तो कपाळावर भस्माचे पट्टे ओढून कचेरीत जाणार त्याला आपल्या धार्मिकतेची लाज वाटत नाही, त्यात काही लपवावे असे वाटत नाही, हा त्याचा मोठेपणा आहे म्हणजे देवधर्म करणारा मोठा आणि न करणारा लहान असे नाही. तर ज्यावर आपली श्रद्धा आहे, त्या धर्माचा टिळा मद्रासी माणूस अभिमानाने कपाळावर मिरवतो जर त्याच्या बॉसने त्याला सांगितले तू भस्म न लावता कचेरीत ये, तर मद्रासी

माणूस नोकरी सोडेल पण भस्म सोडणार नाही

हिंदू हे भारतातील सर्वश्रेष्ठ दर्जाचे दैनिक मद्रासचे ब्रिटिशांच्या ऐन वैभवाच्या दिवसात, भारतात कॉंग्रेस हा जनतेचा पक्ष स्थापन करावा ही बहुमोल सूचना प्रथम हिंदूने केली या सूचनेचा स्वीकार होऊन मग मुबईला कॉंग्रेसची स्थापना झाली मी मद्रासला गेलो, तेव्हा तेथे माझ्या ओळखीचे कोणीही नव्हते मी सरळ हिंदू दैनिकाच्या कचेरीत गेलो आणि सपादकाना भेटलो त्यानी मला स्थानिक लेखकाचे पत्ते दिले आणि माझ्या कामात मार्गदर्शन केले चो रामस्वामी हे दक्षिण भारतातील सर्वश्रेष्ठ विनोदी लेखक मद्रासचेच या शतकातील सर्वश्रेष्ठ जागतिक कीर्तीचे गणितज्ञ म्हणून मान्यता पावलेल्या श्रीनिवास रामानुजम् याची जडण घडण मद्रासमध्येच झाली

मुबई, दिल्ली, कलकत्ता आणि म्हैसूर या चारही शहरापेक्षा अधिक धार्मिक शहर मद्रास आहे आपल्याकडे रामायण आणि महाभारत याना जी सर्वमान्यता आहे, तीच तामिळ भाषिकात कुरुल या महाकाव्याला आहे दोन हजार वर्षांपूर्वीचे हे महाकाव्य लिहिणारे थिरुवल्लुवर हे मद्रासच्याच मैलापूर भागात राहात होते, तामिळनाडू सरकारने तीन कोटी रुपये खर्चून त्याचे स्मारक मद्रासमध्ये बाधलेले आहे एक प्रचंड सभागृह बत्तीस फूट उचीचा दगडी रथ आणि थिरुवल्लुवर याचा पुतळा असे या स्मारकाचे स्वरूप आहे जीवन, धर्म, अर्थ व काम याविषयी माणसाने कसे वागावे याविषयी कुरुल ग्रथाच्या २६६० ओळीत मार्गदर्शन करण्यात आले आहे मद्रास येथे सेंट जॉर्ज नावाचा किल्ला ब्रिटिशानी १६४१ साली बांधला तीच ईस्ट इडिया कपनीची पहिली भारतातील कचेरी वॉटर्लूच्या लढाईत सम्राट नेपोलियनचा पराभव करणारा ॲडमिरल वेलिंग्टन एके काळी या किल्ल्यात राहात होता त्याशिवाय क्लाइव्ह, वॉरन हेस्टिग्ज, कॉर्नवॉलिस असे ब्रिटिश श्रेष्ठ अधिकारी ज्यानी आपण शाळेत होतो तेव्हा इतिहासाच्या पेपरमध्ये फार त्रास दिला, या किल्ल्यात राहात होते मद्रासचे कपालेश्वर मदिर दक्षिणेतील अत्यत प्रसिद्ध मदिरापैकी एक आहे मद्रासचा एक गुण म्हणजे येथे भरपूर स्वस्ताई आहे भात हे मुख्य अन्न त्यावर भरपूर साबार आणि वाटीभर भाजी घेतली की मद्रासी माणूस तृप्त होतो अनेक दक्षिण भारतीय मुबईत पैसा कमावतात निवृत्तीनतर मद्रासला जातात आणि शात व स्वस्त जीवन जगतात मुबई, दिल्ली व कलकत्ता या शहराच्या तुलनेने मद्रासमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण अतिशय कमी आहे याचे एक कारण म्हणजे अन्नधान्याची सुबत्ता आणि स्वस्ताई, लोकाची राहणी साधी, त्यामुळे कोणत्याही

मार्गाने श्रीमंत होऊन गाड्या उडवाव्यात, चैन करावी, त्यासाठी लोकाना लुबाडावे ही वृत्ती नाही मद्रासमध्ये स्थायिक झालेले मराठी भाषिकही तेथे सुखी आहेत

या चार महानगराहून अगदी वेगळे आणि विलोभनीय व्यक्तिमत्त्व लाभले आहे ते म्हैसूर शहराला लोकवस्तीच्या बाबतीत या चारींची व म्हैसूरची तुलनाच होत नाही. मुबईची लोकसख्या पच्याऐंशी लाखावर, मद्रासची जेमतेम सहाच लाख, पण या शहराला जी शान आहे, खानदान आहे तसे या चार महानगराना नाही भारतीय स्तरावर म्हैसूर आणि जागतिक स्तरावर हॉलडमधील ॲमस्टरडॅम ही माझी सर्वात आवडती शहर आहेत याच मुख्य कारण म्हणजे म्हैसूरची अत्यत आल्हाददायक, समशीतोष्ण हवा म्हैसूरच उष्णतामान २० ते ३० पर्यंतच फिरत असत नोव्हेंबर ते जानेवारी अखेरपर्यंत तर म्हैसूरच्या हवेपुढे स्वर्गातली हवाही तुच्छ असेल अस वाटत अगदी ऐन उन्हाळ्यातही हे शहर मन शात करत या निसर्गदत्त गुणाबरोबरच भरपूर झाडी, विस्तीर्ण उद्यान आणि पाण्याची मुबलकता हे म्हैसूरचे प्रयत्नपूर्वक जोपासलेले गुण आहेत म्हैसूरचे राजे कला व साहित्यप्रेमी त्यानी अनेक लेखक, चित्रकार, सगीतज्ञ याना आपुलकीचा आश्रय दिला. त्याच्या उत्तेजनाने सर्व कलाना इथे बहर आला आता सस्थाने खालसा झाली तरी पूर्वीच्या वातावरणाचा प्रभाव तसाच आहे किंबहुना वाढत आहे. या शहराला स्वतत्र विद्यापीठ आहे कर्नाटकची राजधानी म्हैसूर असावी की बगलोर हा प्रातरचनेच्या वेळी वादाचा विषय होता पण राजधानी बगलोरला गेली तेच बरे झाले कारण त्यामुळे राजकीय व्यापारी, औद्योगिक बजबजपुरीपासून म्हैसूर हे सुदर शहर वाचले राजा रविवर्मा याच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या सुसस्कृत शहरावर राजधानीचा बोजा पडला नाही तो त्याच्या फायद्याचाच ठरला भारतातील सर्वश्रेष्ठ इजिनियर श्री मोअगुडम् विश्वेश्वरय्या यानी म्हैसूरच्या सीमेवर कृष्णराज सागर तलाव बाधून म्हैसूरला पाण्याचा अखड पुरवठा होईल अशी व्यवस्था केली म्हैसूर सस्थानचे कर्तबगार दिवाण सर मिर्झा इस्माईल यानी धरणाजवळ वृदावन उद्यान हे अनत रगीबेरगी कारजानी भरगच्च भरलेले अद्‌भुत उद्यान केले या लहानशा गावात अनेक श्रेष्ठ भारतीय लेखक राहतात ज्याचे नाव नोबेल पारितोषकाच्या सदर्भात घेतले जाते, ते मालगुडी डेज चे लेखक आर के नारायण म्हैसूरमध्येच एका शात निवात बगल्यात राहतात त्याना मी भेटलो आहे. इतका तृप्त, समाधानी व निरपेक्ष लेखक मी पाहिला नाही जागतिक कीर्तीचा हा लेखक इतका साधा आहे की तो आपले जेवण स्वत:च तयार करतो ज्ञानपीठ मिळविणारे नामवत

कवी पट्टप्पा ऊर्फ कुवेंदु हेही म्हैसूरमध्ये राहतात त्यानी त्याचेही साधे, ज्ञानमार्गी जीवन पाहण्याची सधी मला मिळाली होती लेखकाच्या वास्तव्यासाठी म्हैसूर हे आदर्श गाव आहे म्हैसूरचा दसरा जगप्रसिद्ध आहे तोही मी पाहिला आहे राजवाडा, जयचामरेंद्र आर्ट गॅलरी, वृदावन ही म्हैसूरची खास आकर्षणे, त्याची राजेशाही, वैभवशाली आणि सुसस्कृत मुद्रा आपल्या मनावर कायमची ठेवून जातात

म्हैसूरला रुक्ष, व्यक्तिमत्त्व अशा गगनचुबी सिमेंट कॉंक्रीटच्या इमारतींचा वेढा पडलेला नाही. अजून झाडीत विसावलेले एकमजली बगले भरपूर दिसतात कधी कधी झाडाच्या छायेत छोटेसे मगलोरी कौलाचे मनोहर घर दिसते या घराना स्वत चे व्यक्तिमत्त्व असते म्हैसूरचे रस्ते भरपूर प्रशात, दोन्ही बाजूनी डेरेदार, वृक्षाच्या कमानी असलेले आणि अत्यत स्वच्छ आहेत सकाळी बाजारहाट करताना, मदिरात देवदर्शनासाठी जाताना किंवा संध्याकाळी फिरायला जाताना मित्राच्याबरोबर सुखदु खाच्या गोष्टी करण्यासाठी म्हैसूरकराच्याजवळ मुबलक वेळ असतो मुंबईकरासारखे ते वारवार घड्याळाकडे पहात गप्पांची रंगत घालवीत नाहीत म्हैसूरचा अस्सल तुपातला डोसा जिभेवर विरघळतो त्यावर म्हैसूरची कॉफी आणि मग थोडीशी सुपारी झाली की मस्तपैकी न्याहरी होते म्हैसूर सँडल साबणाचा खानदानी मद सुगध स्नानाच्या वेळेपासून सध्याकाळपर्यंत मन प्रसन्न ठेवीत असतो रस्त्यावर घाई गर्दी नाही की धावपळ नाही लोक कसे स्वत· सुखात जगत असतात, जगण्याची सस्थानी मौज लुटीत असतात व्यापारी मुंबई, राजकीय दिल्ली, गजबजलेले कलकत्ता आणि मदगती मद्रास यापेक्षा म्हैसूर खानदानी आणि संस्कारी शहर माझे सर्वात आवडीचे शहर आहे.

भू-प्रयारा
क्र. क्र. ६५० ३६८५३ २३।६।०७

REFBK-0026953